म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८७५

# कै. राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक लेख

(दुर्गा भागवत)

REFBK-0007382



जो. क्र. ७१९९६
२०।६।८०

निर्णय
१८४५

मञ्जुषा ७१९९६ दि: २३।६।८०
ग्रंथांक १८४५

# कैं. राजारामशास्त्री भागवत

यांचे

# निवडक लेख

REFBK-0007382

अभिनव प्रकाशन, मुंबई नं. १४

किंमत पांच रुपये

प्रथमावृत्ति, जुलै १९५०

मुद्रकः–म. शं. साठे, दी प्राज्ञ प्रेस, वांई. ( सातारा ).
प्रकाशकः–वामन विष्णु भट, अभिनव प्रकाशन,
२२/३ अहमद सेलर बिल्डिंग, नायगांव, मुंबई १४

रा. ग्रंथ संग्रहालय, नागपूर म्युनिसि.
क्रमांक ७१११६ दि. १०/३/६३
वर्ग क्रमांक २०४१ नोंद दि. २४/३/६०

कै. राजारामशास्त्री भागवतांस —

विक्षिप्त तुला म्हणोत कोणी, करो कुणी हेळणा
ढोंग, रूढिचा नाश ह्याच ना विक्षिप्तांच्या खुणा ?
विचारक्रांति इथें आढळे हृदयांतील वेदना
करांत कर घालुनी चालल्या बुद्धि आणि भावना

सोपानदेव चौधरी

मराठी [illegible]
[illegible] बि:
[illegible] नों: दि:

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना ... ... ... ... ... ... | २–८ |
| ( १ ) | प्राचीन भरतखंडस्थिति. ( कविता ) ... ... ... | ९ |
| ( २ ) | शिवकुमरी व पातकराव. ( कादंबरी ) ... ... ... | ११ |
| ( ३ ) | कृत्रिमपणाचा व सरळपणाचा परिणाम. ( कथा ) ... | १३ |
| ( ४ ) | अन्न. ... ... ... ... ... ... | २५ |
| ( ५ ) | गोंडी भाषा. ... ... ... ... ... | २८ |
| ( ६ ) | गोंडी गीतें व गोंडी रिवाज. ... ... ... | ३३ |
| ( ७ ) | अवतार. ... ... ... ... ... ... | ४१ |
| ( ८ ) | शिमग्याचा सण. ... ... ... ... ... | ४२ |
| ( ९ ) | चातुर्वर्ण्य. ... ... ... ... ... ... | ४८ |
| ( १० ) | चार भावंडें. ... ... ... ... ... | ५२ |
| ( ११ ) | मऱ्हाठा शब्दाचा जुनाटपणा.... ... ... ... | ६० |
| ( १२ ) | 'महाराष्ट्रा'ची व्युत्पत्ति. ... ... ... ... | ६२ |
| ( १३ ) | पेशवाई. ... ... ... ... ... ... | ६४ |
| ( १४ ) | सत्यशोधक समाज आणि दीनबंधु. ... ... ... | ७३ |
| ( १५ ) | महाराष्ट्र मंडळांतील ब्राह्मणांविषयीं कांहीं तुरळक विचार. | ७५ |
| ( १६ ) | आमचा देश, आमचे देशी लोक आमची देशी भाषा. ... | ७९ |
| ( १७ ) | आमचा देश आर्यावर्ताच्या किंवा पुण्यभूमीच्या बाहेर आहे. | ८२ |
| ( १८ ) | प्राक्शालिवाहनी काळांतील वसाहती. ... ... ... | ९० |
| ( १९ ) | ज्ञानेश्वरी महासागरांतील बुड्या. ... ... ... | ९६ |
| ( २० ) | कोंकण गुजराथेंत मोडलें जात असे ( ? ) ... ... | ९८ |
| ( २१ ) | फार्सी भाषेच्या अवगाहनानें सहज सुचणारे कित्येक मुद्दे. | १०० |
| ( २२ ) | मराठ्यांमध्यें दुफळी व शाहूची फत्ते. ... ... ... | १०३ |
| ( २३ ) | ऋतूंची लक्षणें. ... ... ... ... ... | १०७ |
| ( २४ ) | इंग्रज व बंडवाले. ... ... ... ... ... | १०९ |
| ( २५ ) | मराठी धर्माचें इतिहासानिशीं स्वरूप. ... ... ... | ११२ |

(२६) उमेदवारांची साडेसाती. ... ... ... ... १२२
(२७) शिवाजीचें स्मारक. ... ... ... ... ... १२६
(२८) ज्ञानोबाची पालखी व गणेशचतुर्थी. ... ... ... १३०
(२९) न मांसभक्षणे दोष: ... ... ... ... ... १३२
(३०) पुरूरवा–उर्वशी. ... ... ... ... ... १४१
(३१) आजच्या ब्राह्मणांची समजूत अगदीं उलटी कशी झाली ? १४५
(३२) फिरंगी गव्हर्नर आल्मीदा व कोचीनचा राजा. ... १४७
(३३) बायकांची मुंज. ... ... ... ... ... १४९
(३४) ब्राह्मणांचा स्वधर्म. ... ... ... ... ... १५२
(३५) रँगलर परांजपे. ... ... ... ... ... १५८
(३६) महार कोण ? ... ... ... ... ... १६०
(३७) श्वेताश्वतरी विद्येचा अधिकारी. ... ... ... १६२
(३८) कलिवर्ज्य म्हणजे काय ? ... ... ... ... १६४
(३९) राजसत्ता आणि धर्म. ... ... ... ... १६६
(४०) आज क्रांति हवी आहे. ... ... ... ... १६८
(४१) सहा शत्रु व मित्र. ... ... ... ... ... १६८
(४२) अभ्यंकर आणि रामायण. ... ... ... ... १७०
(४३) समुदाय व व्यक्ति. ... ... ... ... ... १७७
(४४) बौद्धधर्म काळोखच. ... ... ... ... १८४
(४५) महाभारतांतील आख्यानें. ... ... ... ... १८६
(४६) शाळांतून धर्मशिक्षण ... ... ... ... १८८
(४७) विवाह व लग्न. ... ... ... ... ... १९३
(४८) क्षत्रियांचें अस्तित्व. ... ... ... ... ... १९७
(४९) जिजाबाई. ... ... ... ... ... ... १९९
(५०) हिंदु व हिंदु धर्म. ... ... ... ... ... २००
(५१) मराठीचा एक कॅथोलिक भक्त. ... ... ... २०६
(५२) राजारामशास्त्री भागवतांचीं कांहीं मननीय वचनें ... २१०

# परिशिष्ट

## रा. रा. भा. यांच्या वाङ्मयाचें दिग्दर्शन

पृष्ठ


( १ ) शास्त्रीबोवांचे ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालेलें वाङ्मय व व्याख्यानें ( मराठी व इंग्रजी ). २२२

( २ ) नियतकालिकांतील लिखाण व टीका.

( १ ) हिंदुधर्म विवेचक. ... ... ... २२७

( २ ) वार्ताहर. ... ... ... ... २२८

( ३ ) केसरी. ... ... ... ... २३२

( ४ ) निबंधचंद्रिका. ... ... ... २३५

( ५ ) केरळकोकिळ. ... ... ... २४३

( ६ ) काळ. ... ... ... ... २४४

( ७ ) निबंधमाला.... ... ... ... २४६

( ८ ) इंदुप्रकाश ... ... ... ... २४६

( ९ ) सुबोधपत्रिका. ... ... ... २४८

( १० ) नेटिव ओपिनियन. ... ... ... २५१

( ११ ) दीनबंधु. ... ... ... ... २६०

( १२ ) सुधारक. ... ... ... ... २६२

( १३ ) ज्ञानप्रकाश. ... ... ... ... २६२

( १४ ) पुणेंवैभव. ... ... ... ... २६३

( १५ ) विविधज्ञानविस्तार. ... ... ... २६३

( १६ ) ग्रंथमाला ... ... ... ... २७३

( १७ ) धर्म. ... ... ... ... २७३

( ३ ) राजारामशास्त्री भागवतांवरील चरित्रात्मक वाङ्मय. २७८

( ४ ) मृत्युलेखांची नोंद. ... ... ... ... २७९

( ५ ) दुय्यम संदर्भ–साहित्य ... ... ... ... २८०

सूचि ... .. ... ... ... ... २८२

# प्रस्तावना

शास्त्रीबोवांच्या वाङ्मयाचें परिशीलन म्हणजे शारदोद्यानांतील रम्य विहार नव्हे. नर्मदेच्या प्रांतातली प्रदक्षिणा आहे ती. त्यांची वाणी स्फूर्तिप्रद आहे. पण ती वाचकास सहज पचवितां येण्यासारखी नाहीं.

राजारामशास्त्र्यांनीं पस्तीस वर्षें लिहलें. भाराभर लिहलें. वाटेल त्या लहान मोठ्या विषयावर लिहिलें. जुन्यावर, नव्यावर, त्यानीं टीकेची झोड उठवली. त्यांची टीका म्हणजे परंपरेच्या जुनाट खोडांना समूळ उलथून पाडणारा झंझा-वातच होता. समाजांतली व्यंगें त्यानीं दाखवलीं. जरा सुद्धां आडपडदा न ठेवतां दाखवलीं. पण त्याच समाजाचे जे कांहीं चांगुलपणाचे बीजांकुर त्यांना दिसले ते त्यानीं कौतुकानें जोपासले. दलितांचीं दुःखें, दलितांचें सुप्त सामर्थ्य शास्त्रीबोवांस माहित होतें. तें सामर्थ्य वाढीस लावण्यासाठीं शास्त्रीबोवांनीं आपली वाणी, लेखणी व करणी पणास लावली. बरें असो कीं वाईट असो, शास्त्रीबोवांनीं जें लिहलें, ते अंतःकरणाच्या तळमळीनें लिहलें. शास्त्रीबोवांचें लिखाण म्हणजे एका तळमळणाऱ्या, अस्वस्थ आणि सामर्थ्ययुक्त अंतःकरणांतून स्फुरलेले खडे बोल आहेत. हे सर्व बोल एकत्र करायचे म्हटले तर हजारों पानें भरतील. म्हणूनच शास्त्रीबोवांच्या वाङ्मयांतील निवडक व उत्कृष्ट लेखांचे उतारे या पुस्तकांत दिले आहेत. लेखकाचें अंतरंग, त्याचीं मतें व त्याची भाषा यांची ओळख या उताऱ्यां-वरून होईल असा भरंवसा वाटतो. ' समग्र राजारामशास्त्री भागवत ' लेखरूपानें फिरून लोकांपुढें येतील कीं नाहीं, हें सांगतां येत नाहीं. पण तोंपर्यंत त्यांच्या वाङ्मयाचें हें सार मी यथामति जनतेपुढें ठेवीत आहें. हें वाचून एकाद्यास शास्त्रीबोवांचें कांहीं ना कांहीं लिखाण वाचण्याची इच्छा झाली तरी हे लेख उत-रून काढणारी माझी लेखणी सोन्याची झाली असें मी समजेन. शास्त्रीबोवा विक्षिप्त म्हणून गाजले असले तरी देखील महाराष्ट्राच्या बौद्धिक व नैतिक कीर्तींत ज्यांनीं फार मोठी भर टाकली आहे, अशा महाराष्ट्रभूमीच्या कांहीं सत्पुत्रांच्या आयुष्यांत त्यानीं महत्वाच्या प्रेरणा निर्माण केल्या यांत शंका नाहीं. उदाहरणार्थ, महर्षि धोंडो केशव कर्वे म्हणतात, " वंदनीय गुरुवर्य राजारामशास्त्री भागवत यांचा माझा संबंध गुरुशिष्य नात्याचा होता. पहिल्यापासूनच मजवर त्यांचा लोभ

जडला, व वडील माणसाशीं वागावें तसाच मी शेवटपर्यंत त्यांच्याशीं वागत राहिलों. माझ्या पुनर्विवाहानंतर आपली पसंति दर्शविण्यासाठीं एकदां ते पुण्यास मजकडे उतरावयास आले होते. त्यांचा थोर व उदार स्वभाव मी मराठा हायस्कूल सोडलें त्यावेळीं दिसून आला. शिक्षणक्षेत्रांतच काम करण्याची आवड व एलिफन्स्टन हायस्कुलांत एक वर्ष काम केलेलें त्यामुळें त्या हायस्कूलचे प्रिन्सिपॉल वामन आबाजी मोडक ह्यांनीं माझा प्रवेश सरकारी नोकरींत सहज करून दिला असता, पण सरकारी नोकरींत शिरायचें नाहीं असें मनानें घेतल्यामुळें शास्त्रीबोवांच्या मराठा हायस्कुलांतच कायमचें राहाण्याचें मीं ठरविलें व आरंभापासूनच मीं त्यांना तसें सांगितलें होतें. पुढें १८९१ च्या सप्टेंबरांत प्रो. गोखल्यांकडून मला फर्ग्युसन कॉलेजांत काम करण्यासाठीं बोलावणें आलें. तेव्हां त्यांचें पत्र मी त्यांना दाखवलें. तेव्हां त्यांनीं ताबडतोब तें काम पत्करण्याचा मला सल्ला दिला, व प्रेमानें मला निरोप दिला. शास्त्रीबोवांचा स्वतंत्र बाणा असे. मराठा हायस्कूलला सरकारी मदत घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. सरकारी अधिकाऱ्यांची व्यर्थ लुडबुड होऊन विनाकारण त्रास होत असे, ह्यामुळें त्यांनीं ती गोष्ट मनांत आणली नाहीं. महाराष्ट्रांत शास्त्रीबोवांची उपेक्षा झाली ही गोष्ट खरी. ”

मराठा हायस्कूलमधील त्यांचे ख्यातनाम शिष्य रँगलर परांजपे म्हणतात, “महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासांत शास्त्रीबोवांना अवश्य स्थान मिळेल. ज्या कित्येक सुधारणा व जीं मतें आतां सर्वमान्य झालेलीं आहेत त्यांचा पुरस्कार करणारांमध्यें ते नेहमी प्रमुख असत. जातिभेद नष्ट करण्याची आवश्यकता आतां पुष्कळांना पटलेली आहे; पण त्यांनीं ती पन्नास साठ वर्षांपूर्वींच प्रतिपादिली होती.”

त्यांचे सेंट झेविअर्स कॉलेजांतील शिष्य डॉ. मुकुंदराव जयकर यांनीं तर शास्त्रीबोवांची सह्याद्रीच्या उत्तुंग शिखराशीं तुलना करून पुढीलप्रमाणें त्यांचें वर्णन केलें आहे. “राजारामशास्त्री भागवतांना मी एक थोर हिंदी गृहस्थ मानतों. कारण जास्त कसोशीनें त्यांचें वर्णन कसें करावें हेंच मला समजत नाहीं. चिकित्सक संशोधनांत निमग्न झालेला गाढा विद्वान्, सर्व मिथ्याचारांबद्दल–मग ते मिथ्याचार कितीही उच्चपद पावलेले असोत--तिटकारा असणारा निर्भय सत्यशोधक, परस्पर–विरोधी भावना व विचार यांचा समन्वय घालणारा, सर्व प्रकारच्या दलितांचा दक्ष कैवारी, जाज्वल्य सुधारक, नकली हिंदुधर्मावर त्वेषानें प्रहार

करणारा आणि इतकें असूनही जरा सुद्धां दिखाऊपणा न ठेवतां ईश्वरावर अचल श्रद्धा ठेवणारा नम्र सेवक, कळकळीचा मित्र आणि तेवढाच दुर्दमनीय प्रतिस्पर्धी या सर्वांचें मिश्रण म्हणजे शास्त्रीबोवा ...

शास्त्रीबोवांच्या विनम्र वृत्तीची मला जाणीव होती ... ... आपल्या वाङ्मयीन व सामाजिक अशा सर्व कार्यक्षेत्रांत गटबाजी शिरली आहे. तिला पुष्कळवेळां जातीयवादाचें स्वरूप येतें. बाळशास्त्री जांभेकर, जगन्नाथ शंकरशेट, नारायण दिनानाथ, भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग इत्यादि नांवें आमच्या राजकारणी आणि सामाजिक नेत्यांच्या मनांतही अगदीं पुसट पुसटच राहिलेली दिसतात; जर या नेत्यांमध्येंही अशा बद्दलचें अज्ञान दिसतें, त्याअर्थी त्यांची संगती इतर कोणत्या तऱ्हेनें लावता येईल ? हे आणि असे दुसरे कितीएक आहेत कीं ते प्रगतीचे अग्रदूतच होते. पण आज त्यांची स्मृति अज्ञानाच्या आणि विकल्पांच्या दाट थरांखालीं गाडली गेली आहे. त्यांच्या अवशेषांवरून आपण चालतों. आपण कोणाच्या अवशेषांवरून चालतों आहों, आपल्या पदाघाताखालीं केवढी अमोल संपत्ति दडलेली आहे, याचा आपल्याला गंधही नसल्यामुळें आणि तें जाणून घेण्याची आपली इच्छा आणि धमक पण नसल्यामुळें आपण हे अवशेष तुडवीत पुढें जातों. शास्त्रीबोवा देखील या विस्मृत विभूतींपैकींच एक आहेत. आणि ती विभूति कशी तर आपल्या विषयींच्या अपवादांत धन्यता मानणारी ! त्यांच्या प्रगाढ निष्ठेचें जणूं कांहीं तें मोल होतें. या थोर पुरुषाबद्दल आदर आणि पारख लोकांना असायला हवी. कारण हल्लीं उथळ, शब्दवेल्हाळ आणि भटक्या वावदूकांचा जसा कांहीं लौकिकावर व प्रतिष्ठेवर हक्क असल्यासारखा झाला आहे. ”

डॉ. भीमराव आंबेडकरांचा देखील शास्त्रीबोवांशीं लहानपणीं परिचय होता. ते म्हणतात, “ राजारामशास्त्री भागवत हे आपले एक हितचिंतक आहेत याची अस्पृश्यांना चांगलीच जाणीव होती हें माझ्या लहानपणीं मला आढळून आलें. अस्पृश्योद्धारासाठीं अगदीं सुरवातीच्या काळांत चळवळ करणाऱ्या लोकांपैकीं ते एक होते. अस्पृश्यांसाठीं झटणारे ते एक अत्यंत कळकळीचे कार्यकर्ते होते, व त्यांत त्यांचें कोणत्याही प्रकारचें राजकीय उद्दिष्ट नव्हतें. या व्यतिरिक्त राजारामशास्त्री भागवतांची आठवण म्हणजे हिंदुसमाजानें आपला पाया तपासण्याची वेळ आली आहे असें सांगणारा पुरुष त्या काळांत तरी विरळाच होता. चिपळुण-

करांसारख्या माणसानीं त्यांच्या कार्यांत विघ्नें उपस्थित करण्याचा चंग बांधला असतां ते आपल्या भूमिकेवर अचल राहिले, ही त्यांना खरोखरच भूषणावह अशी गोष्ट होय. त्यांचें सर्व लिखाण संकलित करून प्रसिद्ध झालें पाहिजे अशी माझी इच्छा आहे. म्हणजे तें सध्यांच्या पिढीला उपलब्ध होईल. कारण हिंदु-समाजाला कोणतें दुखणें लागलें आहे, याची पुसटशी देखील कल्पना या पिढीला नाहीं."

कै. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृशांच्या कार्यांचा पाया राजाराम-शास्त्रांच्या प्रोत्साहनामुळेंच पडला.

राजारामशास्त्र्यांना साने गुरुजींनीं 'धर्ममूर्ति' म्हटलें आहे.

अशा या शास्त्रीबोवांचें लेखन त्यांच्या काळीं टीकेच्या भडिमारास तोंड देऊन उभें होतें. शास्त्रीबोवांवर झालेल्या टीकांची थोडी चुणूक पुस्तकाच्या शेवटीं दिली आहे. शास्त्रीबोवा वादविवादांत कोणाला हार जाणारे नव्हते. प्रतिपक्ष्याची वैयक्तिक व्यंगें त्यांनीं कधींच टीकेंत उच्चारलीं नाहींत. या बाबतींतली त्यांची सहिष्णुता आणि धैर्य कित्ता घेण्याजोगीं आहेत. एकदांच–फक्त एकदांच भावनावश होऊन त्यांनीं थोडेसे दुःखाचे उद्गार काढले आहेत.

नेटिव ओपिनियनमध्यें ऑगस्ट १८८९ च्या एका अंकांत 'लिहून आलेला मजकूर' या सदराखालीं शास्त्रीबोवांच्या 'रत्नाजीपंत आपा, अहिल्याबाई होळक-रीण व सिधोजीपंत निपाणकर' या पुस्तकावर फार कडक व वैयक्तिक टीका आली होती. तिला उद्देशून शास्त्रीबोवा म्हणतात, "जी गोष्ट ऐतिहासिक समजण्यास बिलकुल पुरावा नाहीं, ती ऐतिहासिक चरित्रांत दाखल करणें केवळ इतिवृत्तांवर चरित्र लिहूं पहाणाऱ्या ग्रंथकारांचें काम नव्हे. बापटांसारख्या चरित्रकारांनीं व ग्रंथकारांनीं व दरोबस्त ब्राह्मणमंडळीनें सर्वतोमुख निष्कलंकत्व दाखविण्यासाठीं अतिशयोक्तीनें भरित व निराधार अशा अप्रामाणिक कथा खुशाल मानाव्या, व तसल्या कथांवर खुशाल मनोराज्यमय इमारती बांधून राघोबादादासही शिवाजी-च्या वर्गांत खुशाल घालावें; इतकेंच नाहीं, तर राघोबा दादास सूर्य बनवून, शिवा-जीस त्याच्या पुढें खद्योतही ठरवावें. पण तो मार्ग नुक्त्याच निर्दिष्ट केलेल्या पैकींच कित्येक ग्रंथकारांच्या मतें 'कालाचा अपव्यय करून लेखणीस शीण देणाऱ्या व घाणेरडीं पुस्तकें लिहिणाऱ्या' मजसारख्या सर्व प्रकारें क्षुद्र व क्षुल्लक प्राण्यास पसंत

नाहीं, तेथें नाइलाज आहे. 'असलीं चरित्रें वाचून कोंवळ्या अर्भकांच्या मनावर वाईट परिणाम होईल' वगैरे आरोप मजसारख्यावर असल्या मंडळीनें खुशाल आणावे. माझ्या अल्पमतिप्रमाणें व समजाप्रमाणें मी मुलांचीं मनें भूषित करतों, दूषित करीत नाहीं. जी मंडळी मी अर्भकांचीं मनें दूषित करतों असें समजते, त्या मंडळीनें आपलीं व आपल्या मित्रमंडळींचीं मुलें शाळेंतून खुशाल काढावीं. जे सद्‌गृहस्थ माझें आचरण इतकें निंद्य समजतात, त्यांस दुसरा जबाब देण्याजोगा नाहीं. तो जबाब पूर्वीं एकदां दिला व आणखी जितके म्हणून प्रसंग येतील तितक्याही प्रसंगीं तोच ठरीव व अभिन्न जबाब मिळेल. असल्या प्रसंगाच्या संबंधानें मला अतिशय खेद होतो; तो इतक्यासाठींच कीं नसतें गुरुशिष्याचें नातेंही लावून अनृत भाषणाचा प्रसंग लेखकास ओढून आणावा लागतो. " शास्त्रीबोवांच्या लेखांवर झालेल्या टीका व एकंदर वादविवाद वाचून माझ्या मनांत एक कल्पना आली. डॉ. केतकरांनीं राजवाड्यांवरच्या सर्व बऱ्या वाईट टीका एकत्र करून छापल्यास सामाजिक व वाङ्मयीन दृष्ट्या टीकेचें बरें वाईट स्वरूप कसें असतें हें अभ्यासकास फार बोधप्रद होईल असें म्हटलें आहे. शास्त्रीबोवांवरील सर्व बऱ्या वाईट टीकांचें सार मी शेवटच्या भागांत दिलें आहे तें याच हेतूनें. मला तर असें वाटतें, कीं लोकहितवादी, फुले, चिपळुणकर, टिळक, आगरकर, राजवाडे आणि केतकर या सर्व चळवळ्या पुरुषांच्यावरील साधकबाधक टीकांवर एक ग्रंथ शास्त्रीय दृष्टीनें कुणी लिहिल्यास, त्यापासून टीकाशास्त्राची फारच प्रगति होईल. वाईट टीकेंतून सुद्धां कांहींतरी सार काढणें कांहीं सोपें काम नाहीं. मला शास्त्रीबोवांसंबंधीं लिहतांना वरील सर्व लेखकांच्या वाङ्मयाचा थोडासा अभ्यास करावा लागला. त्यांतल्या त्यांत या सर्व व्यक्ति परस्परविरोधी असल्या तरी संस्कारक्षम आणि तडफेनें काम करणाऱ्या होत्या. व्यक्तिशः त्यांचें आयुष्यांत एकमेकांशीं पटलें नसलें तरी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे विचार वादविवादाच्या भोंवऱ्यांतून वर येऊन कुठें ना कुठें तरी प्रतिस्पर्ध्यांच्या विचारांशीं तादात्म्य पावलेले दिसतात. जन्मभर झगडलेले टिळक व शास्त्रीबोवा, पण मराठीचा केवढा अभिमान त्यांना. गीतेवर किती त्यांची श्रद्धा राजवाड्यांनीं शास्त्रीबोवांचे वाभाडे काढले. पण महाराष्ट्राच्या वसाहतींबद्दलच्या कुतूहलानें नकळत दोघांचे विचार एकाच पन्हळांतून वहात गेले. भाषाशास्त्राच्या कामगिरीनें तर या दोन्ही विद्वां-

नांची अशी कांहीं सांगड पडली आहे कीं सांगून सोय नाहीं. हें गुपित ते दोघे जिवंत होते तोंपर्यंत त्यांना मात्र उमगलें नाहीं. साने गुरुजींनीं म्हटलें आहे, कीं 'जुन्याकडे नव्या दृष्टीनें पाहणें, पुराणांतील भाकडकथांचें अवगुंठन काढून त्यांतील ऐतिहासिक सत्य संशोधणें व आपलीं मतें स्पष्टपणें व निर्भीडपणें मांडणें हें राजारामशास्त्री भागवतांचें काम राजवाडे यांनीं उचललें." (इतिहासाचार्य राजवाडे, पृ. ४०). मराठी भाषेच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासकांपुढें या सर्व थोर समाजसेवकांनीं व विद्वानांनीं मांडलेल्या विविध कल्पनांच्या वारशांतून आपल्या पिढीला सतत पोषक असणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाचा लाभ कसा झाला, हा एक महत्वाचा विषय आहे. नुसते त्यांनीं रुढ केलेले नवे शब्द जरी तपासले तरी त्यांतून किती तरी मनोरंजक ज्ञान मिळतें. उदाहरणार्थ, टिळकांचा नोकरशाही हा शब्द. राजारामशास्त्री भागवत यांचे ब्राह्मणेतर व राजकारण हे शब्द. त्यांच्या मध्यें केवढें सामर्थ्य भरलें आहे! केवढ्या कल्पना त्यांच्यामागें आहेत! पण त्या वेळेला हे 'विचित्र' शब्द वापरल्याबद्दल त्यांना शालजोडींतले अहेर मिळाले. निदान शास्त्रीबोवांची तरी विक्षिप्त ही पदवी या शब्दासनावर बसल्यामुळें अढळ राहिली. दुसरी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या सगळया नागमोडी विचारांच्या वळणा वळणांतूनच आजच्या शास्त्रीय विचारपद्धतीची चौकट तयार झाली आहे. वर सांगितलेल्या कुठल्याही लेखकाचें आजच्या अभ्यासकाला अनुकरण करून चालणार नाहीं. पण त्यांच्या कळकळीचें आणि सामर्थ्योपासनेचें महत्व मात्र एवढें मोठें आहे कीं, त्यांची योग्य जोपासना केल्याशिवाय आम्हांला कुठलेंच काम थोडेसें देखील उत्तम करून दाखवितां येणार नाहीं.

शेवटीं आभारप्रदर्शनाचें काम राहिलें. खरें म्हटलें म्हणजे ज्यांनीं शास्त्रीबोवांच्या वाङ्मयाची व विचारांची जपणूक वर्षानुवर्षें खस्ता खाऊन केली त्या आप्तांचें साहाय्य फार मोठें आहे. तें नसतें तर हा उद्योग १९३७ सालापासून आजपावेतों मला करतां आला नसता. या बाबतींत सर्व साहाय्य मला न मागतांच किंवा मागितल्या बरोबर मिळालें. डॉ. नवल्यांनीं 'दीनबंधू'च्या नव्या फायलींतले जुने लेख दिले. 'सुबोध पत्रिके' चे श्री. ग. ल. चंदावरकर व 'केसरी' चे श्री. ज. स. करंदीकर यांनीं आपापल्या पत्रांतील लेख उतरून घेण्यास अनुमति दिली. श्री. वसंतराव राऊत यांनीं 'हिंदुधर्मविवेचका'चे अंक दिले. प्रो. न. र. फाटक यांनीं कै. शिवरामपंत परांजप्यांच्या शास्त्रीबोवां-

वरील टीकांची प्रथम माहिती दिली. श्री. सोपानदेव चौधरींनीं आपली सुंदर कविता आपणहून पाठवून दिली. अण्णासाहेब कर्वे, डॉ. जयकर, रँगलर परांजपे, डॉ. आंबेडकर वगैरेंनीं शास्त्रीबोवांचा लेखसंग्रह प्रसिद्ध व्हावा म्हणून आग्रहपूर्वक उत्तेजन दिलें. धनुर्धारीचे संपादक श्री. केळुसकर व श्री. सुतार यांनीं खास ' राजारामशास्त्री भागवत अंक ' काढून व कै. साने गुरुजींनीं पण ' साधनेंत ' लिहून राजारामशास्त्र्यांच्या लेखनाबद्दल औत्सुक्य निर्माण केलें. मामा वरेरकरांनीं प्रकाशनाच्या कामीं पुढाकार घेतला व श्री. भट यांनी या कामाला मूर्त स्वरूप आणलें. या सर्वांची मी ऋणी आहें.

जव्हेरी व्हिला,
गिल्डर लेन,
मुंबई ८

दुर्गा भागवत

दा. नं.
शाखा

— १ —

## प्राचीन भरतखंड स्थिति

ज्याच्या स्थावर आणि जंगम जगद् विस्तारिलें शोभतें
लीलेनें करुणार्द्र दृष्टि करुनी संज्ञातही जृंभतें
सद्हृत्पंकजकाननीं यदुदयें कोंभे घनानंद तो
त्या सच्चिद्घन अस्तहीन रविला साष्टांग मी वंदितों

ही क्षमाहि विपुला सहोदरा
निर्मिली प्रभुवरेंचि सुंदरा
आपणां वसतिला उजीयडा
साठिं सूर्य निज तेज येकडा
चंद्र ही सुखद शीत दिवा हो
आपणास्तवच वायु हि वाहीं
लाविला त्रिभुवनैक पित्यानें
अप्रमेय करुणा सवित्यानें
क्षितीच्या पोटींचा कधिं न जलसांठा कमति हो
म्हणोनी त्या कालीं नियमित जगद्वंद्य मति हो
जलार्द्रा मेघाच्या करवि जलवृष्टी क्षितिवरी
कराया तो प्रेरी अशि मति जयांची हि विवरी
जीं सुखें महिवरीं मिळतात
तीं अम्हांस्तवच निर्मळतात
निर्मितो म्हणुनि त्या भजती ते
जो सृजूनि रमतो जगतीं ते
ही क्षिती तळवटीं वनराई

दा. क्र.

वेंचुनी बहुतची चतुराई
लाविली बहु समूळहि गोडें
जींत नित्यसुखदें तरु झाडें
वर्षाकाला वांचुनीही प्रवाहो
धों धों जे हे लागले येथ वाहों
माथ्याहूनी पर्वताच्या जलांचे
आम्हांसाठीं कृत्य त्या निर्मलाचें
दया निर्मिल्या कुक्षिला पर्वताच्या
मनोज्ञा वसाया अम्हां प्रस्तरांच्या
पहा ह्या किती दिव्य विश्वैकपाळें
तया ईश्वरें जो दयेचेंच पाळें
विविध आठउनी अशिया गुणां
स्मरुनिया हि अहर्निश निर्गुणा
करुनि अर्पण त्यास सदा मना
पुरविती सकला निजकामना
त्यांच्या स्थिती ही निजविग्रहाची
होती कशी त्या वसत्या गृहांची
ती सांगतो विस्मयदा मनाशीं
हो तूमच्या जी अघदु:खनाशी
दिक्पटाविण तयांस हि वास
ठाउकें न जरि ताप हिंवास
सोसिती विचरती पदचारी
वृत्तिमात्र जडुनी सुविचारी
हिम न तरी तशियांस वांकवी
तपन न ग्रीष्म ऋतूंत सूकवी
घन हि घनागमनीं न भिजवी
कुमति अशांप्रति नान्य लाजवी

आचारकर्ममय धर्म हि एक ज्यांचा
शब्दार्थतः सकल शुद्ध जिभें प्रजांचा
कोणास कोणि हंसती हि न लाजवीती
ऐक्यात्मबुद्धि अवघ्यां बहु मोदवी ती
अवयव बहु होती एकल्या विग्रहाला
विविध असति किंवा स्तंभ एक्या गृहाला
तदुपरि अवघे ते मानिती एकमेकां
विकल सकल होती दुःख होतांच एका[1]

---

[1] विविधज्ञानविस्तार, पुस्तक ७, अंक ७, पृ. २. १८७५ जुलै, आणि पुस्तक ८, पृ. ५९, १८७६ यांतील ४० श्लोकी कवितेंतल्या निवडक पंक्ति. ही कविता पहिल्यानें संस्कृतमध्यें लिहिली होती. तिचें शास्त्रीबोवांनीं मराठींत रूपांतर केलें.

ग्रंथालय
ग्रं. क्र. २२८०३

## — २ —

# शिवकुमरी व पातकराव

एका सकाळींच मुखमार्जनादि विधि आटोपून नारीगल किल्ल्यांतील एका बऱ्याच प्रशस्त दिवाणखान्यांत एक स्त्री व एक पुरुष असें एक जोडपें उघड्या पलंगडीवर बसून कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत आहे. स्त्री सुमारें अठरा वर्षांची आहे. वर्ण काळा सांवळा असून सर्व अंग रेशमासारखें तेजस्वी व मऊ दिसत आहे. डोळे थोडे मोठे असून काळे कुळकुळीत आहेत, केंस भ्रमरासारखे काळे असून, बुचडा मोठा फक्कड घातला आहे. केंसास लावलेल्या सुवासिक तेलाचा घमघमाट जिकडे तिकडे

सुटला आहे. भांगामधून व कपाळाच्या व भांगाच्या संधिपासून कानांपर्यंत, उंच्या मोत्यांचे सर मस्तकावर गुंफल्यामुळें गंगा व यमुना या दोहोंचा संगमच झाला कीं काय इतके मनोहर केंस दिसत आहेत. कपाळाच्या मध्यभागीं हिंगुळाचा बारीक वाटोळा सौभाग्यसूचक तिलक लाविला आहे. बाळया व बुगडया घातल्यामुळें कानांचें सौंदर्य दिव्य दिसत आहे. नाकांत उंचे हिरे जडवलेल्या तुऱ्याची नथ लटकत आहे. भिवया बऱ्याच बारीक आहेत. नुकतीच पानसुपारी तोंडांत टाकल्यामुळें ओंठावर चढणारी कृत्रिम लाली खऱ्या मूळच्या लालीचा पत्ता लागणें हळू हळू अशक्य करीत आहे. तंग रेशमी भरजरी चोळी घातल्यामुळें स्तनांचें गौरव स्पष्ट होत आहे. गळयांत कंठे व मोत्यांचे हार लोंबत आहेत. पायांत वाळे घातले आहेत. हात व पाय मेंदीनें लाल रंगविले आहेत. सफेत मलमलीचें पातळ नेसली आहे. फार उंच नाहीं व फार ठेंगणीही नाहीं. जरी विरूप दिसे इतकी स्थूळ नाहीं तरी गणना आंगलट चांगली असल्यामुळें साधारण स्थूळांतच करावयाची. चेहऱ्यास थोडेसें म्लानत्व आणणारी अशी ती डोळयाची विलक्षण कांति फारच तीस शोभा देत आहे. मुद्रा बरीच कडक दिसत आहे. तिच्या जवळच बसलेला पुरुष साधारण याच बांध्याचा; पण केंसावर जरादेवीनें रुप्याचा अगदीं सफेत मुलामा चढविल्यामुळें शरीर पुष्कळ अमनोरम व शिथिल दिसत आहे. उमर साठांपेक्षां कमी तर नाहींच. ही स्त्री व हा पुरुष कोण ? व या परस्परांचा संबंध काय ? [१]

---

१. स्कॉटच्या टॅलिसमन कादंबरीचें शास्त्रीबोवांनी भाषांतर केलें होतें; त्याचें नांव स्वयंवर. हें अपूर्ण आहे. त्यांतील थोडासा नमुना. यांतील भाषासौष्ठव पहा !

स्वयंवर, उच्छ्वास दुसरा; विविधज्ञानविस्तार पु. ८ पृ. १५; १८७६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्रत
अनुक्रम ०७१९९६ वि: १७८५
क्रमांक २०५ नों. दि. २१.६.७०

## — ३ —

# कृत्रिमपणा आणि सरळपणाचा परिणाम

## ( शास्त्रीबोवांची एकुलती एक लघुकथा )

पूर्वी विजयनगरचा राजा जयपाळ यास चौघ पुत्र होते. मोठ्याचें नांव घनपाळ, दुसऱ्याचें नांव भूमिपाळ, तिसऱ्याचें नांव शंखपाळ, आणि सर्वांत धाकट्याचें नांव रणपाळ. त्या चौघांच्याही वयांत दोन दोन वर्षांचेंच अंतर होतें. जयपाळानें चौघांसही लहानपणापासून अश्वशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, धनुर्वेद हीं चांगलीं पढविलीं होतीं. कांहीं वर्षांनीं वयांत आले असें पाहून घनपाळास द्रव्यकोशाची व्यवस्था पहाण्यास जयपाळानें सांगितलें. भूमिपाळाच्या हातीं जमाबंदी दिली; शंखपाळास घोडशाळा, शिकारखाना, वगैरेंचा बंदोबस्त तूंच कर म्हणून सांगितलें; आणि रणपाळास सेनापति करून सर्व फौजेचा अधिकार दिला. याप्रमाणें राज्याची व्यवस्था केल्यामुळें जरी राज्य एकाद्या लहानशा संस्थानाइतकेंच होतें, तरी आपण सार्वभौमत्वाचाच उपभोग घेत आहों, असें जयपाळास वाटे. म्हटलें ही आहे, कीं काया निरोगी, द्रव्य अनुकूल, बायको पतिव्रता व मधुर भाषण करणारी, पुत्र आज्ञांकित, द्रव्य देणारी विद्या, हें सर्व ज्यास मिळेल तोच खरोखर सुखी होय. कांहीं दिवसांनीं राजाचा धाकटा पुत्र रणपाळ यानें लष्कराची चांगली तयारी ठेवून, परराज्यावर स्वाऱ्या करून जे अनीतीनें वर्तणारे राजे आढळले त्यांस पदच्युत करून, बापाचें राज्य वाढविलें; व कित्येकांपासून खंडण्या व करभारही घेऊं लागला. तेव्हां जयपाळ राजाचा भरभराट इतका खूप चालला कीं त्याचे राज्यांत चोर, दगेबाज, जुगारी, तर्कटी, हे मुळींच राहिले नाहींत. रणपाळाचें नांव ऐकूनच शत्रूंनीं कांपावें असें झालें. सर्व रयत आनंदानें आणि निर्भयपणानें आपापले धंदे करूं लागली,

तेणें करून राज्यांत सर्व आबादानी झाली व राज्याची जमाबंदी वाढली. दुसरे संस्थानी धाकानेंच करभार आणून पोहोंचवूं लागले. या सर्व गोष्टींनीं राजाचे जामदारखान्यांत द्रव्यही संपादन केलें. त्याचें सार्थक हेंच आहे कीं भोग आणि दान या दोहोंपैकीं भोग तर आपण बांधवांसहवर्तमान यथेच्छ करीत आहोंच, पण दान हा संपत्तीचा मुख्य भाग असतां त्याच्याकडेच आपण लक्ष दिलें नाहीं, हें संपत्ति लयास जाण्याचें एक कारण होय. असा विचार करून, दररोज प्रातःकालीं पांचशें रुपये धर्म करून जी कांहीं राज्यव्यवस्था पहाण्याची असेल ती पहायाची असा रणपाळानें नियम केला, व लागलीच " उद्यांपासून सकाळींच धर्म करण्याकरितां देहुडीवर पांचशें रुपये आणून ठेवीत जा " अशी जामदारास आज्ञा केली. नंतर दुसऱ्या दिवसापासून नित्य सकाळींच पांचशें रुपये देहुडीवर आणावे, व रणपाळानें स्नान करून जे कोणी आंधळे, लंगडे, वगैरे दरवाज्यावर आले असतील त्यांस यथायोग्य धर्म करून भोजन करावें व कृतकृत्य झालों असें मानावें, याप्रमाणें कित्येक दिवस लोटले. रणपाळाचे जे तिघे वडील बंधु होते त्यांनीं आपापलीं कामें बजावीत असतां खानगी खजिना बराच जमविला होता; पण रणपाळानें तसें कांहींच केलें नाहीं. त्याचें लक्ष सर्वदा लोकप्रीति व सत्कीर्ति संपादन करण्याकडेस असे. तेणें करून वडील बंधूंचें आचरण त्याचे कानांत पडून मित्रांनीं त्यांच्याप्रमाणें खानगी खजिना जमा करण्याचा उपदेश केला, तरी त्या उपदेशाचा अनादर करून, तो आपले मित्रांची अशी समजूत करी कीं, " मित्रहो, या जगांत सत्यानें आणि सरळपणानें पराक्रम करून द्रव्य व कीर्ति मिळवावी; आपले बांधव, सुहृत्, संबंधी, यांस संतोषवावें आणि संपादन केलेल्या द्रव्यांतून निदान सोळावा भाग तरी धर्माकडेस लावावा. जो कोणी प्राणी असा असेल त्यास ईश्वर सर्वदा साह्य होईल. परंतु जे कोणी स्वतः अपराक्रमी असून घरखर्चाचे द्रव्यांतून, सेवकांचे तैनातींतून, धर्मद्रव्यांतून किंवा अधिकाराच्या बलानें रयतेस हरएक प्रकारें गांजून द्रव्यसंचय करितात, ते काळें करून सर्वस्व हारवून अन्नास मोताद होतात. यासाठीं हा माझा धोपटमार्ग सोडून आडवाटेस म्हणून मी कधींही

पाऊल टाकणार नाहीं. जोंपर्यंत मी या मार्गानें जात आहें, तोंपर्यंत सर्व-साक्षी सर्वेश्वर माझा साह्यकारी आहे असें खचित समजतों. ”

लागलेंच दुसऱ्या वर्षीं प्रांतांत अवर्षण झाल्यामुळें शेतें नापीक झालीं, तेणें करून सरकार—जमाबंदी फारच कमी झाली, आणि सालाबाद-प्रमाणें खर्च पुरा करण्यास जामदारखान्यांतून बरेंच द्रव्य काढावें लागणार असा सुमार पाहून धनपाळानें राजास विनंति केली आणि म्हटलें, कीं “ महाराज या वर्षीं अवर्षणामुळें जमाबंदी फारच कमी होणार, या करितां आपला खर्च कमी केला पाहिजे. भूमिपाळ आणि शंखपाळ या दोहोंचेंही म्हणणें असेंच आहे. रणपाळ प्रत्यहीं पांचशें रुपये धर्म करतो हें एक मोठें ओझेंच आहे, तें अगदीं उतरून टाकिलें पाहिजे. आपल्या राज्यांत जिकडे तिकडे स्वस्थता आहे तेव्हां फौजेपैकींही कांहीं भागास फांटा दिल्यास हरकत नाहीं. असें केलें असतां खजिन्यांतून पैही काढण्याची गरज पडेल असें आम्हांस वाटत नाहीं; तर सालमजकूरचे जमाबंदींतूनच सुखानें खर्च वटावतां येईल. ” हा विचार राजास पसंत पडला. नंतर रणपाळास बोलावून आणून राजानें त्याच्या वडील भावांच्या समक्षच आपला निश्चय त्यास कळविला. तेव्हां रणपाळ असें म्हणाला कीं “ सर्व राज्यास श्रेयस्कर, आणि इहलोकीं व परलोकींही सुखकारक, असा जो नित्यधर्म तो केल्याशिवाय मी अन्नपाणी मुळींच घेंणार नाहीं असा माझा निश्चय आहे. जिनें आपल्या जिवावर उदार होऊन, अनेक लढाया मारून परराज्यें पादाक्रांत करून आणि खंडण्या मिळवून, राजभांडार भरपूर केलें, अशा फौजेस असल्या दुर्भिक्षसमयीं रजा देणें हें तर मला अगदीं गैर वाटतें. तिच्याच पराक्रमानें संपादिलेलें जें द्रव्य आपण खजिन्यांत सांठवून ठेविलें आहे तेंच या प्रसंगीं काढून तिच्याच पोषणासाठीं देणें, यापेक्षां त्याचा चांगला उपयोग दुसरा कोणताच मला दिसत नाहीं. ” हें त्याचें भाषण जरी फारच रास्त होतें तरी ते तिघे बंधु त्याच्यावर खरकन उतरले आणि एकत्र होऊन म्हणाले कीं “ जर तुला श्रेयस्कर असें समजून नित्य धर्म करणेंच असेल तर तूं आपल्या खानगी खजिन्यांतून हवा तितका कर,

कोणी तुला मना करणार नाहीं. सरकारी खजिन्यांतून एक फुटकी कवडीही तुला मिळणार नाहीं. फौज तुला हवी असल्यास खानगी खजिन्यांतून पोसावी लागेल. " हें त्रिवर्ग बंधूंचें निक्षून भाषण तोंडावाटें बाहेर पडतांच रणपाळानें मनांत विचार केला कीं, आपला काळ हल्लीं थोडा विपरीत दिसतो आहे. तेव्हां गुरुजनांस वंदन करून देशांतरीं आपण प्रस्थान करावें हें बरें. असा विचार करून हातांत धनुष्यबाण घेऊन, मातापितरांस वंदन करून, रणपाळ एकटाच बाहेर पडला. तो त्या रात्रीं शहराबाहेरच धर्मशाळेंत वस्तीस राहून, पूर्व रात्र लोटतांच आपणास कोणीं ओळखूं नये म्हणून रानवाटेनें चालता झाला. सूर्योदयापावेतों सुमारें बारा पंधरा कोस चालून सवई नसल्यामुळें अगदीं थकला, व जवळच एक मोठा तलाव दिसत होता, त्याचे कांठीं वटवृक्षाचे छायेस विश्रांति घेण्यासाठीं बसला.

इतक्यांत चिनापट्टणाहून कोणी सौदागीर कांहीं जवाहीर बरोबर घेऊन त्याच मार्गानें आपले देशास जात होता; तो पूर्व दिवशीं त्याच वटवृक्षाखालीं निद्रिस्त असतां सर्पदंश होऊन गतप्राण झाला होता; त्याचें जवळच पडलेलें प्रेत रणपाळाचे दृष्टीस पडलें. तें पाहून रणपाळानें असा विचार केला कीं नित्यधर्म केल्याखेरीज अन्नपाणी घ्यावयाचें नाहीं असा माझा नियम असून आज धर्म करण्यास मजजवळ एक फुटकी कवडी देखील नाहीं. त्या पक्षीं आपणांस उदकपान सुद्धां करणें नाहीं, तरी या अनाथ प्रेताचा संस्कार तर आपणांस केला पाहिजे. कारण अग्नि-संस्कार केला असतां अनेक कोटी यज्ञाचें फळ प्राप्त होतें असें शास्त्रांत आहे. तस्मात् या प्रेतास दहन करावें हें विहित. असें म्हणून, खिशांतून चकमक काढून, रणपाळानें अग्नि तयार केला, आणि जवळच रानांतील सुकलेलीं काष्ठें आणून एक चिता तयार केली. नंतर प्रेतास स्नान घाल-ण्याकरितां तळ्याजवळ उचलून नेत असतां, प्रेताचे कंबरेस मोलवान रत्नांनीं भरलेला खिसा बांधलेला त्यास सांपडला; तो सोडून घेऊन, प्रेतास स्नान घालून, चितेवर ठेवून, रणपाळानें यथाविधि अग्निसंस्कार

दिला. नंतर स्नान करून परमेश्वराची अशी प्रार्थना केली कीं " हे दीनबंधो, जो कोणी तुजवर भरंवसा ठेवून नीतीनें वागतो, त्यास तूं क्षणभर देखील विसंबत नाहींस. जो मी या अघोर अरण्यांत माता, पिता, बंधु यांनीं उपेक्षिलेला, सारी रात्र चालण्यानें थकलेला, नित्यधर्म केल्याशिवाय अन्नोदक सेवन करावयाचें नाहीं असा दृढ निश्चय असून हातांत एक फुटकी कवडी देखील नाहीं, त्या मला त्वां या अनाथ प्रेतसंस्काराचा अमोल पुण्यलाभ देऊन, माझे नित्य दानधर्मांस अंतर न पडून मी सुखानें अन्नोदक सेवावें आणि तुझ्या भक्तीचीं अनुभवकौतुकें पहावीं म्हणून रत्नांची पिशवी दिलीस त्या तुझ्या ठायीं कायावाचामनें माझी निर्मळ भक्ति राहो. " याप्रमाणें स्तवन करून तेथून तसाच चालता झाला. तो सायंकाळीं सौदापुर म्हणून एक लहानशी उतार पेठ होती, तेथें पोंचला. त्याच पेठेंत पारीस देशाहून कांहीं सौदागीर राजाकरितां जवाहीर खरेदी करण्याकरितां वस्तीस उतरले होते, त्यांची आणि रणपाळाची भेट सहजांत झाली. तेव्हां रणपाळानें आपल्या मिळालेल्या जवाहिरांतून कांहीं मोलवान जवाहीर त्या सौदागरांस विकत देऊन त्यांपासून मोहरा घेतल्या; व एक चांगला घोडाही घेतला. नंतर स्नान करून जे तेथें भणंग भिकारी होते, त्यांस आपल्या नियमाप्रमाणें पांचशें रुपये वांटून स्वयंपाक करून भोजन उरकलें. आणि तेथेंच निद्रा केली.

मध्यान्ह लोटल्यावर, घोड्यावर स्वार होऊन, ढाल तलवार कमरेस बांधून रणपाळ मार्गक्रमण करूं लागला. तो दुसरे दिवशीं प्रातःकाळीं पुण्यग्राम म्हणून एक लहानसें गांवढें होतें तेथें पोंचला. त्या गांवीं एक शिवालय होतें. त्याचे यात्रेकरितां नाना देशींचे बैरागी वगैरे आले होते. त्यांस, आपण पुष्करणींत स्नान करून रणपाळानें पांचशें रुपये धर्म केले; व सर्वांस भोजन देऊन आपणही भोजन केलें. याप्रमाणें मजल दर मजल प्रत्यहीं करून नित्य पांचशें रुपये धर्म करीत करीत कांहीं दिवसांनीं रणपाळ मद्रावती नामक एका समृद्ध राजधानीस पोंचला. तेथील राजाचें नांव मद्रेश्वर. तो मोठा नीतिमान आणि दयाळू आहे, असें लोकांच्या तोंडातून

श्रवण करून राजवाड्याचेच पिछाडीस एक लहानसें घर घेऊन तेथें रणपाळ राहिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच संध्यादि कर्में सारून, समोरच्या चवाठ्यावर बसून, रणपाळ आलेल्या याचकांस द्रव्य वाटूं लागला. पण या घरीं कामना पूर्ण होतात हें जाहीर नसल्यामुळें लोकांची फारशी गर्दी जमली नाहीं, म्हणून रणपाळास बराच वेळ खोळंबावें लागलें. सुमारें दोन प्रहर दिवस होतांच पहिल्यानें आलेल्या याचकांपासून वर्दी मिळाल्यामुळें अन्य याचकांच्या झुंड्यांच्या झुंड्या आल्या. त्यांस नित्याप्रमाणें दान करून, जवळ जवळ सायंकाळच्या सुमारास भोजन करून सायंकाळीं गांवची थोडीशी रोशनाई पाहून, कांहीं रस्त्यांची रणपाळानें माहिती करून घेतली. आपलें दारीं जें जें सामान पाहिजे होतें, तें तें विकत घेऊन राजपसंत असा एक पोशाकही विकत घेतला, व घरकामास जरूरीचे असे कांहीं चाकर ठेविले. तिसरे दिवशीं उजाडतांच रणपाळाचे दरवाजावर याचकांची अगदीं गर्दी होऊन गेली. त्या सर्वांची त्यानें दक्षिणा देऊन बिदागी केली. नंतर भोजन करून, पोशाक करून, राजसभेस गमन केलें. तेथें याचा पूर्वपरिचित कोणीच नसल्यामुळें आपण आलां कोठून व जातां कोठें हें कोणीं कांहीं यास विचारिलें नाहीं. पण शरीरानें देखणा व राजबिंडा असल्यामुळें राजाची मात्र दृष्टि एकदां दोनदां रणपाळावर गेली. तें रणपाळाच्या लक्षांत लागलेंच आलें; व ज्या वेळेस कचेरी बरखास्त करून राजा आपल्या मंदिरांत जाऊं लागला त्यावेळेस पुढें होऊन रणपाळानें सन्मानपूर्वक त्यास रामराम केला. तो स्वीकारून राजानें मान डोलविली. नंतर प्रत्यहीं स्नान करून नियमाप्रमाणें पांचशें रुपये गोरगरीबांस वांटावे, मग भोजन उरकून राजसभेस जावें, व संध्याकाळीं घोड्यावर बसून फेरफटका करावा असा क्रम रणपाळानें चालविला. जेव्हां हा राजसभेस जाई तेव्हां राजास रामराम करी, तो राजा सत्कारपूर्वक स्वीकारी. इतक्यावरून राजाचे कित्येक सभासदही यास मानवूं लागले.

राजाचा मुख्य प्रधान थोड्या महिन्यांपूर्वी वारला होता; व दरबारीं त्याचें काम चालविण्याकरितां कोणी नसल्यामुळें सर्व पोरांडें झालें होतें. राज्यांत पेंढार, रामोशी, वगैरे अनेक जातींचे लुटारू लोक लोकांस जिकडे तिकडे उपद्रव करूं लागले होते, तेणें करून राजास चिंता प्राप्त झाली. तशांत राजा वयातीत असून त्यास पुत्रसंतान नव्हतें. एक कन्या मात्र होती. ती उपवर झाल्यामुळें वरयोजना करावयाची. या सर्व अडचणी जेव्हां राजाच्या मनांत एकदम उभ्या राहत, तेव्हां अक्कल गुंग होऊन राजास निद्रा म्हणून मुळींच लागत नसे. कधीं कधीं तो मोठ्यानें ईश्वराचें स्मरण करून म्हणे, " हे देवा, मी पुत्रहीन, व तशांत वृद्ध झालों. इतकेंच नाहीं तर माझा विश्वासू व हुशार मुख्य प्रधानही वारला. प्रजापालन करणें हा जो राजाचा मुख्य धर्म तो माझ्या हातून कांहींच होत नाहीं. तर अशा समयीं सर्वशक्तिमान जो तूं त्या तुझ्या शिवाय हीं सर्व संकटें निवारण कोण करील ? " या प्रमाणें चिंताग्रस्त असतां एके रात्रीं पहांटेस त्यास असें स्वप्न पडलें कीं आपण नदीचे डोहांत बुडत असतां एक नावाडी नाव घेऊन आला आणि त्यानें आपणास वर काढून वाड्यापर्यंत आणून पोंचविलें. जागृत होतांच बाहेरच्या गच्चीवर स्वप्नाचे शुभाशुभफलाचा विचार करीत बसला आहे, इतक्यांत सुप्रभात झालें; व खालीं प्रात:संध्यादि कर्में करण्यास उठणार, इतक्यांत एका घराजवळ याचकांची अगदीं दाटी होऊन गेली आहे व त्यांस मोठ्या हर्षानें रुप्याच्या ताटांतून चवल्या पावल्या रणपाळ वांटीत आहे, असें गच्चीवरूनच त्याच्या नजरेस आलें. तेव्हां राजानें मनांत म्हटलें कीं " रणपाळ हा क्षत्रिय किंवा वैश्य असावा. हा रोज कचेरींत विनयपूर्वक आपणांस रामराम करितो, तेव्हां अशा विनयी व उदार पुरुषाचा समाचार आपणांस कांहीं तरी घेतला पाहिजे. आजपर्यंत घेतला नाहीं हीच मोठी चूक. तर आपण आतांच त्यास बोलावणें पाठवून येथें आणावें व त्याची भेट घ्यावी. " असा विचार करून आपली भेटीची इच्छा प्रदर्शित करण्याकरितां रणपाळाकडेस राजानें एक हुजऱ्या पाठविला. रणपाळ नित्य धर्मकृत्य

आटोपून येत होता, त्याची व हुजऱ्याची रस्त्यांत गांठ पडली. राजाचा निरोप ऐकून रणपाळास फार हर्ष झाला, व मोठ्या घाईनें राजवाड्यांत आला. आगत स्वागत झाल्यानंतर मद्रेश्वराच्या प्रश्नाचें "मी जातीचा क्षत्रिय, रोजगाराच्या उद्देशानें मी येथें थोड्या दिवसांपूर्वी आलों; व प्रति-दिवशीं पांचशें रुपये धर्म केल्यावांचून अन्नपाणी घ्यावयाचें नाहीं असा माझा नियम आहे," असें रणपाळानें समर्पक उत्तर दिलें. नंतर राजा म्हणाला, "तुझ्या आगमनानें माझें राज्य खचित सुखी होणार असें मला वाटतें, तर आजपासून तूं मुख्य प्रधानाचें काम पहात जा. तुझा सर्व खर्च सरकारी खजिन्यांतून चालेल. त्वां माझ्या राज्यास स्तंभ व्हावें अशी माझी इच्छा आहे. राज्यांत बंडावा पुष्कळ झाला आहे, त्याचा बंदोबस्त मी तुझ्यावरच टाकितों." रणपाळाचा रुकार मिळतांच राजानें आपले मानकरी वगैरे बोलाविले; व त्यांच्या अनुमतें रणपाळास दिवाण-गिरीचीं वस्त्रें दिलीं.

दुसऱ्या दिवशीं रोजच्याप्रमाणें पांचशें रुपये धर्म करून, रणपाळानें आणखीही मोठा देकार वांटला; व साधुसंतर्पण करून ईश्वरास वंदन करून प्रधानकीचें काम पहाण्यास बसला. पहिल्यानें खजिन्याची आणि जमा-बंदीची चौकशी करून, फौजेची चौकशी आरंभिली. तेव्हां त्यास असें आढळलें कीं राज्यांत वसूल येणें बराच असून, फौजेचा रोजमुराही चढलेला आहे. हें ध्यानांत येतांच गांवोगांवीं तहसीलदारांवर वराती पाठवून, एक महिन्याचे आंत दरोबस्त ऐवजाचा भरणा करण्यास त्यांस सक्त ताकिदा पाठविल्या; व सरकारी खजिन्यांतून लष्करी लोकांची बाकी चुकती करून फौज बरोबर घेऊन शहराचे बंदोबस्ताकरितां कोतवाल यास बोलावून, शह-राचे मुख्य दहा भाग करून, त्यांवर एकेक मुख्य नाईक नेमून ज्याचे भागांत चोरी होईल, त्यानें तिचा पत्ता न लाविल्यास सरकार त्या नाइकासच गुन्हेगार समजेल असा कायदा अमलांत आणण्याविषयीं कोतवालास सक्त हुकूम फरमावून, मुलुखांतील पेंढाऱ्यांचीं बंडें मोडण्याकरितां आपण खुद्द निघाला. कांहीं दिवसांनीं बंडवाल्यांचे मुख्य धरून कैद केले. कित्येक

खुनी वगैरे होते, त्यांस फांशी दिलें. कांहीं दगेबाज होते, त्यांस देशपार केलें. याप्रमाणें सर्व देशभर स्वस्थता करून रणपाळ राजधानीस येत असतां त्याचा इतका कडकडीत अंमल बसला कीं जे कांहीं तहसीलदार कित्येक महिने वसूल खाऊन बसले होते, ते आपण होऊन पैका देऊन, आणखी नजराणाही आणून, रणपाळास भेटून क्षमा मागूं लागले. याप्रमाणें दरोबस्त बाकी वसूल करून रणपाळानें खजिना भरपूर केला. व शिपायांस पगाराबरोबर लहान लहान बक्षिसें देऊन संतुष्ट केलें; देश निरुपद्रव केला; व विजयी होत्साता भद्रावती नगरीस परत आला.

अशा समयीं भद्रेश्वराचा आनंद पोटांत मावेना. त्याच रात्रीं भद्रेश्वर राणीस एकांतीं म्हणाला कीं "आपल्या सुंदरीचा विवाह रणपाळाशीं करावा असें मला वाटतें. यास तूं काय म्हणतेस ?" राणी म्हणाली, "हें मज एकटीसच मान्य आहे असें नाहीं, तर सुंदरी जी झुरणीस लागली आहे ती त्याच्याचसाठीं; असें मी तिच्या सखींच्या तोंडून ऐकलें आहे. तेव्हां विलंब न करितां विवाहसिद्धता करावी." हें ऐकून राजास फार हर्ष झाला, व लागलेंच सुमुहूर्तीं सुलग्नीं रणपाळाचा व सुंदरीचा विवाह लागला. राजानें रणपाळास मोठी जहागीर करून दिली. नंतर तीं उभयतां सांसारिक सुखाचा अनुभव घेऊं लागलीं. रणपाळानें राज्यांत इतका चांगला बंदोबस्त ठेविला कीं कोणी खांद्यावर रुपयांचा तोडा घेऊन शेंकडों कोस मार्गानें चालला तरी त्याजकडे कोणी डाव्या डोळ्यानें सुद्धां डोकावून पहात नसे. याप्रमाणें सर्वत्र स्वस्थता पाहून, भद्रेश्वर राजाचा जांवयावर फारच लोभ जडला, व आपल्या पाठीमागें राज्याचा मालक यासच करावा असा त्यानें निश्चय केला.

इकडे रणपाळाचा बाप जयपाळ व त्याचे तिघे पुत्र यांनीं खर्च कमी करण्याकरितां कांहीं लष्कर कमी करून प्रजेवर नानाप्रकारचे कर बसविले, व पैसा बराच जमा केला. तेणें करून प्रजा बेदील झाली. लष्करी लोकांचा पगार बरोबर पोंचेना तेव्हां जुने जुने शूर शिपाई नाउमेद होऊन, राजास सोडून देशांतरीं जाऊं लागले. अशी सर्व अव्यवस्था चारांच्या

तोंडानें श्रवण करून, व रणपाळ द्वीपांतरास गेल्यामुळें त्याची धास्ती बिलकुल नाहीं असा विचार करून, धारानगराचा राजा सोमदत्त, यानें प्रतिवर्षीप्रमाणें खंडणी न देतां, मोठें लश्कर जमा केलें व विजयनगरास वेढा दिला. त्यावेळीं जयपाळानें आपल्या धनपाळादिक तीन पुत्रांस शत्रूवर चाल करून जाण्यास आज्ञा केली. पण तें अशा प्रसंगीं उपयोगास पडणारें युद्धकौशल त्या तिघांपैकीं एकासही नव्हतें. तेव्हां अर्थात् शत्रूनें शहर उध्वस्त करून टाकिलें व मध्यरात्रीस घाला घालून राजवाडाही काबीज केला. त्या वेळेस शत्रूंपासून होणारी पुढची विटंबना टाळण्यासाठीं ही अंधेर रात्र फार चांगला समय होय, असा विचार करून त्या चौघांनीं बायकांसहवर्तमान राजवाड्यांतून गुपचूप पलायन केलें, व पुढें आपणांस कोणीही ओळखूं नये, या उद्देशानें काबाड्याचा वेष घेऊन ते रानमार्गानें चालते झाले. दिवसास अरण्यांत छपून राहून रात्रीं मार्गक्रमण करावें अशा रीतीनें कांहीं दिवसांनीं तीं सर्व आपल्या राज्याच्या हद्दीच्या बाहेर आलीं, इतक्यांत भिल्लांनीं त्यांस गांठून स्त्रियांच्या आंगावरील अलंकार व पुरुषांच्या हातांतील आंगठ्या वगैरे सर्वस्व लुटून नेलें. एक पैसाही निर्वाहास जवळ राहिला नाहीं, तेव्हां त्यांनीं विचार केला कीं हें परराज्य आहे, त्यापक्षीं आपणास कोणी ओळखून काढील अशी विनाकारण धास्ती बाळगण्याचें कांहीं काम नाहीं. यासाठीं आपण रानांतून मोळ्या आणून विकाव्या व उदरपोषण करून प्राण वाचवावे. दुसरा प्रस्तुत उपाय दिसत नाहीं. हर हर! काय ही प्राक्तनाची गति! ज्या राजाचे जवळ हजारों लोक जी जी म्हणत उभे रहात असत त्याच राजानें आपलें वीतभर पोट भरण्यासाठीं लांकडाची मोळी आतां आपल्या माथ्यावर वहावी काय ? पण दैवाच्या लीलेपुढें कोणाचा इलाज चालणार ? राजाचा रंक व रंकाचा राजा हेंच करितें, अर्थात् दैवाची गति गहन होय. असो. उगीच भित्र्याप्रमाणें प्राणत्यागाचा व्यवसाय न करितां त्यांनीं जी स्थिति प्राप्त झाली तींत यथाशक्ति राहण्याचा बेत केला, त्यावरून त्यांचें लोकोत्तर धैर्य आपल्या ध्यानांत येतें.

नंतर आपल्या निश्चयानुरूप रात्रीं अरण्यांत जाऊन लांकडें तोडून आणावीं; त्यांच्या मोळया बांधून त्या सकाळीं विकाव्या व जे पैसे येतील त्यांजवर दिनचर्या चालवून भोजनोत्तर दुसऱ्या गांवीं प्रयाण करावें, याप्रमाणें करीत करीत कांहीं दिवसांनीं तें कुटुंब मद्रावतीस येऊन पोंचलें. तेथें शहराबाहेर एका कुंभाराची शाळा होती तेथें रात्रीं तीं सर्व वसतीस रहात व दिवसास शहरांत काबाड वाहून आपला निर्वाह करीत. असें असतां, एके दिवशीं रणपाळ भोजन करून वाड्याच्या गच्चीवर, आंचवायास बसला आहे व सुंदरी हातावर पाणी घालीत आहे, इतक्यांत त्याची दृष्टि आकस्मात् वाड्यावरील चवाठ्यावर गेली. तेथें आपले मायबाप व भाऊ, भावजया हीं सर्व कंगाल वेषानें काबाड विकीत बसलीं आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां अकस्मात् त्याच्या डोळयांतून पाणी वाहूं लागलें. तसाच रंगमहालांत गेला व अश्रु पुसून सुंदरी रोजच्याप्रमाणें येण्याच्या अगोदरच कचेरीस चालता झाला. हें सर्व रणपाळाचें आचरण पाहून सुंदरी मनांत फार खिन्न झाली व पुढें काय करावें हें तिला कांहीं समजेना. तों इतक्यांत तिला अशी युक्ति सुचली कीं जेथें आपल्या प्रिय पतीच्या डोळयांतून पाणी वाहूं लागलें, तेथेंच जाऊन नीट निरखून तर एकदा पहावें; मग कांहीं ध्यानांत आलें तर बरेंच झालें. असा विचार करून जेथें रणपाळ आंचवीत होता तेथें जाऊन उभी राहिली; व सभोंवती नीट निरखून पाहूं लागली. त्या वेळीं चार बायका व चार पुरुष मिळून काबाड विकीत बसलीं आहेत असें मात्र तिच्या दृष्टीस पडलें. तेव्हां यांचा व आपल्या प्राणप्रिय पतीचा कांहीं तरी संबंध असावा असें तिनें लागलेंच ताडिलें, व त्या दासीस " त्या आठांस येथें बोलावून आण " असें सुंदरीनें सांगितलें. तिनें तीं सर्व बसलीं होतीं तेथें जाऊन " तुम्हांस सुंदरी बाईसाहेब बोलावीत आहेत " असें सांगितलें. तें ऐकून तीं आठजणें सुंदरीच्या महालांत आलीं. सुंदरीनें त्यांस बसायास देऊन नांव गांव विचारिलें. " सांप्रत-आम्ही दुर्दैवाच्या कचाट्यांत सांपडलों आहों, याजकरितां नांव गांव सांगून फळ काय ! सध्यां काबाडी आहों, हें खरें. " सुंदरी म्हणाली

“ बाबांनो, क्षमा करा, आणि आपलें सगळें वृत्त ऐकण्याची माझी इच्छा आहे, ती मेहरबानी करून आपण पूर्ण करा. माझ्या हातानें आपले क्लेश होतील तितके दूर करण्यास मी प्रयत्न करीन. ” हें ऐकून जयपाळ उच्छ्वास टाकून रडूं लागला आणि म्हणाला “ बाई, माझा रणपाळ या नांवाचा मोठा शूर व धर्मात्मा पुत्र होता. तो प्रत्यहीं पांचशे रुपये धर्म केल्या शिवाय भोजन करीत नसे. त्याचें व त्याच्या तिघा बंधूंचें वांकडें पडल्यामुळें त्यानें देशत्याग केला. त्या दिवसापासून आम्ही हे असे क्लेश भोगीत आहों. तो कोठें आहे तें परमेश्वरास ठाऊक.” हें ऐकून जयपाळाची व त्याच्या बायकोची रणपाळासारखी ठेवण तिच्या ध्यानांत आली आणि लागलीच म्हणाली कीं “आज आपण सर्वांनीं कृपा करून येथें भोजन करावें. ईश्वरकृपेनें लौकरच आपण क्लेशमुक्त व्हाल. ” हें तिचें सत्कार आणि आश्वासन या दोहोंनीं भरलेलें भाषण ऐकून जयपाळानें रुकार दिला. नंतर सुंदरीनें स्वयंपाक्यास सांगून जेवणाची तयारी करविली; व वाड्याचे एका सोप्यांत त्यांस जेवावयास घालून थकलेलीं असल्यामुळें तेथेंच थोडा वेळ पडण्यास सांगितलें. रात्रीं रणपाळ कचेरींतील सर्व राज्यकारभार आटोपून महालांत आला; व भोजन करून नित्याप्रमाणें झोंपाळ्यावर बसला आहे व सुंदरीनें पुढें केलेला विडा घेत घेत कांहीं विनोदाचें भाषण करीत आहे, इतक्यांत सुंदरी म्हणाली कीं “ आपलें पूर्ववृत्त आपण मला सांगावें. तें ऐकण्याची मला फार उत्कंठा आहे.” रणपाळ आपल्या भाषणाकडेस दुर्लक्ष करून, दुसरें कांहीं बोलूं पहात आहे, असें पाहून तिनें फारच आग्रह केला. तेव्हा रणपाळाच्यानें ना म्हणवेना. नंतर आपलें वृत्त मुळापासून सांगण्यास आरंभ केला. जो जो मजकूर सांगे तो तो सर्व जयपाळानें सांगितलेल्या मजकुराशीं अगदीं मिळे. सरते शेवट रणपाळ म्हणाला कीं “ ती माझीं दुर्दैवी आईबापें व भाऊ भावजया चवाठ्यावर काबाड वहात आहेत असें पाहून माझ्या डोळ्यांतून पाणी आलें.” या प्रमाणें सांगतो आहे इतक्यांत सुंदरीनें दासी पाठवून तें सर्व कुटुंब आणविलें. रणपाळाची व त्यांची नजरानजर होतांच परस्परांचे कंठ सद्गदित होऊन

गेले. रणपाळानें सर्वांचे पायावर डोकी ठेवली. नंतर वृत्त पुसल्यामुळें, त्यांनीं सोमदत्तानें आपलें राज्य हरण करून आपणांस कसें परागंदा केलें तें सर्व सविस्तर सांगितलें. तें श्रवण करितांच, रणपाळानें आपल्या सासऱ्याचे अनुमत घेऊन, मोठें सैन्य तयार करून, बाप व भाऊ यांस बरोबर घेऊन, विजयनगरावर स्वारी केली. रणपाळानें तंबू नगराबाहेर ठोकिले हें ऐकतांच भयभीत होऊन मोठी खंडणी देण्यास कबूल होऊन, बिनहत्यार सोमदत्त रणपाळाचे भेटीस आला; व विजयनगरचें राज्य जयपाळाच्या स्वाधीन करून, क्षमा मागून सोमदत्त धारानगरास परत गेला. नंतर पाठीमागचें कांहीं एक मनांत न आणतां आपल्या भावांचेही त्यानें सर्व अधिकार कायम केले व नीतीनें चालण्याविषयीं सदुपदेश करून, आपण भद्रावतीस परत आला. तेथें आपण वयोवृद्ध झालों असें पाहून भद्रेश्वरानें रणपाळास अभिषेक केला, व आपण अरण्यांत तप तपून उरलेलें आयुष्य योगानें घालविण्यासाठीं गमन केलें.[1]

---

[1] कृत्रिमपणाचा व सरळपणाचा परिणाम, विविधज्ञान विस्तार, पुस्तक ७, ( पृ. २०६—२१४; १८७५ ).

---

## — ४ —

## अन्न

आतां दुधाच्या घटकपदार्थांविषयीं आपण विचार करूं या. दुधांत पाणी सुमारें नऊ दशमांश असतें; म्हणजे दुधाचे शंभर भाग घेतल्यास त्यांत जवळ जवळ नव्वद भाग पाण्याचे असतात. खेरीज ज्यापासून साई ( संतानिका ) होते, असा एक पदार्थ दुधांत असतो त्यास " केझीन "

( सांतानिक ) म्हणतात. एका प्रकारची वसा ( चरबी ) असत्ये; तीपासून लोणी होतें. साखरेसारिखा एक पदार्थ असतो, तो निराळा काढतां येतो; व तो निराळा काढला म्हणजे त्यास " दुधाची साखर " ( दुग्धाशर्करा ) असें म्हणतात. दुधांत क्षारही बरेच असतात; त्यांपैकीं आपण ज्याचा स्वयंपाकांत पुष्कळ उपयोग करितों तें मीठ (क्लोराइड ऑफ सोडियम् ) व फासफेट ऑफ लैम हे मुख्य होत. दुसरा क्षार अस्थींत पुष्कळ. सांपडतो. या सर्व दुधांतील निरनिराळ्या घटक पदार्थांचे उपयोग आपल्या शरीरांत निरनिराळेच होतात.

अन्न कोणत्याही प्रकारचें असो, त्यावर जर निरोगी पुरुषाचें चांगलें नीट जीवन होत आहे, तर त्यांत हे वर लिहिलेले दुग्ध घटक पदार्थ कोणत्या तरी रूपानें असतातच. केझीनप्रमाणें एक पदार्थ असतो त्यास " आल्ब्युमन " म्हणतात. व त्यावरून तो तसला पदार्थ ज्या अन्नांत असतो त्यास " आल्ब्युमिनस " अन्न म्हणतात, पार्थिव पदार्थही सर्व प्रकारच्या अन्नांत पुष्कळ असतात; ते सर्व क्षार होत. पाणी अनेक प्रकारच्या अन्नांत असतें, इतकेंच नव्हे तर आपणही पिण्याच्या निमित्तानें हवें तितकें पाणी आपल्या जठरांत ओतितों. हे पांच पदार्थ आपल्या जीवनास आवश्यक आहेत व सर्व प्रकारच्या अन्नांत हेच मुख्य असतात.

आतां अनेक व्यापार आपल्या शरिरांत चालत असल्यानें व अनेक प्रकारचे श्रम हमेश आपल्यास पडत असल्यानें आपल्या मांसाचा आपलें चलनवलन नीट चालविण्याकडेस बराच खर्च होतो; व त्यामुळें जी तूट नित्य पडते ती भरून काढण्यासाठीं आपल्या अन्नांत मांस किंवा मांसासारिखाच दुसरा कांहीं तरी पदार्थ असला पाहिजे हें उघड आहे. आणि पार्थिव पदार्थ आपलीं हाडें दगडाप्रमाणें मजबूत करण्यासाठीं मोठ्या उपयोगाचे आहेत हें ही स्पष्ट आहे. पण चरबी, स्टार्च अथवा साखर हीं कांहीं आपल्या शरिरांत फारशीं सांपडत नसतां त्यांचा आपण इतका रोज उपयोग करितों तो कशासाठीं ? तर साखरेचा अथवा साखरेच्याच माळिकेंतले जे पदार्थ त्यांचा आपल्या शरीरांत काय उपयोग होतो हें दाखविण्यासाठीं ज्या अवस्थेंत साखर

आपल्या शरीराच्या आंत पडते, तशाच अवस्थेंत तीस बाहेर ठेवून तिचें कसें काय होतें तें पाहूं या. जर साखरेचें पाणी ऊष्ण केलेल्या हवेंत उघडें ठेविलें व त्यांत थोडीशी " येस्ट " ( सुराबीज, किण्वक ) टाकली तर त्या पाण्यांत कांहीं विलक्षण चमत्कार होऊं लागतात. साखरेचें पृथक्करण होऊन कारबानिक आसिड व आलकोहाल हे दोन नवे पदार्थ तिच्यापासून उत्पन्न होतात व " येस्ट " वाढूं लागतो. साखरेचें पृथक्करण होतेंसमयीं साखर हवेंतील आक्सिजन ओढून घेत्ये व लागलीच " येस्ट " जशीच्या तशीच रहात्ये, अधिक होत नाहीं. अर्थात् हीं दोन परस्पर सापेक्ष युगपत् घडतात. आतां 'येस्ट'ची घटना जवळ जवळ आपल्या शरीराच्या घटनेसारखीच आहे. आपलें शरीर आल्ब्युमिनस पदार्थांनीं भरलेलें आहे व 'येस्ट' ही आल्ब्युमिनस आहे. आंतले व्यापार सतत चालत असल्यामुळें अनेक प्रकारचीं पृथक्करणें रोज आपल्या शरीरांत चालत असतात व तेणें करून आपले शरीरांतील अवयव आपआपले पोषक पदार्थ शोषण करून घेऊन आपली पुष्टि करीत असतात. तेव्हां आपण जी साखर खातों ती सर्व आंत जळून खाक होत्ये, म्हणजे तिचें पृथक्करण होऊं लागतें व या पृथक्करणाच्या योगानें आपल्या शरीरांतील अवयव 'येस्ट' प्रमाणें वाढतात म्हणजे पुष्ट होतात असें म्हणणें असंभाव्य दिसत नाहीं. इतक्यावरून " जरण " म्हणजे अन्न जीर्ण होण्याचा व्यापार व "संधान" म्हणजे 'येस्ट'च्या (सुराबीजाच्या) योगानें साखरेच्या पाण्यांत विकृति होण्याचा व्यापार हे दोन व्यापार अगदीं एकसारखे आहेत. अर्थात् त्या दोहोंत भेद म्हणून मुळींच नाहीं असें म्हणण्याचा आमचा मुळींच आशय नाहीं. कारण 'येस्ट'च्या सूक्ष्मावयवासारखे शरीराचे कोणतेही सूक्ष्मावयव नसतात. तशांत अन्नांतील स्टार्च व साखर यांचें " संधान " (फरमेंटेशन) होत नाहीं; व जरी कार्बानिक आसिड दोहोंमध्येंही उत्पन्न होतें तरी जरण व्यापारांत आल्कोहालची मुळींच उत्पत्ति होत नाहीं. इतकेंच कीं जी म्हणून स्टार्च आपण खातों, तिचा उपयोग होण्यापूर्वीं

पहिल्यानें साखर बनत्ये, व त्यावरून हें आमचें म्हणणें अधिक संभवि असें आम्हांस वाटतें.[1]

---

१ अन्न, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ८, पृ. २२. १८७६ फेब्रुवारी; शास्त्रीबोवा सुरवातीस मेडिकलचे विद्यार्थी होते. शेवटच्या वर्षी त्यांनीं तो अभ्यास सोडला. " अन्न " हा दीर्घ लेख त्यांच्या आहारशास्त्राच्या आवडीचा द्योतक आहे. त्यांच्या शास्त्रीय जिज्ञासेचा दुसरा नमुना म्हणजे " अस्मानी पाणी" हा याच पुस्तकांत १८७६ त लिहिलेला दुसरा लेख. हा समुद्राच्या पाण्याच्या रंगावर व समुद्रतळावर लिहिलेला सुंदर लेख आहे. धार्मिक व ऐतिहासिक लेखांकडचा शास्त्रीबोवांचा कल व ह्या थोडक्या पण शास्त्रीय लेखनांत त्यांनीं दाखविलेली आस्था ही एकाच प्रकारच्या जिज्ञासेचीं दोन फळें आहेत. या लेखांतील शास्त्रीय परिभाषा पहा !

## — ५ —

## गोंडी भाषा

गोंडी भाषा म्हणजे 'गोंड' किंवा ' कोयतोर ' लोक जी बोलतात ती होय. हल्लीं ज्या ज्या प्रदेशांत गोंड लोकांची वस्ती आहे, त्या प्रदेशास नकाशांत ' गोंडवन ' हें नांव दिलें आहे. गोंडवन हें वर्धा, नर्मदा व महानदी या तीन नद्यांच्या मध्यंतरी आहे. हें बहुतकरून हल्लीं ' सेंट्रल प्राविन्सिस ' या नांवाच्या इंग्रज सरकारनें केलेल्या हिंदुस्थानच्या मोठ्या भागांत मोडलें जातें. या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांची अस्सल भाषा म्हणून काय ती हीच. जरी गोंडी भाषा ही द्रवीड, तामीळ, तेलंगी वगैरे चांगल्या सुधारलेल्या व प्रौढ दशेप्रत पावलेल्या दक्षिण हिंदुस्थानांतील अस्सल भाषांचीच सख्खी बहीण असावी असें दिसतें, तरी ती हल्लीं अगदीं रानटी स्थितींत आहे. तिची बाल्यावस्था म्हणजे इतकी आहे कीं,

तीस सध्यां ' लिपी ' हा शब्द मुळींच ठाऊक नाहीं. पूर्वी कधींतरी या भाषेचा व लिपीचा बराच परिचय होता अशा अनुमानास कांहींच आधार बराच शोध केला तरी मिळत नाहीं. कोणतीही विद्या किंवा शास्त्र याचा अभ्यास तिळभर तरी गोंड लोकांच्या स्वप्नींसुद्धां नाहीं. तशांत गोंड लोक हे चांगले रानटी आहेत. तेव्हां या पृथ्वीवर अन्यत्र रानटी लोकांच्या भाषा जशा रानटी स्थितींतच असतात---त्यांचा उर्जितकाळ कधींही आलेला नसतो---त्याचप्रमाणें गोंड भाषेची स्थिति आहे, असें म्हणणें रास्त दिसतें. मुसलमान येण्यापूर्वी गोंडवनांत हिंदुराज्य होतें, तेव्हां राज्य-कारभार हिंदी भाषेंत चालत असून सर्व प्रकारचे लेख हिंदी लिपींत अथवा कायस्थी लिपींत होत असत असें दिसतें. कारण जरी पूर्वीचे लेख देशाच्या दुर्दैवामुळें दुर्मिळ झाले आहेत, तरी या गोंड लोकांशीं निकट संबंध ठेवणारे तद्देशीय ब्राम्हण ज्यांस ' पांड्ये ' असें म्हणतात तेच लोक हल्लीं तेथें जें लिहिणें पुसणें करितात तें सर्व आपल्या भाषेंत व आपल्या लिपींत करितात. त्यावरून प्राचीन काळचे लेख प्राचीन काळच्या लिपींतच प्राचीनकाळचे तद्देशीय ब्राम्हण लिहून ठेवीत असत असें म्हणण्यास बराच आधार दिसतो. गोंड लोकांत हल्लीं बराच विद्येचा प्रसार आहे खरा; पण मराठी भाषेचा प्रचार असतो तेथें जर गोंड मनुष्याचा निकट संबंध असला तर तो मराठी लिपींतच लिहितो, व क्वचित् एकाद्या हिंदुस्थान्याचा सहवास झाला तर गोंड त्याच्याच लिपींत उपयोग करितो. सारांश, गोंडी भाषेस लिहिण्याचें प्राथमिक साधन जें लिपी तें नाहीं.

गोंड लोकांची घरची स्थिति पहावी तर तीही तशीच रानटी दिसते. घरची स्थिति म्हणजे ह्या पृथ्वीवर आपली एक लहानशी तरी मठी बांधून तिच्यावर ' आपली ही ' या शब्दांचा आरोप करून तिच्या आश्रयानें सांसारिक व ऐहिक हर प्रकारच्या सुखाचा---खाणें म्हणा, पिणें म्हणा, बसणें म्हणा, उठणें म्हणा---उपभोग घेणें, या स्थितीचा व भाषेचा संबंध फारच निकट आहे. जसजशी मनुष्याची

रानटी स्थिति सुधारत जाते व तो पानाशनयशनादिक औपभोगिक पदार्थ नवे नवे आपल्या सुखासाठीं निर्माण करूं लागतो व भिन्नं भिन्न रीतीच्या व आचारांच्या व भाषांच्या अनेक राष्ट्रांशीं तो संबंध ठेवीत जातो, तसतसा या उल्लेख केलेल्या सर्वांचा संपर्क लागून त्याची रोजची बोलण्याची भाषा वाढ घेते व प्रौढदशेप्रत पावूं लागते, हें उघड आहे. तसेंच जर एकाद्या लोकांची भाषा प्रौढदशेप्रत पावलेली वं तींत शब्दांचा प्रचुर भरणा असें दिसण्यांत येत आहे, तर त्यावरून ते लोक कोणत्या तरी प्राचीनकाळीं--कृतयुगांत कां म्हणाना--चांगले सुधारलेले होते, असें निर्बाध सिद्ध होतें. कारण तशी ती सर्वप्रकारची सुधारणा जाहलेली असल्याशिवाय भाषा म्हणून इतक्या परिपक्वत्वास पोंचणेंच नाहीं, या अनुमानास जागा मिळत्ये. आतां हा औत्सर्गिक जगत्कर्त्यानें निर्माण केलेल्या या अफाट सृष्टीचा अव्यभिचारी नियम आपण गोंड लोकांस लावूं या. यांची स्थिति अगदीं जंगली; यांचा वास जंगलांत; अल्पस्वल्प मिळेल तसें हिरवें भरडें खाणें; धंदा मोठा म्हटला म्हणजे मोलमजुरी करणें; खेडयापाडयांत म्हारवडयाप्रमाणें लहानसहान झोंपडया बांधून गर्मीत व थंडींत त्यांतच वास करणें; स्त्रियांवर अलंकारादिकांचा अभाव; मातीची ओबडधोबड भांडीं वापरण्यासाटीं; पलंग म्हटला म्हणजे एक वेडीवांकडी खाट; त्याच्यावर बिछाना एक शिंदीची किंवा गवताची गादी; थंडींत कुडकुडी सुटेल तेव्हांच सुका पातेरा मिळवून त्याचा परसा करून त्याजवळ धग घेत बसणें; पावसांत अनेक ठिकाणीं गळती लागलेली झोंपडी, व बाहेर पडणें असल्यास पानांची छत्री; कांहीं उद्योग करणें म्हणजे कुऱ्हाड किंवा फरशी, किंवा पहार घेऊन जंगलांत जाणें, क्वचित् तिरकमठाच घेऊन; टोपीच्या ऐवजीं केसांचा मोठा झुपका; देहाच्या आच्छादनासाठीं मोठें वस्त्र दिशा, फक्त गुह्यांग झांकण्यासाठीं एक फाटकी तुटकी लंगोटी, ही या लोकांची घरची स्थिति.

तेव्हां या भाषेचें शब्दरूपी भांडार तें किती असणार! आतां या भाषेंत शब्दांचा भरणा म्हणूनच जरी कांहीं नाहीं तरी ही भाषा प्राचीन

होय ही गोष्ट निर्विवाद आहे. तेलंगी, तामीळ, कानडी या भाषा सर्व मूळच्या या गोंड भाषेच्याच शाखा असें अनुमान होतें. त्यांचा व संस्कृत भाषेचा संयोग झाल्यामुळें त्या सुधारून पक्क दशेप्रत आल्या, व अनेक कवींबरोबर समागम करून परम नागरिक सुखाचा उपभोग घेऊं लागल्या. पण तसा सुसंयोग गोंडी भाषेच्या कपाळीं लिहिला नव्हता. तेव्हां अर्थात् तिचि स्थिति ती कोठून सुधारणार? त्या बिचारीस वनवास प्राप्त झाला व लिपिरूपी जी सर्व भाषांची पर्णकुटी तीसुद्धां तिच्या कपाळीं आली नाहीं तेव्हां तिचें सौंदर्य, तीस पर्णकुटी नसल्यामुळें कालचक्रानें सहजच तिच्यावर जो हल्ला केला त्याच्यापुढें तें किती टिकणार? व तें नाहींसें झाल्यामुळें ती पंडित लोकांच्या मनांचें रंजन तें काय करणार? तेव्हां तिचा प्रकार इतक्या दशेप्रत येऊन पोंचला यांत कांहींच नवल नाहीं. पण संस्कृत, ग्रीक, लॅटिन या भाषा जशा स्वतःसिद्ध आहेत. म्हणजे या भाषांस दुसऱ्याची मदत मुळींच मिळालेली नाहीं—या स्वतंत्र आहेत व यांच्यापासून अनेक भाषा प्रादुर्भूत झाल्या आहेत, तशी गोंडी भाषा ही स्वतःसिद्ध होय व इच्यापासून तामीळ प्रभृति अनेक भाषा उद्भवल्या आहेत असें म्हणणें बरोबर दिसतें. इतकेंच कीं संस्कृत, ग्रीक व ल्याटिन भाषेप्रमाणें राजविलास मात्र गोंडी भाषेच्या नशिबीं नाहींत. याचें कारण आम्हीं सांगितलेंच आहे. जी केवळ जंगलांत राहून कालक्रमणा करणारी, राजे लोकांस जिचें नांव देखील माहीत नाहीं व जिचें स्वरूप सुधारून तिच्यावर सौंदर्याची लोकोत्तर कळा आणण्यास कविविधात्यांनीं यत्न केला नाहीं, तिच्या दर्शनानें आपल्या नयनास आनंद तो काय होणार! तात्पर्य, या भाषेस जो वनवास लागला तो आजपर्यंत कायम झाला, व पुढेंही कायम होणार. तेव्हां अशा वनवासांत राहणाऱ्या या भाषेची परिस्फुटता होणें हें फारच कठिण असें आम्हांस वाटतें. तरी तिचा विस्तार व परिवार फारसा नाहीं, म्हणून तिचा थांग लागण्यास फार प्रयास केले पाहिजेत असें नाहीं.

तेलंगी, कानडी, तामीळ या भाषा गोंडी भाषेपासून उद्भवल्या असाव्या असें आम्ही अनुमान केलेंच आहे; त्या अनुमानास आतां जो

आधार तो आम्ही आतां वाचकांस सादर करितों. त्याच्यावरून तेलंगी व कानडी या भाषा जरी खुद्द गोंड भाषेपासून निघाल्या नसल्या तरी तिच्या सख्ख्या बहिणी खऱ्या हें वाचकांच्या नीट ध्यानांत येईल.

| गोंडी | तेलंगी | कानडी | मराठी | गोंडी | तेलंगी | कानडी | मराठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आमोट | मेमू | नाऊ | आम्ही | आंद | आदा | अवळू | ती |
| अव | आंवरू | अवरू | त्या | कडक | कंडलौ | कण्णु | डोळा |
| कवी | कवलु | किवि | कान | कई | चेई | कै | हात |
| काल | काळु | कालु | पाय | आका | आकळु | येले | पान |
| कलतन | — | कळुतन | चोरी | गोहक | गोधमळू | गोधि | गहूं |
| दाई | अम्मा | ताई | आई | तंमू | तमो | तम्म | भाऊ |
| हिले | लेदु | इल्ल | नाहीं | हन | यो | होगु | जा |
| तोल | डोळू | तोंगलू | कातडें | रंड | रोडु | येरडु | दोन |
| सारूंग | आरू | आरु | सहा | पद | पदी | पत्तु | दहा |
| इंगा | — | इगलु | आत्ता | हिके | इरड | इकडे | इकडे |

यांप्रमाणें पहातां गोंडी, तेलंगी व कानडी या भाषांचें परस्पर सादृश्य बरेंच आहे असें दिसतें. कोणत्याही भाषेंतील सर्वनामें व अंक हीं दोन बरींच सदृश दिसतात. त्या भाषांचा परस्पर निकट संबंध असून त्यांतील जंगली स्थितींत राहिलेली, त्या सर्व सुधारलेल्या व पक्क भाषांचें मूळ असावी असें अनुमान साहजिकच ओघास येतें. यावरून गोंडी भाषेपासून तेलंगी व कानडी निघाल्या असाव्या, असा आमचा तर्क धांवतो. हा आमचा तर्क खोटा जरी पुढें कांहीं वर्षांनीं कदाचित् मोठ्या विद्वानांनी अधिक शोध करून ठरविला तरी गोंडी, तेलंगी व कानडी या भाषा एकाच पंक्तींत बसणाऱ्या आहेत ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे.

गोंडी भाषेंत गणित विद्येचें माहात्म्य फारसें नाहीं. पांच पावेतों गोंडी अंकलिपी तेलंगी व कानडी यांच्या अंकलिपीशीं बरीच मिळत्ये. पुढें दहा पावेतों सरासरीनें मिळत्ये. अकरा बारा यांचा मेळ मुळींच मिळत नाहीं. शंभराचा तेलंगीशी बराच मिलाफ आहे. हा जो गणितविद्येचा अगदीं

अभाव याचें कारण उघड आहे. हे लोक अगदीं जंगली व रानटी तेव्हां या संख्येची व मिळवणीची गरज ती काय पडणार. पुढें प्रसंग आलाच तर मराठी अथवा हिंदी या भाषेंत काम चालून निर्वाह होत असे. तेव्हां अर्थात् गोंडी भाषा याप्रमाणें गणितलिपींत पाठीमागें पडली.[1]

---

१ ( विविधज्ञानविस्तार, ) पुस्तक ८ पृ. १–४; जानेवारी १८७६. ) शास्त्रीबोवांच्या स्वतंत्र निबंधलेखनास सुरवात या लेखापासून झाली. येथपासून कोणत्याही गोष्टीवर स्वतः विचार करण्याची त्यांची विशिष्ट पद्धत जी एकदां ठरून गेली ती कायमच राहिली. वरील लेखाचें महत्व असें कीं गोंडी भाषेबद्दल जे विचार शास्त्रीबोवांनीं प्रकट केले आहेत, ते अजूनही ताजेच आहेत, या लेखांतला एक शब्दही अजून टाकाऊ झालेला नाहीं.

…ालय, ठाण. स्थल
वि:

## – ६ –

# गोंडी गीतें व गोंडी रिवाज

कोणत्याही भाषेंत गायनकला अगदीं नाहीं असें होत नाहीं. आमच्या या आर्यभूमीपासून पाहिजे तर दूर आफ्रिकेच्या मध्यभागांत राहणाऱ्या काळयाढूस शिद्याकडे पहा. त्याचें तें आपणास जरी मनोरम व चित्तवेधक न वाटलें, तरी कांहीं ना कांहीं गायन व टामटूम हें असतेंच. तेव्हां गोंडी भाषेंत वेडी वांकडीं तरी कांहीं गीतें असावीं असें साहजिकच अनुमान होतें, व हें अनुमान खरेंही आहे. मनुष्यमात्र जसा स्त्रीविषयीं लुब्ध आहे, तसाच गायनाविषयीं आहे, तेव्हां गायनाविषयीं साधारण प्रेम असणें हा एक मनुष्याचा दुष्परिहरणीय स्वभावच आहे असें म्हटलें असतां चालेल. तेव्हां ज्या अर्थीं गोंड लोक हे मानवी प्राणी आहेत हें

उघड आहे, त्या अर्थीं त्यांच्यांत कांहीं तरी गायनकला असावी हें हीं उघडच आहे. शोधाअंतीं गोंडी भाषेंतील गीतें फारशीं वर्णनीय दुमदार अनेक अलंकारादिकांनीं युक्त अशीं नाहींत असें समजतें. पण सर्व गीतांत यमक व प्रास यांचा थोडाबहुत भरणा नाहीं असें क्वचित् होतें. दुसऱ्या अलंकारांचें व इतर मुख्य मुख्य गुणांचें व गीतांचें कांहीं परिचयन नाहीं यांत फारसें आश्चर्य नाहीं. जसजशी मनुष्याची स्थिति सुधारत जाते, व त्याचे विचार प्रौढ होत जातात, तसतशी त्याच्या काव्यांत व गीतांत सुधारणा होऊन तीं सहृदयहृदयाल्हादक होतात हें उघड आहे. तशांत एकाद्या कविजनानें किंवा गुणिजनानें तरी गोंडी भाषेची थोडी सुधारणा करण्यांस यत्न केला असें दिसत नाहीं. अरण्यवासी अरण्यपंडितांनीं त्या भाषेस दृढ आलिंगन देऊन तीस चुना माती कुटण्याचे ध्वनींत प्रायः गुंतवून टाकिलें आहे. तेव्हां तिला अनेक प्रकारचे अलंकार व शृंगार कोठून प्राप्त होणार ! तेलंगी काय, तामीळ काय, दुसऱ्या दक्षिणेंतील भाषा काय,—त्या सर्वांस अनेक कविजनांनीं श्रीमंताप्रमाणें उदार होऊन अनेक यत्नांनीं सौकुमार्यादिक गुणांनीं संभृत करून चित्रविचित्र अलंकारांनीं अलंकृत केल्या आहेत. म्हणूनच त्या हल्लीं विद्वानांच्या मनोभ्रमरांचें एकाद्या सुंदर व सुवासिक कमलाप्रमाणें आकर्षण करून घेत आहेत. गोंडी भाषेस तिच्या दुर्दैवानें असलें कोणतेंही साधन प्राप्त झालें नाहीं. गोंड मांडलिक राजे कांहीं होऊन गेले. त्यांनीं म्हटलें म्हणजे आपल्या भाषेचें गौरव सर्वत्र होण्याविषयींचा यत्न करावयाचा; पण ते सर्व भिल्लांप्रमाणें लुटारू व अक्षरशत्रु. तेव्हां गोंडी भाषेनें काय करावें ! तिचा कांहीं उपाय नाहीं. तशांत तिची जन्मभूमीवर इतकी प्रीति आहे कीं ती तिनें कधींही सोडली नाहीं. तेव्हां तिला इतर भाषारत्नांचा वारा तरी कोठून लागणार ! गोंड लोकांत प्रधान म्हणून एक भेद आहे. हे गोंड लोक आपल्यांत ज्यांस मोठे म्हणतात त्यांच्या पदरीं असतात. रजपुतान्यांत जशी भाट लोकांची कीर्ति आहे, तशीच गोंडवनांत या प्रधान लोकांची आहे. यांच्या स्थितीचें निराळें वर्णन केलें पाहिजे असें नाहीं. गोंड लोक व हे सर्व एका

माळेंतलेच मणी. भेद म्हणून इतकाच कीं गोंड भित्रा तर प्रधान धीट व गोंड मुखदुर्बळ तर प्रधान वाचाळ. यांचे कवि व गीतें करणारे काय ते हेच प्रधान लोक. गोंडी भाषेंतील गीतें ऐकावयास मिळणें फार कठिण काम आहे असें नाहीं. त्यापैकीं चार मासले आम्ही पूर्वीं वचन दिल्याप्रमाणें आज आमच्या वाचकांस सादर करितों.

गीत १

मंडक्यांतलें[1] मडकें मशीचें मडकें,
परवां लग्न झालें, मला पेज वाढ.
( अडकाते अडका कोसाता अडका
नाडीमन्नो मडमी आता नाक जावा मासे )

भावार्थ:–अत्यंत कृष्णवर्ण असून जिचें लग्न नुकतेंच मोठ्या कष्टानें झालें, ती आतां मोठा नखरा करून माझ्या भोजनादिकांकडे लक्ष देत नाहीं, म्हणून मी तीस लावून बोलत आहें व भोजन मागत आहें.

गीत २

आंधळीचा डोळा फुटला, आंधळी कां आली ?
दीडशें पंक्तीचा आंधळीनें विचका केला.
( काडीना कड पिडता काडी वाडी बाता
डेडानूर मांदीतून काडी इचके किता )

---

१ या गाण्यांचे भावार्थ शास्त्रीबोवांना आकलन झालेले नाहींत. पहिल्या गीताचा भावार्थ असा. ' कृष्णवर्ण ' हा शब्द केवळ थट्टेनें वापरला आहे. गोंड लोक विनोद व उपहास यांत प्रवीण असतात. नूतन वधूस पतीपुढें शृंगार करून मिरवितांना पुरेंसें झालें आहे. तेव्हां तिचें स्वयंपाकांत कसें लक्ष लागणार ? दुसऱ्या गीतांतल्या ' आंधळी ' ह्या शब्दांत सुद्धां ' काणे ' पणाच जास्त दाखविला जातो. गोंडीभाषेंत शब्दांचे पर्याय नाहींत. पंक्तींत वांकड्या नजरेनें व चंचलतेनें हिंडणाऱ्या वधूनें सर्वांची मनें घायाळ केलीं असें ध्वनित होतें. तिसऱ्या गीतांतही ' मासळी ' म्हणजे सौभाग्यकांक्षिणी कुमारिका. तरुणानें अनुनयांत प्रगति केली नाहीं तर त्याला चांगली बायको कशी मिळणार; असें ध्वनित केलें आहे.

भावार्थ:- जिचा डोळा फुटला, असली एक विरूप आंधळी दीडशें मनुष्यांच्या पंक्तींत आल्यामुळें तिनें सर्व पंक्तीस अगदीं विरस करून टाकिलें.

### गीत ३

झिम झिम पाऊस येतो, नदीला पूर येतो,
आण वहिनी गांवीं लहान मासे पळूं लागले.

भावार्थ :— बारीक बारीक पाऊस पडत आहे, नदीला पूर येत आहे, तर वहिनी गांवीं लौकर आणून दे. मासळ्या पळून जाऊं लागल्या आहेत.

### गीत ४

चकपक नखरेबाज जवानपठ्ठ्या पुंढें धांवतात.
अशा हल्लीं मुली आतांच्या छिचोर पोरी.
( चैक मैक मैजाधार बगाई योड अगाधार
विहुना आता पेडगी इगाडा चटरी पेकिंग )

भावार्थ:- चकपक व्हावें, नखरा करावा, जवान पठ्या पुरुषांपुढें धांवून जावें, अशीं लक्षणें हल्लींच्या मुलींची झालीं आहेत. आतांशा पोरी फार छिचोर झाल्या आहेत.

आतां गोंड लोकांच्या स्थितीचें आणि रीतिभातीचें जितकें म्हणून सूक्ष्म निरूपण होईल तितकें चांगलें खरें, पण वास्तविक तत्स्वरूपाचें निरूपण होण्यास जितकें संघटन गोंडलोकांशीं पाहिजे व जितकें गोंड लोकांच्या प्रदेशांत परिभ्रमण केलें पाहिजे तितकें आमच्या हातून झालें असें आम्हांस वाटत नाहीं. तरी जी माहिती आम्हांस मिळविण्यास सांपडली ती व तत्संबंधी विचार व जें कांहीं त्यांच्या भाषेचें स्वरूप आमच्या नजरेस पडलें तें आम्हीं आतां वाचकांस सादर करितों.

हे लोक आपणांस गोंड म्हणवीत नाहींत, तर यांस हें नांव अन्य लोकांनीं दिलें आहे व हे लोक आपणांस कोयतोर म्हणवितात याचा उल्लेख आम्ही पाठीमागें केलाच आहे. आतां गोंड हें नांव या लोकांस काय समजून

अथवा कोणत्या विशेष गुणांचा या लोकांवर आरोप करून दिलें, याचा पक्का शोध ज्या पक्षीं त्याचा इतिहास म्हणून नाहींच त्या पक्षीं लागणें तर कठीण. पण आम्हांस वाटतें कीं, गोंड लोक व विशेषेंकरून त्यांच्या स्त्रिया आनखशिखाग्र आपलें सर्व अंग गोंदून टाकितात त्यावरून त्यांस अन्य लोकांनीं " गोंध " म्हणजे " गोंधलेले " असें नांव दिलें असावें, व दकार, घकार, डकार, ढकार, या चार अक्षरांचें पुष्कळ साम्य असल्यामुळें हळूहळू " गोंध " या शब्दाचा अपभ्रंश " गोंड " असा झाला असावा. अथवा इतर हिंदू लोकांप्रमाणें हे गाईस पवित्र मानीत नाहींत इतकेंच नव्हे तर तिला बैलाप्रमाणें नांगरास जुंपून तिचें मांस सुद्धां भक्ष समजून खातात, अर्थात् हे " गोघ्न " असें नांव पहिल्यानें मिळालें असून सिंहादि शब्दांप्रमाणें नवर्णाचा विपर्यय होऊन घकारास ढकारत्व किंवा डकारत्व प्राप्त होऊन त्या गोघ्न शब्दाचा " गोंड " हा अपभ्रंश झाला असेल. पहिल्या अनुमानापेक्षां शेवटील अनुमान अधिक संभवाचें आहे, असें आम्हांस वाटतें; कारण दक्षिण हिंदुस्थानांत थोडी बहुत गोंधण्याची चाल आहेच तेव्हां " गोंधणें " हेंच केवळ भेदक करून त्यांस अन्य लोकांनीं हें नांव दिलें हें म्हणणें आम्हांस बरोबर दिसत नाहीं.

गोंड लोक साधारणतः म्हटले म्हणजे देव एकच आहे व तो निराकार असून सर्वशक्ति आहे व त्याची सेवाभक्ति करणें हें अवश्य होय असें म्हणतात. तरी त्या लोकांस रानटी लोकांप्रमाणें भूतपिशाचादिकांचा भास नाहींसें नाहीं. मंत्रांवर व जादूवर त्यांची बळकट श्रद्धा असते. हिंदुधर्मांतील शास्त्रें व पुराणें यांच्यावर गोंड लोकांची श्रद्धा आहे किंवा त्यांस त्यांची विशेष माहिती तरी आहे असें दिसून येत नाहीं. हे मूर्तीचा द्वेष करितात असें नाहीं. यांचा सर्वांत मोठा संस्कार म्हटला म्हणजे "विवाह." यांच्या सर्व संस्कारांत मद्यपान अगदीं आवश्यक होय. त्याशिवाय संस्कार सांग होत नाहीं. स्त्रियांचे पाट पुरुषांच्या पुनर्विवाहाप्रमाणें अगणित होतात. लग्नें लहानपणीं होतात व मोठेपणींही होतात, सुमार म्हणून कांहीं नाहीं; कारण या लोकांस कालमान गणण्याचें ज्ञान फारसें नाहीं. धाकटा भाऊ

हा वडील भाऊ मृत झाल्यास त्याच्या बायकोबरोबर पाट लावितो. इतें, राजबन्सी, प्रधान असले जातिभेद या लोकांत बरेच आहेत व त्यांत परस्पर अन्नव्यवहार किंवा शरीरसंबंध होत नाहींत असें आम्हांस चांगलें कळलें आहे. कित्येक अन्य जातीयांबरोबर देखील गोंड लोकांचा अन्नव्यवहार होत नाहीं. तरी ब्राह्मणादिकांप्रमाणें या लोकांत असल्या व्यवहारास फारसा निर्बंध आहे असें नाहीं. कित्येक गोंड स्त्रिया यवनादिकांनीं ठेवलेल्या असतात व तेथें त्यांच्या समागमें त्यांचे भोजनादिक व्यवहार होतात. गोंड स्त्री अथवा गोंड पुरुष यांची संतति कांहीं काळानें जातींत मिसळण्याची इच्छा दाखवील तर तीस जातींत मिसळवितां येतें. पण जो अत्यंत अन्यजातीय त्याचा मात्र या लोकांत प्रवेश होत नाहीं; व असें आहे म्हणूनच ही जाति आजपर्यंत चिरायु होऊन राहिली आहे. हे लोक दारिद्र्याचें केवळ माहेर. तेव्हां यांच्यांत सदाचाराची प्रवृत्ति फारशी नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. सारांश, यांतील स्त्रीपुरुषें अगदीं क्षुल्लक कारणावरून देखील वैवाहिक संबंध एकदम तोडून टाकितात. मद्यपानाचें या लोकांत इतकें माहात्म्य आहे, कीं त्यासाटीं ते सांगाल तसे हाल काढतील व कष्ट सोसतील. फार तर काय, जर पदरीं पैसा नाहीं तर चोरी करून तरी मद्यपान केल्याशिवाय रहात नाहींत. या लोकांच्या स्त्रिया काळ्या रंगाच्या असून चांगल्या धिप्पाड व दृढ शरीराच्या असतात. व हरएक कामधंदा चांगली मेहनत करून करितात. तेव्हां पुरुष अर्थात् फारच भित्रे, गरीब व आळशी असतात. आपण पुढें सरसावून एखादें काम आपला लौकिक व्हावा एतदर्थ त्यांनीं घेतलें असें कधीं घडत नाहीं. गांवाच्या आसपास थोडेंबहुत जें हलकेंसें काम मिळतें तें करून हे आपली कशीतरी जीविका चालवितात. या लोकांत पिशाचादिकांच्या विद्येंत जो कोणी मोठा निपुण असतो त्यास "पुजारी" म्हणतात. त्याजला व्याघ्रादि हिंस्र पशूंची रूपें धारण करण्याचें सामर्थ्य असून आकाशांतून उडून जाण्याचेही मंत्र चांगले येत असल्यामुळें चांगली शक्ति असत्ये असे हे लोक समजतात. त्याच्यावर या लोकांचा विश्वास फारच असतो

व त्याचा मानही हे लोक चांगला ठेवितात. तो गोंडच असतो व त्याच्या खाण्यापिण्याचा खर्च सर्व लोक मिळून चालवितात. जारण, मारण, मोहन, उच्चाटन, मूठ मारणें असल्या मंत्रांची सिद्धि करून घेण्याचें या लोकांस वेड फार असतें. हरएक मनुष्य मरतो तो रोगानें मरत नाहीं व व्याघ्रादिक हिंस्र पशु त्यास आपण होऊन खात नाहींत, तर हे सर्व माहात्म्य मंत्रांचें व जादूगिरीचें असा त्यांचा समज आहे. हे लोक विटाळशीची शिवाशीव फारच मानितात. विटाळश्या बायकांकरिता एक लहानसें झोंपडें बांधलेलें असतें. तिथें तिनें रहावें व तिथेंच खाणें पिणें वगैरे सर्व विधि उरकून आपले कपडेलत्ते जेथें कोणासही स्पर्श होणार नाहीं अशा एकाद्या दूरच्या झाडावर टांगून ठेवावे असा या लोकांचा आचार आहे. विटाळशी बायको खेरीज करून यांच्यांत स्पर्शास्पर्शाचा विचार बिलकुल नाहीं. वस्तीपासून दूर असें एक सागाचें किंवा असलें दुसरें झाड पाहून त्याच्या खालीं बाणासारखी एक लोहाची प्रतिमा करितात, व त्या प्रतिमेस पूजा नैवेद्य केल्यावांचून कोणताही कामधंदा करूं नये असा त्यांचा समज आहे. ज्या झाडाखालीं हा देव असतो त्या झाडाखालीं सुद्धां फिरकण्याची बायकांस मनाई असते. जर कां बायको त्या झाडाखालून गेली किंवा तिची सावली त्या देवावर पडली तर तो देव अगदीं खवळून जातो व आपलें सर्वस्वी नुकसान करितो असें हे समजतात. या लोकांची प्राचीन काळीं देवळें होतीं व त्यांत हे नरमेध करीत असत असें यांच्या दंतकथेवरून दिसतें. मनुष्याचा बळी देण्याचा संप्रदाय भोंसले सरकारचें राज्य व त्याच्या पूर्वीचें पटाणाचें राज्य या दोन राज्यांहून चांगल्या प्राचीन काळीं मात्र होता असें दिसतें. प्रस्तुत काळीं बैल, रेडा, डुकर, कोंबडें, असले पशु बळी देण्याची चाल पडली आहे. एकदां परजातींत गेलेला गोंड जर स्वजातींत येऊं लागला तर त्या प्रसंगीं खाणें पिणें होऊन प्रसंगवशात क्षौरादिक प्रायश्चित्तही होतें. या लोकांचें वैद्य म्हटले म्हणजे "पुजारी" किंवा जादुगीर. त्यांस झाडपाल्याच्या औषधाचें थोडेंबहुत ज्ञान असतें, व त्या ज्ञानावर काय ती त्यांची सर्व मदार असते. हे लोक सामान्यतः म्हटले

म्हणजे कुरूप खरे, पण यांचे केस हे बरेच म्हातारे झाले तरी बहुत करून पिकत नाहींत. जरी हे रानटी जनावरांस बरेच भितात तरी आपलें जंगल सोडून मैदानांत किंवा शहरांत जाऊन रहाणें यांस फारसें आवडत नाहीं. या लोकांत शेतकी करणारे म्हटले म्हणजे फार थोडे. प्रायः सर्व लोक दुसऱ्याची नोकरी पत्करून आपला उदरनिर्वाह चालवितात व कित्येक मजुरी करून आपलें पोट भरितात. या सर्व कारणांवरून त्यांची स्थिति सुधारण्याविषयीं एकादी नवीन मंडळीच जर स्थापित झाली, तरच त्यांच्यांत कांहीं सुधारणा होईल. एरवीं म्हटलें म्हणजे त्यांची सुधारणा होणें हें दुरापास्त आहे, असें आम्हांस वाटतें.[1]

---

१ गोंडी भाषा, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ८. पृ. १–३, ४१–४४. १८७६, जानेवारी व मार्च. गोंडी भाषेसंबंधानें लिहिणारे शास्त्रीबोवा महाराष्ट्रांतलेच नव्हत तर हिंदुस्थानांतले पहिले विद्वान. त्या काळच्या आदिवासींवर लिहिणाऱ्या आंग्ल लेखकांच्याहूनही जास्ती स्वतंत्र विचारांचें असें हें लिखाण आहे. आदिवासींना शास्त्रीबोवा ' आद्य देशी लोक ' म्हणतात. शास्त्रीबोवांच्या पूर्वीं नेटिव ओपिनियनच्या एका अंकांत मला ' गोंड लोक ' म्हणून एक लेख सांपडला. पण तो मननीय असला तरी इंग्रजी गॅझेटीयरच्या व एकंदर आंग्ल पंडितांच्या विचारांची हुबेहुब नक्कल करून लिहिला आहे. (त्यावेळी दोनच पुस्तकें आदिवासींवर इंग्रजींत लिहिलीं गेलीं होतीं.) हा लेख शास्त्रीबोवांच्या लेखाप्रमाणें सहानुभूति आणि रसिकता यांनीं पूर्ण असा नाहीं. स्वयंस्फूर्त पण नाहीं. तरी मराठींत आदिवासी जीवनाच्या चर्चेची मुहूर्तमेढ फारच शास्त्रोक्त आणि सुंदर रीतीनें झाली असें ह्या दोन्ही लेखांवरून म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. 'नेटिव ओपिनियनमधल्या लेखांत गोंड शब्दाची व्युत्पत्ति व द्राविडी भाषांचें विवरण आहे ( नेटिव ओपिनियन २९–९१८७६ ).

५१९९६ ठाणे

— ७ —

## अवतार

जर या सर्व जगताचा कर्ता व सूत्रधार म्हणून कोणी एक सर्वज्ञ आहे खरा, तर त्यास युगोयुगीं व देशोदेशीं दुर्जनांचा संहार करण्यासाठीं किंवा अज्ञ लोकांस सद्गतीचा लाभ करून देण्यासाठीं अवतार अवश्य घेतला पाहिजे. जर तो अवतार घेणार नाहीं तर सर्व दुर्जनमय होऊन जाईल व पारमार्थिक कल्याणाचा मार्ग कोणासही दिसेनासा होईल. या विशाल भूमंडळावर सर्व लोक सुधारलेले नव्हत. कित्येक अगदीं जंगली पशूंचींच भावंडें म्हटल्यास साजेल असे असतात. कित्येकांमध्यें तर आध्यात्मिकसुधारणा व कित्येकांमध्यें आधिभौतिक सुधारणा केवळ जवळ जवळ कळसास गेलेली असते. अशा दिगंतवासी किंवा अनेक औपाधिक निमित्तांनीं परस्पर अत्यंत भिन्न अवस्थांमध्यें लोळणाऱ्या लोकांचें एकमेकांबरोबर दळणवळण असण्याचा संभव नाहीं. परमात्म्यास तर सर्वच लोक सारखे. तेव्हां निरनिराळ्या लोकांमध्यें निरनिराळेच अवतार त्यास घेतले पाहिजेत. तशांत सर्व लोकांमध्यें एककालावच्छेदानेंच अधर्म माजून दुर्जनांचा या पृथिवीमातेस भार होतो असें नाहीं. तेव्हां सहजच निरनिराळे वेळीं परमात्म्याचे अवतार झाले पाहिजेत. कित्येक भगवंताचे अवतार उग्र असतात व कित्येक शांत असतात. कित्येक अत्युग्रही असतात. शिवानें वीरभद्रावतार घेतला तो अत्युग्र व विष्णूनें नरसिंहावतार घेतला तो ही अत्युग्र. वीरभद्रानें एक सारखा दक्षाचा व इतर याज्ञिकांचा विध्वंस मांडिला. नरसिंहानेंही हिरण्यकशिपूस फाडण्यास सपाट्या सरसा आरंभ केला, याज्ञिकांचा व त्यांच्या यज्ञांचा विध्वंस होतांच वीरभद्रावतार व हिरण्यकशिपु गतप्राण होतांच नरसिंहावतार संपला. दुर्जनांपासून सज्जनांचें रक्षण

करण्यासाठीं जे अवतार होतात ते उग्र असतात. स्वभावतः ते कितीही शांत व सौम्य असले तरी त्यांस प्रसंगविशेषीं उग्रता धारण केल्याशिवाय गति नसते. शिवाजी कांहीं क्रूर किंवा रक्तपातप्रिय नव्हता. तरी त्यास लढाई करून रक्तपात केल्याशिवाय स्वजनांस व स्वधात्रीस मुक्त करितां आलें नसतें. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे अवतार झाले ते सर्व शांत. असले अवतार लढाया मारून रक्तपात करण्याच्या भरीस पडत नाहींत. त्यांचे सर्व विचार जड जंतूंचा उद्धार करून त्यांस परम पुरुषार्थाचा लाभ करून देण्याकडेस लागलेले असतात.[१]

१ अवतार; हिंदुधर्मविवेचक. चैत्र १८०८; १८८६

## — ८ —

## शिमग्याचा सण

आमचे हिंदु लोकांचे जे अनेक सण आहेत त्यांत शिमगा हा शेवटचा सण होय. या सणाविषयीं हिंदुधर्माची सुधारणा करूं पहाणाऱ्या पत्रांतून व मासिक पुस्तकांतूनही आजपर्यंत जो मजकूर छापून प्रसिद्ध झाला आहे तो सर्व एकत्र करून जर ग्रंथ बांधला तर तो ग्रंथ महाभारताएवढा किंवा त्याहूनही मोठा होईल. पण त्या सर्व लेखांचें तात्पर्य काय ? तर, हा सण फार वाईट आहे याकरितां करूं नये. हा उपदेश प्रथमतः पाद्री लोकांनीं सुरू केला. नंतर त्यांच्या उपदेशाने फितूर होऊन जे आपल्या देशबांधवांचा त्याग करून परधर्मास अनुसरले त्याणीं तर या उपदेशाचा गहजबच करून सोडला. पाद्यांनी किंवा त्यांच्या शिष्यांनी जरी कांहीं म्हटलें तरी जे आपणास सारासार विचार करून सत्याचेंच ग्रहण कर-

णाऱ्यांमध्ये अग्रेसर समजतात त्यांनीं तरी थोडा विचार करून टांक बुडवावा. परंतु तसें होत नाहीं. प्रतिवर्षीं शिमग्याचे दिवस आले कीं कांहीं तरी हिंदु लोकांस म्हणजे आपल्या देशबांधवांस निरुत्साह करण्या सारखें किंवा दुःख होण्यासारखें लिहून आपल्या शुद्धतेची, शहाणपणाची अथवा आपल्या सुधारकत्वाची आढ्यता दाखविल्या शिवाय त्यांस चैनच पडत नाहींसे होतें. आमच्या सुधारकांची वृत्तीच कांहीं चमत्कारीक होत चालली आहे. त्यांस असें वाटतें कीं ज्यापेक्षां आपण परतंत्र झालों आहोंत त्यापेक्षां आपण कोणत्याही प्रकारचा आनंदोत्सव करितां कामा नये. नृत्य, गीत, रागरंग वगैरे ख्याली खुशाली गोष्टीपैकीं आम्ही एकही करितां कामा नये. फार तर काय ? आम्ही कपाळाला चंदनटिळक सुद्धां किंवा स्त्रियांनीं कुंकुम टिळकही लावूं नये. तात्पर्य, सर्वांनीं सुतक्याची वृत्ति धारण करून (पाद्री) लोक आपणांस हंसणार नाहींत, अशा थाटानें वागावें, आणि करावें काय ? तर पाद्री लोकांस खुश करण्यासाठीं आपल्या धर्माची सुधारणा म्हणजे निंदा करावी. गणेश चतुर्थीच्या सुमारास गणपतीची चेष्टा होईल, शिमग्याच्या सुमारास शिमग्याचा फडशा उडेल, असले लेख लिहावे, पुनर्विवाह गोर गरिबांकडून करवावा. बालविवाहनिषेधाच्या गप्पा माराव्या, न्याशनल कॉंग्रेसचें माहात्म्य गावें, राज्यकर्त्यांस आमचें म्हणणें मनावर घेण्यास प्रवृत्त करण्यास झटावें. म्हणजे काम झालें ! हे उद्गार आमच्या येथल्या एका प्रतिष्ठित वर्तमानपत्रकर्त्यांचेच आहेत. शिमग्याकडे आणि देशोन्नतीकडे काय संबंध आहे हें त्यांचे त्यासच ठाऊक असेल. नाच, तमाशे, बैठका, वगैरे घटकाभर मौज करण्याचे प्रकार शिमग्यांत लोक करितात म्हणून शिमगा बंद करावा. पण इंग्लंड सारख्या सुधारलेल्या देशांत शिमग्याचाच थोरला भाऊ नाताळ दरवर्षी आठ दिवस चालतो त्याचें काय ? पण तो राजकर्त्यांचा सण आहे. राज्यकर्तृत्व हातीं असलें म्हणजे त्यांनी कांहीं केलें तरी चालतें. आमच्यामध्यें सुधारलेले लोकास त्यांचें 'बाल' म्हणजे पतिपत्नीभाव ज्यांच्या मध्यें नाहीं असल्या स्त्रीपुरुषानीं मद्य चांगलें ठासून व एकमेकांच्या कमरास मिठ्या मारून व अश्लील

अभिनय करून नाचणें पसंत पडतें! कलावंतिणीचें गीत किंवा नृत्य पहाणें अधर्मास उत्तेजन देणारे जे सुधारलेले लोक समजतात तेच 'आपरा' बैठक किंवा इंग्रेजी नटीचें नाटक असलें म्हणजे तें पाहाण्यास तिळमात्र संकोच न धरितां आपल्या बायका मुलांसहित जातात. पण 'बाल' पडला राज्यकर्त्यांचा व 'आपराग्यर्लस' प्रमाणें शेक्सपीयरची नाटकें करणाऱ्या नटी पडल्या गौरकाय. जे ज्ञानोदय कर्ते शिमग्याच्या विरुद्ध लिहितात त्यांनीं 'बाल' च्या विरुद्ध चकार शब्द काढलेला आम्हांस आठवत नाहीं. दुसऱ्याचें मात्र कारटें हा साधारण ज्ञानोदय कर्त्यांचा व तज्जातीयांचा नियम दिसतो. आम्हांस या संबंधानें आज दोन शब्द लिहावयाचे आहेत. ते हे.

प्रातःकालापासून सायंकालपर्यंत घडणाऱ्या किंवा मनुष्याच्या जागृतावस्थेंतल्या वृत्तीचा जर विचार केला तर असें दिसून येईल कीं मनुष्य कितीही विचारी असो, कितीही इन्द्रिय-संयमन करणारा असला, तरी त्यास क्षणभर तरी विनोद केल्याशिवाय राहवणार नाहीं. निदान त्यांस न कळत तरी विनोदास्पद असें कांहींतरी कृत्य त्याच्या हातून होईल. मग तो विनोद बोलण्यांत होवो, चालण्यांत होवो किंवा तो स्वतःशीच करो. पण ती विनोदवृत्ति त्यास क्षणभर तरी धरल्या खेरीज सोडणार नाहीं. मात्र त्यांत फरक इतकाच कीं असभ्य मनुष्य असेल तर तो मर्यादा सोडून अश्लील असाही विनोद करील. या अश्लीलपणाच्या वृत्तीचा जितका संकोच करवेल तितका करावा हाच हेतु शिमग्याचा सण उत्पन्न करणारांचा आहे. मद्य आणि मांस भक्षण करण्याची मनुष्यास स्वाभाविक इच्छा असते. ही एका प्रकारानें विचार केल्यास फार वाईट दिसते, म्हणून मन्वादि ऋषींनीं वाजपेयसौत्रामण्यादि यज्ञ करून मद्यमांस भक्षण करावें अशीं मर्यादा करून तद्विषय स्वाभाविक इच्छेचें आकुंचन केलें, म्हणजे जो उठला तो सुटला दारू पीतो अथवा मांस खातो असा, जो अत्यंत निंद्य प्रकार होता त्याचा निषेध केला. आणि मद्य मांसाविषयींची उत्कट, म्हणून समूळ नाहींशी करण्यास कठीण, वांछा तिला वाव

करून ठेविला. तद्वतच शिमग्याचा प्रकार आहे. वर सांगितल्याप्रमाणें मनुष्यास जी थट्टा मस्करी अथवा विनोद करण्याची हौस उत्पन्न होते व जिचें पर्यवसान अश्लीलपणांत होते त्या अश्लीलपणाचा शास्त्रज्ञांनीं विधि सांगून निषेधच केला आहे. तो असा कीं ३६० दिवसांपैकीं एक दिवस म्हणजे फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशीं घराच्या बाहेर मंडळींत होलिका पूजनाचे वेळीं जी बीभत्स शब्दांचा उच्चार करण्याची उत्कट इच्छा ती पूर्ण करून घ्यावी, नंतर कधींही त्या शब्दांचा उच्चार करूं नये असा नियम केला आहे, आणि व्यवहारही असाच आढळतो. कधीं कोणी जर प्रसंगीं अवाच्य शब्दांचा उच्चार केला अथवा नुसतें ओंठाकडे मणगट नेलें तरी शिष्ट लोक रागें भरतात आणि कायरे, शिमगा आहे ? असा प्रश्न करून त्याचा तिरस्कारपूर्वक निषेध करितात. याहून विद्वानांनी आणि वजनदार लोकांनीं बंदोबस्त तो काय करावयाचा ? असो. याप्रमाणें शिमग्यांतल्या बीभत्सपणाची मर्यादा ठरली. बाकी त्या सणांत कोणताही प्रकार सुधारकांनीं नाक मुरडण्या सारखा आहे असें नाहीं. शिमगा हा दसऱ्याच्या सणाप्रमाणेच फार प्राचीन आहे. याचें खरें नांव वसंतोत्सव. हें संस्कृत नाटकांत आढळतें. कोणी होलिकोत्सव म्हणतात. आणि प्राकृत जन यास शिमगा म्हणतात. हा उत्सव सर्वत्र रंगपंचमीपासून सुरू होतो. याची व्याप्ती कमजास्ती मानाने काशीपासून रामेश्वरापर्यंत सर्वत्र हिंदुस्थानांत आढळते. दसरा, दिपवाळी, आणि शिमगा या तीन सणांस सार्वजनिक ( न्याशनल ) सण म्हणतां येईल. त्या प्रमाणें रामनवमी, गोकुळाष्टमी, गणेशचतुर्थी वगैरे सणांस म्हणतां येणार नाही. कारण यांची व्याप्ति सर्वत्र नाहीं. वसंतोत्सवाचा अधिक प्रकार मारवाड देशांत दिसतो. आमच्या महाराष्ट्रांत त्यापेक्षां कमी आहे. या प्रांतांत द्वादशीचें रात्रीं सर्व देवालयांतून हा उत्सव सुरू होतो. प्रथमतः नृत्य गायन होतें. नंतर पहिल्यानें देवाच्या नूतन परिधान केलेल्या वस्त्रावर रंग व गुलाल उडवितात. तदनंतर ब्राह्मणांवर व मग मानाप्रमाणें मुख्य मुख्य सभासदांवर उडवून सर्व जमलेल्या मजलसीवर उडवितात. याप्रमाणें उत्सवास आरंभ झाल्यावर समवयस्क लोक आपापल्या घरीं यथाशक्ति उत्सव करितात.

त्यांत थट्टामस्करी, गायन, नृत्य, मिष्टान्नभोजन, रंगीबेरंगी वस्त्रें परिधान करणें, नाना प्रकारच्या क्रीडा करणें इतके होतें. आपापल्या शक्तीप्रमाणें, कोणी केशरांचा, कुसंब्याच्या फुलांचा अथवा निदान हळदीचा तरी रंग करून एकमेकांच्या आंगावर उडवितात. इत्यादि मौजेचे प्रकार होतात. शिवाय तरुण असतात ते रात्रौ समुद्र किनारीं अथवा मैदानांत आट्यापाट्या, खोखो, चिकाट्या, कुस्त्या वगैरे मर्दुमकीचे खेळ खेळतात. पौर्णिमेचे रात्रीं होळी झाल्यावर दुसऱ्या दिवशीं धुळवड होते. हा प्रकार जरा सकृत्‌दर्शनी वाईट दिसतो खरा, पण जरा विचार केला तर त्याविषयीं ही समजुत पडेल..

आमच्या सर्व कृत्यांत परकीयांच्या त्रासामुळें फरक पडत चालला आहे. त्यामुळें कोणती ही क्रिया शास्त्रोक्त व्हावी तशी होत नाहीं. पूर्वीच्या व्यवस्थेचा लोप होत चालला आहे. असो, धुळवड हा शब्दच यथार्थ आहे. बाल गोपाळ सर्व एक व्हावयाचे. त्या दिवशीं चांडाल स्पर्श मुद्दाम करावा, असा शिष्टाचार आहे. म्हणजे ब्राह्मणा पासून चांडाळा पर्यंत आणि राजा पासून रंका पर्यंत सर्वांनी आपली अहंभावना एकीकडे ठेवून एकत्र जमावें, आणि चार घटिका परस्परांशी विनोद करून मग अंगावर धूळ उडवावी. यांत गर्भितार्थ इतकाच कीं या नाशिवंत जगांत लहान थोर कोणी नाही. सर्वांची योग्यता या धुळी बरोबर आहे. ... सर्व धुळींतून आले आणि अखेर धुळींतच जातील.. मट्टीकु मट्टी मिलाई.. 'dust to dust' इत्यादि जीं भगवद् भक्तांची व तत्ववेत्यांचीं वाक्यें, त्याची यथार्थता सूचित करावी आणि निरभिमान व्हावें हाच या धुळवडीचा मुख्य उद्देश दिसतो. असा हा विधि आटोपल्यावर सर्वांनी सचैल स्नान करावें, नूतन वस्त्रें परिधान करावीं, अंगास बुका वगैरे परिमळ द्रव्यांचें अर्चन करावें व पुन: रात्रौ सर्वांनीं देवालयांत जमून, भजन पूजन करून शेवटीं भगवन्नामाचा जयघोष करीत आपापल्या घरी जावें, व दुसऱ्या दिवशीं पूर्ववत स्वकर्मास अनुसरावें, हा एक हेतु झाला. दुसरा हेतु असा दिसतो कीं हेमंताच्या शेवटीं हवेंतील दुष्टपणा नाहींसा होऊन

ती स्वच्छ होऊन दुष्ट हवेमुळें उद्भवणाऱ्या या रोगांपासून लोकास इजा होऊं नये, म्हणून होलिकादेवीची योजना आमच्या शास्त्रज्ञ पूर्वजांनीं केली असावी, अशी आमची कल्पना आहे. या कल्पनविरुद्ध आमचे सुधारक जे दारापुढें पांचचार गोऱ्या, डांबर आणि गंधक जाळल्यानें हवा शुद्ध होऊन जरीमरीचा बंदोबस्त झाला असें मानतात ते कांहीं बोलूं शकणार नाहींत, अशी आमची खात्री आहे. हजारों खंडी लाकडें व गोवऱ्या वगैरे पदार्थ जळतात त्याचा कांही अंशी तरी हवेवर चांगला परिणाम झाल्या-खेरीज रहाणार नाहीं, आणि त्या परिणामाचें ज्ञान आमच्या पूर्वजांस होतें. या प्रमाणें शिमग्याचा हेतु जो आम्हांस दिसला तो सांगितला. बरा वाईट प्रकार हा सर्वांत आहेच, वाईटाचा त्याग करावयास लावणें हें विद्वज्जनांचें काम आहे. पण तें करीत असतां, लोक निरुत्साह होतील असले लेख निदान हिंदु पत्रकारांनीं तरी लिहूं नयेत. अत्याचार आणि दुराचार हे दोन्ही वाईटच. या करितां सदाचारानें लोक वागतील असेंच शिक्षण पाहिजे. या संबंधानें शेवटीं आमच्या सुधारकांस इतकेंच सुचविणें आहे कीं पाद्री लोकांस खूष करण्याच्या भरीस पडूं नका. आमचा धर्म आणि आमचे नांव समूळ नाहींसे होई पर्यंत त्यांस चैन पडावयाचें नाहीं. ते हंसत राहणारच. याकरितां तुम्ही आपल्या दृष्टीनें आपला विचार करा. आपण परतंत्र झालों आहों म्हणून सर्वसंगपरित्याग करून नित्य उदासीन होऊन रडत बसण्या पासून कांहीं उपयोग नाहीं. हालमे ख्याल, ख्यालमे खुशाल, हीच वृति धरली पाहिजे. तात्पर्य, चालू शिमग्या-तला अत्याचार आणि किंचित् जो दुराचार दिसतो तो वजा केला असतां बाळगोपाळांस व राजा रंकांस सारख्या रीतीनें रमविणारा दुसरा उत्तम सणच नाहीं. [1]

---

१ (**हिंदु धर्म विवेचक**. चैत्र १८०९;१८८७) शास्त्रीबोवांच्या काळीं लक्षांत ठेवण्यासारखी एक मोठी गोष्ट म्हणजे बहुतेक समाजसुधारकांनीं 'शिमग्याच्या' सणावर कधीं ना कधीं लिहिलें नाहीं असें झालें नाहीं. सण तर हवा व बीभत्सपणा नको असें सर्वांचें मत होतें. विशेषतः पाश्चात्यांचें मत

आपल्याविषयीं फार कलुषित होत आहे असा सूर त्या काळच्या वृत्तपत्रांतून वारंवार ऐकूं येतो. उदाहरणार्थ इंदुप्रकाशांत ह्या विषयावर एक लेख असून त्यांत शिमग्यावर जितके लेख पहिल्यापासून लिहिले गेले आहेत तितके अजून दुसऱ्या कोणत्याही विषयावर लिहिले गेले नाहींत असें म्हटलें आहे ( १५-३-१८८६ इंदुप्रकाश ) नेटिव ओपिनियन मध्यें ह्या सणाला शिमगा न म्हणतां चैत्रमेळा म्हणावें व चांगल्या तऱ्हेच्या संगीताचा व नाटकादिकांचा जास्त प्रसार करावा असें म्हटलें आहे, ( नेटिव ओपिनियन १९-४-१८६८ )

---

— ९ —

## चातुर्वर्ण्य

क्षत्रिय व वैश्य हे दोनही वर्ण महाराष्ट्र देशांत आहेत. इतकेंच कीं वैश्य किंवा वैश्यवाणी यांची संख्या फारशी नाहीं. क्षत्रियांचा भरणा तर महाराष्ट्र देशांत पुष्कळ आहे. ' नंदान्तं क्षत्रियकुलं ' ( नंद हा शेवटचा क्षत्रिय ) असें विष्णुभागवतांत एक वचन आहे, त्यावरून आतां अस्सल क्षत्रिय व वैश्य राहिले नाहींत असा पुष्कळांचा समज आहे. पण हा समज चुकीचा दिसतो. परशुरामानें एकदां सोडून एकवीसदां पृथिवी निःक्षत्रिय केली असतांही जर द्वापर युगांत क्षत्रिय राहिले, व क्षत्रियांत श्रीकृष्ण भगवंतानें व कौरवपांडवांसारख्या महा पराक्रमी राजांनीं जन्म घेतला, तर कौरव पांडवांच्या युद्धाच्या पश्चातही क्षत्रिय राहिले, इतकेंच नाहीं तर नंदाच्या पश्चात् ही क्षत्रिय राहिले व शिवाजीसारख्या अर्जुनादिकांप्रमाणें किंवा त्यांच्या पेक्षांही पराक्रमी पुरुषांनीं जन्म घेऊन जीं कुळें अलंकृत केलीं तीं सर्व अस्सल क्षत्रियांचींच असें म्हटल्याशिवाय गति नाहीं. विष्णुभागवत हें बोपदेवकृत नव्हे तर

त्यासकृतच होय असें क्षणभर मानिलें तरी कांहीं बाध येत नाहीं. तसें म्हटल्यास 'नंदान्तं क्षत्रियकुलं' हा श्लोक नर्मदेच्या उत्तरेस लागू होईल. पण दक्षिणेस कदापि लागू होणार नाहीं. नंद मगध देशाचा राजा. सर्व संहार क्षत्रियांचा झाला, तर तो अर्थातच मगध देशांत. महाराष्ट्रदेशांत किंवा कर्नाटकांत किंवा तेलंगणांत किंवा द्रविडांत तसें होण्याचा संभव नाहीं. सारांश महाराष्ट्र देशांतील क्षत्रिय अस्सल क्षत्रिय व वैश्यही अस्सल वैश्य होत. गागाभट्टासारख्या षट्शास्त्र निष्णातानें जी शिवाजी महाराजांची मुंज केली ती असल्या प्रकारचा विचार केल्याशिवाय नव्हे. शालिवाहन शके १२१२ त ज्ञानेश्वरांनीं देखील त्या वेळचा महाराष्ट्र मंडळाचा राजा रामचंद्रराव[1] यास यदु वंशांतील राजा म्हटलें आहे. जर त्यावेळीं यदुवंश होता तर दुसरेही क्षत्रियांचे वंश होते यांत कांहीं संशय नको. क्षत्रियांची व वैश्याचीं कर्में काय तीं तीन. त्या पैकीं दान व यजन सर्व क्षत्रिय व वैश्य करितात. वेदाचें अध्ययन मात्र त्यांच्या हातून होत नाहीं हें खरें आहे. पण आम्ही जितके म्हणून ब्राह्मण आहों, तितके सर्व षट्कर्में करतों काय ? नाहीं. याजन व अध्यापन व प्रतिग्रह हीं तीन कर्में अजीबात टाकून दिलेले ब्राह्मण काय आपल्या या महाराष्ट्र देशांत आज

---

१ 'तेथ यदुवंश विलास। जो सकळकळानिवास। न्यायातें पोषी क्षितीश। श्रीरामचंद्र—ओ० १८०६, अ. १८ ज्ञानेश्वरी. यादवाचा मऱ्हाठींत जाधव असा अपभ्रंश होतो. शिवाजी महाराजांची आई जाधवांच्या घराण्यांतील. जर जाधव अस्सल क्षत्रिय; तर भोसले ही अस्सल क्षत्रिय. धर्मसंस्थापना युगांतरीं केली यदुवंशांतील श्रीकृष्णानें नरकासुर वगैरे दुष्टांचा संहार करून, व कलियुगीं केली मातृसंबंधानें त्याच यदुवंशांत जन्म घेणाऱ्या शिवाजी महाराजांनीं दिल्लीपतीस न जुमानतां मऱ्हाठेशाहीची प्रतिष्ठापना करून. इतकेंच नाहीं तर हिंदु धर्माचा द्वेष्टा शत्रु अवरंगझेब यास अखेरीस सभोंती घेरून टाकून तोबा तोबा म्हणण्यास व प्राणोत्क्रमण करण्यास लाविलें त्याच यदुवंशांतील धनाजीनें. रामचंद्रराव जाधवाच्या वंशास दिल्लीपतीनें बुडविलें त्याचा सूड अखेरीस धनाजी जाधवानें अहमदनगरीं दिल्लीपतीसच आपल्या प्रिय जीविताचा वीट आणून घेतला खरा. दैवगति ती ही!!!

थोडे आहेत ? सहा कर्मांपैकीं जर पुष्कळ ब्राह्मण हल्लीं केवळ तीन कर्में करीत असतांही त्यांचें ब्राह्मणत्व जात नाहीं तर तीन कर्मांपैकीं दोन कर्में करणाऱ्या क्षत्रियांचें क्षत्रियत्व व वैश्यांचें वैश्यत्व तरी कसें जाईल ? हंबीरराव मोहिते, संताजी घोरपडे, शिवाजी महाराज ( कोल्हापूरचे ) वगैरे मंडळी ज्या कुळांत निपजलीं तीं जर क्षत्रियांचीं कुळें नव्हेत तर रामदासस्वामी, वामन पंडित वगैरे ज्या कुळांत जन्मले तीं तरी ब्राह्मणाचीं म्हणण्यास काय प्रमाण ? आतां हें खरें आहे कीं पुष्कळ मऱ्हाठे यज्ञोपवीत घालीत नाहींत व उपनयन करून घेत नाहींत, म्हणून त्यांस व्रात्यत्व येऊं पहातें. तरी उपवीत देऊन उपनयनाची आवश्यकता दाखविणें हें महाराष्ट्रब्राह्मणाचें कर्तव्य आहे, व तें कर्तव्य ते आज नाहीं तर उद्यां तरी बजावतीलच बजावतील. उपनयनासारख्या प्रधान संस्काराविषयीं आपल्या देशांतील क्षत्रियांचा व वैश्यांचा पुष्कळ ठिकाणीं अनादर असावा ही गोष्ट शोच्य तर खरी. पण पलांडु वगैरे अभक्ष्य भक्षण करण्याचा प्रायः येथील ब्राह्मणांतच रिवाज आहे, व गर्भाधान करण्याचा कित्येक कुळांत संप्रदाय नाहीं; या गोष्टी काय कमी शोच्य आहेत ? पलांडु वगैरे खाण्याचा शास्त्रनिषिद्ध अतिगर्हित संप्रदाय ब्राह्मणांमध्यें शिष्टाचार झाला आहे, तर उपनयन न करण्याचा संप्रदाय पुष्कळ क्षत्रियांत व वैश्यांत शिष्टाचार बनून गेला आहे, म्हणून त्यांस दूषण देणें ब्राह्मणांस शोभणार नाहीं.

महाराष्ट्र क्षत्रियांत मुख्य जात म्हटली म्हणजे 'मऱ्हाठे' म्हणविणारे. भोसले, घोरपडे, मोहिते, जाधव वगैरे मऱ्हाठ्यांचीं पुष्कळ घराणीं आहेत. तीं महाभारतांतील वीरांस लाजविणाऱ्या महापराक्रमी पुरुषांनीं शिवाजी महाराजांच्या वेळीं जन्म घेऊन नांवाजलीं. 'कायस्थ, प्रभु ' वगैरे बरेच पोटभेद ही महाराष्ट्र क्षत्रियांत आहेत. कायस्थ ही जात फार प्राचीन आहे. ही जात मूळची ब्राह्मणांमधील कीं क्षत्रियांमधील हें ठरविणें मोठें कठीण काम आहे सर्व कायस्थांचा धंदा म्हटला म्हणजे लिहिण्याचा. शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळ प्रभु जातीचे कायस्थ. साक्षाद् यमास देखील कायस्थाची गरज लागते. यमाचा कायस्थ म्हणजे चिटणीस आहे त्यास

चित्रगुप्त म्हणतात. या धंद्यावरून पहातां कायस्थ मूळचे ब्राह्मणच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाजीच्या वेळेस तर जसे मोरोपंत पेशवे वगैरे ब्राह्मणांनीं तसेंच मुरारबाजी, बाजी देशपांडे वगैरे कायस्थांनीं आपल्या जन्मभूमीच्या रक्षणार्थ क्षत्रिय धर्माचा आदर करून अशेष-क्षत्रियकुलावतंस शिवाजी महाराजांचा भार बराच हलका केला. ' प्रभु ' या शब्दाचा क्वचित् ' परभू ' असा अपभ्रंश झालेला आढळतो. ही जात पुष्कळ वर्षें माहिम, चेउल, रेवदंडा वगैरे स्थळीं वसाहत करून राहिलेली दिसते. मुंबईत खत्री नांवाचीही जात आहे. ' खत्री ' किंवा ' छत्री ' हा क्षत्रिय शब्दाचाच अपभ्रंश. पांच कळसे वगैरे कित्येक जाती त्याही मूळच्या क्षत्रियच दिसतात. ज्या पांचकळशांनीं सुताराचा धंदा पतकरिला आहे त्यांस मात्र वैश्यांपेक्षां थोडें निकृष्ट समजलें पाहिजे. तरी जसा ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांस तसाच रथकारास ( सुतारास ) अग्निहोत्राचा, अर्थात् तद्विषयक वेदाचा अधिकार आहे. सोनार, लोहार वगैरे जातींचा वैश्यवर्णांत अंतर्भाव होतो. पाणिनीनें गांवांत रहाणारे ( अनिरवासीत ) व गांवाच्या बाहेर रहाणारे ( निरवासित ) असे शूद्रांचे दोन भेद करून अनिरवासित शूद्रांत सुतारांची गणना केली आहे. तेव्हां हवा असल्यास शूद्र, अर्थात सच्छूद्र शब्द सुतारांस व लोहारांस खुशाल लावावा. पण त्यांस सूत्रकारांनी दिलेला वेदाधिकार मात्र त्यांच्यापासून कोणीही हिसकावून घेणें बरोबर नाहीं. रथकारांस अर्थात सुतारांस अग्नि-होत्रांचा अधिकार आहे. ' सरण जीवी ' कलाकौशल्यानें जीविका कर-णाऱ्या सोनार लोहार वगैरे जातींस सोडमुज आहे. तेव्हां धर्माच्या संबं-धानें वैश्यांमध्यें किंवा वैश्य व शूद्र या दोहोंच्यामध्यें वैश्यांपेक्षां निकृष्ट व शूद्रापेक्षां उत्कृष्ट अशा वर्णांतराची कल्पना करून त्या वर्णांतरांत त्यांची गणना केल्या शिवाय गति नाहीं.

शेतकी, उदीम, गुरें पाळणें हे तीन धंदे करणारे लोक. तीन मुख्य भेद एका वैश्य वर्णाचे. सुतार, लोहार वगैरे कलाकौशल्यानें जीविका

चालविणारे लोक दुसऱ्या म्हणजे उदीम करणाऱ्या वैश्यांचे अवांतर भेद समजावे. कोळी, खाटकी, कातकरी वगैरे जाती शूद्र वर्णांत गणायच्या.

हें चातुर्वर्ण्य केवळ आपल्या लोकांमध्येंच आहे असें नाहीं. यच्चयावत् सुधारलेलीं राष्ट्रें आहेत, त्या सर्वांमध्यें हें चातुर्वर्ण्य आहेच आहे. सर्व पाश्चात्य राष्ट्रांत हे चार वर्ण आपण पहातों. जसे आपले ब्राह्मण तसे युरोपियन लोकांमध्यें पाद्री. जसे आपले क्षत्रिय, तसेच युरोपियन लोकांतील सोल्जर. क्षत्रियांनीं लढाई करायाची. लढाई नसली म्हणजे सोल्जर रिकामे, त्यांस काम नाहीं. आपले वैश्य तसे इंग्रज लोकांतील मर्चंटस् = व्यापारी, जितकीं व्यापाऱ्यांची हपिसें मुंबईत आहेत तितकीं सर्व इंग्रजांतील वैश्य वर्णांतील लोकांची काम करण्याचीं ठिकाणें होत. धोबी, भिस्ती, वगैरे इंग्रज लोकांत असतात ते सर्व शूद्र[1].

१ चातुर्वर्ण्य-हिंदुधर्मविवेचक, फाल्गुन, १८०७, १८८६.

## -- १० --

## ' चार भावंडें '[1]

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई हीं या चार भावंडांचीं नावें.

गंगातीरावरील आपेगांव नांवाच्या गावांत गोविंद म्हणून कोणी वृत्तिवत ब्राह्मण होता. गंगातीर म्हणजे गोदातीर, कारण गगा हें मूळचें

१ कै. श्री. वि. ल. भावे यांनी महाराष्ट्र-सारस्वत भाग १ या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत व प्रारंभींच्या ज्ञानदेवादि चार भावंडांच्या वृत्तांतास हेंच नेमकें नांव दिलें आहे, योगायोग !

संतांबद्दल चरित्रवजा माहिती सुबोध गद्य मराठींत सांगणारे शास्त्रीबोवा पहिलेच लेखक; म्हणून या लेखाचें महत्व.

गोदावरीचें नांवे[२]. गोविंदाची पिढी गृहस्थाची म्हणजे कुळकर्ण्यांची होती कीं भटाची होती हें बरोबर कळत नाहीं. तरी हा व याची बायको निराबाई या दोघांनीं गैनीनाथ नांवाचा नाथ संप्रदायी गोसावी होता, त्याचा उपदेश घेतला होता, त्या पक्षीं गोविंद हा गृहस्थ अर्थात कुळकर्णी असावा. गोविंदाचें घराणें जर अस्सल भिक्षुकाचें असतें तर नाथ संप्रदाय आंत शिरता ना. पण जितका भिक्षुकांचा वेदविषयक व कर्मविषयक दुराग्रह असतो, तितका प्रायः गृहस्थाचा नसतो. त्यामुळें नाथ संप्रदायासारख्या संप्रदायाचा पाया गृहस्थाच्या घरांत शिरण्याचा जितका संभव आहे तितका भटभिक्षुकाच्या घरांत शिरण्याचा संभव नाहीं. तेव्हां गोविंदपंत कुळकर्णी होता अशी दंतकथा आहे. ती अगदीं निराधार म्हणतां येत नाहीं. गोविंदपंताचें आडनांव संस्कृतांत 'महेश' असें ज्ञानेश्वरांनीं लिहिलें आहे, त्यापक्षीं म्हैसे असावें. गोविंदपंतास एक मुलगा झाला, त्याचें नांव त्यानें विठ्ठल ठेविलें. विठ्ठलाची मुंज झाल्यानंतर काहीं वर्षांनीं तो तीर्थयात्रा करण्यास निघाला. कांहीं महिन्यांनीं इंद्रायणीच्या तीरीं आळंदी गांवीं विठ्ठल आला. तेथें इंद्रायणीच्या तीरीं स्नानसंध्या करीत असतां, सिदोपंताची व विठ्ठलाची भेट झाली. सिदोपंतांनीं विठ्ठलास घरीं आणून विश्रांति घेण्यास सांगितलें. रात्रीं विठोबाचा दृष्टांत सिदोपंतास झाला कीं 'तूं विठ्ठलास जांवई कर'. पण विठ्ठल विरक्त पडला. तो या गोष्टीस कबूल होईना. तेव्हां विठ्ठलासही विठोबाचा दृष्टांत झाला. जसें सिदोपंताचें कुळदैवत विठोबा, तसें विठ्ठलाचेंही कुलदैवत विठोबा. तेव्हां विठ्ठलाचें लग्न झालें व वधुवरें पहिल्यानें पंढरीस विठोबाचें पायीं पडण्यास गेलीं. तेथून विठ्ठल परत आळंदीस आला. सिदोपंत मुलीस घेऊन जांवयाबरोबर निघाले. विठ्ठलानें तीर्थयात्रा केली, इतकेंच नाहीं, तर गृहस्थाश्रमाचा आदर केला, हें ऐकून त्याच्या आईबापांस आनंद झाला. मुलीस सासरीं पोंचती करून सिदोपंत परत आळंदीस गेले.

---

२ गोदावरीस वृद्धगंगा म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम...
क्रमांक ...

काहीं वर्षांनीं विठ्ठलपंतांचे तीर्थरूप व मातुश्री या उभयतांनीं या अशाश्वत लोकाचा त्याग केला. आतां संसाराचा सर्व बोजा विठ्ठलपंतांवर पडला. तरी त्यास कथाकीर्तनाचा नाद होता तो किंचित्‌ही कमी झाला नाहीं. हें वर्तमान सिदोपंतांस कळलें. तें ऐकून त्यांस फार वाईट वाटलें. आपल्या एकुलत्या मुलीचा त्याग करून जर जांवयानें संन्यास घेतला तर आपणावर आकाश कोसळल्यासारखें होईल असें सिदोपंतास वाटलें, व तसा प्रसंग येऊं नये म्हणून आळंदीस जांवयास आणून ठेवण्याचा विचार सिदोपंतांनीं केला. सासऱ्याच्या घरीं येऊन राहिले तरी विठ्ठलपंतांनीं पूर्वीचा क्रम सोडिला नाहीं. दर आषाढीस व कार्तिकीस दिंडी पताका घेऊन विठ्ठलपंतांची स्वारी विठोबाच्या दर्शनास जाई. रोज भजन तर घरीं सुरू असे, व संतमंडळीचा मेळा रोज जमे. अखेर संन्यास घेण्यासही विठ्ठलपंतांनी कुटुंबाची आज्ञा मागितली. रखमाबाईस तर पतीचा संन्यास अनिष्ट होता. ती आज्ञा देईना. पण एकदां विठ्ठलपंतांनी कांहीं कावा करून 'जा जा' इतके शब्द निघतांच विठ्ठलपंतांनीं काशीची वाट धरिली. काशींत जाऊन श्रीपाद म्हणून संन्यासी होता त्याच्या जवळून संन्यासाची दीक्षा विठ्ठलपंतांनीं घेतली व 'चैतन्य' असें चतुर्थाश्रमांत नांव धारण केलें. इकडे रखमाबाईनें पिंपळास प्रदक्षिणा घालण्यास आरंभ केला. कर्मधर्मसंयोगानें श्रीपादस्वामी रामेश्वराची यात्रा करावयास निघाले. वाटेंत त्यांनीं आळंदीस मुक्काम केला. तेव्हां संन्याशाच्या पायांवर म्हणून रखमाबाईनें डोकी ठेविली. श्रीपादस्वामींनीं 'पुत्रवती हो' असा आशीर्वाद दिला. तेव्हां रखमाबाई हंसली. श्रीपादस्वामींनीं हंसण्याचें कारण विचारलें. तेव्हां आपल्या नवऱ्यानें संन्यास घेतला ही गोष्ट रखमाबाईनें स्वामीस कळविली. खाणाखुणा पुसतां श्रीपादस्वामींस चैतन्याची रखमाबाई बायको असावी असा संशय आला. नंतर स्वामी पुढीस सिदोपंतांच्या घरीं राहिले. सिदोपंतांनीं सर्व कच्ची हकिकत स्वामीस कळविली. तेव्हां स्वामी रामेश्वराची यात्रा सोडून पहिल्यानें पुनः काशीस परत गेले. काशींत येतांच चैतन्यास सर्व हकिकत विचारली. तेव्हां त्यानें आपला सर्व इतिहास स्वामीस सांगितला. स्वामींनीं

पुनः गृहस्थाश्रम स्वीकारण्यास आज्ञा चैतन्यास दिली. तेव्हां विठ्ठलपंत चतुर्थाश्रमांतून पुनः द्वितीयाश्रमांत आले. पण आळंदीच्या ब्राह्मणांनीं उभयतांसही वाळींत टाकलें. बारा वर्षें याप्रमाणें विठ्ठलपंताची व रखमाबाईची वाळींत गेलीं. पुढें या उभयतांस चार मुलें झालीं – तीन मुलगे व एक मुलगी. निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव हीं तीन अनुक्रमें मुलांचीं नांवें, मुक्ता हें मुलीचें नांव.

विठ्ठलपंतांनीं आपल्या मुलांस ब्राह्मणांनीं जातींत घ्यावें म्हणून बरीच खटपट केली. पण आळंदीचे ब्राह्मण कबूल होतना. पुढें विठ्ठलपंतांनीं इहलोकाचा त्याग केला. चारही भावंडें मोठीं कुशाग्रबुद्धी व भगवद्भक्त निघालीं. अखेरीस पैठणच्या ब्राह्मणांनीं शुद्ध केल्यास आम्हांस कबूल, असें आळंदीच्या ब्राह्मणांनीं चारहीं भावंडांस सांगितलें. तेव्हां चौघें हीं पैठणास आलीं. पैठणचें पत्र आळंदीच्या ब्राह्मणांनीं आणावयास सांगितलें, यावरून पहातां शालिवाहन वंशाची समाप्ति होऊन शेंकडो वर्षें या वेळी गेलीं होतीं तरी पैठणच्या लोकांचें –– मग तें ब्राह्मणांचें कां असेना –– वजन अजून महाराष्ट्रमंडळांत बरेंच होतें. पैठणांत मोटी ब्रह्मसभा भरली. ब्राह्मणांनीं नांवें विचारलीं. तेव्हां चारांनींही आपलीं नांवें सांगितलीं. त्यांचीं तीं अपूर्व नांवें ऐकून ब्राह्मण हंसले. एका ब्राह्मणानें तर असा उद्गार काढिला कीं जवळ रेडा होता त्याचें ही नांव 'ज्ञान्या.' नांव ज्ञानदेव असलें तर तितक्यानेंच 'ज्ञानीपणा' अंगीं असतो असें नाहीं. ज्ञानदेव म्हणाले, जो आत्मा माझ्यांत आहे, तोच त्या रेड्यांत आहे. सारांश आत्मा किंवा परमात्मा सर्वत्र सारखा आहे. ब्राह्मणानें रेड्याच्या पाठीवर कोरडा मारिला, तों लागलेच ज्ञानदेवांच्या पाठीवर वळ दिसूं लागले. ब्रह्मसभा सगळी कर्मठांनीं भरलेली. सर्वां भूतीं परमेश्वर हें कबूल करीत ना. ज्ञानदेव मोठे योगी व ब्रह्मज्ञानी. परमात्मा सर्वां भूतीं सारखा हें त्यांचें मत. हें पैठणच्या कर्मठ ब्राह्मणांस कबूल होईना. ब्राह्मण पुनः ज्ञानदेवास म्हणाले, 'जर तुझा व या रेडयाचा आत्मा एक तर तुझ्या प्रमाणें या रेडयास वेद म्हणतां कां येऊं नये?' 'या रेडयासही वेद म्हणतां येईल' असा ज्ञानदेवांनीं ब्राह्म-

णांस जबाब दिला, व रेड्यास वेद म्हणावयास सांगितलें. रेड्यानें एखाद्या दशग्रंथी ब्राह्मणाप्रमाणें ऋग्वेदाचें पारायण करण्यास आरंभ केला. तेव्हां ब्रह्मसभा थक्क झाली, व कर्मठ ब्राह्मण तोंडांत आंगळी घालून बसला. तरी दुसऱ्या कर्मठ ब्राह्मणांनीं चार भावंडांचा छळ करण्याचें सोडून दिलें नाहीं. ज्या ब्राह्मणाच्या घरीं चार भावंडें उतरलीं होतीं, त्या ब्राह्मणास इतरांनीं वाळींत टाकिलें, व त्याच्या घरची पितृतिथि आली तेव्हां एकही ब्राह्मण श्राद्धास मिळेना. पण भगवद्भक्तीचा महिमा अगाध व अचिंत्य आहे. दुर्वासासारख्या कोपिष्ट व तेजस्वी ब्राह्मणाचेंही अंबरीषासारख्या भगवद्भक्त क्षत्रियापुढें कांहीं चाललें नाहीं. चार भावंडें तर जशीं भक्त तशींच योगी होतीं. ज्याच्या घरी उतरले होते त्यायाच पितरांस ज्ञानदेवांनीं साक्षात् बोलाविलें, व दुराग्रही ब्राह्मणांचा मद उतरविला. रेड्याजवळून वेद बोलविले व साक्षात् पितरांस आणलें, हें दोन चमत्कार जेव्हां पैठणकरांनीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिले, तेव्हां चारही भावडांस त्यांनीं शुद्धिपत्र दिलें.

शुद्धिपत्र व वेद म्हणणारा रेडा बरोबर घेऊन चाऱ्ही भावंडें पैठणाहून निघालीं. कांहीं दिवस चारही भावंडांचे नेवाशास गेले. नेवाशास असतां ज्ञानदेवांनीं ' भावार्थ– दीपिका ' नांवाची गीतेवर मराठींत टीका केली. ही ' ज्ञानेश्वरी ' या नांवानें मऱ्हाठ्यांमध्यें आबालवृद्धांस माहीत आहे. ही टीका करीत असतां लेखकाचें काम सच्चिदानंद बाबा यानें केलें. या वेळीं निवृत्तिनाथानें स्वतंत्र ग्रंथ करण्यास सांगिल्यामुळें, ज्ञानदेवांनीं पुढें ' अमृतानुभव ' ग्रंथ रचिला. महालया देवीचें दर्शन घेऊन चाऱ्ही भावंडें निघालीं तीं आळयाच्या वनांत आलीं व तेथें वेद बोलणारा रेडा निवर्तला. त्याच्या नांवानें एका दगडास शेंदुर व तेल लावून त्याचें 'म्हसोबा' नांव ठेविलें. पुढें कांहीं दिवसांनीं चाऱ्ही भावंडें आळंदीस आलीं.

आळंदीस आल्यावर चांगदेव चाऱ्ही भावंडाचा महिमा ऐकून त्याच्या भेटीस आले. चाऱ्हीं भावंडें एका भिंतीवर बसलीं होतीं. चांगदेव येतात असें पाहून ज्ञानदेवांनीं भिंत होती तीच चालविली. पुढें चांगदेवास

उपदेश होऊन तत्व मनावर ठसावें, म्हणून ज्ञानदेवांनीं पासष्ट ओव्या रचिल्या व त्या चांगदेवास अर्पण केल्या. त्या पांसष्ट ओव्यांस ' पांसष्टी ' म्हणतात. या ' पांसष्टी' वरून व अभंगावरून पाहतां चांगदेवाच्या गुरूचें नांव वटेश्वर. मग हा वटेश्वर साक्षात् बाप असो किंवा केवळ गुरू आहे. सारांश, चांगा वटेश्वर हा शब्द ' एका जनार्दन ' शब्दाप्रमाणें झालेला. चाऱ्ही भावंडांची भेट झाल्यानंतर, चांगदेव मुक्ताबाईस आपल्या मातृस्थानीं समजूं लागले व मुक्ताबाईही त्यांस आपला मुलगा समजूं लागली. शके बाराशें बारांचे म्हणजे ज्या वर्षी ज्ञानेश्वरी झाली त्या वर्षाचे रामदेवराव जाधवाचे ताम्रलेख आहेत, त्यांत रामदेवरावाच्या कोशाधिपतीचें नांव चांगदेव आहे. हाच चांगा वटेश्वर नसेलना ? आम्हांस वाटतें कीं, चाऱ्ही भावंडें पैठणास गेलीं होतीं, तेव्हां ज्ञानदेवांनीं केलेले चमत्कार ऐकून रामदेवरावाच्या खजिन्यावरच्या मुख्य कारभाऱ्यासही ज्ञानदेवांस व त्यांच्या भावंडांस पहाण्याची बळकट इच्छा उत्पन्न झाली व तो सवडे सांपडतांच आळंदीस चाऱ्ही भावंडांस पहाण्याच्या हेतूनें आला. पुढें चांगदेवाची विशेष भक्ति मुक्ताबाईवर बसली, व तीस तो आपली आई समजूं लागला, म्हणून मुक्ताबाईचें नांव चांगदेवांच्या अभंगांत वारंवार येतें.

निवृत्तिनाथांस नाथसंप्रदायाचा उपदेश केला गैनीनाथानें. गैनीनाथ हा गोरक्षनाथाचा शिष्य, व गोरक्षनाथ मत्स्येंद्रनाथाचा शिष्य. देवीच्या नांवाजलेल्या सप्तशृंगी नांवाच्या स्थळीं रहात असतां, गेलेले हातपाय योगबळानें पुनः आणून देऊन, मत्स्येंद्रनाथानें चौरंगीनाथावर अनुग्रह केला, असें ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या ओव्यांत म्हणतात. गैनीनाथ कदाचित् गोरक्षाचा साक्षात् शिष्य असेल, कदाचित् पारंपारिक शिष्य असेल. भक्तविजयाच्या बाविसाव्या अध्यायांत ' मत्स्येंद्र, गोरक्ष, शांभव, अद्वयानंद, प्रभव व गैनीनाथ ' अशी गुरुपरंपरा दिली आहे. यावरून गैनीनाथ गोरक्षनाथाचा परंपराशिष्य ठरतो. ज्ञानदेवांच्या आजोबांस व आजीस उपदेश करणारा हाच गैनीनाथ. ज्ञानदेवांस योगविद्येचा उपदेश केला तो

निवृत्तिनाथांनीं, असें ज्ञानेश्वरीच्या शेंवटच्या ओंव्यावरून सिद्ध होतें. या गुरुपणामुळें निवृत्तिनाथाचें नांव आपल्या नांवास जिकडे तिकडे ज्ञानेश्वरांनीं जोडून अजरामर करून ठेविलें आहे. निवृत्तिनाथाचे कांहीं अभंग मात्र उपलब्ध आहेत. बऱ्याच अभंगांत गैनीनाथाचें नांव आलें आहे. या अभंगावरून चांगदेवच नव्हे तर विसोबा खेचर, नामदेव, नामदेवाचे चाऱ्ही मुलगे, नरहरि सोनार, सांवत्या माळी, व जगमित्र नागा हे अनेक वेळां विठोबाच्या समोर भक्तीच्या रंगांत येऊन पंढरपुरीं चाऱ्ही भावंडांबरोबर नाचले होते, हें सिद्ध होतें. सोपानदेवाचे कांहीं अभंग मात्र आहेत. दुसरी त्याच्या विषयीं माहिती बिलकुल नाहीं.

मुक्ताबाईचे सोपानदेवाच्या प्रमाणें कांहीं अभंग मात्र आहेत. जसा मुक्ताबाईनें चांगदेवास ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला तसाच विसोबा खेचरास केला. चांगदेवाप्रमाणें खेचरासही ती आपला मुलगा समजे. एके दिवशीं ज्ञानेश्वर कांहीं कारणानें मुक्ताबाईवर रुसले, व खोलीचा दरवाजा उघडून मुक्ताबाईस आंत घेतना. त्यावेळीं मुक्ताबाईनें अभंग केले, त्यांस 'ताटीचे अभंग' म्हणतात. ते गोंधळेकरांनीं जी ज्ञानदेवांची गाथा पुण्यास छापली आहे तींतही दिले नाहींत म्हणून खालीं दाखल केले आहेत.

१

संत जेणें व्हावें । जग बोलणें सहावें ॥ १ ॥
तरीच अंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ॥ २ ॥
थोरपण जेथें वसे । तेथें भूतदया असे ॥ ३ ॥
रागें भरावें कवणासी । आपण ब्रह्म सर्वदेशीं ॥ ४ ॥
ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

२

योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥ १ ॥
विश्व रागें झालें वन्ही । संत सुखें व्हावें पाणी ॥ २ ॥
शब्दशस्त्रें जाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥ ३ ॥
विश्व परब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

३

सुखसागरीं ठाव झाला । उंच नीच काय त्याला ॥ १ ॥
आपण जैसें व्हावें । देवें तैसेंच करावें ॥ २ ॥
ऐसा नटनाट्यखेळ । स्थीर नाहीं एक पळ ॥ ३ ॥
एकापासूनी अनेक । त्यांत आपपर लोक ॥ ४ ॥
शून्य साक्षित्वें समजावें । वेद ओंकाराच्या नावें ॥ ५ ॥
एके उंचपण केलें । परि अभिमानें गेलें ॥ ६ ॥
द्वैत टाकून शांती धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा[१] ॥ ७ ॥

| | जन्म शालिवाहन शके | समाधि शालिवाहन शके |
|---|---|---|
| निवृत्तिनाथ | ११९० | ज्येष्ठ वद्य १३,१२१६ त्र्यंबकेश्वरी |
| ज्ञानदेव | ११९३ | कार्तिक वद्य १३,१२१५ आळंदीस |
| सोपानदेव | ११९६ | मार्गशीर्ष वद्य १२,१२१५ सासवडास |
| मुक्ताबाई | ११९९ | चैत्र वद्य १२,१२१६ खानदेशांत एदलाबाद येथें. |

हा जन्मकाल व समाधिकाल पारखांनीं केलेल्या ज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्रांतून घेतला आहे. यास आधार जनाबाईच्या व नामदेवाच्या अभंगांचा आहे. तेव्हां निवृत्तिनाथांनीं २५ वर्षें या जगांतील यात्रा केली. ज्ञानदेवांनीं २२ वर्षें, सोपानदेवांनीं १९ वर्षें, व मुक्ताबाईनें १७ वर्षें.

वरील कालावरून ज्ञानेश्वरी केली त्यावेळीं ज्ञानेश्वरांचें वय एकूणीस वर्षांचें होतें. ज्ञानदेवांनीं अभंग केले ते आळंदीस पैठणाहून आल्यानंतरें[२] !

---

१ हे ताटीचे अकरा अभंग शास्त्रीबोवांनीं दिले आहेत. पण ते आतां लोकांच्या पुष्कळ परिचयाचे झाले आहेत म्हणून विस्ताराच्या भयानें आंखडते घेऊन मी वरचे तीन मात्र दिले आहेत.

२ संतमंडळी, चार भावंडें, हिंदुधर्म विवेचक.

## -- ११ --

## " मऱ्हाठा " शब्दाचा जुनाटपणा व त्याची व्युत्पत्ति.

जन व जनपद या दोहोंच्या संज्ञा अतिप्राचीनकाळीं या भूगोलावर अभिन्न होत्या. लोकांस " अंग " म्हणत. व ज्या प्रांतांत ते रहात त्या प्रांतासही " अंग " म्हणत. अगदीं पहिल्यानें " कुळें " किंवा " घरें " होतीं तीं वाढत जाऊन गोत्रें झालीं. व गोत्रें वाढत जाऊन " जन " झाले. ज्या " जना " नें जो मुलूख बळकाविला तो त्या " जना " चा मुलूख ( जनपद ) झाला.

" मऱ्हाठा " हा पूर्वींचा जनवाचक शब्द. संस्कृत नाटकांत " मरहट्ट " असा जनवाचक शब्द येतो तो या " मऱ्हाठा " शब्दाची प्रकृति दिसतो. ' मरता तब हटता ' म्हणजे मरतो तेव्हां हटतो. अर्थात् प्राणांतीही शत्रूस पाठ न दाखविणारा, अशी " मरहट्ट " शब्दाची व्युत्पत्ति केली आहे. ही व्युत्पत्ति मऱ्हाठ्यांच्या वीरश्रीच्या संबंधानें पाहूं गेलें असतां यथार्थ आहे. तरी अशा रीतीने क्रियापदाची छिन्नभिन्न झालेली किंवा छिन्नभिन्न केलेलीं रूपें जोडून झालेल्या आणखी एखाद्या जनवाचक किंवा जनपदवाचक शब्दाचें उदाहरण देतां येत नाहीं. त्यापक्षीं वरील व्युत्पत्ति विलक्षणच खरी. " राठोड " नांवाचे रजपूत मारवाडांत प्रसिद्ध आहेत. जोधपूरचा राजा " राठोड " वंशांतला होय. " महाराठोड " म्हणजे " मोठे राठोड, " व " महाराठोड " शब्दाचा अपभ्रंश " मऱ्हाठा " असे कित्येकांचें मत आहे. एका रजपुताच्या गोत्रांतील लोक आले, ते सर्व महाराष्ट्रभर गांवोगांव पसरले हें म्हणणें अगदीं असंभाव्य होय. तशांत " राठोड " गोत्र रजपुतांत आहे, पण " महाराठोड " असें गोत्र रजपुतांत नाहीं. तेव्हां वरील व्युत्पत्तिप्रमाणें हीही

व्युत्पत्ति विलक्षणच. ' मऱ्हाठा ' हा प्रायः " महाराष्ट्र " शब्दाचा अपभ्रंश समजतात. " महाराष्ट्र " हा शब्द बराच जुनाट आहे. नंदाचें राज्य मगध देशांत असतां म्हणजे शालिवाहन शकाचे पूर्वी सुमारें चारशें वर्षे वररुचि नांवाचा विद्वान झाला. त्यानें " प्राकृतप्रकाश " नांवाचें प्राकृत भाषेचें म्हणजे संस्कृत नाटकांतील बालभाषेचें व्याकरण केलें आहे. त्या व्याकरणाचें अगदीं शेवटचें सूत्र " शेषं माहाराष्ट्रीवत् " हें होय. अशोकानें महाराष्ट्र देशांत धर्मोपदेश करण्यासाठीं कांहीं बौद्ध भिक्षूंस पाठविलें. अशी बौद्ध लोकांतही दंतकथा आहे. नंदाच्या नंतर चंद्रगुप्तानें राज्य केलें, चंद्रगुप्ताच्या पाठीमागें त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला, व बिंदुसाराच्या मागून त्याचा मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यांस गादी मिळाली. तेव्हां चांगला बाविसशें वर्षांचा ' मरहट्ट ' किंवा " महाराष्ट्र " शब्द आहे असें म्हणण्यास कांही हरकत नाहीं.

भाषेच्या नियमांवरून पहातां " महाराष्ट्र " शब्दाचा महाराठ व " सुराष्ट्र " शब्दाचा " सुराठ " अपभ्रंश व्हावा. पण शिलालेखांत " महारठ " व " सुरठ " अशीं शब्दांची रूपें आपण पहातों. हीं जर रूपें अस्सल खरीं, तर " महारठ " हा "महारथ " शब्दाचा व "सुरठ" हा "सुरथ" शब्दाचा अपभ्रंश असावा. "महारथ" म्हणजे "मोठा योद्धा," व " सुरथ " म्हणजे " चांगला योद्धा. " अशा प्रकारची विशिष्टगुणहेतुक जनवाचक नांवें क्वचित क्वचित आपणांस आढळतात. " फ्रेंच " हा " फ्रांक " शब्दाचा अपभ्रंश. हे सर्व लोक मूळचे " फ्री " म्हणजे स्वतंत्र, अर्थात् त्यांच्यांत गुलाम नव्हते म्हणून ते आपणांस " फ्रांक " म्हणवीत, असें म्हणतात. मूळचे संस्कृत रूप एक असून त्याचा जो अपभ्रंश झाला, त्यापासून एक अपूर्व शब्द निर्माण होऊन तो पुनः संस्कृत भाषेस मिळाला अशीं बरीच उदाहरणें सांपडतील. मूळचा शब्द ' त्रिकलिंग.' " तीन कलिंग " म्हणजे तेलंगणाची खालाठी व " आंध्र " नांवाची वलाठी, व या दोहोंच्या दक्षिणेस " द्रोणकटक " किंवा " धेनुकटक " नांवाचा प्रांत, हे तीन प्रांत. अशा रीतीनें प्राचीन काळीं अनेक जनपदांस

नांवें मिळालेली होतीं. " मलय " किंवा " द्रविड " देशाचे..." चोल " म्हणजे मद्रासेजवळील मुलूख, " पांडय " म्हणजे तिनवल्ली जवळील मुलुख, व " चर " म्हणजे म्हैसूरचा दक्षिण भाग, असे, तीन भाग मानीत, व त्यामुळें त्यांस " त्रिमलय " म्हणत. " तमूळ " किंवा " तम्मूळ " हा या " त्रिमलय " शब्दाचा अपभ्रंश. " त्रिकलिंग " शब्दाचा " तिअलिंग " होऊन, हळू हळू त्याचा "तिलिंग " झाला. नंतर तिलिंग शब्दास पुनः " त्रिलिंग " असें अपूर्व संस्कृत रूप मिळून मल्लिकार्जुन, कालेश्वर व भीमेश्वर या तीन लिंगा-मधील मुलूख म्हणून " त्रिलिंग, " अशी त्याची अपूर्व व्युत्पत्तिही झाली. तेव्हां " महारथ " शब्दाचा पहिल्यानें " महारठ " व " मरहट " असा अपभ्रंश होऊन कालांतरानें या अपभ्रंशाचे पुनः " महाराष्ट्र " असें संस्कृत रूपांतर झालें, हें म्हणणें सोपपत्तिक दिसतें.[१]

१ मऱ्हाठ्यांसंबंधानें चार उद्गार, पृ०. १-३, १८८७

## - १२ -

## "महाराष्ट्रा"ची व्युत्पत्ति.

महाराष्ट्र म्हणजे ' मोठें राष्ट्र ' ही व्युत्पत्ति चांगलीशी नाहीं. तेलंगण हें ही मोठें राष्ट्र आहे. गौड हेंही ' मोठे राष्ट्र ' आहे असें म्हणण्यास सवड होती. तशांत अल्पराष्ट्र असतें, तर त्याच्याहून ' मोठें राष्ट्र ' असें म्हणण्यास सवड होती. पण ' अल्पराष्ट्र ' नाहीं. जो शब्द संस्कृतांत महाराष्ट्र लिहितात, तो प्राकृतांत मरहट्ट लिहिला जातो. मरतो तेव्हां हटतो, याही व्युत्पत्तींत जीव दिसत नाहीं. रेड्डि नांवाची एक तेलंगी जात अजूनही

आहे. रट्ट कुळींतले राजे कुंतल देशावर राज्य करीत असून त्यांची राजधानी बेळगांव ( वेळुग्राम, वेणुग्राम ) होती. रेड्डि व रट्ट हे शब्द मूळचे सजात दिसतात. जसे रेड्डि व रट्ट ज्यांतून निघाले किंवा निराळे पडले, ते महरेड्डि किंवा महरट्ट समजल्यास ' मह ' या अवयवाचा ' महत् ' शीं मेळ पडेल. रेड्डि व रट्ट हे ज्याप्रमाणें स्वतंत्र होते, त्याप्रमाणें महरेड्डि किंवा महरट्ट हेही होते, अशाही दृष्टीनें या शब्दाकडे पहातां येईल. तिन्ही जाती रुचल्यास स्वतंत्र मानाव्या किंवा रुचल्यास एकांतून दुसरी व दुसऱ्यांतून तिसरी, अगर एका मोठ्या जातींतून दोन छोट्या जाती -- असा जातीं-मध्यें प्रकृति-विकृति-भाव मानावा. गुजराथी व हिंदुस्थानी लोक ' मरेठो ' किंवा ' मरेठा ' असें रूप देतात, तें महरेट्टि नांवावरून देत आले असावे. पुढें टकारांत प्राण जास्त घुसवून मराठा किंवा मराठी असा उच्चार करण्याचा व लिहण्याचाही संप्रदाय पडला. ' नुकसान–नुसकान ' प्रमाणें व्यंजनांचा विपर्यास होऊन महरट्ट शब्दापासून ' मरहट्ट शब्द निघालेला दिसतो. याप्रमाणें मूळच्या देशी शब्दास, महाराष्ट्र असें मोठें रूप देऊन, संस्कृत भाषेनें आपल्या शब्दांच्या भांडारांत ओढून घेतलें. शालि-वाहनाचा वंश व पैठण नगर यांच्याप्रमाणें महाराष्ट्र शब्द कमीत कमी बावीस साडेबावीसशें वर्षांचा आज झालेला असून, या त्रिवर्गाची मगर-मिठी पडली आहे, ती सोडवितां येत नाहीं. ![1]

---

१प्राकृत भाषेची विचिकित्सा. पृ. ५४–५५ सन माहीत नाहीं बहुतेक १८९९ ते १९०१ असावा.

## — १३ —

# पेशवाई

अवरंगझेब मेल्यानंतर, संभाजीचा मुलगा शिवाजी, रायगड घेतला तेव्हां त्याच्या आईसहवर्तमान मोंगलांच्या हातीं लागला होता, त्यास अवरंगझेबाच्या मुलानें दिल्लीच्या दरबारचें अंकित करून सोडून दिलें, त्यामुळें मऱ्हाठयांत दुफळी झाली. तरी ताराबाई कचली नाहीं. पण मतिभ्रंश झाला म्हणून म्हणा किंवा ब्राह्मण कारकून बाळाजी विश्वनाथ यानें कान फुंकले म्हणून म्हणा किंवा रामचंद्रपंत बेकैद राहूं देत नसे व जेव्हां तेव्हां लुटीचा विगतवार हिशोब मागे तें सोसेना म्हणून म्हणा...जेव्हां कृतज्ञतेचा त्याग करून व कृतघ्नतेचा आदर करून धनाजी जाधवानें आपले दरोबस्त लष्कर घेऊन लढाई न देतां एकाएकीं स्वामिद्रोह केला, तेव्हां ताराबाईचें काय चालतें, रामचंद्रपंताचें काय चालतें, व परशुराम त्रिंबकाचें तरी काय चालतें ! अवरंगझेब शिवाजीस चोर म्हणे व त्या चोराबरोबर संभाजीच्या मुलाचा तो पकडला गेल्या दिवसापासून कांहीं संबंध नाहीं म्हणून, व त्याचें शिवाजी नांव कर्णकटु होतें म्हणून, त्यास " साहु " म्हणजे " साव " म्हणूं लागला होता. आपल्या आजाचे यशस्वी नांव सोडून त्याच्यावर जसें काय कलंक लावण्यासाठीं त्याच्याच शत्रूनें आपणांस दिलेलें " शाहू " हें नांव प्रसिद्ध केलें, व दिल्लीपतीची सुभेदारी पतकरली, तेव्हांच खरोखरी विचार केला असतां संभाजीच्या मुलाचा महाराष्ट्रमंडळाबरोबरचा संबंध . . पूर्वीचा असल्यास . . संबंध तुटला. कोणाही मराठ्यास त्याच्या बरोबर संबंध ठेवण्याची गरज नव्हती. फार झालें तर त्यास खाण्यापिण्याची वाण पडूं नये म्हणून जहागीर दिली असती म्हणजे झालें. वास्तविक विचार करतां शाहूस तरी याच्या पलीकडेस कांहीं नको होतें. शहाण्या बाळाजी विश्वनाथानें व त्याच्या

संततीनें पुढें तशीच व्यवस्था लावून ठेविली. जेव्हां शाहूस अभिषेक झाला, तेव्हांपासून शिवाजीच्या मऱ्हाठेशाहीस ग्रहण लागलें, असें म्हटल्यास त्यांत कांहीं अयथार्थ नाहीं. बडोद्याचे गायकवाड व नागपुरचे भोसले या दोहोंसही शाहूनें चढविलें. ग्वाल्हेरकर शिंदे व इंदुरकर होळकर हे मूळचे बाळाजी विश्वनाथाचे किंवा पहिल्या बाजीरावांचे आश्रित. पेशव्यांस स्वतंत्र रीतीनें पुण्यास राहूं दिलें, ही शाहूची मोठी चूक. छत्रपतीच्या अष्ट प्रधानांनीं राजधानींतच असावें. साताऱ्यास पेशव्यांस ठेविलें असतें, म्हणजे त्यांस इतकें स्वातंत्र्य मिळालें नसतें. पण शाहू पडला ऐष आरामी, व बाळाजी विश्वनाथ मोठा कारकून. पहिला बाजीराव बाळाजीचाच मुलगा. त्यास महाराष्ट्र मंडळांत जितकी अव्यवस्था होईल तितकी इष्ट होती. व्यवस्था लागली, म्हणजे सातारकरांकडेस लागलाच लोकांचा व फौजेचाही ओघ वळायाचा. तो तसा न वळावा व सर्व लगाम आपल्या हातांत रहावी म्हणून बाजीरावाचा मऱ्हाठ्यांस जिकडे तिकडे पसरविण्याविषयीं भगीरथ-प्रयत्न. शाहूच्या पदरीं जुन्या माणसांपैकीं कोणीही राहिलें नाहीं. एक श्रीपतराव प्रतिनिधि होता तो मात्र या वेळीं बराच दूरदृष्टि दिसतो. वऱ्हाड प्रांत निजामाजवळून घ्यावा व शिवाजीच्या स्वराज्यांत नीट व्यवस्था लावून, नंतर हवा असल्यास नर्मदेच्या उत्तरेकडेस घोंटाळा चालला होता त्यांत हात घालावा, हे श्रीपतरावाचें म्हणणें. हें श्रीपतरावांचें म्हणणें अगदीं यथार्थ होतें. श्रीपतराव हा परशुराम त्रिंबकाचा मुलगा. त्याचा मोठा हेतु, शिवाजीच्या वंशजांचे राज्य कायम होऊन सातारकरांची गादी अकुतोभय व्हावी हा. जर अव्यवस्था एकसारखी पुष्कळ दिवस चालली, तर अनेक बंडें उद्भवतात व बंडखोरांपसून मनस्वी त्रास होऊन रयत राजास शाप देते. तेव्हां श्रीपतरावानें जो उपदेश शाहूस केला त्यावरून तो बराच विचारी व विवेकी दिसतो. या वेळीं मोठें शहाणपण म्हटलें म्हणजे राज्यांत व्यवस्था लावून महाराष्ट्र मंडळ एकवटणें, हें होतें. जर मोठा राजकारण धुरंधर पुरुष या वेळीं निपजता, तर थोड्याच काळांत मऱ्हाठ्यांचा झेंडा कन्याकुमारीवर किंवा रामेश्वरावर लागण्यास फारसा

प्रयास पडताना. वऱ्हाड निझामापासून घेऊन त्यास मोबदला हवा असल्यास तेलंगणचा कांहीं मुलूख द्यावयाचा होता. तसें केल्यानें सगळी लगाम मऱ्हाठ्यांच्या हातीं राहून, निझाम लहानशा सरदाराप्रमाणें झाला असता, व प्रसंगविशेषी त्याचीही उचलबांगडी करण्यास सांपडून सर्व दक्षिण दिशा निष्कंटक होती, व पुढें उद्भवलेल्या हैदर अल्लीसारख्या कंटकाचें बीज पूर्वींच साफ करपून गेलें असतें. याप्रमाणें दक्षिणेंत व्यवस्था नीट लावून मग जर मऱ्हाठे नर्मदा उतरते, तर सगळें हिंदुस्थान त्यांस त्यांच्या पूर्वजांप्रमाणें सहज अकुतोभय पुनः व्यापून टाकण्यास मिळतें. पण श्रीपतरावाच्या उपदेशाप्रमाणें जर शाहू चालता, तर बाजीरावाचा मतलब साधताना. बाजीरावानें हिमालयावर झेंडा लाविण्याची मसलत दिली. शाहूच्या सभोंवती सर्व मंडळी बाजीरावाची आश्रित. श्रीपतरावास पाठबळ देणारा कोणी नाहीं. तेव्हां शाहूस बाजीरावाचें बोलणें पसंत पडलें. बाजीरावानें मऱ्हाठ्यांचा देशाभिमान किंवा धर्माभिमान तरी जागरूक करावा होता. पण तेंही त्याच्या हातून झालें नाहीं. निझामाच्या पदरीं जाऊन राहूं नये म्हणून शिलेदारांचा पगार वाढवून बाजीरावास मऱ्हाठ्यांच्या लुटारूपणास भर घालावी लागली !!! मऱ्हाठे मूळचे कांहीं लुटारू नव्हत. देवगिरीच्या जाधवांची गादी कांहीं लुटारू लोकांची नव्हे. पूर्वीच्या काळीं तरी मऱ्हाठे लुटारू होते, असें म्हणण्यास कांहीं प्रमाण नाहीं. शिवाजी महाराजांनीं पहिल्यानें लुटारूपणा थोडा बहुत केला. पण तो तसा केला नसता, तर मऱ्हाठेशाहीची प्राणप्रतिष्ठाच झाली नसती. तर शिवाजी कांहीं इतर लुटारूसारखा नव्हता. शिवाजी लुटी शत्रूच्या मोठ्या मोठ्या पेठा. पेटेंमध्ये देखील पूर्वीं शिवाजीचे जासूद जात, व सावकारांच्या यादी करून ठेवीत. पुढें शिवाजी लुटीच्या वेळीं आपण खुद्द जाई, व गोरगरीबांवर, बायकांवर किंवा फकीर बैराग्यावर काडीभर देखील जुलूम होऊं नये, म्हणून सक्त बंदोबस्तानें राही. व लखपतीकडून लूट गोळा करून आणी ती आपल्या रयतेस सुखी करून तिच्यापासून दुवा घेण्यांत खर्ची. शिवाजीनें काम केलें तें सर्व स्वजनांसाठीं व स्वदेशासाठीं व

स्वधर्मासाठीं. असें असतां पुरा विचार न करून त्यास कोणी अस्मद्देशीय लुटारू किंवा दरोडेखोर म्हणेल, त्यास कृतघ्न म्हणण्यास आम्ही पाठी पुढें पाहणार नाहीं. शिवाजी शत्रूंचा मुलूख स्वजनासाठीं लुटून फन्ना करी खरा. पण प्रत्येक शिपायाच्या हृदयांत स्वहित करून घेण्यासाठीं जो लुटीचा अंकुर जन्मतः सिद्ध असतो तो शिवाजीनें मुळीच पालवूं दिला नाहीं, अशी खात्री त्याचे लुटीच्या संबंधाचे सक्त नियम वाचतांच होते. हा शिवाजीचा किल्ला रायगड अविंधांच्या हाती गेला तरी त्याचे पक्के शिष्य बनलेल्या रामचंद्रपंतानें व संताजीनें वळविण्याचे सोडून दिलें नाहीं. पुढें संताजीचा खून झाला व दुर्दैवानें धनाजी सारख्या बेकैद मऱ्हाठ्याच्या हातीं लष्कराचें सर्व मळसूत्र आलें. दिल्लीपतीनेंही महा-राष्ट्र देशांत खासा तळ दिला व त्यामुळें लष्करावर लष्कर व पैशावर पैसा आमच्या देशांत हिंदुस्थानांतून उतरूं लागला. तेव्हां दिल्लीपतीची छावणी व धनाजी जाधवाची बेकैद व या वेळची मराठ्यांची झालेली दुर्दशा, ही तीन त्यांच्या हृदयांतील लुटीच्या अंकुरास पाण्याच्या स्थानीं झालीं व तो अंकुर एकाएकीं पालवून थोडक्याच काळांत त्याचा मोठा विस्तार झाला. रामचंद्रपंतानें अवरंगझेबाचे पाठीं निःसंशय या वृक्षाच्या सगळ्या फांद्या हळू हळू सवड सांपडतांच तोडून टाकल्या असत्या. पण धनाजी व त्याच्या बरोबर दरोबस्त लष्कर फितुर झालें. व एकाएकीं शाहू-कडेस गेले. त्यामुळें जशी पंख कापलेल्या पक्ष्याची स्थिती होते, तशी राम-चंद्र पंताची झाली. धनाजीनें मोठा स्वामिद्रोह केला याचे कारण रामचंद्र पंताची शिस्तवार काम करण्याची पद्धति त्यास दुःसह झाली, हेंच नसे-लना? पुढें मऱ्हाठ्यांचा लुटारूपणा नाहींसा करणें, हें राव बाजीचें पहिलें कर्तव्य होतें. पण तसें न करितां, उलट मराठ्यांचा लुटारूपणा वाढविला, म्हणून ग्रांटडफ बाजीरावाची तारीफ करितो. स्वार्थपर होऊन मऱ्हाठ्यांचा लुटारूपणा वाढविला, ही बाजीरावाची मोटीच चूक निदान आम्ही सम-जतों. हा लुटारूपणा वाढविल्यामुळें सर्वत्र अव्यवस्था झाली, व अव्यव-स्थेनें सर्व लुटून फन्ना करण्याचें दुर्निवार व्यसन लागल्यामुळें महाराष्ट्र

मंडळाचा अखेरीस घात झाला. शिवाजीस हवा होता मुलूख, म्हणून तो जसजसा मुलुख घेत गेला, तसं तशी त्यांत व्यवस्थाही लावीत गेला. शिवाजीचा मोठा हेतु, आपल्या रयतेस काडीमातही शत्रूंपासून उपद्रव सोसावा लागूं नये, हा असे. म्हणून विजापूरकरांचा उघडा मुलुख त्याच्या हातीं आल्या नंतर, हळू हळू त्यांत त्यानें नवे गड बांधले. बाजीराव शत्रूंचा मुलुख शिवाजीच्या पेक्षांही अधिक उद्‌ध्वस्त करी. पण लुटीपलीकडेस व आपले घोडें पुढें ढकलण्यापलीकडेस त्यास दुसरें कांहीं नको होतें. बाजीरावानें स्वाऱ्या कराव्या, व शत्रूंच्या मुलुखांस जाळून टाकावें व लुटून फन्ना करावें. शिवाजीनेंही असेंच केलें. पण शिवाजीकडेस सगळी लूट तरी येत असे व तिचा तो आपल्या मुलखांत नवे गड बांधण्यांत व बंदोबस्त करून आपल्या रयतेस अधिक सुखी करण्यांत सद्विनियोग करी. बाजीरावाकडे सगळी लूट येण्याचा मुळींच संभव नव्हता, कारण शिवाजीप्रमाणें बाजीरावाची कैद नव्हती. रयतेस सुखी करण्याचा किंवा तिच्या पिकापाण्यास शत्रूंचा उपद्रव होऊं नये म्हणून गड बांधण्याचा, छत्रपतीस बाजीरावानें कधींही, उपदेश केलेला नाहीं. बाजीरावाची व त्याच्या बंधूची स्वामीभक्तीही तितपतच होती. दोनदां तिनदां शाहूचा चिमणाजी आप्पानें उघड उपमर्द केला. शाहूची परवानगी न घेतां किंवा त्यास न विचारतां बाजीरावानें दिल्लीपती पासून खिलत व सुभेदारी घेतली. कोठें अवरंगजेबापासून खरोखरीच मोठ्या आणिबाणीच्या प्रसंगींही कोणत्याही प्रकारचा लांच न घेणारा रामचंद्र नीलकंठ, व कोठें क्षुद्र खिलत व सुभेदारी आपल्या धन्याच्या परवानगीशिवाय स्वतंत्रपणानें घेणारा पहिला रावबाजी! रामचंद्रपंतानें जर अवरंगजेबाच्या बोलण्यास रुकार दिला असता तर अवरंगजेबापासून त्यांस किती बरें फायदा करून घेतां येतां! याप्रसंगी सर्व दक्षिणची सुभेदारी रामचंद्रपंतास देण्यास अवरंगजेब मागें पुढें पहाताना. पण ज्या खाणींतून रामचंद्रपंत, पुरंदरीं नांवाजलेला मुरारबाजी, व चाकणास नांवाजलेला फिरंगोजी नरसाळा, असलीं अमोलिक रत्नें निघालीं ती खाण निराळी, व रावबाजीची खाण निराळी. सारांश, बाजीराव शूर होता.

बाजीराव काटक होता, बाजीराव उदार होता, हें सर्व खरें आहे. चिमणाजी आप्पाही मोठा शूर होता. यांत कांहीं संशय नाहीं. पण उभय बंधूमध्यें स्वामिभक्ति मुळींच नव्हती. व ते परार्थतेच्या गांवीं स्वप्नींही गेलेले नव्हते. बाजीरावानें अरेतुरेची लढाई काय ती दाभाड्या बरोबर मारली ती. बाकी त्यानें निजामास कोंडलें त्यांत त्याचें सैनापत्य दिसून येतें. यांत कांहीं संशय नाहीं. तरी मऱ्हाठा शिपायांनीं खरोखर अभिमान बाळगण्यासारख्या लढाया बाजीरावानें किंवा त्याच्या वंशजांनीं फारशा मारल्या नाहींत. इतके येथें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. लढाया मारल्या प्रतापराव गुजरानें, हंबीरराव मोहित्यानें व संताजी घोरपड्यानें. त्या अवरंगजेबाच्या वेळच्या दांडग्या लढाया कोठें व निझामासारख्या जेव्हां तेव्हां लढाई टाळणाऱ्या सरदारा बरोबर झडलेल्या बाजीरावाच्या चकमकी कोठें.

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यास पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्यानंतर लौकरच शाहू वारला. त्या समयीं नानासाहेबानें राजपत्नीशीं केलेला कावा खरोखरीच आम्हां ब्राह्मणांस खालीं पहायास लाविणारा आहे. शाहू होता तोपर्यंत त्याचा पेशव्यांस बराच मान राखावा लागे. पण शाहू वारल्या नंतर नांवाने तरी मऱ्हाठेशाही होती ती जाऊन तिच्या ऐवजी खरी पेशवाई किंवा ब्राह्मणशाही झाली. व सातारकर छत्रपति एक पेशव्यांच्या हातांत बाहुलें झालें. प्रसंग पडल्यास नांव मऱ्हाठ्यांचें, पण ऐवज सगळा ब्राह्मणांचा, अशी स्थिती झाली. मऱ्हाठे कांहीं लिहिणारे नव्हत. हें खरें आहे. तरी मोठ्या धूर्त पुरुषाच्या काव्यानें एक मऱ्हाठा फसेल, दोन फसतील, फार तर तीन फसतील, पण सगळी जात कधींही फसावयाची नाहीं. एकादा पक्का पुरुष कांहीं गोष्ट करतो ती स्वव्यतिरिक्त अमुक जातीस हितावह आहे, असें तो पुनः पुनः आपण होऊन लोकांमध्यें फुंकतो खरे, पण ती खरोखरी हितावह आहे कीं नाहीं हें थोडें बहुत त्या त्या जातीतील प्रत्येक पुरुषास कळतें. करणारा जितके आपल्या निःपक्षपाताचें व परार्थतेचे घोडें पुढें अधिक अधिक ढकलतो तितका लोकांस अधिक अधिक संशय येतो, व हळू हळू भ्रमाचा भोपळा फुटल्या शिवाय राहत

नाहीं. सारांश जातीच्या कामांत नुसतें तोंडानें गोडगोड बोलून किंवा गोड बोलतोंसें दाखवून कोणाच्याही डोळ्यांत विशेष धूळ पडण्याचा संभव नाहीं. पेशवे आपणांस मऱ्हाटे म्हणवीत, पण मऱ्हाठ्यांची साताऱची गादी होती तिचा अपमान करीत. कुलीन व जातीवंत मऱ्हाठे यांस व मावळ्यांस ते मुळींच पदरीं ठेवीत नसत, कां तर त्यांचा ओढा साताऱकरांकडेस असायचा. जाधव, मोहिते, घोरपडे वगैरे अस्सल मऱ्हाठ्यांची कुळें पेशव्यांची नोकरी फारशी पत्करीत ना, व पेशवेही त्यांस ठेवण्यास फारसे राजी नसत रघोजी भोसल्यानें निझामा बरोबर सख्य केलें तेव्हां माधवराव पेशवे चिडले. व आपल्या लोकां बरोबर किंवा मऱ्हाठ्यां बरोबर असा विरोध करणें बरोबर नाहीं, असा रघोजीच्या पुढें त्यांनी एकदां उद्गार काढला. जर रघोजीस थोडी समयसूचकता व धैर्य असतें तर मऱ्हाठ्यांची सर्व सत्ता बळकावून त्यांचाच उपमर्द करणाऱ्या ब्राह्मणांबरोबर माझा विरोध आहे, मऱ्हाठ्यांबरोबर नाहीं, असा उलट जबाब त्याच्या तोंडांतून निघाला असता, व तसें झालें असतें तर त्यांत कांही वावगें नव्हतें. कोल्हापुरकर पुनः पुनः निझामाकडेस वळत त्याचेंही कारण हेंच. कोल्हापुरकरांच्या मुलुखांस मिरज वगैरे लागून असणारा मोठा मुलुख पटवर्धनांच्या घराण्यांस पेशव्यांनी जहागीर दिला त्याचा मतलब अस्सल मऱ्हाठ्यांनी डोकें वर करूं नये, हाच. शिंदे व होळकर या दोन गरीब मऱ्हाठ्यांस चढविण्याचा मुख्य हेतू हा कीं, अस्सल मऱ्हाठ्यांबरोबर टक्करीचा प्रसंग पडल्यास कृतज्ञतेनें आपणांस हस्तालंब देण्यास त्यांनी चुकूं नये. अशा रितीनें आपल्या पोष्याच्या हातून, प्रसंगविशेषीं त्याच्याच जातीबरोबर तंटा उपस्थित झाल्यास विशेष मदत होईल, अशी आशा राखणे, हें मृगजळाचें पाणी पिऊन तहान भागविण्यासारखें होय. जोपर्यंत पोष्य दुर्बळ असतो तोपर्यंत त्याच्या मदतीपासून फारसें निष्पन्न होण्यासारखें नसतें. बरें पोष्य बलिष्ठ झाला, म्हणजे तो सहजच आपल्या जातीकडेस वळतो, व तसें त्यानें केलें म्हणून उदार मनाच्या पुरुषाच्यानें तरी त्यास दोष देववणार नाहीं. पोष्यास त्याच्या जातीच्या विरुद्ध परजातीयानें शस्त्र धरायास

सांगणें हें प्रायः त्यांस त्याच्याच भावडांच्या वर हात उचलण्यास सांगण्यासारखें होय. शिंदे व होळकर या दोहोंनीं मिळून जाऊन भाईबंदी करूं नये म्हणून पेशव्यांची बरीच सावधगिरी दिसते. या पेशव्यांच्या कृत्यांचें फळ येण्यास फारसे दिवस लागले नाहीं. गादी म्हटली म्हणजे मूळची महाराष्ट्र क्षत्रियांची. तिची प्राणप्रतिष्ठा केलेली शिवछत्रपतीनें. घोरपडे, जाधव वगैरे महाराष्ट्र क्षत्रियांनीं आपलें रक्त पाण्याप्रमाणें ओतण्यास तयार राहून व एकनिष्ठ रामचंद्रपंत, प्रल्हादपंत, वगैरे महाराष्ट्र ब्राह्मणांनीं आपली अमोलिक बुद्धि खर्चून, रायगड अविंधांच्या हातीं लागला असतांही पुनः तिचा लागलाच जीर्णोद्धार केला. हें खरोखरी मोठें असाधारण व लोकोत्तर काम दोन्ही जातींच्या मऱ्हाठ्यांनी मिळून केलें. पुढें बाळाजी विश्वनाथानें पेशवाई मिळविली ती आपल्या कारकुनीच्या बळावर, पराक्रमाच्या किंवा शौर्याच्या बळावर नव्हे. पहिल्या रावबाजीनें बाहेरून सर्व व्यवस्था नीट ठेवून आंतून शाहू छत्रपतीस कसपटासारखें गणण्यास आरंभ केला. नानासाहेबांच्या कारकीर्दीच्या आरंभींच शाहू वारला. तेव्हां तर पेशव्यांनीं सगळीच सत्ता बळकाविली, व सातारकरांस बाहुलें करून ठेविलें. देवगिरीच्या यादव वंशाचे बरेच कारभारी ब्राह्मण होते. रामदेवरावाचा चुलता महादेव गादीवर असतां, हेमाडपंतावर त्याचा पूर्ण भरंवसा होता. रामदेवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं हेमाडपंतच मुख्य प्रधान होता. हेमाडपंताचें वजन कांहीं सामान्य नव्हतें. तरी स्वामिद्रोहाचें स्वप्न त्यांस कधीही पडलें नाहीं. क्षत्रिय गादीची सगळी सत्ता बळकावून गादीच्या मालकांस कसपटा सारखें लेखण्याचा पाया अशा रितीनें पेशव्या सारख्या आमच्या जातीबंधूनीं महाराष्ट्र मंडळांत पहिल्यानें घातला, हें कबूल करण्यांस आमच्या लेखणीस फार कष्ट होत आहेत. अशा रितीनें ब्राह्मण व क्षत्रिय या दोन फळ्या महाराष्ट्र मंडळामध्यें करून, घरफूट म्हणजे काय तें मऱ्हाठ्यांस या काळीं पेशव्यांनीं स्पष्ट करून दाखविलें. या काळाच्या पूर्वी या प्रकारचा जातीभेद किंवा आपमतलब आमच्या महाराष्ट्र मंडळांत तरी निःसंशय नव्हता, म्हणूनच

शाहूछत्रपतीस अभिषेक होई पर्यंत महाराष्ट्रमंडळांचें स्वातंत्र्य कायम राहिलें होतें. ज्या मऱ्हाठ्यांच्या गादीनें जातीभेद मनांत मुळींच न वागवितां बाळाजी विश्वनाथास केवळ मऱ्हाटा समजून पेशवाईचीं वस्त्रें दिलीं, इतकेंच नाहीं, तर त्याच्या वंशांत पेशवाई कायम केली, त्या गादीचें त्याच्याच वंशानें अनिष्ट करणें तर दूर राहूं द्या, पण अनिष्ट चिंतिणेंही एक महापापच समजावें होतें. पहिल्या बाजीरावानें स्वतंत्रपणानें राहून व त्याचा बंधू चिमणाजी आप्पा यानें शाहूचा अनेकवेळां उपमर्द करून, त्या गादीची अवज्ञा करण्यास आरंभ केला, व बाजीरावाच्या चिरंजिवानें तर मऱ्हाठ्यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं म्हणून गादी नांवाने ठेवून सर्व सत्ता आपण बळकाविली. मऱ्हाठ्या सातारकरांचें मऱ्हाटे म्हणविणारे मुख्य नोकर द्विजोत्तम पेशवे यांनी हा कित्ता मऱ्हाठ्यांस घालून दिला !!! हा कित्ता घालून दिल्याचें फळ पेशव्यांस लौकरच मिळालें. याप्रमाणें जर पेशव्यांस स्वामिभक्तीचा गंधही नव्हता, तर तो त्यांच्याच प्रत्यक्ष बंधूस किंवा पदरच्यास तरी काय म्हणून असावा ? नानासाहेबांचा चुलत भाऊ भाऊसाहेब हा आपणांस मोठा शहाणा व मोठा पराक्रमी समजे. नानासाहेबांबरोबर भांडून ती स्वारी एकदां कोल्हापुरकरांच्या पदरी जाऊन राहिली. इतकी बंधुप्रीति व बंधुनिष्ठा !!! असला आत्मनिष्ठ पुरुष पानिपतास मऱ्हाठ्यास घेऊन जातो, व धनगर म्हणून होळकराची शहाणपणाची सल्ला दूर भिरकावून देतो !!! बळवंतराव मेहेंदळ्यास भरसभेंत विनाकारण जनकोजी शिंद्याचा व मल्हारराव होळकराचा उपमर्द करूं देतो, व अखेरीस इब्राहिमखान गारद्याचीही बरीच शहाणपणाची सल्ला न ऐकतां, कांहीं तरी मतिभ्रष्टाप्रमाणें करतो !!! तेव्हां परिणाम झाला तोच व्हावयाचा. दुसरा परिणाम होण्याचा संभव नव्हता. जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर या दोहोंनींही पानिपतच्या लढाईंत आपली शर्थ केली. इब्राहिमखान म्हटला म्हणजे अविंध. तरी त्याचें इमान, शहाणपण व शौर्य ही तिन्ही चोख. तेव्हां पानिपतची लढाई महाराष्ट्रांतील क्षत्रियांनीं बेवकुफाई किंवा नामर्दाई करून घालविलेली नव्हे व त्यांच्या अविंध

नोकरांचाही कांहीं वांक नव्हता. या लढाईच्या संबंधानें सर्व अपयश पेशव्यांवर व त्यांच्या जातीवर, अर्थात दरोबस्त महाराष्ट्र ब्राह्मणांवर येतें. तें टाळण्याचा सयुक्तिक व वाजवी व सरळ असा मार्ग निदान आम्हांस दिसत नाहीं.[1]

---

१. मऱ्हाठ्यांसंबधानें चार उद्गार पृ. ४४—५२

---

## — १४ —

# सत्यशोधक समाज आणि दीनबंधु

महाराष्ट्र क्षत्रियांची उन्नति करूं पाहणारा "सत्यशोधक" समाज व "दीनबंधु" यांच्या संबंधानें आतां दोन शब्द लिहले पाहिजेत. दोहोंसही आमची हात जोडून सविनय विनंती आहे कीं, उगीच ब्रह्मद्वेष करणें व ब्राह्मणांच्या विरुद्ध क्षुल्लक व कुत्सित मनाच्या पुरुषानीं लिहलेल्या कचऱ्याच्या पेटींत टाकण्यासारख्या लेखांस एकसारखी सतत जागा देऊन एकमेकांमधील द्वेष माजविणें, यांत बिलकूल शहाणपण नाहीं. ज्या एकनाथस्वामींनीं अतिशूद्रांचाही उद्धार व्हावा या हेतूनें सर्व धर्म तत्त्व मऱ्हाठींत उतरविलें व श्राद्धाचे ब्राह्मण जेवण्याच्या पूर्वी अतिशूद्रांस जेऊं घातलें, ते जातीचे ब्राह्मणच होते. ज्या अनंतभट्टाने चोख्यासारख्या अतिशूद्राचे प्रासादिक अभंग लिहून ठेवण्याचें पत्करलें, तोही जातीचा ब्राह्मण. तेव्हां दरोबस्त ब्राह्मणांवर जेव्हां तेव्हां उतरतां, ही तुम्ही मोठीच चूक करितां. जसें एकट्या ब्राह्मणजातीच्या हातून महाराष्ट्र मडळाचे गाडें चालणें नाहीं, तसेंच एकट्या क्षत्रिय जातीच्याही हातून चालणें नाहीं, शिवाजी महाराजां-

सारखे अवतारी क्षत्रिय झाले, ते कांहीं ब्रह्मद्वेष करणारे नव्हते. जर त्यांनीं ब्रह्मद्वेष केला असता, तर त्यांच्या हातून मऱ्हाठेशाहीची प्राणप्रतिष्ठा निःसंशय झाली नसती. जर शिवाजी महाराजांचीं पावलें तुम्हांस वंद्य असलीं, तर त्यांच्याप्रमाणें जितके लौकर तुमचें वर्तन होईल, तितकें सुंदर होईल. प्रल्हादपंतासारखा ब्राह्मण प्रतिनिधि कानडी महाराष्ट्रांत हुजुर होता, व रामचंद्रपंतासारखा अमात्य ब्राह्मण आपल्या मऱ्हाठी महाराष्ट्रांत एक सारखा खपत होता, म्हणून राजाराम महाराजांचे वेळीं मऱ्हाटेशाही जीव धरून राहिली, व दिल्लीपतीस अकृतार्थच या अशाश्वत लोकांचा त्याग करणें भाग पडलें. धर्मप्रकरणीं व राज्यप्रकरणीं ब्राह्मणांचे अशेष महाराष्ट्र मंडळावर झालेले उपकार जर आज महाराष्ट्रांतील क्षत्रिय अजीबात विसरून जातील, तर त्यांच्या पूर्वजांवर आजपर्यंत न आलेला कृतघ्नतेचा मोठा आरोप त्यांच्यावर येईल व महाराष्ट्र-मंडळाचें अतिशय नुकसान केल्याचा बट्टा त्यांच्या नांवास लागेल. जे ब्राह्मण तुम्हांस कुळंबट किंवा क्षुद्र म्हणतील व तुमच्या वित्तादिकांचा अभिलाष करतील, त्यांच्या बरोबर तुम्ही वाद खुशाल चालवावा. पण महाराष्ट्रांतील दरोबस्त ब्राह्मण जातीवर कृपा करून उतरू नये. भटांशिवाय लग्न लावण्याची चाल पाडून तुम्ही अतिप्राचीन काळाच्या आपल्या पूर्वजांचा कित्ता वळवितां, हें पाहून आम्हांस फार संतोष होतो. पण तुम्ही एक चूक करीत आहां, ती जर लौकरच दुरुस्त कराल तर बरें. लग्न लावण्यासाठीं भटांच्या ऐवजी लहानशी जात उत्पन्न करण्याकडेस तुमच्या मनाचा ओघ वळलेला दिसतो. अशा रीतीनें जर भिक्षुकांची नवीन जात तुमच्यामध्यें उत्पन्न कराल, तर केवळ आगींतून निघून फोपाट्यांत गेल्यासारखें होईल, याचा नीट शांतपणानें आजच विचार कराल तर बरें. नाहींपेक्षां पुढें निःसंशय पस्तावावें लागेल. तुमच्या पूर्वजांचा अति प्राचीनकाळीं भिक्षुकवर्ग म्हणून निराळा नव्हता. तशीच जर स्थिति तुम्ही पुनः आणाल, तर अत्युत्तम होईल. हे मऱ्हाटे कोकणस्थ व हे देशस्थ अशी भेदबुद्धि राखून जर तुम्ही आपापसांत फूट माजवूं पहाल, तर तुम्ही आपल्या जन्मदात्रीचें अतिशय नुकसान कराल. महाराष्ट्र-

मंडळांत शूद्र नांवानें नर्मदेच्या उत्तरेस नांवाजलेला वर्ण बिलकूल नाहीं. मऱ्हाठा मात्र मग तो कोंकणांतला असो कीं देशावरचा असो मूळचा म्हणून एक. महाराष्ट्र क्षत्रिय सर्व एकमेकांचे बंधु...जसे तंजोरकर व मुधोळकर, तसेच ग्वाल्हेरकर व वाडीकर. जातिभेद महाराष्ट्रमंडळांत पूर्वीच्या-काळीं नव्हता. तो ब्राह्मणांनीं आपणांबरोबर शालिवाहन वंशाची समाप्ति झाल्यानंतर आणिला. जर पूर्वीचे दिवस पुनः यावे अशी तुमची नाभि-कमळापासून इच्छा असली, तर जशी त्यावेळीं तुमच्या पूर्वजांची जातीच्या संबंधानें सर्वत्र अभेदबुद्धि होती, तशी हल्लींच्याकाळीं...जर तुम्ही त्या पूज्य पूर्वजांचे वंशज खरे तर...तुम्हांस राखिली पाहिजे. इतकें काम तुम्ही केलेंत, म्हणजे महाराष्ट्रमंडळ यावच्चंद्रदिवाकर अकुतोभय झालें.[1]

---

१. मऱ्हाठ्यासंबंधानें चार उद्गारः— पृ. १९५-१९६, १८८७

---

-- १५ --

## महाराष्ट्र मंडळांतील ब्राह्मणांविषयीं कांहीं तुरळक विचार

महाराष्ट्रमंडळ हें एक घर असून, जितके म्हणून लोक महाराष्ट्र-भूमीचें पयःपान करीत आहेत, तितकीं सर्व सारखीं भावंडें होत, असा प्रत्ये-काचा समज झाला पाहिजे. पण हा समज तर दूर राहूं द्या. जे आपण हिंदू धर्माचे म्हणवितों, त्या आपणांमध्यें प्रत्येक लहान लहान जात आपणास उंच समजते, व दुसऱ्या जातीस नीच समजते. सुशिक्षित लोकांमध्यें बाहेरून परजातीयांबरोबर वाचेनें समदृष्टिपणा दाखविणारी मंडळी बरीच

आहे. पण अंतःकरण शुद्ध नसल्यानें वाचा व कृति या दोहोंमध्यें अनेक प्रसंगीं विसंवाद पडतो, व त्यामुळे तिऱ्हाईतास जातिभेदाची बळकट शंका येते. अशा प्रकारें शंका येण्यासारखें पुढारी झालेल्या किंवा होऊं पहाणाऱ्या मोठ्या लोकांनीं आचरण करणें हें कांहीं धर्मबंधुत्वाचें किंवा देशबंधुत्वाचें लक्षण नव्हे. इतकी बंधुप्रीति ज्या लोकांमध्यें नसेल, त्यांस पूर्वी कधींही बरकत आलेली असण्याचा संभव नाहीं, व पुढेंही यावयाची नाहीं. सुंभानें हत्तीस बांधतां येतें; पण त्यांतील एकच तंतु घेतला, तर हत्ती त्यास सहज तुडवून टाकील. सुंभामध्यें इतके तंतु असतात, त्यांत वरचा कोणता व खालचा कोणता ? वर असतो तो वरचा, व खालीं असतो तो खालचा. जसा तंतूंचा वरचेपणा व खालचेपणा कायमचा करून ठेवण्यांत अर्थ नाहीं, तसाच देशरूपी सुंभाचे तंतुभूत जे दरोबस्त जातींचे लोक, त्यांचा वरचेपणा व खालचेपणा कायमचा करून ठेविण्यांत हांशील नाहीं. ब्राह्मणास शूद्र जातीचीही मुलगी भार्या विहित आहे, हा लेख पूर्वी येऊन गेलेला आहे. तेव्हां “ गृह्य ” धर्माचे काळीं वर्णसकराची कल्पना निःसंशय नव्हती. पुढें स्मार्तकाळीं ही वर्णसंकाराची कल्पना निघालेली दिसते. तेव्हां ब्राह्मणी धर्माचें कर्मठ रूप देखील वर्णसंकराविरुद्ध आहे असें विचाराअंतीं म्हणतां येत नाहीं. तरी रूढि सर्वतोमुख बलवत्तर होऊन बसल्यामुळें आम्हां ब्राह्मणांची व आम्हांबरोबर इतर हिंदूंचीही अत्यंत शोच्य स्थिति होऊन गेली आहे. युगांतराचे ब्राह्मण फारच स्वधर्मनिपट व तपस्वी होते, असे ब्राह्मणांचेच ग्रंथ सांगतात. असें असतांही युगांतरीं पराशराच्या कोळणीपासून झालेल्या पुत्रास ब्राह्मणत्व मिळालें. युगांतरीं शापामुळें देवादिकास मनुष्ययोनींत जन्म घ्यावा लागे, असें ब्राह्मणाच्या ग्रंथांत आढळतें. स्वधर्मपणा व तपस्वीपणा विशेष होता, अशा काळीं देखील जर ब्राह्मणत्व आईकडून इतर जातीय असणारास मिळत असे, तर बोलून चालून अधर्मनिष्ठपणा वाढविणाऱ्या या युगांत सूट निःसंशय अधिक असली पाहिजे. पूर्वीचे देवही तेच आहेत. जसा शापादिकामुळें देवादिकांस मनुष्यादि योनीमध्यें युगांतरीं जन्म घ्यावा

लागत असे, तसा या युगींही जन्म घेऊं लागण्याचा संभव आहे. जसे विदुरादिक पूर्वीच्या काळीं होऊन गेले, त्यांच्या घरीं साक्षात् श्रीकृष्णानें दुर्योधनाच्या घरचीं पक्वान्नें सोडून कण्या झोडल्या, तसेंच या युगींही विदुरादिक जन्मण्याचा संभव आहेच. रामचंद्रानें भिल्लिणीचीं उष्टीं बोरें निःशंक खाल्लीं. स्नेह व भक्ति हे दोन गुण जसे युगांतरीं होते, तसें या युगींही असण्याचा संभव आहे. "कलियुगासारखें युग नाहीं, कारण नाममात्रानें काम होते व यज्ञादिक जाड्या खटपटीची गरज पडत नाहीं," असें भागवतकार म्हणतात. महाराष्ट्र मंडळांतील ब्राह्मणांमध्यें कांदा व लसूण खाण्याची, क्षत्रियामध्यें पाटाची, अशा सर्वथैव शास्त्रनिषिद्ध चाली पडून गेल्याचीही चांगलीं उदाहरणें देतां येतात.

सारांश, रूढी पडलेल्या असतील त्या अन्यथा पाडण्यास हिंदु धर्माची आडकाठी बिलकूल नाहीं. ब्राह्मण आहेत ते आपणांस हिंदु म्हणवितात, त्या पक्षीं हिंदु धर्मांत ब्राह्मणी धर्माचा समावेश झालेलाच आहे. हिंदु धर्म हा हल्लीं जागता धर्म आहे. पाणी जिवंत असतें तोंपर्यंत त्याचा गढूळ झालेला थर वाहून जाण्याचा व गढूळ झालेल्या थराची नवीन स्वच्छ पाण्याच्या थरानें जागा बळकावण्याचा क्रम चाललेला असतो. हिंदु धर्म हा हल्लीं जिवंत धर्म आहे. वयाच्या मानानें आपल्या बहिरंग शरीरांत पुष्कळ पालट झाला, तरी अंतरंग आत्मा निर्विकार असतो. पालट होतो तो केवळ बहिरंगांत होतो, अंतरंगांत कधींही होत नाहीं. ब्राह्मणी धर्म पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें मूळचेंच अठरा धान्याचें कोडबोळें होय. हा त्याचा कोडबोळपणा हिंदुधर्म या नांवाचा आरोप झाल्यापासून विशेष वाढला आहे. दरोबस्त जाती जसजशा एकमेकांत मिसळत जातील, तसतसा हिंदु धर्माचा पाया निःसशय अधिकाधिक मजबूत होईल. शेतांतील जमिनीची उच्चावचता ठेवून जर बियाणें पेरलें, तर पुष्कळ बियाणें फुकट जातें व शेत चांगलेसें पिकत नाहीं. पण डिफळें असतील तीं खेंगऱ्यानें फोडून जर सर्व सपाट पूर्वी केलें, व नंतर बीजारोप केला, तर कुत्रे खाईना इतकें ही धान्य पिकतें. महाराष्ट्रमंडळरूपीं शेतांतील लोकरूपी जमीन जितकी

अन्नोदकाच्या संबंधानें व वैवाहिक संबंधानें सपाट होईल व केवळ कृत्रिम उच्चावचता टाकून देईल, तितकें ऐश्वर्याचें बीं पेरल्यास ऐश्वर्य दाट उगवेल. सगोत्र मुलीबरोबर विवाह करण्याचा निषेध शास्त्रकारांनी केला आहे. त्याचें ही रहस्य हेंच आहे. निराळें गोत्र असल्यानें संततीमध्यें अपूर्व गुण येण्याचा संभव विशेष असतो. अशाच समाजानें ब्राह्मणादिकांस असवर्ण भर्त्यांचें विधान सूत्रकारांनीं केलेलें दिसतें. पंचामृताचा खमंगपणा नुसता गुळांत, नुसता चिंचेंत, नुसत्या मेथ्यांत, नुसत्या मिरच्यांत किंवा नुसत्या मिठांत निःसंशय नसतो, हें महाराष्ट्रमात्रास माहीत आहे.

सारांश, कित्येक रूढी पूर्वी प्रचारांत असून त्यांचा हल्लीं लोप झाला आहे. पूर्वी ब्राह्मणांमध्यें व तदनुयायांमध्यें असण्याचा संभव बिलकुल नाहीं, अशाही रूढी हल्लीं दोहोंमध्यें दृष्टिगोचर होतात. ज्या रूढींचा लोप झाला असेल त्या पुनः अंमलांत आणिल्या किंवा ज्या पूर्वी नसतां हल्लीं दृष्टिगोचर होतात त्या तशाच कायम ठेविल्या व ज्या स्वजातींत नसतील त्या दुसऱ्या जातींतून उचलून घेतल्या, म्हणजे आमच्या या परम प्रिय ब्राह्मणी धर्मासारखा किंवा वैदिक धर्मासारखा किंवा हिंदु धर्मासारखा धर्म या भूपृष्ठावर नाहीं. आपल्या धर्मांत जो पंचामृतपणा सिद्धांतदृष्ट्या आहे, तोच लोकांमध्ये व्यवहारदृष्ट्या आणिला, म्हणजे काम झालें. [1]

१. ब्राह्मण व ब्राह्मणीधर्म, किंवा वेद किंवा वैदिक धर्म.
हेमंत व्याख्यानमाला, १८८९ पृ. ३०–३१

अनुक्रम ... वि:

# आमचा देश, आमचे देशी लोक, आमची देशी भाषा

## १ आमच्या देशाच्या चतुःसीमा

आमचा देश महाराष्ट्र हें कोणासही सांगावयास नलगे. आज ज्यांस हिंदु असें नांव मिळालेलें आहे, त्यांच्या भूमीचे पूर्वीपासून उत्तर व दक्षिण असे दोन मोठे विभाग करण्याची वहिवाट आहे. उत्तर भूमीस उत्तरापथ असेंही म्हणतात, व दक्षिण भूमीस दक्षिणापथ असेंही म्हटलेलें असतें. महाराष्ट्र देशाचा दक्षिणेंत समावेश होतो, उत्तरेंत होत नाहीं.

आमच्या देशाची उत्तरेकडील सीमा नर्मदा नदी होय. नर्मदेचा उगम गोंडवनांतील डोंगरांत झालेला असून, ती उत्तर दिशेस बरीच समांतर वहाते, व अखेरीस खंबायतच्या आखातास मिळते. महाराष्ट्राची पश्चिमेकडील सीमा आरबी समुद्र होय.

महाराष्ट्राच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील या दोन सीमा जशा निश्चितपणानें सांगतां येतात, तशा दक्षिणेकडील व पूर्वेकडील सांगतां येत नाहींत. अगदीं पहिल्यानें महाराष्ट्राची दक्षिणेकडील सीमा मलय देश ठरते. मलय देशाचे व लोकांचे तीन विभाग कल्पिलेले असून त्यांस तम्मूळत्रिमलय, असा शब्द लाविण्यांत येई. मद्रासेपासून कांहीं अंतरावर मैलापूर प्रसिद्ध आहे. हें मैलापूर ( मलयपूर ) मलयांची राजधानी होतें. मलय लोक हे मोठे दर्यावर्दी दिसतात. बोर्निओ, सुमात्रा वगैरे बेटांमध्यें मलय हें नांव पूर्वीच्याकाळीं सुप्रसिद्ध झालेलें असून, मलाक्का हें नांवाजलेल्या द्वीपकल्पाचें नांव या लोकांवरूनच पडलेलें आहे. मलय हा शब्द हल्लीं इंग्रजींत Malay असा लिहिला जातो. हिंदी महासागरांत मालदिव

( मलयद्वीप ) नांवाचीं बेटें चांगलीं प्रसिद्ध आहेत. मलबार व मलयाल (त्रावणकोर) हीं नांवें पडण्याचें कारण हेच मलय लोक समजावे. मलबारांतून पुढें थेट कुमारीपर्यंत जो सह्याद्रीचा भाग गेला आहे, तो मैलागिरी ( मलयगिरि ) या नांवानें नांवाजलेला आहे. तेव्हां मलयमंडळ हें अगदीं पूर्वीच्या काळची महाराष्ट्र मंडळाची दक्षिणेकडील सीमा ठरतें. महाराष्ट्राची पूर्वेकडील सीमा अगदीं पहिल्यानें तेलंगण होती. तेलंगणाच्या खालाटीस कलिंग म्हणतात व वल्हाटीस आंध्र म्हणतात. आंध्र व कलिंग या दोहोंमध्यें जी डोंगरांची ओळ लागली आहे, तिचें जुनें नांव महेंद्रपर्वत होय. मलय लोकांप्रमाणें कलिंग लोकही पूर्वीच्याकाळीं नांवाजलेले दर्यावर्दी होते. यवद्वीपांत ( जाव्हांत ) कलिंग लोकांच्या पुष्कळ वसाहती प्राचीन काळीं झाल्या होत्या. जसें मलयांचें तसेंच कलिंगांचें नांव पूर्वेकडील द्वीप समूहांतल्या अनेक द्वीपांमध्यें पुष्कळ प्रसिद्ध झालेलें होतें. कलिंगांची अगदीं पहिली राजधानी शिक्कोल नांवाची असून, पुढें सिंहपुर राजधानी झाली. या दोन्ही मोडलेल्या नगरी दर्याकिनाऱ्यावरच आहेत जेथें जेथें मलयांनीं किंवा कलिंग लोकांनीं वसाहती केल्या, तेथें तेथे वसाहतीस व आसपासच्या मुलुखास त्यांनीं आपल्या मूळच्या मुलुखांत प्रसिद्ध झालेलींच नांवें प्रायः ठेविलेलीं दिसतात. हल्लींचें सिंगापूर हें नांव मूळचें सिंहपुर असून तें प्राचीनकाळीं कलिंगांनीच वसविलेलें होय. सिंहलद्वीप हें नांवही कलिंगांच्या वसाहतीमुळेंच पहिल्यानें पडलेलें समजावें. आंध्र लोकांचा खालटीबरोबर संबंध नव्हता; तरी आंध्रांनीं आपलें नांव जमिनीवर गाजविलें नाहीं असें नाहीं. मगध देशांत चंद्रगुप्त मौर्यानें स्थापिलेली गादी सुंग नांवाच्या कुळीनें बुडविली, व सुंगांची गादी काण्वांनीं बुडविल्यानंतर काण्वांची गादी आंध्रांनीं बुडविली. काण्व व आंध्र या दोन्ही कुळी तेलगी होत. काण्वांनीं व आंध्रांनीं मिळून आपला एकछत्री अंमल चांगला चारशें वर्षे चालविला. शालिवाहन शकाचे आरंभीं मगध देशावर एकछत्री सत्ता आंध्रांचीच होती. या आंध्र व कलिंग मिळून तेलंगी नांव पावलेल्या लोकांचा देश तेलंगण होय. हें तेलंगण महाराष्ट्रदेशाची अगदीं

पूर्वेकडील सीमा होती. ही सर्व हकीगत प्राय: शालिवाहन शकाचे पूर्वीची व कांहीं शालिवाहन शकाचे आरंभींची समजावी.

शालिवाहन शकाचे आरंभींच किंवा त्या सुमारास कुमारी जवळील लोक पांड्य या नांवानें नांवाजूं लागले. हें नांवाजण्याच्या पूर्वीं शें दोनशें — तीनशेंही समजण्यास हरकत दिसत नाहीं - वर्षें केराल व चोल हें नांव अस्तित्वांत आलें, या विषयीं शंका नको. तेव्हां मलय लोकांच्या भरभराटीचा काळ या काळाच्या पूर्वींचा समजावा. केरल हें नांव चेर किंवा सेर असेंही लिहिण्याची पुढें वहिवाट पडलेली दिसते. चेर किंवा सेर या देशास कोंक, व कोंग किंवा कांग असेंही म्हटलेलें आढळतें. कोंक किंवा कांग या शब्दास पुढं गाङ्ग किंवा गंगाकुल असें जाडें रूप ब्राह्मण शास्त्र्यांकडून देण्यांत आलें कोंक किंवा कोंग किंवा कांग, हें मूळचें राजकुळीचें नाव दिसतें. शालिवाहनाच्या तिसऱ्या शतकांत किंवा त्या सुमारास या कुळीचें चेर देशांत राज्य होतें. चोल देशांत याच सुमारास पालव किंवा पालवे कुळीचे राजे राज्य करीत होते. पालव किंवा पालवे हा शब्द ब्राह्मण शास्त्री पल्लव असा लिहितात शालिवाहनाच्या पांचव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धांत किंवा त्या सुमारास बदामी मुक्कामीं जैसिंग किंवा जैसी नांवाच्या चाळक्यानें किंवा साळुख्यानें एक नवी गादी स्थापन केली या काळीं दक्षिण महाराष्ट्रांत अर्थात कुतल या नांवानें नांवाजलेल्या महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील इलाख्यांत राठोडांचा अंमल होता कुतल हें नांव अव्युत्पाद्य दिसतें. या प्रांताचें मूळचे देशी नांव कानडा किंवा कन्नड होय. बदामीची गादी हळू हळू पुष्कळ वाढली व त्यामुळें कर्नाटकाचें नांव सर्वत्र गाजलें. कानडी लोक किंवा कानडी भाषा ही द्वयी बदामीच्या गादीच्या पूर्वीं माहीत होती, असें म्हणण्यास प्रमाण दिसत नाहीं. सारांश, मलयमंडळाचे सौभाग्य मावळल्यानंतर कांहीं वर्षें महाराष्ट्रदेशाची दक्षिणेकडील सीमा केरल, चेर, किंवा सेर देश ही होती. पण बदामीची गादी वाढत गेल्यामुळें कन्नड किंवा कर्नाटक हीच महाराष्ट्राची दक्षिणेकडील सीमा झाली. हेंच कर्नाटक वर जोरानें

धुसूं लागलें; व त्यामुळें पूर्वेकडेस तेलंगण निराळें पडून कर्नाटकच महाराष्ट्राची पूर्वेकडील सीमा बनलें.[1]

१. आमचा देश, आमचे देशी लोक, आमची देशी भाषा, आमच्या देशाच्या चतुःसीमा, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २२. पृ. ८१-८३; १८९०.

## --१७--

# आमचा देश आर्यावर्ताच्या किंवा पुण्यभूमीच्या बाहेर आहे

आर्यावर्त शब्दाचा अर्थ "आर्यांचा मुलुख' असा होतो. आर्यावर्ताचे ब्रह्मावर्त व ब्रह्मर्षिदेश असे आणखी दोन विभाग करण्याचा संप्रदाय आहे. ब्रह्मावर्त म्हणजे "ब्रह्मांचा मुलुख" असा ब्रह्मावर्त शब्दाचा अर्थ समजावा. ब्रह्मर्षिदेश या शब्दाचा अर्थ तर उघड आहे. असें दिसतें कीं पूर्वी ब्रह्म नांवाचे लोक दृषद्वती व सरस्वती या दोन नद्यांमधील व आसपासच्या मुलुखांत रहात होते, ते हळू हळू खालीं पसरले. ब्रह्मांमध्यें ब्रह्मर्षि असा एक पोटभेद उत्पन्न झाला. पुढें आसपासच्या मुलुखांत यांस पसरण्यास सवड सांपडली, व हळू हळू तीन वर्णांची प्रवृत्ति यांच्यामध्यें झाली. तेव्हां ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांस आर्य शब्द लावण्यांत येऊं लागला. तेव्हां आर्यावर्त ही आर्य शब्दाची व आर्य नांवानें नांवाजलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांची जन्मभूमि समजावी. जे आपणांमधील नसत, त्यांस अनार्य किंवा म्लेंच्छ असा शब्द आर्यांकडून लावण्यांत येई. अनार्यांच्या किंवा म्लेच्छांच्या देशास प्रत्यंत शब्द लाविलेला

आढळतो. सूत्रांचे काळीं अगदीं पहिल्यानें आर्य शब्द व अनार्य किंवा म्लेच्छ हे शब्द होते, असें म्हणण्यास प्रमाण नाहीं. त्या काळच्या अनार्यांचा किंवा म्लेच्छांचा वाचक दस्यु दिसतो. दस्यु शब्दासारखाच समजावा. आर्यावर्तास आर्य " पुण्यभूमी " पवित्र मुलूख, असाही शब्द लावितात. या आर्यावर्ताच्या दक्षिणोत्तर सीमा हिमालय व विंध्य हे पर्वत होत. आर्यावर्ताच्या दक्षिणोत्तर सीमा जरी अडचणीशिवाय ठरवितां येतात तरी पूर्व पश्चिम सीमा ठरविणें पुष्कळ जड जातें. जर पूर्वपश्चिम मोठ्या डोंगरांच्या ओळी असत्या, तर गोष्ट निराळी होती. पण पूर्वपश्चिम मुलूख बराच सपाट असल्यामुळें शास्त्रकारांस या सीमा ठरवितां आल्या नाहींत. तरी आर्यावर्ताच्या पूर्वपश्चिम ठोकळ सीमा ठरविण्यास फारशी अडचण दिसत नाहीं. इतकेंच कीं दक्षिणोत्तर सीमा जशा निश्चितपणें सांगतां येतात तशा पूर्वपश्चिम सीमा सांगतां येत नाहींत. विदेह किंवा मिथिला व मगध या पूर्वेकडील देशांतले लोक संकरजन्य (?) समजण्याचा वैदिक संप्रदाय आहे. विदेह किंवा मिथिला या देशांस हल्लीं तिर्हुत किंवा त्रिहोत्र असें म्हणतात, व मगध देशास बहार म्हणतात. दर्भंग्याच्या मुलखालगत असणाऱ्या कोशी नदीवरील पुंड्र व तेलंगणांतील आंध्र या लोकांस ऐतरेयकारानें " दस्यू " मध्यें म्हणजे अनार्य लोकांमध्यें घातलें आहे. लाट्यायन सूत्रावरून मगध देशांतील लोक " व्रात्य " — अनार्य ठरतात. तेव्हां आर्यावर्ताची पूर्वेकडील सीमा बहार, तिर्हुत, व आंध्र यांच्या पलीकडेस जाऊं शकत नाहीं, हें उघड होय. गौड देश तर दूर राहूं द्या, कारण आर्यावर्तांतून बहारासारखे प्रांत उल्लंघन केल्याशिवाय गौडमंडळांत पाऊलच पडणें नाहीं. गौडांमधील अंबष्ठ नांवाचे लोक वैदहकांप्रमाणें व मगधांप्रमाणें संकरजन्य, असा शेरा ब्राह्मणांनीं आपल्या शास्त्रांमध्यें मारून ठेविला आहे. अंबष्ठ लोक हे हल्लीं बंगाल्यांत " वैद्य जात " या नांवाखालीं मोडले जातात. बंगाल्यांत ब्राह्मण, वैद्य व कायस्थ अशा तीन प्रधान जाती हल्लीं सुप्रसिद्ध आहेत. जगन्नाथाच्या देशास म्हणजे उडिसा प्रांतास संस्कृतांत ओड्र म्हटलेलें असतें. ओड्र व कलिंग यांच्या देशांत पाऊल

टाकणें हें एका प्रकारचें वाईट काम असें आर्य समजत होते. तेव्हां आर्यावर्ताची पूर्वेकडील सीमा जरी निश्चयात्मक सांगतां येत नाहीं, तरी इतकें ठोकळ अनुमान करितां येतें कीं आर्यावर्ताची पूर्वेकडील सीमा बहार प्रांताच्या अलीकडेस गेलेली असण्याचा बिलकूल संभव नाहीं. आवंत्य म्हणजे अवंति देशांतील लोकांस मनु संकीर्ण समजतो. अवंती देशाचें नांव हल्लींचें माळवा होय. तेव्हां दक्षिणेकडील आर्यावर्ताची सीमा थेट विंध्यापर्यंतही पश्चिमेकडील बाजूस पोंचत नाहीं, या विषयीं शंका नको. पंजाबांतील लोक पिशाच्यांची संतति असल्यामुळें त्यांस वेदबाह्य किंवा अनार्य समजण्याचा शिष्टसंप्रदाय (?) आहे. पिशाच हें वेदबाह्य अनार्य-जनांचें नांव असून त्या जनांच्या वैवाहिक वगैरे ज्या चाली होत्या, त्यांची केवळ निंदा ब्राह्मणांच्या ग्रंथांत श्रवण होते. काश्मीरांत पूर्वी नागांचें राज्य असून चातुर्वर्ण्य नव्हतें, तें एका राजानें कनोज प्रांतांतून आणिलें, असें काश्मीरी लोकच म्हणतात. तेव्हां काश्मीर व पंजाब हे दोन देश अनार्य ठरून, त्यांतील लोक अनार्य ठरले. सारांश, आर्यावर्ताची पश्चिमेकडील सीमा पंजाबाच्या पलीकडेस गेलेली असण्याचा बिलकुल संभव नाहीं, ती पंजाबाच्या अलीकडेसच हुडकली पाहिजे.

यात्रमाणें मूळच्या आर्यावर्ताचाच नीट पत्ता लावला म्हणजे आमचा हा महाराष्ट्र देश आर्यावर्ताच्या बाहेर आहे, हें ठरविण्याची ज़रूरी राहिली नाहीं. आमच्या देशाची जी उत्तरेकडील सीमा आज हजारों वर्षें ठरून राहिली आहे, ती नर्मदा नदी विंध्य पर्वताच्या दक्षिणेस पडते, व आर्यावर्त दक्षिणेस फार पोंचल्यास विंध्य पर्वतापर्यंत पोंचतें. तेव्हां महाराष्ट्रदेश आर्यावर्ताच्या बाहेर पडतो हें सहजच सिद्ध होतें.[१]

## आमच्या देशाचे इलाखे व जिल्हे

भूगोलानेंच आमच्या देशाचे तीन स्वतःसिद्ध इलाखे केले आहेत. दक्षिणोत्तर जी डोंगरांची ओळ थेट कुमारीपर्यंत धांवत जाते, तिनें

(१) आमचा देश आमचे देशी लोक, आमची देशी भाषा, विविधज्ञानविस्तार पुस्तक, २२, अंक ५, पृ. ९७-९८, मे.१८९०.

आमचा देश नीट दुभागला आहे. या डोंगरांच्या ओळीस सह्याद्रि किंवा घांट म्हणतात. जी बरीच अरुंद पट्टी सह्याद्रीनें वेगळी पाडली आहे, तीस कोंकण म्हणतात. घाटाच्या पलिकडील सपाट व सुपीक मुलुखास देश हाच शब्द लावितात. नर्मदा नदीस जवळ जवळ समांतर तापी वहात गेल्यामुळें तिनें आपली एक लहानशी पट्टी आमच्या देशाची पाडली आहे. या पट्टी मध्यें सातपुडा ही डोंगरांची ओळ सुप्रसिद्ध आहे. या पट्टीस खानदेश म्हणतात. या पट्टया व सपाट मुलुख मिळून भूगोलदृष्टया तीन इलाखे आमच्या देशाचे होतात.

खानदेशास लागूनच पूर्वेच्या बाजूस गोंडवन आहे. यांत गोंड नांवाच्या जंगली लोकांची वस्ती आहे. खानदेशास लागूनच दक्षिणेस बागलाण आहे, व गोंडवनाच्या दक्षिणेस वऱ्हाड आहे.

बागलाण व वऱ्हाड यांच्या दक्षिणेकडील मुलुखास देश इतकाच शब्द लाविला जातो; व आणखी खालीं गेलें म्हणजे दक्षिण महाराष्ट्र किंवा कुंतल हा महाराष्ट्राचा अगदीं दक्षिणेकडील इलाखा लागतो.

लाट किंवा लाड, उत्तर कोंकण व दक्षिण कोंकण असे कोंकणाचेही तीन इलाखे केले जातात. सोपार किंवा साष्टी व अष्टागर असे उत्तर कोंकणचे दोन जिल्हे, व परशुराम, कुडाळ व गोमंतक असे दक्षिण कोंकणाचे आणखी तीन जिल्हेही करितां येतील. सोपार व परशुराम हीं नावें केवळ सोईसाठीं पाडलीं आहेत, असें समजावें.

कऱ्हाड, करवीर व कोळवण हे तीन इलाखेही थोडे ध्यानांत ठेविण्यासारखे आहेत. या तिहींपैकीं पहिले दोन दक्षिणेस असून महाराष्ट्र देशाच्या प्राचीन इतिहासांत बरेंच नामांकित झाले होते. कोळवणाचा मात्र महाराष्ट्र देशाच्या राजकीय इतिहासाबरोबर संबंध मुळींच येत नाहीं.

कोंकण हा शब्द बराच जुनाट आहे. शालीवाहन शकाच्या चवथ्या शतकांत हा शब्द हयात होता, या विषयीं शंका नको. याप्रमाणें कोंकण हा शब्द या काळीं हयात होता, या विषयीं काहीं शंका नाहीं, तरी त्याच्या अर्थाच्या व्यापकपणाविषयीं पुष्कळ शंका आहे. कोंकण या शब्दाचा

गोकर्ण शब्दाबरोबर उघड संबंध दिसतो. चेर देशास कांग किंवा कोंग असेंही म्हणण्याची बरीच जुनी वहिवाट आहे. चेर देशाची एक बखर आहे, तीस तद्देशीय लोक " कांग देश — राजकाल " म्हणतात. " कांग देश " म्हणजे कांग नांवाच्या कुळीचा देश, असा मूळचा अर्थ समजावा. ज्या कुळींचें राज्य शकडों वर्षे चेर देशांत होतें, तीस गंग किंवा गांग प्राचीन लेखांत म्हटलेलें असतें.

शालिवाहन शके ५०६ तील पुलकेशीच्या सुप्रसिद्ध शिलालेखांत "गंगान्वय" असें या कुळीचें नांव आलें आहे. "तुंगगंगकुलोत्सादी" वनवासीच्या कदम कुळीच्या प्राचीन लेखांत येते. तेव्हां गंग किंवा गांग हें मूळचें कुळीचें नांव होतें, या विषयीं शंका नको. मूळचा शब्द गांग असून त्यास तम्मूळ लोकांनीं कांग असें रूप दिलें, असें दिसतें. कांग हाच मूळचा तम्मूळ शब्द असून, त्यास गांग असें रूप चेर देशांत मिळालें, असेंही म्हणतां येईल. या कांग किंवा कोंग शब्दाबरोबर कोंकण शब्दाचा संबंध नसेल काय ? जें गोंडाचें वन तें गोंडवन, तसें जें कोंगांचें वन, तें कोंगवन. या कोंगवन शब्दास हळू हळू कोंकण रूप मिळालें, असें समजणें सोपपत्तिक नाहीं असें नाहीं. तेव्हां कोकण किंवा कोंकण हा शब्द मूळचा कोंगवन किंवा गोकर्ण दिसतो. या दोन व्युत्पत्तींपैकीं कोणतीही व्युत्पत्ति स्वीकारली, तरी मूळचा कोंकणशब्द आज मितीस जितका व्यापक आहे तितका पूर्वीं नव्हता, या विषयीं शंका रहात नाहीं.

खानदेश हें नांव मूळचें कह्रानदेश असावें अशी शंका येते. कह्रान, कन्ह, कन्हव या तीन्ही देशी शब्दांस एकच एक कृष्ण असें रूप संस्कृत भार्षेत मिळतें. देवगिरीकर जाधवांमध्यें कन्हर नांवाचा जो पराक्रमी राजा झाला, त्याचें नांव कृष्ण असें ताम्रपट्टांत लिहिलेलें आढळतें. कन्नड हा शब्दही मूळचा कन्हर किंवा कन्नर नसेलना ? एव्हांही आंग्ल भाषेंत Canara ( कनर ) असाच कन्नड शब्दाचा अपभ्रंश होतो. या अनुमानांत कांहीं अर्थ असल्यास कन्नड हें नांव मूळचें कन्दर असून, तें कन्दर नदीवरून किंवा कृष्णानदीवरून जुनाट काळीं पडलेलें असावें. वऱ्हाड हें

नांव मूळचें वर्धा नदीवरून पडलें आहे. संस्कृतांत वऱ्हाड शब्द विदर्भ करितात व वर्धा नदीस विदर्भा नदी म्हणतात. इतरत्रही सिंध सारखीं नदीवरून नांवें पडलेलीं नाहींत असें नाहीं. तेव्हां महाराष्ट्राचा दक्षिणेकडील इलाखा कृष्णानदीवरून पडलेल्या कन्नड किंवा कन्हर या नांवानें नांवाजला होता; तसा उत्तरेकडील इलाखा कन्हदेश किंवा कहानदेश या नांवानें नांवाजला, अशी असलची हकीकत दिसते. खानदेशांत गवळी लोकांची वस्ती पुष्कळ असून, खिल्लारेंही पुष्कळ फिरतीं असतात. आभीर किंवा अहीर नांवाची जात खानदेशांतच चांगली प्रसिद्ध आहे. आभीर शब्द संस्कृतांत गवळयास लाविला जातो. तेव्हां खानदेश शब्द मूळचा कहानदेश असून, त्याचा मूळचा अर्थ "कहान नावाच्या वीरांचा किंवा कृष्णाचा देश" असा असावा. खानदेश हा देशवाचक शब्द किती जुना आहे, तें नीट लक्षांत येत नाहीं. ज्ञानेश्वर एका अभंगांत ज्या भाषेस बागलाणी भाषा म्हणतात ती खानदेशी बोली दिसते. संस्कृतांत चेदि नांवाचा एक देश सुप्रसिद्ध आहे. या देशांत खानदेशाचा कांहीं भाग येत असावा. शलिवाहनच्या पांचव्या शतकाच्या अखेरीस नर्मदेवर कालचुरे किंवा कडचुरे नावाच्या कुळीचें राज्य होतें. या राजकुळीची पूर्वींची राजधानी महिष्मती किंवा महिषपुर असून, पुढें त्रिपुरी राजधानी झाली. हल्लीं जबलपूरापासून कांहीं अंतरावर तेऊर नांवाचें गांव आहे, हें पूर्वींची त्रिपुरी होय. तेऊर या नांवास त्रिपुर किंवा त्रिपुरी असें ब्राह्मण शास्त्र्यांनीं संस्कृत रूप दिलें, असेंही होऊं शकेल. नर्मदातीरीं हल्लीं महेश्वर नांवाचें बरेंच प्रसिद्ध तीर्थीभूत गांव आहे. हें महेश्वर पूर्वींचे महिषपुर होय. हल्लीचें म्हैसुर हेंही पूर्वींचें महिषपुरच होय. पण कलचुऱ्यांचें महिषपुर नर्मदा तीरावरील महेश्वर समजावें. म्हैसुराबरोबर त्या महिषपुराचा संबंध नाहीं. कलचुऱ्यांचें राज्य ज्या पक्षीं नर्मदेवर होतें त्या पक्षीं खानदेशचा कांहीं भाग त्यांच्या राज्यांत निःसंशय मोडत असावा. कलचुऱ्यांस "चेदि देशाचे राजे" असें प्राचीन लेखांत म्हटलेलें असतें. चेदि देशाचे दोन राजे चांगले पौराणिक आहेत. शिशुपाल हा कृष्णाचा आतेभाऊ असून, त्याचें व

कृष्णाचें हाडवैर होतें, तें पांडवप्रतापाच्या वाचकांस नीट माहीत असतें. कार्तवीर्य किंवा सहस्रार्जुन हा मोठा न्यायी व धर्मप्रिय राजा चेदि देशाचा असून, त्याचा वध परशुरामानें केला हें ज्यांस माहीत नाहीं, असे अक्षर-पारीण न झालेल्याही ब्राह्मणामध्यें फारच थोडे सांपडतील.

वऱ्हाड हा देश ही चांगला पौराणिक आहे. यास संस्कृतांत विदर्भ म्हटलेलें असतें. वऱ्हाड हें नांव वर्धा नदीवरून पडलेलें दिसतें. वर्धा नदीस संस्कृतांत विदर्भ म्हणतात. रुक्मिणीचें माहेरघर वऱ्हाड होय. दम-यंती ही वऱ्हाडचीच कन्या होती. वऱ्हाडची राजधानी कुंडिनपुर किंवा कुंडपुर होती.

कुंतल शब्द शालिवाहनाच्या आठव्या शतकांत व त्या सुमारास निःसंशय सुप्रसिद्ध होता. कृष्णा नदी आंतून वहात गेलेल्या घांटाजवळील मुलुखास कुंतल शब्द लागत असून, घांटापासून बऱ्याच अंतरा-वरच्या मुलुखास कन्नड किंवा कन्नर शब्द लागत होता, असें दिसतें.

लाट शब्द शालिवाहनाच्या तिसऱ्या शतकांत चांगला माहीत होता, असे पाश्चात्य भूगोलकारावरून म्हणावें लागतें. शालिवाहन शकाचे आरंभीं व बरींच वर्षे पूर्वी ही पट्टी नांवाजलेली होती; कारण पश्चिमेकडेस जो आपल्या देशांतून माल जाई, तो या पट्टींतील बंदरांतून चढविला जाई.

सोपार हे शालिवाहन शकाच्या आरंभीं व कांहीं वर्षे पूर्वी एक अत्यंत नांवाजलेलें बंदर पश्चिम दिशेस माल चढविणारें होतें. सोपार हें नांव "सुपारी" किंवा "सोपारी" शब्दावरून पडलेलें दिसतें. संस्कृतांत ब्राह्मण शास्त्री सोपार शब्द क्वचित् सूर्पार लिहितात, व क्वचित् सूर्पाद्रि लिहितात, व "सुपा" सारखा हा मुलुख किंवा कोंकणपट्टी असल्यामुळें सूर्पारक नांव मिळालें, अशी विचित्र व विलक्षण व्युत्पत्ति ते आपल्या अनादि काळच्या संप्रदायाप्रमाणें करितात. साष्टी, सासष्टी, षट-षष्टि किंवा सासटी हें नांव शालिवाहनाच्या दहाव्या व बाराव्या शतकांत चांगलें

माहीत होतें. अष्टागर हें नांव बरेंच अलीकडील दिसतें. आकशी, किहीम, चऊल, थळ, नागांव, रेवदंडा वगैरे "आठ आगरें" मिळून झालेल्या मुलखास अष्टागर शब्द पहिल्यानें लाविला गेला, असें म्हणतात. सर्व आगरांमध्यें चऊल, चेवुल किंवा चेमुल हें आगर सर्वांत जुनाट आगर समजावें. जसें सोपार तसेंच चेऊल किंवा चेवल हे बंदर शालिवाहन शकाचे आरंभीं व बरींच वर्षें पूर्वीं पश्चिम दिशेकडेस माल चढवीत असल्यामुळें चांगलें जगद्विदित झालें होतें. रेवदंडा हें आगरही व्यापाराची जागा या ...यानें बरेंच पूर्वीं प्रसिद्ध असावें; शालिवाहन शकाच्या पांचव्या शत... अखेरीस मांग चाळके नांवाचा जो बदामीकर चाळक्यांमध्यें पराक्रमी राजा झाला, त्यानें रेवतीद्वीप हें रेवदंड्यास ब्राह्मण-शास्त्र्यांनीं दिलेलें संस्कृत रूप दिसतें.

चिपळुणाजवळ परशुरामाचें स्थान सुप्रसिद्ध आहे. अष्टागराच्या दक्षिणेस रत्नागिरीच्याही खालीं कांहीं कोसपर्यंत हा भाग गेलेला समजावा. हा भाग संपला म्हणजे कुडाळप्रांतास आरंभ झाला. कुडाळची वरची सीमा राजापूर समजावी. वेंगुर्लें व मालवण यांचा पूर्वींच्या कुडाळांतच समावेश झाला पाहिजे. शालिवाहनाच्या सातव्या शतकांत किंवा त्या सुमारास कुडाळ हा देश सुप्रसिद्ध होता. कुडाळच्या दक्षिणेस गोमंतक लागलें. गोमंत हें मूळचें डोंगरांच्या ओळीचें नांव असून, पुढें आसपासच्या मुलखासही मिळालेलें असावें. गोमंतक नांव किती जुनें आहे, तें नीट कळत नाहीं. शालिवाहनाच्या दहाव्या शतकांत गोवें हें गोमंतकांची राजधानी असून, गोवें मुक्कामीं कदमांची गादी स्थापन झाली होती.

कऱ्हाड व करवीर हे दोन इलाखेही पूर्वींच्या इलाख्यांप्रमाणें आज मितीस कायम आहेत. इतकेंच कीं आज जे इलाखाधिपति आहेत, ते मात्र सांगण्यासारखे प्राचीन नव्हत. कऱ्हाड हें नांव संस्कृतांत करहाटक लिहिलें जातें. शालिवाहनाच्या अकराव्या शतकांत हा इलाखा चांगला माहीत असून यांत शेलार कुळीचें राज्य होतें. शालिवाहनाच्या दहाव्या शतकांतही करहाटक हें नांव सुप्रसिद्ध होतें. करवीर शब्द किती जुनाट

आहे तें बरोबर कळत नाहीं! पण कोल्हापूर हा शब्द शालिवाहनाच्या दहाव्या शतकांत निःसंशय हयात होता. जसे करहाटकाचे तसेच करवीरचे राजे शेलार कुळींतील दिसतात. कोळवण हा महाराष्ट्र देशाचा इलाखा वरील इलाख्यांप्रमाणेंच समजावा. आज जो कोळ्यांचा वंश कोळवणांत राज्य करीत आहे, तो शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांत अविंधांच्या आश्रयानें वाढलेला होय. तेव्हां कऱ्हाडच्या व करवीरच्या इलाखाधिपतींच्या वंशापेक्षां तो निःसंशय वयोवृद्ध आहे. कोळवणाच्या संबंधानें आणखी अधिक विचार पुढें सवडीप्रमाणें करण्यांत येईल.[१]

---

१ विविधज्ञान विस्तार, पुस्तक २२, पृ. ९८-१०३, १८९०

—

## — १८ —

# प्राक्शालिवाहनी काळांतील वसाहती

### ( महार, मांग, गोंड, भिल्ल, कोळी व धनगर )

( पहिल्यानें संस्कृत भाषेंतल्या नाग, गोप, असुर, वेताळ, वानर इत्यादि वसाहतींबद्दल चर्चा करून शास्त्रीबोवा ह्या लेखांत देशी भाषेंत नांवाजलेल्या वसाहतींबद्दल चर्चा करीत आहेत. )

( १ ) महार हे अति पुरातन कालचे अस्सल देशी लोक, या संबंधानें शंका नको. महार जसे कोंकणांत आहेत, तसेच देशावर आहेत. " गांव आहे तेथें महारवाडा आहे. " महारांची बोली शुद्ध व असंकीर्ण देशी समजावी. जें आमच्या भाषेचें रूप आजमितीस त्यांनीं राखून ठेविलें आहे, तें आमच्या भाषेचें आजमितीचें अतिशय शुद्ध रूप समजावें.

आमचे महार व राजस्थानांतील मेहेर हे मूळचे एकच नसतील, ना? राजस्थानांत मेहेरवाडा नांवाचा प्रांत आहे. त्यांत मेहेरांचीच वसती आहे, असे म्हणतात. मेहेर व महार या दोहोंमधील तारतम्य निःसंशय विचारणीय होय. मेहेतर नांवाची जातही काठेवाडांत प्रसिद्ध आहे. ही जात जवळ जवळ महारांच्याच वर्गांतील आहे. महारांचा वाचक शब्द संस्कृतांत नाहीं. चांडाल व श्वपच किंवा श्वपाक हे दोन शब्द अलीकडेस संस्कृतांत या जातीस लाविण्यांत येतात. मनूनें संकीर्ण जातींचे वाचक म्हणून जे शब्द ते आपल्या विशिष्ट मुलुखांचे व त्यांतील लोकांचे वाचक होत. मागध, वैदेहक, अंबष्ठ, निषाद किंवा पारशव, आवंत्य, द्रविड वगैरे शब्द मूळचे त्या त्या मुलुखाचे वाचक होत. असें जर आहे, तर चांडाल शब्दाची तशीच स्थिति समजण्यास हरकत नाहीं. चांडाल शब्द मूळचा चांदाल किंवा चंदेल असून त्याचा चेदि देशाबरोबर संबंध नसेल ना? चेदि देश नर्मदेवर असल्यामुळें, तो ब्राह्मणांच्या आद्यस्थानास लागू होतो. रजपूतांमध्यें चंदेल नांवाची एक कुळी सुप्रसिद्ध आहे, असें म्हणतात. श्वपाक किंवा श्वपच शब्दांचा अर्थ "कुत्रेंखाऊ" होतो. आमचे महार कुत्रेंखाऊ नव्हत, याविषयीं शंका नको. कुत्रेंखाऊ लोक आसाम वगैरे बंगालच्या पूर्वेस जे प्रांत आहेत, त्यांत आढळतात. ब्राह्मणांनीं पूर्वीं कुत्रें अभक्ष्य मानिलें होतें. "विश्वामित्रानें दुष्क्राळाचे प्रसंगीं एखाद्या श्वपचाप्रमाणें कुत्र्याचें मांस खाल्लें" ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. गौड व आसाम हे प्रांत अगदीं लागून आहेत. तेव्हां गौडांमध्ये पूर्वीं कुत्रेंखाऊ लोक होते, असें मानण्यास हरकत नाहीं. असें दिसतें कीं ब्राह्मणी धर्माचा जेव्हां मूळच्या अनार्य गौडमंडळांत अनार्य मगध देशांतून प्रसार झाला, तेव्हां मूळचा कुत्रेंखाऊपणा सहजच ब्राह्मणी धर्माचा परिग्रह केलेल्यांमध्यें निंद्य झाला, व कुत्रेंखाऊ लोक केवळ अस्पृश्य होऊन त्यांस शब्द लागू लागला. तद्गुणोपलक्षित श्वपच किंवा श्वपाक हे तेव्हां चांडाल व श्वपच किंवा श्वपाक शब्द मूळचे आमच्या मंडळांतील महार जातीचे वाचक नव्हत. हे शब्द पूर्वीं नर्मदेवरील व गौडमंडळांतील किंवा आसाम प्रांतांतील तद्देशीय

लोकांचे वाचक असून, अति निकृष्ट जातींस तिकडेस लाविण्यांत येत होते, ते तसेच पुढें ब्राह्मणी धर्माचा प्रसार आमच्या देशांत झाला, तेव्हां आमच्या मंडळांतील अति निकृष्ट जातींस लाविण्यांत येऊं लागले, असें अनुमान निघतें.

( २ ) मांग ही जात कोंकणांत आढळत नाहीं. हेही महारांप्रमाणें शुद्ध व असंकीर्ण देशी लोक होत. मांग हा शब्द संस्कृतांत व पुराणांत प्रसिद्ध नाहीं, असें म्हणणें बरोबर नाहीं. मातंग नांवाचा मुनि संस्कृतांत येतो. रामानें दंडकारण्यांत मतंगाचे आश्रमांत कांहीं दिवस वास केला होता. मातंग शब्द संस्कृतांत हत्तीस लाविला जातो व मांगांसही लाविला जातो. तेव्हां असें दिसतें कीं नाग वगैरे नांवाप्रमाणें मतंग हे मूळचे विशिष्ट लोकांचेंही नांव होतें. मतंगांचा जो मुलुख होता तेथें हत्ती सांपडत, म्हणून हत्तीसही मातंग शब्द लावूं लागले, असें म्हणणें रास्त दिसतें. तेव्हां मतंगांचें आद्य ठिकाण मलबारांत किंवा म्हैसूरमध्यें जेथें हत्ती सांपडतात अशा मुलुखांत हुडकलें पाहिजे. याप्रमाणें मतंग किंवा मातंग हा शब्द जरी निःसंशय पौराणिक आहे, तरी नागांप्रमाणें किंवा गोपांप्रमाणे यांचें विशेष वर्णन कोठेंही आढळत नाहीं, म्हणून तो नागादिक शब्दामध्यें दाखल न करितां या स्थळीं दाखल केला आहे. मातंगीचें वर्णन बाण कवीनें प्रसंगवशें केलें आहे, त्यावरून हे लोक वर्णानें काळे ठरतात. मातंग शब्दापासूनच मांग शब्द निघालेला समजावा.

( ३ ) गोंड व भिल्ल हे लोकही पुष्कळ पुरातन होत. गोंड हे पूर्वेकडील असून भिल्ल पश्चिमेकडील होत. गोंड लोकांस खोंड असेंही म्हणतात. गोंडवन वऱ्हाडास लागून आहे. वऱ्हाडची प्राचीन राजधानी कुंडपुर किंवा कुंडिनपुर होती. कुंड किंवा कुंडिन या शब्दाचा गोंड किंवा खोंड शब्दाबरोबर संबंध दिसतो. गोंड शब्द शालिवाहनाच्या चवथ्या किंवा पांचव्या शतकांतील लेखांत येतो. भिल्ल हे पुष्कळ पसरलेले आहेत. भिल्ल जसे खानदेशांत आहेत, तसेंच विंध्याद्रीवर व विंध्याद्रीच्या उत्तरेस राजस्थानांतही आहेत. पूर्वी एके प्रसंगीं शिव रुसला व अरण्यांत चालता

झाला, तेव्हां पार्वतीनें भिल्लिणीचें किंवा शबरीचें रूप धारण करून त्यास पुनः वश केलें, ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे. जरी भिल्ल व शबर हे अभिन्न झालेले या गोष्टींत आपणांस आढळतात, तरी ते भिन्न होत. गोंडवनाच्या पलीकडे उडिसा प्रांताच्या दक्षिणेस शबरखंड नांवाची भूमि प्रसिद्ध आहे. शबर लोकांस हल्लीं सौर किंवा सवर म्हणतात. सवरांमध्यें कित्येक शेतकरी आहेत व कित्येक जंगलांत फिरते राहून उपजीविका करणारेही आहेत. सवर हे टोणगेखाऊ लोक होत. चोल, चौल, चोड, चौड, सोर सौर असा सहा रीतीनीं एक चोल शब्द लिहिला जातो. तेव्हां चोल नांवानें पुढें नांवाजलेले लोक सवरांतूनच निघालेले नसतील ना ? चोल हे शबरांतून निघालेले असोत कीं नसोत, पण भिल्ल व शबर हे दोन्ही लोक निरनिराळे आज आहेत व पूर्वीही होते, याविषयी शंका नको. गर्द-भिल्ल नांवाचा उज्जयिनीचा राजा शालिवाहनाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत होऊन गेला. गर्द-भिल्ल हा राजा पुराणप्रसिद्ध आहे. जैनांच्या गोष्टींमध्येंही गर्दभिल्ल येतो. या गर्द-भिल्लाचें पारिपत्य करिण्यासाठीं कालक नांवाचा एक यति होता, तो सिंधु नदीवर शाहि वंशांतील राजा राज्य करित होता, त्याच्याजवळ गेला; ही आख्यायिका जैनांच्या ग्रंथांत पुष्कळ प्रसिद्ध आहे. गर्दभिल्ल हा नांवावरूनच जातीचा भिल्ल ठरतो. या भिल्लानें उज्जयिनीच्या विक्रमवंशाची समाप्ति केलेली दिसते. भिल्ल हे महाराष्ट्र मंडळाच्या वरच्या सीमेवरील लोक पडल्यामुळें यांच्या भाषेमध्यें बरेच तारतम्य आढळतें. दक्षिणेकडील भिल्लांची भाषा बरीच शुद्ध देशी असते. पण जसजसें वर जावें, तसतशी भाषा अधिकाधिक अशुद्ध होत जाऊन, तींत गुजराथी वगैरे शब्द बरेच आढळतात.

( ४ ) वारळी व कोळी हे दोन्ही लोक आमच्या देशांतील वरच्या भागांत चांगले प्रसिद्ध आहेत. वारळी हे मूळचे भिल्लांमधील होत. वारळी नांवाचा पोटभेद आज मितीसही भिल्लांमध्यें विद्यमान आहे. जशी भिल्लांची तशीच वारळ्यांची भाषा आमची देशी खरी, पण बरीच अशुद्ध होय. भिल्लांप्रमाणें कोळी हे नर्मदेच्या उत्तरेस देखील नांवाजलेले आहेत. कोसल

शब्द संस्कृतांत येतो, पण कोळी शब्द संस्कृतांत येत नाहीं. खानदेश हें मूळचें भिल्लवन समजण्यास हरकत नाहीं. भिल्लवन व गोंडवन यांच्या दक्षिणेस पूर्वीचें कोळवण घालावें. महारांप्रमाणें व मांगांप्रमाणें भिल्ल, गोंड व कोळी हे आद्य देशी लोक होत. कोळयांमध्यें पुष्कळ पोटभेद झाले आहेत. उत्तर कोंकणांत कोळी हे नांवाजलेले दर्यावर्दी होत.

( ५ ) ठाकुर हे मूळचे डोंगरी लोक ठरतात. पूर्वेकडून येऊन कोळयांनीं जसा वारळ्यांचा तसाचा ठाकरांचा मुलुख बळकाविला. ठाकुरांची वस्ती जशी उत्तर कोंकणांत आहे, तशीच नाशिक प्रांतीं आहे. ठाकुर किंवा टक्कर नांवाची जात राजस्थानांत प्रसिद्ध आहे. शालिवाहनाच्या सहाव्या शतकाच्या पहिल्या पादांतील ताम्रपट्टांत जसें गोपराष्ट्र तसें ठाकुर हें नांवही आलें आहे. ज्या ठाकराच्या विनंतीवरून पुलकेशीच्या पुतण्यानें एक शिवलिंगाच्या पूजेसाठीं एक गांव तोडून दिला, तो ठाकूर मूळचा त्र्यंबकेश्वराचा रहिवासी ठरतो. जो गांव दिला तो गोपराष्ट्रांत मोडत होता असें जर आहे, तर गोपराष्ट्राचें मूळचें ठिकाण कोठें होतें, त्याचें बरेच बिनचूक असें अनुमान करितां येतें, व ठाकुर हे मूळचे गोपांमधील ठरतात. गोमांस किंवा मुर्दाड खाणारे ठाकुर नाहींत, हीही गोष्ट या मुद्यांच्या संबंधानें लक्षांत ठेविण्यासारखी आहे.

( ६ ) धनगर हे अजूनही जवळ जवळ फिरतेच लोक होत. धनगरांमध्यें गवळी धनगर असाही एक पोटभेद आहे. गवळी धनगर गाई म्हशींची खिल्लारें बाळगतात. मेंढे धनगर असतात ते मेंढरें किंवा बकरीं बाळगतात. अशी जरी हल्लींची स्थिति आहे, तरी धनगर शब्द मूळचा मेंढ्या किंवा बकऱ्या राखणारांचाच वाचक दिसतो. धनगर शब्दाची व्युत्पत्ति जड जाते.

जेथें जेथें खंडोबाचें महास्थान असतें तेथें तेथें पूजा धनगराची असते. तेव्हां खंडोबा हा मूळचा धनगरांचा देव, याविषयीं शंका नको. "खांडा" हें मूळचें एका जातीच्या हत्याराचें नांव होय. हा शब्द संस्कृत भाषेंत "खंडपरशु" असें एक शिवाचें नांव आहे. त्या नांवाच्या पूर्वावयवांत

नजरेस पडतो. खंडोबा हें शिवाचेंच स्वरूप समजण्याचा संप्रदाय आहे. मार्तंड व मल्हारि अशीं आणखी दोन खंडोबाची नांवें आहेत.[1]

---

१ आमचा देश, आमचे देशी लोक व आमची देशी भाषा. भाग दुसरा — आमचे देशी लोक; विविधज्ञान विस्तार, पुस्तक २३, अंक ५, पृ. १०९-११२; मे, १८९१.

महार ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल बॉंबे गार्डियनमध्यें एक इंग्रजी लेख आला होता त्यावरून ' मुंबई इलाख्यांतले महारलोक ' म्हणून सुबोधपत्रिकेंत एक सुंदर लेख आला आहे. त्यांतला मुख्य उल्लेख असा: 'महार हा शब्द केव्हां व कोणत्या अर्थी प्रचारांत आला हें ठरविण्यास ऐतिहासिक पुरावा नाहीं. त्याच्या व्युत्पत्तीबद्दल पुष्कळांनीं तर्क लढवले आहेत. कोणी महाराष्ट्र या शब्दाशी त्याचा संबंध जोडतात.' ( ७-५-१९०५ ) ह्या बाबतींत डॉ. केतकरांच्या महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास भाग १ (पृ. २३-३१) ह्यांत फार मार्मिक विवेचन आहे.

शास्त्रीबोवांच्या नंतर महाराष्ट्रांतील वसाहतींबद्दल व्युत्पत्तीच्या आधारें कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी ' राधामाधव विलासचंपू ' च्या व 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें', भाग ६ च्या प्रस्तावनेंत बरीच चर्चा केली आहे. त्याशिवाय ' महाराष्ट्राच्या वसाहत कालीन इतिहासाचा शोध ' ह्या लेखमालेंत त्यांनीं खानदेशी गांवांच्या नांवावरून कित्येक अनुमानें बसवलीं आहेत.

' महारांचें राष्ट्र म्हणजेच महाराष्ट्र ' असें महाराष्ट्र या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दलचें विधान शास्त्रीबोवांचें असल्याबद्दल त्यांस ओळखणाऱ्या कित्येक माहीतगार वृद्धांनीं मला सांगितलें. या लेखावरून व नाग लोक म्हणजेच महार या शास्त्रीबोवांच्या विधानावरून ( जें विधान पुढें राजवाडे व डॉ. केतकर यांनीं उचलून धरल्यामुळें सिद्धांतरूप झालें आहे ) जरी महारांच्या महाराष्ट्रांतील महत्वाला पुष्टि मिळाली तरी पहिलें सूत्ररूप वाक्य शास्त्रीबोवांचें नाहीं. तें शास्त्रीबोवांच्या लेखनांत कुठेंच उल्लेखिलेलें नाहीं. त्याचें जनकत्व लोकहितवादींकडे जातें. ' निबंधसंग्रहांत ' ( पृ. ७२५ ) ' महाराष्ट्र भाषा ' या लेखांत असें वाक्य आहे ' मराठी भाषेची व्यवस्था मुळापासून पाहिली तर असें दिसतें कीं महार लोकांचें मूळचें हें राष्ट्र होतें व त्यासाठीं त्यास महाराष्ट्र असें नांव आहे. व हल्लीचे उच्चारांत मधील र चा लोप होत असतो. ' ( इंदुप्रकाश, ता. ४, १२, १८६४ ). डॉ. केतकरांच्या ग्रंथांत हा महत्वाचा उल्लेख सुटलेला आहे.

शब्द संस्कृतांत येतो, पण कोळी शब्द संस्कृतांत येत नाहीं. खानदेश हें मूळचें भिल्लवन समजण्यास हरकत नाहीं. भिल्लवन व गोंडवन यांच्या दक्षिणेस पूर्वीचे कोळवण घालावें. महारांप्रमाणें व मांगांप्रमाणें भिल्ल, गोंड व कोळी हे आद्य देशी लोक होत. कोळयांमध्यें पुष्कळ पोटभेद झाले आहेत. उत्तर कोंकणांत कोळी हे नांवाजलेले दर्यावर्दी होत.

( ५ ) ठाकुर हे मूळचे डोंगरी लोक ठरतात. पूर्वेकडून येऊन कोळयांनीं जसा वारळ्यांचा तसाचा ठाकरांचा मुलुख बळकाविला. ठाकुरांची वस्ती जशी उत्तर कोंकणांत आहे, तशीच नाशिक प्रांतीं आहे. ठाकुर किंवा ठक्कर नांवाची जात राजस्थानांत प्रसिद्ध आहे. शालिवाहनाच्या सहाव्या शतकाच्या पहिल्या पादांतील ताम्रपट्टांत जसें गोपराष्ट्र तसें ठाकुर हें नांवही आलें आहे. ज्या ठाकराच्या विनंतीवरून पुलकेशीच्या पुतण्यानें एक शिवलिंगाच्या पूजेसाठीं एक गांव तोडून दिला, तो ठाकूर मूळचा त्र्यंबकेश्वराचा रहिवासी ठरतो. जो गांव दिला तो गोपराष्ट्रांत मोडत होता. असें जर आहे, तर गोपराष्ट्राचें मूळचें ठिकाण कोठें होतें, त्याचें बरेच बिनचूक असें अनुमान करितां येतें, व ठाकुर हे मूळचे गोपांमधील ठरतात. गोमांस किंवा मुर्दाड खाणारे ठाकुर नाहींत, हीही गोष्ट या मुद्यांच्या संबंधानें लक्षांत ठेविण्यासारखी आहे.

( ६ ) धनगर हे अजूनही जवळ जवळ फिरतेच लोक होत. धनगरांमध्यें गवळी धनगर असाही एक पोटभेद आहे. गवळी धनगर गाई म्हशींची खिल्लारें बाळगतात. मेंढे धनगर असतात ते मेंढरें किंवा बकरीं बाळगतात. अशी जरी हल्लींची स्थिति आहे, तरी धनगर शब्द मूळचा मेंढया किंवा बकऱ्या राखणारांचाच वाचक दिसतो. धनगर शब्दाची व्युत्पत्ति जड जाते.

जेथें जेथें खंडोबाचें महास्थान असतें तेथें तेथें पूजा धनगराची असते. तेव्हां खंडोबा हा मूळचा धनगरांचा देव, याविषयीं शंका नको. "खांडा" हें मूळचें एका जातीच्या हत्याराचें नांव होय. हा शब्द संस्कृत भाषेंत "खंडपरशु" असें एक शिवाचें नांव आहे. त्या नांवाच्या पूर्वावयवांत

नजरेस पडतो. खंडोबा हें शिवाचेंच स्वरूप समजण्याचा संप्रदाय आहे. मार्तंड व मल्हारि अशीं आणखी दोन खंडोबाची नांवें आहेत.[1]

---

१ आमचा देश, आमचे देशी लोक व आमची देशी भाषा. भाग दुसरा — आमचे देशी लोक; विविधज्ञान विस्तार, पुस्तक २३, अंक ५, पृ. १०९–११२; मे, १८९१.

महार ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल बॉंबे गार्डियनमध्यें एक इंग्रजी लेख आला होता त्यावरून ' मुंबई इलाख्यांतले महारलोक ' म्हणून सुबोधपत्रिकेंत एक सुंदर लेख आला आहे. त्यांतला मुख्य उल्लेख असाः 'महार हा शब्द केव्हां व कोणत्या अर्थीं प्रचारांत आला हें ठरविण्यास ऐतिहासिक पुरावा नाहीं. त्याच्या व्युत्पत्तीबद्दल पुष्कळांनीं तर्क लढवले आहेत. कोणी महाराष्ट्र या शब्दाशी त्याचा संबंध जोडतात.' ( ७–५–१९०५ ) ह्या बाबतींत डॉ. केतकरांच्या महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास भाग १ (पृ. २३–३१) ह्यांत फार मार्मिक विवेचन आहे.

शास्त्रीबोवांच्या नंतर महाराष्ट्रांतील वसाहतींबद्दल व्युत्पत्तीच्या आधारें कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी ' राधामाधव विलासचंपू ' च्या व 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें', भाग ६ च्या प्रस्तावनेंत बरीच चर्चा केली आहे. त्याशिवाय ' महाराष्ट्राच्या वसाहत कालीन इतिहासाचा शोध ' ह्या लेखमालेंत त्यानीं खानदेशी गांवांच्या नांवावरून कित्येक अनुमानें बसवलीं आहेत.

' महारांचे राष्ट्र म्हणजेच महाराष्ट्र ' असें महाराष्ट्र या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दलचें विधान शास्त्रीबोवांचें असल्याबद्दल त्यांस ओळखणाऱ्या कित्येक माहीतगार वृद्धांनीं मला सांगितलें. या लेखावरून व नाग लोक म्हणजेच महार या शास्त्रीबोवांच्या विधानावरून ( जें विधान पुढें राजवाडे व डॉ. केतकर यांनीं उचलून धरल्यामुळें सिद्धांतरूप झालें आहे ) जरी महारांच्या महाराष्ट्रांतील महत्वाला पुष्टि मिळाली तरी पहिलें सूत्ररूप वाक्य शास्त्रीबोवांचें नाहीं. तें शास्त्रीबोवांच्या लेखनांत कुठेंच उल्लेखिलेलें नाहीं. त्याचें जनकत्व लोकहितवादींकडे जातें. ' निबंधसंग्रहांत ' ( पृ. ७२५ ) ' महाराष्ट्र भाषा ' या लेखांत असें वाक्य आहे ' मराठी भाषेची व्यवस्था मुळापासून पाहिली तर असें दिसतें कीं महार लोकांचें मूळचें हें राष्ट्र होतें व त्यासाठीं त्यास महाराष्ट्र असें नांव आहे. व हल्लीचे उच्चारांत मधील र चा लोप होत असतो. ' ( इंदुप्रकाश, ता. ४, १२, १८६४ ). डॉ. केतकरांच्या ग्रंथांत हा महत्वाचा उल्लेख सुटलेला आहे.

---

# ज्ञानेश्वरी महासागरांतील बुड्या

ज्ञानेश्वरी एक महासागर आहे. हें एक भगवद्गीतेवर विस्तृत ओंवीमय भाष्य असून, ह्याचें मूळचें नांव भावार्थ दीपिका होय. ...... ज्याकाळीं ज्ञानेश्वर झाले, त्याकाळीं आमच्या मंडळास अविंधी वारा लागलेला नव्हता. त्यामुळें राजकीय, सामाजिक वगैरे जे खेळ आमच्या मंडळांत त्याकाळीं खेळण्यांत आले, ते अव्वल देशी होते. हा आमच्या अर्वाचीन देशी भाषेचा पहिलाच उत्कर्षकाळ होय. या काळांतील माहितीकडेस थोडेंसें लक्ष पोंचवूं......

### २५ मृगजळ

हें रोहिणी लागल्या म्हणजे मृगाच्या पूर्वी हरिणांस भ्रमवीसें दिसतें.

फुटोनि पडे तंव । मृग वाढती हांव ।
परि न म्हणे ते माव । रोहिणीची । ओं. ७०८; अ. १३

हा मृगजळाचा रोहिणीशीं संबंध ज्ञानेश्वरींत पुनः पुनः श्रवण होतो.

२६ नाग, गणेश, दुर्गा यांच्या तिथि व भैरवांचा वार.

तेतुलाचि नागांसी पंचमीच्या दिवशीं
चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होय
चंडदसी म्हणे माये । तुझाचिवो दुर्गे ।
आदित्यवारीं वाढीं । वहिर वां पापीं । ओं. ८१८–२० अ. १३

### २७ लिंगास डाळीची लाखोली.

हा संप्रदाय ज्ञानेश्वरांचे काळीं होता.

बुद्धीची डाळ सात्विका । भरूनिया त्र्यंवका । लाखोली वाहे—
ओं. ३८८. अ. १३

## २८ केळवण

ही चालही जुनाट दिसते.

ना तरी केळवली नोवरी— ओं. ५५६ अ. १३

केळवली = केळवण केलेली.

## २९ पुरलेलें द्रव्य दाखविणारें अंजन

हें अंजन हल्लीं मुसलमानांजवळ असतें. तें लावलें, म्हणजे दृष्टीस कांहीं विलक्षण दिसतें. पण पायाळ असेल, तरच दृष्टी वर चढते, एऱ्हवीं चढत नाहीं.

जें पाताळींचें ही निधान। दावील कीर अंजन । परी होआवे
लोचना पायाळाचे ॥ ओं. ३४. अ. १५

## ३० ज्वालामुखी

'अग्नीचा डोंगर' असा शब्द ज्ञानेश्वरांनीं वापरला आहे.

जैसा अग्नीचा डोंगर। नेघे कोणी बीज अंकूर। तैसा मनीं जयाचा विकार। उदयजेना — ओं. ३०१, अ. १५

## ३१ काश्मीरी दगड व गंडकी शिळा

हिमवंतीचीं सरोवरें। चंद्रोदयीं होती काश्मीरें। मग सूर्यागमीं माघारें। द्रवत्व ये -- ओं. १६१५, अ. १५

" हिमालयावरील सरोवरें रात्रीं थिजतात व नंतर त्यांच्यावर चंद्राचें किरण पडले म्हणजे काश्मीरी दगडाचींच असा भास होतो. हा पहिल्या ओंवीचा भावार्थ.

"काश्मीराचा रवा"—काश्मीरी दगडाची बुकी. "कुंकुम"—केशर

रत्नपारखियाच्या गांवी। जाईल गंडकी तरी सोडावी। काश्मीरीं न करावी मिडगड तेथें–ओं. ३२०, अ. १३ मिडगड–स्तुति.

३२ सूर्यफूल व द्राक्षांची वेल

आदित्याचीं झाडें । सदा संमुख सूर्याकडे -- ओं. ८३५ अ. १८ कां श्लोकाक्षर द्राक्षलता । मांडव झाली आहे गीता । संसार पथश्रांता विसवावया -- ओं. १६७०, अ. १८ [1]

१ ज्ञानेश्वरी महासागरांतील बुब्या, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २३ पृ. ९५, १८९१, पुस्तक २४, अंक ३, पृ. ७२, १८९२. शास्त्रीबोवांना ज्ञानेश्वरीबद्दल जें प्रेम वाटे तें फार विलक्षण. ज्ञानेश्वरीवर लिहिलेला हा भाग पूर्ण झाला असता तर मराठी भाषेचें समाजशास्त्राला आधारभूत असें तें एक अपूर्व लेणें झालें असतें. शास्त्रीबोवांचा मोरोपंतांचा व्यासंग सुद्धां दांडगा होता. विस्तारांतले त्यांचे मोरोपंतावरचें लिखाण फार विवेचक आहे. मोरोपंतासारखा कवि झाला नाहीं व पुढें होईल कीं नाहीं कोण जाणे असें तें म्हणत. " मोरोपंती आखाडा " काढून त्यांत ते मोरोपंत व इतर कवींबद्दल देखील चर्चा करीत. पण ज्ञानेश्वरी ती ज्ञानेश्वरी. तिनें शास्त्रीबोवांच्या आयुष्यांत जीवनरसच घातला होता. ज्ञानदेवांस ते ज्ञानर्षि म्हणत.

---

## -- २० --

## " कोंकण गुजराथेंत मोडलें जात असे (?) "

( 'कोंकण गुजराथेंत मोडलें जात असे ' हें विधान शास्त्रीबोवांच्या शिवछत्रपतीच्या संबंधानें झालेल्या हेमंतव्याख्यानावर न्यायमूर्ति काशिनाथपंत तेलंग यांनीं १४-८-१८९२ रोजीं हिंदुयुनियन क्लबमध्यें इंग्रजींत जें भाषण केलें, त्या भाषणांतलें आहे. त्याला शास्त्रीबोवांनीं पुढील प्रमाणें उत्तर दिलें आहे. )

कोंकण गुजराथेंत मोडलें जात होतें, हा या मुद्याचा भाव व यास आधार, अलबीरुनि व मार्कोपोलो, हे अनुक्रमें आरबी व खिस्ती मुशाफर. स्वदेशीयांवर विश्वास न ठेवितां परदेशीयांवरच स्वदेशीही बाबींच्या संबंधानें विश्वास ठेवणें कोणास वाजवी दिसेल, तर त्याच्या आड येण्याचें अवसान भगवंताच्या अंगीं नाहीं व तसें करण्याचें प्रयोजनही नाहीं; कारण "मूर्ती तितक्या प्रकृती." जेथें स्वदेशी पुरावा नाहीं, असल्या स्थळीं किंवा विसंवाद असल्यास यथाशक्ति खरें काढणें आहे असल्या स्थळीं, परदेशी पुरावा आणणें आणि कांहीं तरीं कसें तरी निर्गमन करणें हें "वन्हिः शीतो द्रव्यत्वात्[1]" या नैयायिक वाक्याच्या तोडीचें दिसतें. आमच्या मंडळांत वरून वरिष्ठ ब्राह्मणापासून तों खालीं थेट कनिष्ठ महारापर्यंत जा आणि घरांतील भाषा कोणती आहे तें पहा. जर घरांतील भाषा मराठी नव्हे, तर जसा अति वरिष्ठ ब्राह्मण तसाच अतिनिकृष्टही ब्राह्मणेतर मराठा ठरणें नाहीं. जशी ब्राह्मणांची तशीच अति निकृष्ट ब्राह्मणेतरांचीही घरांतील भाषा ज्या प्रांतीं मराठी आहे, तो प्रांत मराठ्यांचा होय आणि म्हणून तसल्या प्रांताचा महाराष्ट्रांतच समावेश झाला पाहिजे. ज्या प्रांतीं वस्ती उघड मराठी बोलणाऱ्या ब्राह्मणादि महारान्त लोकांची आहे, तो प्रांत उघड महाराष्ट्रांतील होय. या सूर्यासारख्या झळकणाऱ्या महानियमास अनुसरून वर वसईच्या खाडीपासून तों खालीं गोमंतकापर्यंत कोंकण महाराष्ट्रामध्यें घातलें पाहिजे.[2]

---

१ विस्तव थंड आहे, कां तर त्यांत असलेलीं द्रव्यें मूळचीं थंड म्हणून.

२ शिवछत्रपतीच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे, मुद्दा ६. १८९२

---

## -- २१ --

# फार्सी भाषेच्या अवगाहनानें सहज सुचणारे कित्येक मुद्दे

आज मितीस "फार्सी" भाषा विद्यापिठी भाषा बनली आहे. पण आमची देशी भाषा विद्यापिठी भाषा बनली नाहीं. असें कां? "फार्सी" भाषेंत गुणवत्ता विशेष आहे किंवा आमच्या देशी भाषेंत "फार्सी"शीं तुलना करितां कांहीं उणेपणा दिसतो कीं काय? याची थोडक्यांतच मीमांसा झाली पाहिजे.

आजची "फार्सी" ही आजच्या "पारशांची" जन्मभाषा नव्हे. आजपर्यंत "पार्शी" आपली जन्मभाषा विसरून "गुजराथीं" तच आपले व्यवहार चालवीत आले. जी "फार्सी" आज "पार्स" इलाख्यांत बोलत आहेत, ती "फार्सी" आजच्या "पार्श्यांच्या" पूर्वजांचीं गलबतें "सुरतच्या" किनाऱ्यावर सुखरूप लागल्यानंतर "अरबी" अंमलांत "अरबांचा" व त्यांच्या भाषेचा "पार्स" लोकामध्यें व "पल्हवी" मध्यें पुष्कळ संकर होऊन गेल्यानंतर, शेंकडों वर्षांनीं अस्तित्वांत आलेली होय. या "फार्सी" चा आजच्या "पार्श्यां" च्या पूर्वजांशी बिलकूल संबंध नव्हता. तेव्हां आमच्या देशी भाषेचा जन्मकाळ व "फार्सी" चा जन्मकाळ हे जवळ जवळ एकच होत. कदाचित् "फार्सी" चा जन्मकाळ शेंपन्नास वर्षें आमच्या आजच्या देशी भाषेच्या पूर्वीं घालावा लागेल. "फार्सी" भाषेची ग्रंथसंपत्ति ही व विषयसंपत्ति ही तितपतच आहे. काव्य व इतिहास या विषयांखेरीज दुसरा विषय "फार्सी" च्या ग्रंथसंपत्तींत नाहीं. आमच्या देशी भाषेंत ही या मुद्याच्या संबंधानें "फार्सी" पेक्षां उणीव लक्षांत येत नाहीं. एका "संस्कृताच्या कैवाऱ्यानें" पूर्वीं "नेटिव ओपिनियन" मध्यें एकदां "हालाम" सारखें किंवा

"बकल" सारखे इतिहास आमच्या देशी भाषेंत नाहींत, असा आक्षेप आणला होता. पण हा आक्षेप आमच्या बिचाऱ्या देशी भाषेसच नव्हे तर जसा "फार्सी" तसा "अरबी" सही लागू पडतो; पण अलीकडच्या संस्कृताच्या कित्येक कैवाऱ्यांवर प्राय: दुरभिमानाचें पटल इतकें दाट आलेलें असतें कीं संस्कृत नांव पावलेली जागती भाषा नव्हती किंवा कोणत्याही मुलुखाची नव्हती व तींत ऐतिहासिक ग्रंथ बिलकूल नसून तिच्या विद्यापीठीय फाजील पारिशीलनानें धर्मवासना मात्र शिथिल होऊन जाते, असें म्हटलें म्हणजे जबाब तर नीट व उजू न देतां आल्यामुळें त्यांच्या पायांची आग मस्तकीं जाते व देशी भाषेंच्या कैवाऱ्यांवर हवे तसे क्षुद्र, असंबद्ध व असंभाव्य ही आरोप आणण्यांत येतात. आज "आंग्ल" भाषेशीं तुलना आमच्या देशी भाषेची केली कोणी ? ऐतिहासिक ग्रंथांच्या संबंधानें जी तुलना करावयाची, ती "फार्सी" व "आरबी" या दोन भाषांशींच कर्तव्य आहे, कारण या दोन्ही भाषा विद्यापीठीय असून आमची देशी भाषा विद्यापीठीय नाहीं. पण आंतून एक व बाहेरून एक अशी अत्यंत शोच्य स्थिति जशी कित्येकांची साग्र व समग्र पाश्चात्य शिक्षणानें तशी कित्येकांची शिक्षणावलेपानेंही प्राय: आमच्यांतील "ब्राह्मण" व "शास्त्री" या शब्दावर विशेष जोर देणारांची झालेली दिसते. तेव्हां ऐतिहासिक ग्रंथसंपत्ति जशी "फार्सी" ची किंवा "आरबी" ची आहे, तशीच आमच्या देशी भाषेची आहे. "फार्सी" अतिशय साधी व सोपी असून, आमच्या देशी भाषेचा रूढिप्रवाह किती दुरभ्यास्य व दुरवगाह्य आहे, तें एकाद्या परक्यास विचारलें असतां नीट कळून येईल. "फार्सी" चें व्याकरण मुळींच नाहीं, असें म्हटल्यास चालेल. आमची देशी भाषा लिंगाच्या, काळाच्या, अर्थाच्या वगैरे संबंधानें किती तरी "फार्सी" च्या वरची जागा सहज मिळवणारी आहे. पार्शांप्रमाणें आम्ही परागंदा झालेले नव्हे. आज जी देशी भाषा आम्ही बोलत आहों तीच आमच्या पराक्रमी व उदाहरणीय पूर्वजांची होती. त्यांनीं ती भाषा बोलत असतां हव्या त्या सुधारणा मणगटाच्या जोरावर सहज केल्या व आपला यशोदुंदुभि भरत-

खंडभर सर्वत्र दुमदुमविला. असें असतां, "फार्सी" भाषा पूर्वीच विद्यापीठीय झालेली असून आमची देशी भाषा अजूनही तळमळत पडली आहे. असें कां? हा आमच्या देशी लोकांनीं विशेष विचारणीय असा एक प्रश्न सहज उद्भवूं पाहतो. या प्रश्नाचा उलगडा होऊं शकतो कीं नाहीं तें आतां पाहूं या.

देशी भाषांच्या शत्रूंच्या दोन टोळ्या कराव्या लागतात. एक टोळी अन्यदेशी असून, दुसरी स्वदेशी होय. अन्यदेशी शत्रूंच्या टोळींमध्यें कांहीं स्वार्थाचा गंध निःसंशय मारतो. देशी भाषा पूर्वी विद्यापीठीय व आज नवीनच ती विद्यापीठीय करणें आहे, असें नाहीं. विद्यापीठीय स्नातकांचे मूर्धाभिषिक्त रावबहादुर रानडे व आमच्या देशी भाषेचे नांवाजलेले कैवारी कलाशेष चंद्राप्रमाणें प्रकाशणारे रावसाहेब मोडक हे विद्यापीठाच्या पार गेले, ते देशी भाषांवर विद्यापीठानें बहिष्कार टाकण्याचे पूर्वी गेले, हें शब्दशः खरें आहे. पण तो बहिष्कार माहीत नसणारा विद्यापीठाचा काळ " जुना " म्हणजे आजच्या कित्येक मंडळीच्या समजुतीनें दुर्धारकांचा किंवा कुधारकांचा ठरतो व आज जो बहिष्कारप्रधान काळ विद्यापीठाचा चालला आहे, तो काळ हे सुधारक म्हणवूं पाहणारे " आपला " ठरवितात ! ! ! सारांश पूर्वी जरी देशी भाषा विद्यापीठीय होती, तरी तिच्यावर पुढें बहिष्कार टाकून सुधारणा करण्यांत आली ! ! ! आज जर देशी भाषा पुनः वरच्या शिक्षणक्रमांत घातली तर विद्यामंदिरांत दोन किंवा तीन गुरुंची योजना अधिक करावी लागते व खर्चाचा बोजा वाढूं पहातो. हा खर्चाचा बोजा इष्ट नसल्यामुळें कित्येक अन्यदेशीयांची प्रवृत्ति देशी भाषांच्या उलट झालेली दिसते. " परिषद्य मंडळीपैकीं शेंकडा पांच असल्या प्रश्नाकडेस लक्ष देत असल्यास देत असतील " अशा औदासिन्यानें भरलेल्या अभिप्रायांचा उद्गार " तडजोडीचे मुंबईकर नामांकित देशी नावाडी व देशी भाषांचेही कैवारी आमचे नामदार न्यायमूर्ति यांनीं विद्यापरिषदेंत या मुद्यावरील वादविवादाच्या प्रसंगीं काढिला होता, असें वाटतें. जरी देशी लोकांस या प्रश्नाचें मोठें महत्त्व वाटतें, तरी अन्यदेशीयांस वाटत नाहीं. आमचे देशी प्रश्न निघाले म्हणजे राष्ट्रीय कायदे करून

आमचें राष्ट्रीय हित करूं पहाणारी आंग्लमंडळांतील मंत्रिमंडळी प्रायः वांक सोडून चालती होते, ही गोष्ट जगद्विदित आहे. तेव्हां इतरांच्या संबंधानें अन्यदेशीयांस आजच्या काळीं फारशी कळकळ नसते, हें उघड आहे. " परदुःख शीतळ " अशीं आपल्या देशी भाषेंत म्हण पडली आहे, ती शब्दशः खरी दिसते.[1]

---

१. पार्स व पार्शी धर्म, हेमंत व्याख्यान माला, १८९१; पृ. २३—२५

अनुक्र. ७११८६

## -- २२ --

## मराठ्यामध्यें दुफळी व शाहूची फत्ते

अवरंगजेब वारला त्या समयीं कामबक्ष विजापुरीं असून अझीमशहा लष्कर गोळा करून शहा अलम बरोबर तख्तासाठीं भांडायास निघाला. तेव्हां मराठ्यांचें आयतेंच पिकलें. सिंहगड, चाकण वगैरे मराठ्यांचे किल्ले पुनः मराठ्यांनीं घेतले. जेव्हां नर्मदेवर ही बातमी अझीमशहास कळली, तेव्हां झुल्फीकाराच्या मसलतीनें आई व बायको या उभयतांस ओलीस ठेऊन शाहूस सोडलें. मराठ्यांमध्यें दुफळी होऊन फत्ते झाल्यास शाहूचा मुलूख वाढविण्याचें अभिवचन दिलें.

पर्सोजी भोसले शाहूस पहिल्यानें येऊन मिळाला. हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे यांनींही लौकरच कृतघ्नपणाचा स्वीकार करून ताराबाईची बाजू सोडली व शाहूची धरली. त्यामुळें शाहूजवळ लष्कर बरेंच जमलें. तरी ताराबाई कांहीं कचणारी बायको नव्हती, व रामचंद्रपंत मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं तिळभरही तारंबळ न होणारा कारभारी होता. पर-

शुरामपंत प्रतिनिधि व शंकरजी नारायण सचिव हे रामचंद्रपंताचे पट्टशिष्य होते. त्यामुळें रामचंद्रपंतानें ताराबाईजवळ राहून मसलत करावी, व परशुरामपंतानें धनाजीसहवर्तमान लढाईस जाऊन शंकराजीनें किल्ले व तालुके सांभाळून कुमक पाठविण्याचें काम करावें, असा ठराव झाला. स्वतंत्रपणाची व ताबेदारीची पहिली लढाई पुण्याचे उत्तरेस १५ कोसांवर झाली. पण महाराष्ट्र मंडळाच्या दुर्दैवानें धनाजी जाधव व खंडो बल्लाळ या दोहोंनींही आपल्या नांवावर यावच्चंद्रदिवाकर अमार्जनीय कलंक लावून कृतघ्नतेचा आश्रय केला. चिटणिसांनीं वेषांतर करून शाहूच्या छावणींत बऱ्याच खेपा घातल्या व भर लढाई जुंपली असतां धनाजीनें लष्करानिशीं शाहूकडेस वळावें असा ठराव झाला ! ! ! या ठरावा अन्वयें शाहूचा हत्ती घोड्याजवळ येईपर्यंत धनाजी लढाई न करतां उभा राहिला व शाहूचा हत्ती जवळ येतांच, धनाजीनें एकदम घोड्याखालीं उडी टाकून इतर सरदारांनिशीं व शिपायांनिशीं शाहूस मुजरा केला ! ! दुसरे दिवशीं धनाजीस सेनापतीचीं वस्त्रें व खंडो बल्लाळास चिटणिसीची वस्त्रें कृतज्ञ शाहूकडून मिळालीं.

अवरंगजेबानें पूर्वी एकदां सोडून दोनदां किंवा तीनदां मऱ्हाठ्यांमध्यें दुफळी व्हावी या उद्देशानें त्यास त्या कैदेंतून सोडलें होतें. नांवानें जरी ताबेदारी मऱ्हाठ्यांस कबूल होती, तरी सुप्रसन्न होऊन धनाजी वगैरे मंडळीस अवरंगजेब नांवाजता व महाराष्ट्र मंडळाच्या सीमा वाढवता. पण जी अविंधांची ताबेदारी नांवापुरती देखील कबूल करणे पूर्वी धनाजी व खंडो बल्लाळ यांनी कंठरवानें नाकारलें, तीच ताबेदारी शिक्कामोर्तबानीशीं घेऊन आलेल्या शाहूची बाजू घेते समयीं मऱ्हाठे म्हणविणाऱ्या या उभयतांस तिळभरही संकोच वाटू नये, हें नवल नव्हे काय ? धनाजी जाधव व खंडो बल्लाळ या उभयतांस ही राजारामानें वाढवलें. संताजीच्या वधासारखें अनन्वित काम ज्या धनाजीसाठीं राजारामानें होऊं दिलें, त्याच धनाजीनें राजारामाच्या बायकोस व मुलास सोडून शाहूस मिळावें ! ! ! ताराबाई तीच, रामचंद्रपंत तेच, परशुरामपंत तेच व शंकरजीही तोच.

या उभयतांनीं देशद्रोह केला, तेव्हां अव्यवस्था फाजील माजली होती असें म्हणण्यास आधार नाहीं. खांसा अवरंगजेब मऱ्हाठी महाराष्ट्रांत प्रत्येक गडापुढें बसला होता, तेव्हां जी अव्यवस्था महाराष्ट्र मंडळांत होती, तिच्यापेक्षां या वेळीं पुष्कळ कमी असली पाहिजे. छत्रपतीची स्वारी चंदी चंदावरासारख्या दूरच्या मुलुखीं असतां आमच्या मंडळांत ज्यानें उत्तम बंदोबस्त ठेवला होता, तोच रामचंद्रपंत हल्लीं विद्यमान होता. इतकेंच कीं संताजीच्या वधाच्या पश्चात् जसा कैदखोर सेनापती रामचंद्रपंतास व आमच्या मंडळास हवा होता तसा धनाजींत सांपडला नाहीं. पण तेथें रामचंद्रपंताचा नाइलाज होता. ज्या परशरामपंतांनीं परळीसारखे किल्ले महिन्यांवर महिने लढवून आपलें नांव अजरामर करून घेतलें, तेच परशुरामपंत या प्रसंगीं धनाजी बरोबर गेले होते. ज्या शंकरजीनें कोंकणप्रांतीं अनेक ठिकाणीं छापे घालून मोंगलास मऱ्हाठयांच्या छातीचा व काटकपणाचा अनुभव दिला त्याच शंकरजीनें या प्रसंगीं प्राणांतीही कुमक करण्याचें पत्करलें होतें. अवरंगजेबास प्राणोत्क्रमण करूं लावणारें महाराष्ट्रमंडळ तेंच होतें, कर्तबगारीनें भरलेली ताराबाई तीच होती, व मोंगलांस कालयत्रीं कोणत्याही प्रकारें दाद न देणारें मुत्सद्दी मंडळ तेंच होतें. जी मोंगलांची ताबेदारी महाराष्ट्र मंडळास पूर्वीं नको होती, ताराबाईस नको होती, तिच्या मुत्सद्दी मंडळास नको होती, ती हल्लींही त्यास नको होती. पण धनाजी व खंडो बल्लाळ या उभयतांसे जी ताबेदारी पूर्वीं नको होती तीच हल्ली खमंग लागते व मनोरम भासते !!! राजारामाच्या पश्चात् मोगलांची ताबेदारी न करण्याचा निश्चय अनेकवेळां कायम करून व महाराष्ट्र-मंडळाची बाजू राखून वंद्य केलेलें आपलें नांव यावेळीं मोंगलांची ताबेदारी मोठ्या हर्षानें पत्करून निंद्य करून ठेवलें, हें या चरित्रांत नोंदून ठेवण्यास लेखणीस अतिशय कष्ट होत आहेत पण " आलिया भोगासी असावें सादर".

आतां रामचंद्रपंताकडे वळूं. "संपत्तौ च विपत्तौ च महतामेकरूपता," असें एक संस्कृतांत वचन आहे. राजारामाचे पश्चात् फितूर

होण्याविषयीं अवरंगजेबानें रामचंद्रपंतास स्वदस्तुरचें एक पत्र लिहिलें. जर रामचंद्रपंत फितूर होता, तर महाराष्ट्र मंडळाचें नाक कापलें जातें, व दिल्लीपतीनें त्यास हवें तसें नांवाजलें असतें. याकाळीं रामचंद्रपंतास क्लेश थोडे पडत होते, असें नाहीं. पण फितूर होऊन क्लेश कमी करण्याची किंवा स्वस्थ बसून चैनींत दिवस काढण्याची कल्पना रामचंद्रपंताचे स्वप्नीं हीं आली नाहीं. हें पत्र रामचंद्रपंताने ताराबाईस दाखवलें नाहीं, पण परशुरामपंताच्या सहज अवलोकनांत आलें व आंतील मजकूर त्यानें ताराबाईस कळविला. न दाखविल्या बद्दल रामचंद्रास किंवा मजकूर कळविल्या बद्दल परशुरामास दोष देणें वाजवी नाहीं. मजकूर कळल्यानंतर ताराबाईस रामचंद्रपंताच्या निष्ठेविषयीं शंका येणें साहजिकच होय. ही शंका आल्यामुळें प्रतिनिधीचें पद रिकामें पडलें तेव्हां रामचंद्रपंतास न देतां ताराबाईनें तें परशुरामपंतास दिलें. रामचंद्रपंतास वाईट वाटलें, तरी, ताराबाईस सोडून मोगलाकडे वळण्याचें त्याच्या स्वप्नींही आलें नाहीं. पुढें एकनिष्ठपणाविषयीं खात्री होऊन ताराबाईचा भरंवसा पुनः पूर्वीप्रमाणेंच रामचंद्रपंतावर बसला व रामचंद्रपंताचा ही शेवट ताराबाईच्या पदरीं झाला. "प्रज्ञाविक्रमभक्तयः समुहिता येषां गुणा भूतये ते भृत्या नृपतेः" असें विशाखदत्ताचें म्हणणें यथार्थ आहे.

दरोबस्त लष्कर घेऊन धनाजीनें स्वामीद्रोह केला, तेव्हां परशुरामपंतास पलायनाशिवाय गति राहिली नाहीं, त्यांत नवल नाहीं. साताऱ्यास पळून इत्थंभूत हकिकत ताराबाईस व रामचंद्रपंतास परशुरामपंतांनीं कळविली. किल्ला यथाशक्ति लढविण्यासाठीं परशुरामपंतास ठेऊन, ताराबाईनें रामचंद्रपंतासह पन्हाळ्याची वाट धरली. चंदन वंदन घेऊन, शाहूनें लौकरच साताऱ्यास वेढा दिला. गडांतील एक अविंध फुटला, त्यामुळें आयासाशिवाय सातारा शाहूच्या हातीं लागला व परशुरामपंतांस कैदी व्हावें लागलें.

नंतर शा. शके १६२९ या वर्षीं दिल्लीपतीची ताबेदारी पत्करलेल्या शाहूस सातारा मुक्कामीं अभिषेक झाला.[1]

---

१. राजारामाचें चरित्र; पृ. २७-३०, १८९२

## ऋतूंचीं लक्षणें

मधुश्च माधवश्च वासंतिकावृतू । शुक्रश्च शुचिश्च ग्रैष्मावृतू । नभश्च नभसश्च वार्षिकावृतू । ईषश्चोर्जश्च शारदावृतू । सहश्च सहस्यश्च हैमंतिकावृतू । तपश्च तपसश्च शैशिरावृतू ।

( तैत्तिरीय संहिता, ४ कांड, ४ प्रपाठ. ११ अनुवाक्. )

भाष्य –– वसततौ पुष्पवतीति नाम । ग्रीष्मतौ तापवतीति । वषतौ वृष्टिवतीति । शरदतौ जलप्रसादवतीति । हेमंतशिशिरयोः शैत्यवतीति । ( तैत्ति० संहिता, ४ कांड ३ प्रपा० ११ अनुवाक्. )

तर्जुमा[१]:–

मधु आणि माधव ( हे ) वसंताचे ऋतू; शुक्र आणि शुचि ( हे ) ग्रीष्माचे ऋतू; नभ आणि नभस्य ( हे ) वर्षाकाळाचे ऋतू; ईष आणि ऊर्ज हे शराकाळाचे ऋतू, सह आणि सहस्य ( हे ) हेमंताचे ऋतू; तप आणि तपस्य ( हे ) शिशिराचे ऋतू. ( ऋतू=मास )

भाष्य:–– वसंत ऋतूंत ( पृथ्वीचें ) नांव पुष्पवती, ग्रीष्म ऋतूंत तापवती, वर्षा ऋतूंत वृष्टिवती, शरद् ऋतूंत जलप्रसादवती, हेमंत आणि शिशिर ( या दोन ) ऋतूंत शैत्यवती.

फलितार्थः–– ऋतु शब्दाचा मूळचा अर्थ मास. वसंताच्या पहिल्या मासाचें लक्षण " मधु " = फुलांतला मध, दुसऱ्या मासाचें लक्षण तेंच, कारण " माधव " शब्द " मधु " शब्दापासून निघालेला. ग्रीष्म ऋतूच्या पहिल्या मासाचें लक्षण ऊष्णता किंवा ताप, कारण " शुचि " शब्द त्याच धातूपासून निघालेला. वर्षा ऋतूच्या पहिल्या मासाचें लक्षण, सूर्याचा प्रकाश नसणें, म्हणजे सूर्य न दिसणें कारण

१ शास्त्रीबोवा भाषांतरास नेहमीं तर्जुमा म्हणतात.

" नभस " शब्द " न " आणि " भस् " = " भास " = उजेड या दोहोंचा मिळून झालेला; दुसऱ्या मासाचेंही लक्षण तेंच. शरद् ऋतूच्या पहिल्या मासाचें लक्षण अन्न, कारण " इष " = अन्न, आणि हा अन्नाचा म्हणजे भाताचा मास; दुसऱ्या मासाचें लक्षण अन्नावर अवलंबून असणारें बळ, कारण " अर्ज " = बळ आणि हा नवें अन्न खाऊन बळकट होण्याचा मास. हेमंताच्या पहिल्या मासाचें लक्षण (थंडी) सोसणें, कारण " सहस् " शब्द " सह "—सोसणें या धातूपासून निघालेला; दुसऱ्या मासाचेंही लक्षण तेंच कारण " सहस्य " शब्द " सहस् " शब्दापासून निघालेला. शिशिराच्या पहिल्या मासाचें लक्षण (अग्नीची) धग घेणें, कारण " तपस् " शब्द तप् = तपणें किंवा तापविणें या धातूपासून निघालेला; दुसऱ्या मासाचेंही लक्षण तेंच, कारण तपस्य शब्द " तपस् " शब्दापासून निघालेला.

वसंताचें लक्षण फुलें, ग्रीष्माचें लक्षण सूर्याचा ताप, वर्षा ऋतूचें लक्षण पाऊस, शरद् ऋतूचें लक्षण पाण्याचा स्वच्छपणा, हेमंत आणि शिशिर या दोन ऋतूंचें लक्षण थंडी.

तर्कः— " ऋतु " शब्द मासाच्या ऐवजीं श्रुतींत बराच येतो.

" अंतमानावृतू अभिदीक्षन्ते " (ताण्ड्य—महाब्राह्मण, ५ अध्याय, ९ खंड ५ सूत्र) अंत नांवाच्या ऋतूंमध्यें दीक्षा घेतात. माघ आणि फाल्गुन हे दोन अंत नांवाचे ऋतू. ताण्ड्य-महाब्राह्मणाच्या याच अध्यायांत, याच खंडात, " फाल्गुने दीक्षेरन् " असें ७ वें सूत्र. फाल्गुन ऋतूंत दीक्षा घ्यावी हा सूत्राचा अर्थ. अर्थात ऋतु = मास ...... " ऋतु " शब्द " ऋ "=जाणें या धातूपासून निघालेला. " मास " किंवा " मास् " हा शब्द " मा "=मोजणें, या धातूपासून निघालेला दिसतो. ज्याच्या योगें (काळ) मोजणें शक्य तो मास् किंवा मास अर्थात् चंद्र—असा मास शब्दाचा मूळचा अर्थ. फार्सीत " माह् " शब्द चंद्राचा वाचक सुप्रसिद्ध असून " मास " या अर्थीही " माह् " शब्दाचा प्रयोग होतो. "माहरू" =चंद्रमुखी (रू=मुख, तोंड); हा माहरू शब्द मराठींतल्या " मारू "=

सुंदर, या शब्दाची प्रकृति. माहे मोहरम=मोहरम मास; ऋतूंची नांवें दाखल झालीं आहेत इतक्यावरून चैत्र वगैरे मासांचीं नांवें वैदिक काळीं माहीत नव्हतीं असें म्हणणें वाजवी नाहीं, कारण " षष्ठ्यां शरादि कार्तिके मासे यजेत् " या सूत्रांत आणि " फाल्गुने दीक्षेरन् " या श्रुतींत मासांचीही नांवें उघड दाखल झालेलीं आहेत. ऋतूंस उद्देशून सोम अर्पण करण्यांत येतो, तसा मासांस उद्देशून अर्पण करण्यांत येत नाहीं, म्हणून मधु-माधव या नांवांप्रामाणें " चैत्र वैशाख हीं नांवें क्रमानें दाखल करण्याचें प्रयोजन पडलें नाहीं.....................कोणत्याही ऋतूचा आरंभ अमुक दिवशीं असें म्हणणें जड जाई. जर ऋतूस आरंभ अमुक दिवशीं होतो, असें ठरवतां येत नव्हतें, तर ऋतूचा शेवट अमुक दिवशीं होतो हें ही ठरवण्याचें उघड साधन नव्हतें. अर्थातच फुलांतला मध किंवा फुलें हेंच वसंताचें स्थूल लक्षण. जसें वसंताचें, तसें ग्रीष्म वगैरे इतर ऋतूंचेंही स्थूळच लक्षण केलेलें. कोणत्याही ऋतूचें—जसें वसंताचें, तसेंच ग्रीष्माचें किंवा शरद् ऋतूचें वगैरे—सूक्ष्म लक्षण करण्याचें साधन जवळ उघड नव्हतें[१].

---

१. जुनाट ज्योतिष. भाग१ श्रुतींतलें, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २७, पृ. ९७-९८; १०६; १८९४. शास्त्रीबोवांची ही नक्षत्र, महिनें, वर्षमान व व पंचाग ह्या वरील लेखमाला फार सुरेख असून माहितीनें व व्यासंगानें पूर्ण अशी आहे. दुर्दैवानें ती अपूर्ण आहे.

## -- २४ --

## इंग्रज व बंडवाले

आगींत घातलेला पाय पोळला पाहिजे; केलेल्या चुकीस लागलेलें फळ कितीही कडू जहर असलें, तरी तें चूक करणारास चाखल्याविना गति

नाहीं. ठोंकर लागली म्हणजे आंगीं अक्कल असल्यास शहाणपण येतें, आणि एकदां आलें, म्हणजे तशी ठोंकर पुनः लागूं न देण्याविषयीं खबरदारी ठेवण्याकडे प्रवृत्ति होते. लोभ वाढून तोंडास पाणी सुटलें, म्हणून डालहौसी साहेबानें दत्तक कबूल करण्याच्या राजरस्त्यानें उजू जावयाचें तें सोडून दिलें, आणि प्रांतावर प्रांत खालसा करून आडवाटेनें पाऊल टाकलें. विलायतेंतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं डालहौसीनें घातलेल्या किरयाचा शांतपणें आणि पोक्तपणें विचार करण्याचें सोडून देऊन, त्याची सगळीं कृत्यें गैरवाजवीपणाकडे बिलकूल लक्ष न पोंचवतां मंजूर केलीं. या लोभाच्या आगींत जर इंग्रजांनीं पाय मुद्दाम घातला, तर तो पाय कां बरें पोळूं नये? जर प्रांतावर प्रांत खालसा करण्याची दर्बारी दृष्टीनें जंगी चूक इंग्रजांनीं केली, तर तीस लागलेलें कडूजहर फळ त्यांसच चाखावें लागल्यास नवल कोणतें? करावें तसें भरावें किंवा द्यावें तसें घ्यावें — हा न्याय सृष्टींत एकंदरींत जिकडे तिकडे लागू होतो. ही ठोंकर लागली, तेव्हां आंगीं अक्कल होती, म्हणून राणीसरकारच्या प्रधानमंडळीनें जाहीरनामा तयार करून तो सर्वांना जाहीर होईल अशी तजवीज कलकत्त्याच्या बड्या लाटसाहेबाजवळून करविली. अर्थातच असली ठोंकर पुनः न लागण्याविषयीं घ्यावी तितकी खबरदारी घेतली. प्रांतावर प्रांत खालसा करण्याची बडी चूक जशी इंग्रजांच्या हातून झाली, तशीच बैलाचीं किंवा डुकराची चरबी लावलेलीं काडतुसें वापरण्यास सांगण्याची छोटी चूकही झाली. एकंदरींत विचार करतां, चुकांचें प्रायश्चित्त मिळावें हेंच रास्त. तेव्हां झालेल्या दोन चुकांबद्दल सांगोपांग प्रायश्चित्त इंग्रजांस मिळालें, ही गोष्ट सृष्टींतल्या स्थूळ नियमांच्या सुलट झाली, उलट नव्हे.

याप्रमाणें खरी हकीगत असतां, बंडाचें मुख्य कारण बंड करणारांचें अज्ञान ठरवणें, किंवा या बंडांतल्या जाड्या पात्रांस पहिल्यानें "मूर्ख" म्हणून लगेच "दरवडेखोरांहूनही दुष्ट" समजण्याची दिशा दाखविणें, हें वाचकांस उघड भलत्याच मार्गानें घालवणें होय. बंडाचें मुख्य कारण बंड करणाऱ्यांचें अज्ञान नव्हे, तर इंग्रज लोकांस अनावर झालेला लोभ, आणि

सत्तेचा कडेलोट झाल्यामुळें विधर्म्यांच्या समजुती कसपटाच्याही खालच्या लेखूं लावणारी डोळ्यांवर आलेली धुंदी. जर अनावर लोभानें प्रांतावर प्रांत खालसा करण्याचें खोटें व्यसन इंग्रजांस लागलें नसतें, किंवा धर्मबुद्धि कसपटाप्रमाणें लेखूं लावणारी धुंदी त्यांच्या डोळ्यांवर आली नसती, तर बंडाचें बीजच पेरलें न जातें. धर्मबुद्धीचा अंमल एकंदरींत मनुष्याच्या हृदयभूमिकेवर किती आणि कितपत जोराचा बसलेला असतो, हें जर समंजस आणि विशेषें करून मुत्सद्दीपणाची आढ्यता मिरवणाऱ्या पुरुषांस कळत नाहीं, तर डोळ्यांवर धुंदी उघड आलेली म्हणावी लागते. अर्थातच अज्ञान जर कोणावर लादणें सयुक्तिक होईल, तर तें धर्माच्या आंतल्या अंमलाची यत्ता न कळून बैलाची किंवा डुकराची चरबी लावलेलीं काडतुसें वापरण्याचा हुकुम सोडून बंड करूं लावणाऱ्या इंग्रजांवर लादणें जास्त सयुक्तिक होईल. असें असतां अज्ञानाचा बोजा बंड करणारांवर लादणें हें सरळपणानें इतिहास लिहिणाराचें उघड काम नव्हे. त्याप्रमाणें मुख्य पात्रांस " मूर्ख " म्हणणें किंवा ती दरवडेखोरांहूनही दुष्ट ठरवणें हें ही काम सरळ इतिहास लिहिणाराचें नव्हे. नानासाहेब, तात्या टोपी, लक्ष्मीबाई—हा जमाव मूर्खांचा उघड नव्हे. 'यांस धोरण कमी होतें, शक्तीपलीकडे उडूं गेल्यामुळें फसलीं,' असें म्हणण्याचा मार्ग निराळा आणि हीं मूर्ख होतीं किंवा " डोयजड " होतीं, असें म्हणून निव्वळ क्षुद्र दृष्टीनें त्यांची मस्करी करण्याचा मार्ग निराळा. जर शेंकडों लोकांच्या नाशास कारण झाली, म्हणून ही मंडळी दरवडेखोरांहूनही दुष्ट, तर शिकंदर, कैसर, बोनापार्ट, बिस्मार्क यांच्या सारखी मंडळी दरवडेखोरांहून कितीतरी पट दुष्ट म्हणावी लागेल. जी मंडळी या बंडखोरांस दरवडेखोरांहून दुष्ट ठरविते, ती मंडळी प्रसंगीं शिवाजीसही दरवडेखोराहून दुष्ट ठरवण्यास शरमणारांपैकीं उघड नव्हे. पण वॉरन् हेस्टिंग्स, क्लैव, असल्यांनीं जो संहार केला तिकडे मात्र असल्या मंडळीचें लक्ष पोंचत नाहीं. आणि प्रसंगीं त्यांच्या दोषांवर झांकण घालण्याकडे हिचें लक्ष वाजवीहून फाजील असतें. वर लिहिलेल्या गोऱ्यांनीं हिंदुस्थानांतल्या लोकांचा संहार थोडा केला नाहीं. असल्याही गोऱ्यांचे

पोवाडे जर सहज गातां येतात, तर शिकंदराचे किंवा बोनापार्टाचे किंवा बिस्मार्कचे पोवाडे ही मंडळी गाऊं लागली, तर त्यांत नवल नाहीं. पण ज्या संहारासाठीं काळे लोकांस दरवडेखोरांहून दुष्ट समजावयाचें, त्याच संहारासाठीं गोरे लोकांची, सवड सांपडतांच मनमुराद तारीफ करायची, या मार्गास उजू कोण म्हणेल ? कोणत्या तरी क्षुद्र हेतूनें मिटलेले डोळे जर असली मंडळी उघडील, आणि कांटा उजू धरील, तर कित्येक मुद्दे तीस बिनचूक दिसतील, आणि निदान असल्या मुद्यांच्या संबंधानें मतभेदासाठीं जागेची जरूरी पडणार नाहीं.[१]

१. लक्ष्मीबाई झांशीकरीण, विविधज्ञानविस्तार. पुस्तक २७, पृ. १०९—११०; १८९४

---

## -- २५ --

## मराठी धर्माचें इतिहासानिशी स्वरूप

जी घरांतली भाषा असते, त्याच भाषेंत प्रत्येकाचा धर्म असला पाहिजे. धर्माच्या आणि घरच्या भाषेंत थोडें अंतर असल्यास चालेल. पण जर धर्माची भाषा अगदीं निराळी पडली, तर धर्माचीं मुख्य तत्वें कुटुंबांतील माणसांच्या मनावर ठसण्यास आणि ठसवण्यास विशेष आयास पडतात. कोणताही एक धर्म सगळया मानवी सृष्टीसाठीं समजतां येत नाहीं, कारण सगळया मानवी सृष्टीची भाषा आजपर्यंत कधींही एक नव्हती. कोणत्या ही धर्मसंस्थापकाची जी जन्मभाषा असते, ती बोलणाऱ्यांच्या उन्नतीसाठीं त्या त्या धर्मसंस्थापकांचा जन्म झालेला समजावा. जसा

ख्रिस्ताचा जन्म मूळचा यहुद्यांसाठीं होता, जसा महंमदाचा जन्म मूळचा आरबांसाठीं होता, बुद्धाचा किंवा जिनाचा जन्म प्राकृत भाषा बोलणारां-साठीं होता. बौद्ध आणि जैन हतवीर्य झाल्यानंतर कांहीं काळानें मराठी कानडी आणि तेलंगी या तीन भाषा अर्वाचीन काळचें स्वरूप धारण करूं लागलेल्या दिसतात. ही भाषाक्रांति झपाट्यानें चालल्यामुळें बौद्धांच्या आणि जैनांच्या शास्त्रांच्या भाषा मृत होऊन दुर्बोध झाल्या आणि ती ती देशी भाषा बोलणारांचा जमाव वाढत चालला. संस्कृत भाषा तर कुमारि-लानें उद्धार केला तेव्हां मृतच होती. शालिवाहन शकाच्या दहाव्या शत-काच्या पूर्वीं एकदां हर्ष विक्रमादित्याचा मोड शालिवाहनी वंशातील राजानें करून शकाची स्थापना केली; तेव्हां एकदां मिळून दोनदां मरा-ठ्यांनीं नांव गाजवले होतें; आणि शालिवाहनी राजांनींही अनेक ग्रंथका-रांस पदरीं आश्रय देऊन वाढवलें होतें. पण देशी भाषा बोलणारांचा जमाव जमत चालल्या पासून नवीन मन्वंतरास आरंभ झाला. आणि शालिवाहनाच्या ११ व्या शतकांत दक्षिण दिशेची हवा पालटत पालटत इतकी पालटली कीं अखेरीस— जशी मराठी मंडळांत तशी कानडी मंड-ळांत एक आणि तेलंगी मंडळांत एक मिळून— तीन स्वतंत्र गाद्या स्थापन होण्याचा रंग दिसूं लागला.

मराठी मंडळांत जसा बल्लाळ किंवा भिल्लम नांवाच्या पुरुषानें जोगाईचें आंबें या ठिकाणीं नवी गादी शालि० शके १११४ च्या सुमा-रास स्थापिली. बल्लाळाचा मुलगा जयंतपाळ गादीवर असतां मुकुंदराज नांवाच्या ब्राह्मणानें औपनिषद धर्म राजाच्या नीट लक्षांत यावा म्हणून "विवेकसिंधु" नांवाचें एक छोटें ओवीबद्ध प्रकरण मराठींत रचिलें. मराठी मुलुखाची हवा एकंदरींत कर्मठांस किंवा ब्रह्मज्ञान्यांस सांगण्यासा-रखी मानवत नाहीं. कर्मठांचा किंवा ब्रह्मज्ञान्यांचा मराठी मंडळांत कुणी द्वेष करतात किंवा छळ करतात असें समजूं नये. ज्याप्रमाणें इतर धर्मांच्यास मराठी मंडळांत स्थान मिळालें आहे, त्याप्रमाणें या दोन वैदिक धर्मांसही मिळालें आहे. पण मराठ्यांचा एकंदरींत ओढा जसा कर्मठपणाकडे नाहीं,

तसा ब्रह्मज्ञानाकडेही नाहीं. कर्मठांच्या हाडीं शूद्रांचा आणि देशी भाषेचा तिरस्कार हे दोन अतीच खिळलेले असतात; त्यामुळें त्यांच्या सांप्रदायाकडे त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाचें लक्ष वळत नाहीं, यांत नवल नाहीं. एकंदरींत कर्मठांच्या धर्मामध्यें दोष ठेवण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. संध्या करणें किंवा गायत्रीचा जप करणें किंवा पूजापाठ करणें यांत वावगें कांहीं नाहीं. देशी भाषेचा तिरस्कार केला, तरी त्यापासूनही फारशी हानि नाहीं. पण दुसऱ्यास आपल्या धर्मात ओढीत नाहींत, हें मात्र आजचे कर्मठ ठीक करीत नाहींत, असें वाटतें. जर गायत्रीमध्यें—जसें वाऱ्यामध्यें अगर जिवंत पाण्यामध्यें तसें—पावन करण्याचें सामर्थ्य आहे, तर जसा वाऱ्याचा किंवा सूर्याच्या उन्हाचा किंवा जिवंत पाण्याचा उपभोग घेण्याची महारमांगास आणि मुसलमानांसही मोकळीक असते, तशीच गायत्रीच्या जपाची ही असली पाहिजे; कारण पवित्रपणा ब्राह्मणास मात्र हवा, तो महारमांगास किंवा मुसलमानास नको, असा भाग नाहीं. सारांश जी व्यवस्था पूर्वीच्या काळीं होती, आणि ज्या व्यवस्थेचा कुमारिलानें पुनः प्रसंगीं आश्रय केला, तीच व्यवस्था कर्मठ जर पुन: स्वीकारतील, तर अती उत्तम होईल. हा विचार कर्मठांचा कर्मठांनींच करून फाटलेल्या जागीं ठिगळ लावण्याचें काम जारीनें पत्करलें पाहिजे, हें जरी अगदीं खरें आहे, तरी आपल्या बंधूच्या आंगरख्याची फाटकी जागा दिसल्यास ती दाखवणें आणि ठिगळ लावण्याची युक्ति सुचवणें हें प्रत्येक बंधूचें कर्तव्य आहे. पुढें फाटकें घालणारा बंधु जसा ठिगळ लावण्यास तसा न ही लावण्यास मुखत्यार आहे. मराठी लोकांचा ब्रह्मज्ञानाकडे कल नाहीं, त्याचें मुख्य कारण असें दिसतें कीं, आंगीं चळवळीचें वारें विशेष भरलें असल्यामुळें, त्यांस स्वस्थ बसणें आवडत नाहीं. आणि त्यामुळें ब्रह्मज्ञानाच्या शुष्क गोष्टी सांगत बसणें हें त्यांस एक प्रकारच्या नामर्दपणाचें लक्षण भासतें. म्हणून मुकुंदराजानें प्रयत्न केला तरी तो रुचून राजा जरी ब्रह्मज्ञानी झाला असला, तरी मुकुंदरायाचा प्रयत्न एकंदरींत मंडळांत सांगण्यासारखा फलद्रूप झालेला दिसत नाहीं. जयंतपाळाच्या पश्चात् गादी

देवगिरी मुक्कामीं गेली, आणि लौकरच मराठी लोक खालीं कानडी लोकांस आणि पूर्वेस तेलंगी लोकांस दाबीत चालले. शालि० बारावे शतकाचे अखेरीस रामदेवराव नांवाचा राजा झाला, त्याच्या कारकीर्दीत मराठी सत्तेचा कळस झाला. याच्या राज्याची हद्द खालीं तुंगभद्रा नदीवर गेली होती. हेमाडपंत नांवाचा ब्राह्मण होता तो रामदेवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं, आणि रामदेवरावाचा चुलता महादेव याचे कारकीर्दीत मुख्य प्रधान होता. हेमाडपंतानें मोडी लिपी सोपी म्हणून आणून कुळकरणांत तिची योजना केली, बाजरीच्या लागवडीस नवीनच उत्तेजन दिलें, आणि घरें बांधण्याची एक अपूर्व पद्धति घातली. या हेमाडपंतानें अनेक कर्मठांस आपल्या पदरीं बाळगून " हेमाद्रि " नांवाचा धर्मशास्त्रावरील विस्तृत ग्रंथ त्यांच्या जवळून करविला. हेमाडपंताच्या पदरीं बोपदेव नांवाचा पंडित होता, ज्यानें विष्णु-भागवत केलें अशी दंतकथा आहे. याप्रमाणें या काळच्या मराठी लोकांचें पाऊल सर्वतोमुख पुढें पडलें होतें.

वर लिहिलेल्या गोष्टी निःसंशय ध्यानांत वागण्यासारख्या आहेत. तरी या सर्वांहून ही एक विशेष ध्यानांत राखण्याजोगी गोष्ट रामदेवरावाचे कारकीर्दीत घडून आली. ती ही कीं ज्ञानेश्वरांनीं देशी भाषेंत ओंवीबद्ध ज्ञानेश्वरी रचून भागवती धर्माचा जीर्णोद्धार केला. हा जो भागवती० धर्माचा देशी भाषेंत जीर्णोद्धार झाला, त्याच्या पलीकडे आतां पुनः त्या धर्माचा जीर्णोद्धार शक्य दिसत नाहीं; ही त्या धर्माच्या जीर्णोद्धाराची पराकाष्ठा झाली आहे. भगवद्गीतेचें खरें मर्म मराठी मंडळास कळावें, म्हणून साक्षात् विष्णूनें ज्ञानेश्वरावतार धारण केला, अशी परंपरा आहे. सगळा आंगरस ज्ञानेश्वरांनीं देशी भाषेंत पिळून घेतल्यामुळें, भगवद्गीता आतां रस काढून घेतलेल्या अळत्याच्या मोलाची झाली आहे........

जी छोटी जोत प्रत्येकाच्या कुडींत जळत असते, तिचें आणि बड्या जोतीचें स्वरूप एकंदरींत एक समजण्यांत कांहीं वावगें नाहीं. मरणोत्तर कित्येकांच्या कुडींतली जोत बड्या जोतींत सामील होते, असें म्हटल्यास भलत्यासलत्याचा भास होत नाहीं; कारण ज्या छोट्या जोतींनीं विशेष कृपा

संपादन केली असेल त्यांस बड्या जोतीनें आपणांमध्यें ओढून घेणें ही करुणेची कमाल होते. पण मरणाच्या पूर्वीच जो ब्रह्मज्ञानी झाला त्यास मुक्ति मिळावी असा शंकराचार्यांचा सिद्धांत आहे, तो एकंदरींत मानवी मतीस थोडासा ढिलग वाटतो. छोट्या जोतीस विहार करण्यास मिळालेलें हें कुडीचें आटोपसर स्थळ कायम आहे, तोपर्यंत त्या जोतीस बड्या जोतीमध्यें अगदीं सामील होऊन जाण्याचा प्रसंग येण्याचा बिलकुल संभव नाहीं. ब्रह्मांडी प्राण नेतात तेव्हां बड्या जोतींत जो मिलाफ होतो तो अगदीं बेमालूम होतो, असें समजणें वाजवी नाहीं; कारण मिलाफ अगदीं बेमालूम झाल्यास छोट्या जोतीची पाठीं येण्याची वाट अगदीं बंद झाली पाहिजे. ज्या छोट्या जोतीस बड्या जोतींत सामील होऊन पुन: अलग राहतां येतें, इतकेंच नव्हे तर कांहीं काळानें गेलेल्याच वाटेनें बिनचूक परतही येतां येतें, त्या छोट्या जोतीचा बड्या जोतींत बेमालूम मिलाफ झाला असें कसें म्हणतां येईल? याप्रमाणें मरणाच्या पूर्वी बड्या जोतींत बेमालूम मिलाफ होणें संभाव्य नसल्यामुळें, शंकराचार्यांचा एक सिद्धांत थोडा विसंगत वाटतो. सारांश—मरणानंतर भक्ताच्या जीवात्म्याचा परमात्म्याच्या आत्म्यांत, जसा मिठाच्या खड्याचा समुद्राच्या पाण्यांत, तसा—बेमालूम मिलाफ होतो असें प्रतिपादन करणाऱ्या ज्ञानेश्वरांनीं जसा मरणाच्या पूर्वी बेमालूम मिलाफ प्रतिपादन करणाऱ्या शंकराचार्यांचा तसा जीवात्म्याचें परमात्म्याशीं सेवकपणाचें नातें मरणानंतरही निरंतर राखू पहाणाऱ्या वैष्णवांचा एक सिद्धांत तोडला. मरणानंतर तरी बेमालूम मिलाफ स्वीकारून ज्ञानेश्वरांनीं एका बाजूनें जसा शंकराचार्यांचा आणि त्यांच्या शिष्यांचा मान राखला तसा भक्ताची पायरी मुक्तीच्याही वरची ठरवून दुसऱ्या बाजूनें रामानुजाचार्यांचा मान राखला. ब्राह्मणांच्या कुळांत जन्मलेल्या पूर्वीच्या जीर्णोद्धारकानें संस्कृत भाषेचाच आदर केला होता; पण या जीर्णोद्धारकानें देशी भाषेचा आदर केला, ही एक नवीनच जोड दिली. बुद्ध आणि जिन या दोहोंनीही पूर्वी जागत्याच देशी भाषेचा आदर केला होता; पण हे दोघेही मूळ खांब क्षत्रियाच्या कुळांत जन्मलेले होते, ब्राह्-

णाच्या कुळांत जन्मलेले नव्हते. जीर्णोद्धारास जागत्या देशी भाषेचा आदर करून, ज्ञानेश्वरांनीं एकप्रकारें बुद्धानें आणि जिनानें दाखविलेली वाट स्वीकारली. याप्रमाणें वरील दोन धर्मांच्या संस्थापकांची वाट व ज्ञानेश्वरांची वाट जरी पहिल्यानें एक पडली, तरी अखेरच्या दिशा उघड निराळ्या होत्या; कारण बुद्ध आणि जिन यांनीं आपल्या गलबताचें सुकाणूं शून्याच्या दिशेनें फिरविलें असून ज्ञानेश्वरांच्या गलबताचें सुकाणूं भक्तांस मरणोत्तर आपणामध्यें सर्वांशीं सामील करून घेणाऱ्या परम कारुणिक देवाकडे फिरलें होतें. कुळ ब्राह्मणाचें, साहा शास्त्रें हातचा मळ झालेला, योगाचा अभ्यास केलेला, असा तीन प्रकारचा विशिष्टपणा आंगीं जडलेला असतांहीं केवळ भक्तीनें नांमाकित झालेल्या नामदेवाच्या पाया स्वतःच पडून ज्ञानेश्वरांनीं मराठी ब्राह्मणांस अत्युत्तम उदाहरण घालून दिलें, आणि हेंच धोरण ठेऊन जातीची मातब्बरी मुळींच न मानणाऱ्या पंढरपूरच्या संप्रदायाची स्थापना केली.........

ज्ञानेश्वराचें हाड कर्मठ ब्रह्मज्ञान्याचें, योग्याचें किंवा शुष्क तार्किकाचें नव्हतें, तर निष्काम भक्ताचें होतें. ब्रह्मज्ञानाचा प्राण ब्रह्मांडीं गेला, म्हणजे ब्रह्मज्ञानी दगडासारखा निश्चेष्ट पडला. पण निष्काम भक्ताचा प्राण ब्रह्मांडीं गेला म्हणजे अपरिच्छिन्न परमात्म्याच्या जोराच्या योगानें या परिच्छिन्न जीवात्म्यास कांपरें सुटतें आणि स्वतःच्याच वाणीवर स्वतःचा अंमल चालेनासा होऊन परमात्म्याचे गुणानुवाद तोंडावाटे झटाझट बाहेर पडूं लागतात, असा जो अठराव्याच्या आरंभीं उपोद्घात केला आहे, त्यावरून ज्ञानेश्वरांचें हाड शुद्ध भक्ताचें ठरतें, ब्रह्मज्ञान्याचें किंवा योग्याचें उघड ठरत नाहीं. ज्ञानेश्वरांचा जन्म केवळ परार्थ दिसतो. जंगलांत फळें मुळें भक्षण करून किंवा आंगास राख फांसून केवळ स्वतःसाठीं मुक्ति मिळवावी, किंवा एखाद्या मठिंकेत ब्रह्मांडीं प्राण नेऊन स्वतःचा अर्थ तितका साधून घ्यावा, असला कोतेपणा ज्ञानेश्वरांमध्यें नव्हता. जातीनें कितीही निकृष्ट असला तरी अतीच उत्कृष्टपणा आणणारा भक्तिरूपी चिंतामणी मराठी मंडळांत सर्वांच्या हातीं लागावा, हा ज्ञानेश्वरी अवताराचा

मोठा हेतु होता. हा मोठा हेतु सहज सिद्ध होईल, अशीच व्यवस्था ज्ञानेश्वरांनीं पहिल्यापासून चालविली. चौफेर संतांची मंडळी माळेसारखी बसलेली असून, मेरूच्या स्थानीं निवृत्तिनाथ असत; आणि चौफेर पसरत गेलेल्या वर्तुळाच्या मध्यभागीं निवृत्तिनाथाकडेस तोंड केलेले ज्ञानेश्वर बसून भागवती धर्माचा जीर्णोद्धार त्या काळच्या कर्मठांनीं तुच्छ आणि निःसार मानलेल्या मराठी भाषेंत करीत. संतमंडळी फिरती असल्यामुळें जिकडे तिकडे ज्ञानेश्वरांनीं पाजळलेली मशाल नेत. त्यामुळें मराठी मंडळांत या मशालीचा उजेड जिकडे तिकडे थोडक्याच काळांत पडत चालला.

हा जो ज्ञानेश्वरीरूपी मोठा " वाग्यज्ञ " विशीच्याही पूर्वी ज्ञानेश्वरांनीं आरंभला आणि संपविला ही, तो " वाग्यज्ञ " सर्वत्र वास्तव्य करणाऱ्या परमेश्वराच्या पायीं निवेदन केला आणि त्याच्यापासून महाप्रसाद मागून घेतला. हा महाप्रसाद आंत कोणत्याही प्रकारच्या कोतेपणास वाव मिळालेला नसल्यामुळें फारच सुरेख बनला आहे. तो महाप्रसाद निवेदनासहित जशाचा तसाच दाखल करण्यांत येत आहे.

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें
तोषोनि मज द्यावें । पसाय दान हें ॥ १ ॥
जे खळाची वेंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचे ॥ २ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ ४ ॥
चलां कल्पतरूंचें आरव । चेतनां चिंतामणीचें गांव
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥
चंद्रमे जे अलांच्छन । मार्तंड जे तापहीन
ते सर्वां ही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना पूर्ण सुखी । पूर्ण होउनी तिहीं लोकीं
भाजि जो आदिपुरुषीं । अखंडित ॥ ७ ॥

खळांच्या संबंधानें, जीवांच्या संबंधानें, विश्वाच्या संबंधानें, प्राण्यांच्या संबंधानें, ईश्वरनिष्ठांच्या संबंधानें, भूतकाळाच्या संबंधानें आणि अखेरीस जसे तिन्ही लोकांच्या तसे आदिपुरुषाच्या संबंधानें, मिळून भूपृष्ठावरील ऐक्याच्या संबंधानें जे सार्वत्रिक उद्गार खिस्ती शकाच्या तेराव्या शतकांत मराठी मंडळामध्यें ज्ञानेश्वरांनीं काढले आहेत, त्यांच्या वरची दिशा या खिस्ती शतकाच्या एकोणिसाव्या शतकांत कोणासही दिसलेली असण्याचा संभव नाहीं.

जसा संसाराचा खटारा स्त्री आणि पुरुष या जोडीवर अवलंबून असतो, तसा मंडळाचा खटारा आध्यात्मिक व दर्बारी या दोन खात्यांच्या जोडीवर अवलंबून असतो. संसारांच्या खटाऱ्यास स्त्री पुरुष हीं दोन्ही चाकें जरुर हवींत, तशीं मंडळाच्या खटाऱ्यास आध्यात्मिक आणि दर्बारी हीं दोन्ही चाकें जरूर हवींत. जर दोन चाकांपैकीं एक चाक पंगु झालें, तर खटारा अडला. दर्बारी खातें मंडळरूपी पुरुषाच्या कायेच्या ऐवजीं असून आध्यात्मिक खातें वाचेच्या आणि मनाच्या ऐवजीं आहे. रणवीरांची तलवार हा दर्बारी खात्याचा पाया आहे. आणि धर्मवीरांची सरस्वती हा आध्यात्मिक खात्याचा पाया आहे. याप्रमाणें शूरांच्या हातांतली तलवार आणि संतांच्या तोंडांतली सरस्वती या अनुक्रमें उग्र आणि शांत स्वरूप धारण करणाऱ्या देवी एकदां प्रसन्न झाल्या, म्हणजे मंडळास कसली ही वाण पडत नाहीं. देशी किंवा व्यापक आणि कर्मठ किंवा कोतें अशी आध्यात्मिक खात्याची दोन मुख्य पोटखातीं असतात. देशी किंवा व्यापक खातें असतें, त्याचें दफ्तर जिवंत देशी भाषेंत असून, कर्मठ किंवा कोत्या खात्याचें दफ्तर मृत भाषेंत असतें. हवा हा पदार्थ मुख्यत्वें करून— एक प्राणाचा उत्तेजक आणि एक प्राणाचा नाशक, असे— दोन वायू मिळून झाला आहे; अर्थात हा पदार्थ साधित आहे. साध्य नव्हे. जोपर्यंत हे दोन्ही वायू समतोल असतात, तों पर्यंत हवा मानवी सृष्टीस मानवणारी असते;

पण दोन्ही वायूंच्या समतोलपणांत बिघाड झाला कीं हवा बिघडली आणि इजा देणारी झाली. याच प्रमाणें मंडळांतलें आध्यात्मिक खातें साधित असल्यामुळें, त्यांतील हवा जिवंत भाषा आणि मृत भाषा समतोल असतात तोंपर्यंत निरोगी राहाते. पण समतोलपणात बिघाड झाला कीं रोगांच्या सांथी उद्भवल्या. शालिवाहनाच्या तेरावे शतकाचे आरंभीं दर्बारी खात्याचें सुकाणूं रामदेवरावाचे हातीं होतें. व्यापक आध्यात्मिक खात्याचें सूत्र ज्ञानेश्वराचे हातीं असून हेमाडपंतासारखा मनानें थोर आणि हाडानें सुधारक असला ब्राह्मण कोत्या खात्याचें सूत्र हालवीत होता, म्हणून आध्यात्मिक खात्यांतली हवा या शतकांत मंडळांतील लोकास एकंदरींत सशक्त आणि सतेज करूं शकली.'

---

१. (महाराष्ट्रधर्म—उत्तरार्ध. शके १८१७. सन १८९५ पृ. १६–२५); 'महाराष्ट्रधर्म' हा शास्त्रीबोवांच्या फार गाजलेल्या परंतु तितक्याच पूज्य ठरलेल्या लेखांपैकीं एक आहे. महाराष्ट्रधर्माचा जन्म जरी प्रासंगिक वावटळींतून झालेला असला तरी त्यांत संतांच्या धर्माचें निरूपण व्यवस्थित केलें आहे. बहुजनसमाजाचा धर्म कसा असावा व पूर्वापार परंपरेला न सोडतां लहानापासून थोरांपर्यंत त्याचप्रमाणें ब्राह्मणांपासून 'चोखामेळ्यां' पर्यंत सगळ्या जातींना सारखाच प्रिय असलेला हा संतांचा धर्म आहे. १८९४ सालीं हिंदुमुसलमानांचा दंगा झाला त्यावेळीं सामाजिक व राजकीय जागृतीची व असंतोषाची लाट देशभर उसळली. विशेषतः सामाजिक परिषदेचे व राष्ट्रीय सभेचे व्याप ह्या सालीं प्रमाणाबाहेर वाढले व त्यांच्यांत चकमक सुरू झाली. पुण्यास आगरकरांनी सुधारणेची गर्जना चालवली तर 'केसरी' नें राष्ट्रीय प्रगतीची कांस धरली. ह्या सामाजिक प्रगतीला पहिला जोराचा धक्का आगरकरांच्या मृत्यूनें त्याच वर्षीं बसला. रानडे राष्ट्रीय सभेंतूत बाहेर पडलेलें. त्यांना कोणी विचारीना. पुण्यांत राष्ट्रीयत्वाच्या नांवाखालीं कांहीं बेजबाबदार मंडळींनीं सामाजिक परिषदेवर बहिष्कार घालतांना जरासुद्धां सभ्यता पाळली नाहीं. या दांभिक लोकांच्या वैदिक धर्माच्या खोट्या अभिमानाचा उल्लेख 'इंदुप्रकाशांत' पुढीलप्रमाणें आला आहे. " –या मंडळीचे कर्मनिष्ठपणाचें आणि आचारावलंबनाचें फारच अवडंबर माजलेलें आहे., या अवडंबराचे आंत मात्र कोणीं डोकावतां कामा नये. बाहेरून

सोंवळेपणाचें अवडंबर माजवून कायिक, वाचिक, मानसिक असे अत्यंत निषिद्ध अनाचार मनसोक्त करणारी मंडळी अशा सोंवळ्या मंडळीमध्यें कमी नसते. अभक्ष्य-सेवन, अपेयपान, वगैरे प्रकारचीं अनेक पापें करूनही नीचपणानें वैदिक धर्मा-भिमानाचा डांगोरा पिटावयाचा, असला अधमपणा परमेश्वराचे घरीं तरी खचित अक्षम्य होईल अशी आमची खातरी आहे." ( २८-१०-१८९५ ). ह्या अशा खोट्या आचारांना उत्तर म्हणून सनातन वैदिक धर्म व वारकरी धर्म ह्यांची चर्चा शास्त्रीबोवांनीं केली.

'महाराष्ट्रधर्म' ह्या शब्दाचा इतिहास मराठी वाङ्मयांतला एक मनोरंजक व बोधप्रद इतिहास आहे. शास्त्रीबोवांनीं हा शब्द रानड्यांच्या त्याच स[illegible]च्या व्याख्यानांतून उचलला. रानड्यांनी तो शब्द रामदास स्वामींच्या दासबोधांतून घेतला. रामदासांच्या दासबोधानें झाला नाहीं, रानड्यांच्या व्याख्यानानें झाला नाहीं, तेवढा हा शब्द शास्त्रीबोवांच्या व्याख्यानानें व लेखानें मराठींत गाजला व रुळला.

त्यानंतर इतिहासाचार्य राजवाडे यांनीं १८९९ सालीं मोदवृत्त छापखान्यांत 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें,' भाग पहिला, ह्या आपल्या पहिल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत महाराष्ट्रधर्माची रामदासी बाण्याची चर्चा केली आहे. जरी ह्यांत शास्त्रीबोवांच्या व्याख्यानाची थोडी छाप असली तरी ही प्रस्तावना स्वतंत्र विचारांनीं भरलेली आहे. पण राजवाड्यांची भूमिका केवळ इतिहासज्ञाचीच असल्यामुळें सर्वसाधारण जनतेला ह्या सुंदर विचारांची अजूनही ओळख पटली नाहीं. उलट शास्त्रीबोवांच्या व्याख्यानाचा उद्देश तात्कालिक लोकजागृति असल्यामुळें हें व्याख्यान अतोनात चर्चिलें गेलें. त्यामुळें तेव्हांपासून 'महाराष्ट्रधर्म' हा 'सत्याग्रहा' प्रमाणेंच एक घरोब्याचा शब्द होऊन बसला. मात्र ह्या धर्माचें विवेचन ह्या दोन विद्वानांचेंच खरें आहे. राजवाड्यांनी महाराष्ट्र धर्मावर लिहिलें तें बहुतेक टांचणवजा आहे. त्यांना त्याबद्दल पुष्कळ लिहावयाचें होतें. पण अवसर सांपडला नाहीं. राजवाडे व शास्त्रीबोवा ह्यांच्या विचारांच्या दिशेमध्यें फरक एवढाच कीं राजवाडे रामदासांचे एकांतिक स्तोते, तर शास्त्रीबोवा सर्व संतांचे व पूर्ण भक्तिमार्गी. राजवाड्यांची दृष्टि देशाच्या स्वातंत्र्याकडे, तर शास्त्रीबोवांची सामाजिक उन्नतीकडे. शास्त्रीबोवा व राजवाडे यांच्या महाराष्ट्रधर्माच्या विधानाबद्दल थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं शास्त्रीबोवांचें व्याख्यान महाराष्ट्र-जननीच्या कपाळावरच्या ठळठळीत कुंकुम तिलका प्रमाणें लोकांच्या

नजरेंत भरलें पण राजवाड्यांचें लेखन पदराखालच्या मंगळसूत्राप्रमाणें आड राहिलें. पुढें पुष्कळ वर्षांनीं (१९२५) श्री. विनोबा भाव्यांनीं 'महाराष्ट्र धर्म' म्हणून मासिक चालविलें त्यांत भावना शास्त्रीबोवांची, बाणा राजवाड्यांचा आणि कार्य गांधीजींचें अशीं एकंदर त्यांच्या लेखनाची परिणति झाली. आतां महाराष्ट्र धर्मावर ह्याच स्वरूपांत लेखन करावें लागेल हें निश्चित.

'महाराष्ट्र धर्म' म्हणून एक पुस्तक राजवाड्यांचे चरित्रकार श्री भा. वा. भट ह्यांनीहि लिहिलें आहे.

---

## – २६ –

## उमेदवारांची साडेसाती

"बरें तें बरें, वाईट तें वाईटच; वाजवी तें वाजवीच, गैरवाजवी तें गैरवाजवीच; शेंवटीं सत्याचाच जय"–अशा अभिप्रायाची अखेरी डॉ. भांडारकरसाहेबांनी गेलेसालीं उपाध्यक्षाच्या नात्यानें विद्यापीठाच्या सनदेसाटीं जमलेल्या त्या त्या विद्यार्थ्यांस विशेष आठवण राहाण्याजोग्या प्रसंगीं लेखी भाषण संपवितांना मारली आहे, ती फार सुरेख मारली आहे...

**साडेसातीचे पूर्वींचा रंग**—परीक्षेच्या पैल तडीस लागलेल्या पुष्कळांस इंग्रजी भाषेची ओळख चांगलीशी झालेली नसते आणि अभ्यासाचा बोजा बराच पडल्यामुळें परीक्षेच्या विषयांमध्यें जास्त आंत शिरण्यास फुरसत सांपडत नाहीं, अशा प्रकारची कुरकुर उमेदवार मंडळीच्या बाहेर बरीच वर्षें चालली होती. एकंदरीत विचार करतां कुरकुर वावगी नव्हती. इंग्रजी भाषेची ओळख जितकी जास्त होईल तितकी इष्ट —

हा मुद्दा निर्विवाद आहे. पडलेल्या बोजाची नीट निरवानिरव करतां येऊन, विषयामध्यें जास्त आंत शिरण्यास एकंदरींत थोडी फुरसत सांपडावी -- हा मुद्दाही पूर्वीच्या मुद्याप्रमाणेंच निर्विवाद आहे. हे दोन्ही मुद्दे उघड समंजसपणाचे. जे मुद्दे उघड समंजसपणाचे त्यांच्या संबंधानें गोरे व काळे यांच्यामध्यें एकंदरींत मतभेद पडणें नाहीं. अर्थातच "विषय न वाढवतां निरवानिरव करावी" अशा अर्थाची सूचना चेंबर्ससाहेबांनी केली, ती विद्यासभेनें मंजूर केली.

**साडेसातीचें स्वरूपः** -- येथपर्यंत सूचनेचें जें स्वरूप एकंदरींत बाहेरच्यांच्या दृष्टीस पडलें होतें, तें निभ्रांत साडेसातीचें नव्हतें. सुधारणें हें जसें गोऱ्यांस इष्ट, तसेंच काळ्यांस इष्ट. आज इंग्लंडांतल्या गोऱ्यांची जी स्थिति दिसत आहे, ती सुधारतां सुधारतां त्यांस आलेली आहे. आम्हांमध्यें जीं व्यंगें दिसतात तीं नाहींशी करून टाकणें हें जसें एकंदरींत थोर मनाच्या गोऱ्या राजकर्त्यांस इष्ट, तसें ती नाहींशी होणें आम्हा काळ्यांसही इष्ट. तेव्हां विद्यापीठाच्या अभ्यासामध्यें जीं व्यंगें दिसलीं तीं काढून टाकण्याच्या संबंधानें गोऱ्यांचा आणि काळ्यांचा जूट झाला, हें ही योग्य झालें. चेंबर्ससाहेबांनीं सूचना केली होती, ती योग्य होती, ती गोऱ्यांनीं आणि काळ्यांनीं मिळून जुटीनें केली हेंही योग्य केलें. याकाळीं साडेसातीचें स्वरूप निदान बाहेरच्यांच्या तरी लक्ष्यांत आलें नव्हतें. आकाशांत मळभी आलेली नसतां, आणि सांगण्यासारखा गरमाही होत नसतां एकदम अकालीं मळभी येऊन मुसळधार कोसळते आणि लगेच नदीस पूर येऊन कांठीं वसलेलीं गांवें क्षणांत वाहून जातात, तशी अत्यंत घातक आणि फसवणारी हवा कधीं कधीं होते, असें परकी लोक म्हणतात. चेंबर्ससाहेबांची सूचना मंजूर झाली तेव्हां विद्यापीठाची हवा जरी कोणत्याही प्रकारें मळभी न आलेली भासली, तरी लौकरच जोरानें बिघडत गेली आणि भलतेंच -- निदान बाहेरच्यांच्या ध्यानीं मनी नव्हतें असलें -- पिलूं बाहेर आलें. अशा प्रकारचें तऱ्हेवाईक पिलूं डोहाळे लागलेल्या विद्यापीठाच्या पोटांतून बाहेर पडेल, असें तें बाहेर येईपर्यंत बाहेरच्यांस

वाटलें नव्हतें. प्रत्येक परीक्षेस इंग्रजी निबंधाचा एक जास्त कागद जोडण्यांत आला, त्यांत तऱ्हेवाईकपणा बिलकूल दिसला नाहीं; कारण इंग्रजीची ओळख किती झाली आहे ती इंग्रजींतच निबंधाचा प्रसंग उमेदवारावर कोसळल्याविना नीट कळणें नाहीं. "बी. ए." चें एक वर्ष वाढलें, त्यांतही तऱ्हेवाईकपणा नव्हता. कारण वर्ष वाढवण्याचा ठराव पूर्वीच मंजूर करण्यांत आला होता. पण "बी. ए" च्या परीक्षेस दोन इतिहासाचे आणि एक अर्थशास्त्राचा असे ३ कागद जास्त जोडण्यांत आले तें काम मात्र व्हावें तसें झालें नाहीं. ठरावाबर्हुकूम जसें वर्ष वाढणें इष्ट होतें, तसें विषय न वाढणें इष्ट होतें. पण विषय वाढूं नयेत असा मूळचा ठराव असतां, दोन विषय आणि तीन कागद निमूटपणें जास्त जोडण्यांत येतात ! ! !

याप्रमाणें दोन विषय आणि तीन कागद जास्त जोडले जावे आणि गोऱ्याचे किंवा काळ्याचें लक्ष तिकडे पोंचू नये ही मोठया खेदाची गोष्ट नव्हे काय ? निरवानिरव लावण्यांत आली आहे, ती ठरावाबरोबर आहे कीं नाहीं, हे पहाणें जसें नीतीच्या बाहेर पाऊल टाकण्यास भिणाऱ्या प्रत्येक गोऱ्याचें तसेंच प्रत्येक काळ्याचें पहिलें कर्तव्य. जें ठरावाबर्हुकुम तें ठरावाबर्हुकुम, अर्थातच वाजवी; जे ठरावाबर्हुकुम नव्हे, तें ठरावाबर्हुकुम नव्हे, अर्थातच गैरवाजवी. जें वाजवी तें अर्थातच बरें आणि खरें; जें गैरवाजवी ते अर्थातच वाईट आणि खोटें. विद्यासभेच्या सभासदांनीं जो ठराव करावा त्याच्या उघड उलटी अशी निरवानिरव लावणें जितकें व्यवस्थापक मंडळीस शोभत नाहीं, तितकेंच निरवानिरवीच्या गैरवाजवीपणाकडे लक्ष पोंचवणारा एकही सभासद नसावा हें विद्यासभेस शोभत नाहीं. जशी निरवानिरव करणाऱ्या मंडळींचीं तशींच विद्यासभेच्या सभासदांचीं कामें शंकेच्या सांवलीच्याही पलीकडे हांकभर असण्याजोगीं चोख हवींत. जर तीं चोख असलीं, तरच उदाहरण सुरेख पडून उमेदवारांची भक्ति विद्यापीठावर नीट बसेल आणि ब्र ही काढण्याची कोणाही बाहेरच्याची छाती होणें नाहीं. जर मूळचा ठराव एक, निरवानिरव भलतीच, आणि ती भलतीच हे

कोणाही विद्यासभेच्या सभासदास दिसत नाहीं, तर विद्यापीठाविषयीं किंवा व्यवस्थापक मंडळीविषयीं किंवा विद्यासभेविषयीं उमेदवारांची आणि बाहेरच्यांची पूज्य बुद्धी रहाणार कशी ? सारांश पूर्वीची हवा स्वच्छ आणि सुरेख असतांही एकाएकीं विषय वाढून कागद वाढले आणि जी चॅंबर्स साहेबांची पूर्वीची साधी सूचना होती, तीच साडेसाती बनून उमेदवारांच्या बोकांडीस बसली.[१]

---

१ उमेदवारांची साडेसाती, पृ. १–४; १८९५.

ह्या निबंधाची पार्श्वभूमी फार गंभीर व मनोरंजक आहे. गव्हर्नर लॉर्ड हॅरिस, १८९४ सालच्या हिंदुमुसलमानांच्या दंग्याचे जनक, सेवानिवृत्त व्हावयाचे, म्हणून मुंबई विश्वविद्यालयाचे उपगुलगुरु डॉ. भांडारकर ह्यांनीं योग्य वेळीं पदवीदान समारंभ न ठेवतां तो १२ फेब्रुवारीला घडवून आणला आणि हॅरिससाहेबांची मनसोक्त स्तुति केली. विद्यार्थ्यांना तें न पटून सभेंत गोंधळ झाला आणि त्यावर पुष्कळ जाहीर टीका झाली. हॅरिसबद्दलचा हा पक्षपात व लोकमताला न विचारण्याचा प्रघात पुष्कळ दिवस हॅरिसभांडारकरी म्हणून ओळखला जात असे. ( इंदुप्रकाश, ४–२ व ११–३–१८९५. त्याशिवाय परिशिष्ट, केसरी पहा ). परंतु त्याच सुमारास विद्यार्थ्यांवर पडणारे अभ्यासाचें ओझें आणि नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें वाढतें प्रमाण याकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें. त्यावेळीं शास्त्रीबोवांनीं या लेखाचा उपोद्घात इंदुप्रकाशांत छापला ( १८–२–१८९५ ). पुढें न्यायमूर्ति रानडे त्या काळीं मुंबईतच राहात असत व त्यांच्याकडे शास्त्रीबोवांचें जाणें येणें फार असे, त्या वेळी वरील सर्व चर्चांना योग्य तोंड फुटून रानड्यांनीं दोन सूचना सीनेटपुढें आणल्या, एक म्हणजे नापास झालेल्या उमेदवारास शेंकडा ४५ गुण मिळाले तर त्याला त्या विषयाची परीक्षेंत सूट असावी आणि बी. ए. पर्यंत विश्वविद्यालयाच्या ज्या परीक्षा असतात, त्या तीनच असाव्या. ह्या दोन्हीं सूचना त्यावेळीं भांडारकर व रानडे ह्यांच्यांत जंगी वादविवाद होऊन युरोपियनांचें पाठबळ भांडारकरांस मिळाल्यामुळें फेंटाळल्या गेल्या. त्यांतल्या त्यांत लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं न्यायमूर्ति तेलंग, शंकर पांडुरंग पंडित आणि त्या वेळेस नुकतेच वारलेले आगरकर ह्यांच्या अकालीं मरणानें जनता विद्ध झाली. अभ्यासाचा बोजा कमी केल्यास तरुण पिढी अशी अल्पायु होणार नाहीं अशी अंधुक आशा त्या वेळीं बऱ्याच जणांना वाटत

होती. आणि म्हणून जनतेनें त्यावेळीं रानडे-भांडारकर यांच्याकडे धाव घेतली. " वरील वादांत कोणताही मतभेद असला तरी दोघांही विद्वानांच्या मतें सुशिक्षित मंडळीचें आयुष्य परिमाण कमी होण्याचें एक मुख्य कारण विश्वविद्यालयांतून त्यांजवर जो बोजा लादला जातो, तें होय असें निष्पन्न झालें आहे. आणि तेच उद्गार सर्व हिंदुस्थानभर निघाले आहेत," असा उल्लेख इंदुप्रकाशांत आढळतो. ( इंदुप्रकाश, आगरकर मृत्युलेख, २४-६,१८९५ आणि विश्वविद्यालयांतील सुधारणा किंवा ना०रानडे यांच्या दोन सूचना, २-९-१८९५. )

अशा तऱ्हेच्या विचारविनिमयांतून विद्यार्थ्यांना योग्य तें ज्ञान मिळावें पण अभ्यासाचा बोजा वाढूं नये म्हणून शास्त्रीबोवांनीं वरील लेख लिहिला.

---

## -- २७ --

# शिवाजीचें स्मारक

( शिवाजीचें स्मारक करावें अशी एक चळवळ १८९५ सालीं महाराष्ट्रांत जोरानें पुढें आली होती. त्यावेळीं वर्तमानपत्रांत त्याबद्दल निरनिराळ्या सूचना येत. उदाहरणार्थ, इंदुप्रकाश "श्री शिवाजीचा पुतळा," एक राष्ट्रहितचिंतक; ८ जूलै, १५ जूलै, ५ आगस्ट १८९५; राजारामशास्त्री भागवत शिवाजीचे निःसीम चहाते व पहिले चरित्रलेखक. त्यांनीं खालील लेखांत शिवाजीचें 'गुणमय' स्मारक कसें असावें ह्याबद्दल विवेचन केलें आहे. स्मारकाची सूचना पहिल्यानें A Book of Bombay करणाऱ्या डग्लस साहेबांनीं केली असें शास्त्रीबोवा म्हणतात. )

शिवाजी जितका देशाभिमानी होता, तितका धर्माभिमानी किंवा जात्यभिमानी नव्हता. छत्रसाल हा हिंदु राजा पदरीं रहातो म्हणून म्हणत

असतां शिवाजी त्यास पदरीं ठेवीत नाहीं आणि विजापुरकरांचीं मुसलमानी पतकें बेकार होऊन आश्रय मागण्यासाटीं आलीं होतीं, त्यांस पदरीं ठेवतो. जर शिवाजीस धर्माभिमान जास्त असता आणि देशाभिमान तितका नसता, तर शिवाजीनें हिंदु छत्रसालास आश्रय दिला असता, मुसलमानांच्या पतकांस आश्रय दिला नसता. विजापुरीं परदेशी आणि स्वदेशी किंवा दक्षिणी अशा मुसलमानांमध्यें दोन फळया असून, स्वदेशी किंवा दक्षिणी फळीचा ओढा शिवाजीकडे असे, आणि शिवाजीचाही ओढा त्याच फळीकडे असे. याप्रमाणें शिवाजीचे आंगीं देशाभिमानाचें वारें होतें; आणि हें वारें असें दोन्ही ठिकाणीं नांदत होतें, म्हणून शिवाजीचें पुष्कळ काम सहज होऊं शकलें. प्रसंग पडला कीं, विजापूरकरांच्या वतीनें दिल्लीपतीशीं टक्कर मारण्यास शिवाजी देशाभिमानानें तयार. इतकी सुरेख उन्नति शहाजीच्या मार्फत विजापूरकरांशीं तह झाल्यांनंतर शिवाजीची झाली होती. जसें ब्राह्मण आणि कायस्थ प्रभु गडास आई समजत, तसे मराठी क्षत्रिय आणि मांग ही आई समजत. याप्रमाणें जात्यभिमानास शिवाजीच्या राज्यांत मज्जाव होता, म्हणून मराठेशाहीचा पाया पडूं शकला. तेव्हां शिवाजीस जो अभिमान होता तो देशाभिमान होता, धर्माभिमान किंवा जात्यभिमान नव्हता, हा एक मोठा मुद्दा स्मारक करूं पाहणारांनीं विशेष लक्षांत ठेविला पाहिजे. पुष्कळ स्वदेशी मुसलमानांनीं शिवाजीचे काळापासून महाराष्ट्राची सेवा केवळ देशाभिमानानें--धर्माभिमानास बरेच प्रसंगीं पाठीं टकलून—केली आहे, हा ही मुद्दा स्मारक करूं पहाणाराचे दृष्टीपुढून जातां कामा नये. शिवाजीच्या अमीरांचा मुख्य दर्यासारंग हा मुसलमान असून त्यानें अखेर पर्यंत शिवाजीची सेवा नेकीनें आणि इमानानें केली. घोड्याचा पाय किल्ला चढतांना घसरला, तेव्हां शेख मिरा पुढें न होता, तर शाहू घडघडून ठार झाला असता. पाणिपतच्या लढाईंत इब्राहिम गार्दी यानें कशी शिकस्त केली ती महशूर आहे. अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला बाजूचा होता, म्हणून मराठी लोकांचें क्लेश पाणिपत मुक्कामीं पुष्कळ कमी झाले. ही गोष्ट इतिहास वाचणाराच्या

लक्षांत आल्याशिवाय राहणारी नव्हे. याप्रमाणें मुसलमानांनीं जी देशसेवा आजपर्यंत केली, तीही स्मारक करूं पाहणारांनीं आपल्या दृष्टीपुढें खडी करून ठेविली पाहिजे.

आज पांढरपेश्यांचें पाऊल एकंदरीत पुष्कळ पुढें आहे. आणि जसें मागासलेल्या दक्षिणी हिंदूंचें तसेंच दक्षिणी मुसलमानांचें पाऊल पुष्कळ मागें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. जर शिवाजीचें स्मारक करावयाचें, तर त्या अवतारी पुरुषानेंच दाखवलेली दिशा स्वीकारली पाहिजे. मंडळांतील संप वाढण्यास आंतल्या पोटभेदांमध्यें अंतर पडत चाललें आहे. तें हळूहळू कमी होईल. जसा हिंदु मुसलमानांमध्यें तसाच एकंदरींत हिंदूंच्या आणि मराठी हिंदूंच्या पोटभेदांमध्यें फुटीचा अंमल आज पुष्कळ बसलेला दिसतो. तर निदान महाराष्ट्र देशांत फूट हळूहळू कमी होऊन संप वाढेल कसा, त्याचा विचार करूं.

फूट कमी होत जाऊन जसें संप वाढविण्याचा मार्ग शिक्षण हाच काय तो एक दिसतो, तसेंच धर्म, लिहणें वाचणें, इतिहास भूगोल आणि अंकगणित पूर्णांक, अपूर्णांक, त्रैराशिक, व्याजबट्टा यांची चांगली माहिती झाली पाहिजे. गायत्री शिकवूं म्हटल्यास किंवा वेदाक्षर शिकवूं म्हटल्यास पुष्कळ अडचणी येणार. धर्माचीं तत्वें प्रत्येकाच्या मनांत ठसलीं तर पाहिजेत. धर्माची ज्यांस मस्करी करणें असेल त्यांनीं खुशाल करावी. पण धर्माशिवाय जसें जलाशिवाय मत्स्यास तसें मानवी प्राण्यास साधारण जीवन नाहीं, ही गोष्ट एकंदरींत निर्विवाद आहे. तेव्हां अशा प्रकारचें धर्मशिक्षण तर हवें आणि तेंही मराठींतूनच शक्य; एकंदरींत संस्कृतांतून शक्य नाहीं. संस्कृतांतून धर्मशिक्षण आणि असलेंच दुसरें विशिष्ट शिक्षण ज्या आईबापांस जरूरी वाटत असेल त्यांच्यावरच ढकलणें, हा उत्तम मार्ग. भक्तीचा अधिकार सर्वांसही सारखा आहे. या संबंधानें आपल्या देशांत मतभेद नाहीं. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, चोखामेळा, शेख महंमद ही सगळी मंडळी केवळ भक्तीनें पावन झालेली. हा मोठा सिद्धांत कोणा ब्राह्मणासही अमान्य होणें नाहीं. असल्यांची भक्तिपर

सरस्वती शिकविण्याची वहिवाट ठेवली, म्हणजे धर्मशिक्षणाचें बरेंच काम झालें. " जाऊं देवाचिया गांवा । देव देईल विसावा । " असले तुकारामाचे अभंग मुसलमानांसही शिकवतां येतील.

याप्रमाणें खालचें शिक्षण विशेषें करून मागासलेल्या हिंदूस आणि मुसलमानांस मिळावें हा हेतू जाहीर केल्यानें कित्येक शेट यांची द्रव्यद्वारा मदत मिळण्याचा संभव आहे. तीन वर्षें किंवा चार वर्षें इतक्या शिक्षणास बस दिसतात. ज्या शाळा अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं स्थापन करण्यांत येतील, त्या शाळांस " शिवाजी शाळा " असें नांव देण्यांत यावें. आणि जो फंड जमविण्यांत येईल त्यासही " शिवाजी फंड" नांव द्यावें. ज्याची जन्मभाषा मराठी असेल त्यास हें शिक्षण तीन किंवा चार वर्षें फुकट मिळावें. जो कोणी आपला मुलगा पाठवणार नाहीं, त्यास शिक्षा मिळण्याचा कायदा सरकारकडून पसार करून घ्यावा. पांढरपेश्यांच्याही मुलांकडून फी घेऊं नये. तर दर माणशीं प्रत्येक वर्षी त्यांनीं "शिवाजीची पट्टी " इतकी घ्यावी असा म्युनिसिपालिटीनें नियम ठेवावा. असें केल्यानें खालचें शिक्षण एकंदरींत लोकांचें हातीं येईल आणि शिवाजीचें नांव सर्वतोपरी गाजेल. इतकेंच नाहीं, तर लोकांस भक्तीचा मार्ग दाखवल्यासारखा होऊन संतमंडळीचीही आठवण जागती राहील. शिवाजीच्या अंगीं धर्माभिमान आणि जात्यभिमान या दोहोंहून देशाभिमान वरचढ झालेला होता. असल्या महापुरुषाचें जर स्मारक करायाचें, तर तें देशाभिमानांत धर्माभिमान आणि जात्यभिमान बुडून जाईल अशाच प्रकारचें हवें. दुसऱ्या प्रकारचें कोतें किंवा एतद्देशीय स्मारक करूं पहाणें हें शिवाजीच्या वंद्य नांवाची मस्करी करूं पाहण्यासारखें भासतें.[1]

---

१ इंदुप्रकाश पत्रव्यवहार, ता २२-७-१८९५. ह्यालाच पुरवणी म्हणून "खाफीखान आणि शिवाजी" ह्या मथळयाखालीं दुसरा लेख शास्त्रीबोवांनीं लिहिला आहे. त्यांत शिवाजी कुराणाचा व मशिदींचा आदर करी, ही खाफीखानाची कबूली मुख्य आधार आहे. ह्या लेखांत १८९४ साली लोकमान्य टिळकांनीं ' मुसलमानांच्या नाकांत काड्या घालण्यासाठीं ' मुद्दाम मेळे भरविले म्हणून शास्त्रीबोवांनी

विनाकारण जातिद्वेष कोणत्याही प्रकारचा फैलावण्यास मदत करूं नका असा पुढारी ब्राह्मण मंडळींस स्पष्ट इशारा दिलेला आहे. इंदुप्रकाश, १२-८-१८९५.

---

## --२८--

# ज्ञानोबाची पालखी आणि गणेशचतुर्थी

नवीन देऊळ बांधणें बरें कीं जीर्णोद्धार करणें बरें ? उघड जीर्णोद्धार करणें बरें. पंढरपुरासारख्या क्षेत्रीं नवीन देवळाची जरूरी नाहीं. जेथें विठोबासारखी जागती जोत—ज्ञानोबा तुकारामांसारख्या अवतारी पुरुषांचा श्वासोश्वास जीस दिवसेंदिवस जास्त पेटवीत चालला आहे, अशी एकसारखी जळत आहे, तेथें तुमच्या आमच्या सारख्या क्षुद्र काजव्याच्या ठिणगीचा उजेड तो काय पडणार ! सूर्यापुढें दिवटीची मातबरी नाहीं, तशी ज्ञानोबाच्या पालखीच्या मेळ्यापुढें आजकालच्या मेळ्याची मातबरी नाहीं. जर पुणेंकर पुढाऱ्यांचा हेतु लोकांची धर्मवासना बळकट करण्याचा होता तर, ज्ञानोबाच्या पालखीचा मेळा वाढवणें हाच एक राजरस्ता होता. तो राजरस्ता न स्वीकारतां गणेशचतुर्थीसारखी गेले सालीं एक नवीनच आडवाट शोधून काढली, हें काम कोणतेंही राष्ट्रीयकाम जितक्या धोरणानें झालें पाहिजे तितक्या धोरणानें झालें नाहीं. आजची ज्ञानोबाची पालखी आमच्या तुमच्या सारख्यांच्या खांद्यावर नाहीं तर, निवृत्ति, ज्ञानदेव सोपानदेव, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम या समर्थांच्या खांद्यांवर आहे. आजच्या मंडळींत या समर्थांच्या तोडीचा कोणीच नाहीं. मुक्ताबाईची बरीच योग्यता आजच्या काळीं आंगीं आलेली रमाबाई ही पुणेंकरांनीं

वाहिलेल्या लाखोल्या प्रेमानें स्वीकारून शारदासदनांत बसली आहे;[1] आणि एकनाथाचें वारें अंगीं थोडें भरलेले रावबहादूर रानडे तूर्त मुंबईत वास्तव्य करून आहेत. तेव्हां मुक्ताबाईचें दर्शन आणि तिची मठिका पुणें. करांनीं जर आपण होऊन वर्ज केलेली आणि एकनाथाची मसलत जर पुणें-करांस एकंदरींत रुचत नाहीं, तर गणेशचतुर्थीचा मेळा निर्विघ्न चालून राष्ट्रीय होण्यास जो पुण्याईचा जबरदस्त अंश पदरीं लागतो, तो कोणत्या अपूर्व बाजारांतून पुणेकर मंडळी विकत आणणार तें कळत नाहीं. जुना एक बडा राष्ट्रीय मेळा जागता असतां दुसरा एक छोटा एकदेशी मेळा नवीनच सुरू करणें हें कोणत्याही प्रकारें संप वाढण्याचें लक्षण म्हणतां येत नाहीं; हें नवीन घरफूट पाडण्याचें लक्षण. तर यंदा दाढी धरून मुसलमानांस ओढणारे गणपती प्राणप्रतिष्ठेच्या पूर्वींच एखाद्या तळयांत बुडवून आणि तेणेंकरून राष्ट्रीयपणा आलेल्या मेळयाची मजल नीट पोंचवून, निदान पुढचें सालापासून घरफूट काढून टाकण्याच्या मार्गास पुणेंकर बंधू लागतील अशी उमेद बाळगतों.[2]

---

१ पंडिता रमाबाई ख्रिस्ती झाल्या तरी शास्त्रीबोवांचा त्यांच्या विषयींचा आदर यत्किंचित् कमी झाला नाहीं. तो त्यांनीं वेळोवेळीं व्यक्त केला आहे उदाहरणार्थ, वैधव्य जर दुर्दैवामुळें कोसळतें, तर खास सुदैवामुळेंही कोसळतें. शारदासदनाची पंडिता रमाबाई मोठी सुदैवाची, मोठी भाग्याची म्हणून विधवा झाली; आणि वैधव्याच्या आश्रमांत राहून तो आश्रम सफळ करण्याची वाट विधवांस आजही दाखवीत आहे. (वपन व क्षत्रिय वैश्य. विविधज्ञानविस्तार, पुस्तक २९, पृ. ३३५-४५ ) शास्त्रीबोवांप्रमामाणेंच आगरकरांनाही रमाबाईबद्दल फार आदर. रमाबाईच्या सदनांतील बारा मुलो ख्रिस्ती झाल्या तेव्हां लोकांनीं त्यांवर काहूर केलें. विशेषतः केसरीनें. त्यावर दुर्गुणी पुरुषांना सोडून त्या 'अबलेवर तोफा डागण्या' बद्दल आगरकरानीं केसरीवर ताशेरा झाडला आहे. ( सुधारक, २५,-९-१८९३ ). यावर तोडगा, इंदुप्रकाशानें बाईबद्दल आदर ठेवूनही एक हिंदु विधवांकरितां संस्था काढावी म्हणून सूचना केली आहे (इंदुप्रकाश एक नवी संस्था पाहिजे. २-१२-१८९५ )

२ इंदुप्रकाश, पत्रव्यवहार, १-७-१८९५. गणेशचतुर्थीचा सार्वजनिक उत्सव. १८९४ सालीं लॉर्ड हॅरिस ह्यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानभर जे दंगे झाले

त्यांच्या बुडाशीं सर रिचर्ड टेंपल ह्याचें ' हिंदुस्थानांत हिंदु-मुसलमानांचें वैर राखणें हीच इंग्रजी राज्याची मजबुती ' हें तत्व होतें. त्यामुळें मुसलमानांत व हिंदूंत सर्वतऱ्हेनें वितुष्ट पाडण्याचा डाव ब्रिटिश मुत्सद्यांनीं खेळण्यास आरंभ केला. येथपासून मुसलमानांस चढविण्यास सुरवात झाली. ह्या दंग्यास तोंड देण्याकरतां आणि ब्रिटिश मुत्सद्यांच्या कारागिरीस जणूं कांहीं खत घालण्या-साठींच हिंदूंनींही मुसलमानांविरुद्ध मोहीम सुरूं केली. ह्या वेळीं हिंदूंनीं हिंदूधर्मावर निष्ठा ठेऊन मुसलमानास तोंड द्यावें ही वृत्ति बळावत चालली. शिवाजीच्या स्मार-काची कल्पना पण ह्यांतूनच उदय पावली. ( इंदुप्रकाश, ४-१ १८९५, २४-६ १८९५, ५-८-१८९५) अशा ह्या पिसाट आणि कोत्या जात्याभिमानाला आळा पडावा म्हणून शास्त्रीबोवांनीं वरील लेख लिहिले. पण त्यावेळीं सरकारचें व पर्यायानें मुसलमानांचें सगळेंच वर्तन इतकें बेमुर्वत होतें, व त्यास डॉ. भांडार-करांसारख्यानींही लॉर्ड हॅरिसचा लोकमताविरुध्द जाऊन उदो उदो केल्यानें, राष्ट्रीय आणि धार्मिक कुठलीही चळवळ असो, लोकांनीं ती दूरचा विचार न करतां उचलून धरली. त्यामुळें राष्ट्रीय लढा बळावला पण जातींचें वैरही त्याच प्रमाणांत फोंफावत गेलें. ब्रिटिश सरकारला मिळणाऱ्या प्रत्येक तडाख्यानें, सरकार हिंदुमुसलमान तेढीला अटीतटीनें जोपासूं लागलें. कारण तेंच त्याचें अंतीम बळ होतें. अर्थात् पुण्यांत व पर्यायानें महाराष्ट्रांत १८९५ नंतर लो. टिळकांच्या प्रेरणेनें गणेशोत्सव व मेळे अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळें शास्त्रीबोवांचे हे उद्गार टिळकभक्तांना मूर्तिभंजकाच्या प्रहाराप्रमाणें वाटले, यांत नवल नाहीं.

---

## -- २९ --

## न मांसभक्षणे दोषः

(रा. रा. विस्तारकर्ते यांस, या मजकुराचें सार काढून तें इंदुप्रकाशाकडे पाठवलें होतें. पण इंदुप्रकाशाच्या कर्त्यांस तें सार आपल्या पत्रीं छापणें

प्रशस्त वाटलें नाहीं. म्हणून हा मजकूर आपणांकडे पाठवण्यांत येत आहे. हा सगळा मजकूर वाचकांस एकदम वाचावयास मिळेल, अशी तजवीज आपणांकडून होईल अशी आशा बाळगतों-राजाराम रामकृष्ण भागवत)

"दारु पिणें" आणि "स्त्रीसंग करणें" या ही दोन बाबींचा या निबंधांत कमजास्त विचार होईल. विचार होईल तो धर्मशास्त्राच्या दृष्टीनें होईल, दुसऱ्या कोणत्याही शास्त्राच्या दृष्टीनें होणें नाहीं. निबंध लिहिणारास स्वतःचें मत नाहीं. तिऱ्हाइताच्या दृष्टीनें म्हणून त्यानें हा यत्न केला आहे. सगळे ब्राह्मण मांस खाणारे किंवा दारु पिणारे झाले, तरी निबंध लिहिणारा तिऱ्हाईत; सगळया लोकांनीं मांस व दारु हीं सोडलीं, तरीही हा निबंध लिहिणारा तिऱ्हाईत.

श्रुतींचा विचार करण्याचा प्रसंग निदान मांसाच्या संबंधानें नको आहे. धर्मशास्त्राची इमारत स्मृतींवर उभारलेली असल्यामुळें, स्मृतींच्याच दृष्टीनें ठराव काय होतो तो पहिल्यानें पहाणें आहे. प्रसंग आल्यास श्रुतींचीही विचिकित्सा होईल तो भाग निराळा. स्मृतींमध्यें मनु व याज्ञवल्क्य या दोन स्मृती जास्त प्रसिद्ध असून कुल्लुकासारखे आणि विज्ञानेश्वरासारखे नामांकित टीकाकार अर्थाची फोड करण्यास मिळतात, म्हणून त्यांच्यावरच विशेष भार ठेवण्यांत आला आहे.............

**प्रवृत्ति व निवृत्तिः—** "मांस खाण्यांत, दारू पिण्यांत, स्त्रीसंग करण्यांत दोष नाहीं; यांकडे प्राण्यांची उपजत प्रवृत्ति असते, निवृत्तीचें फळ मोठें (न मांसभक्षणे दोषो.........श्लोक ५६. अध्याय ५) असें मनु म्हणतो. मांस खाणें, दारु पिणें, स्त्रीसंग करणें हीं सोडलीं, तर "पुण्य पुष्कळ" हें मनूचें म्हणणें. निवृत्त झाल्यास पुण्य पुष्कळ. ठीक आहे. ज्यांस "पुष्कळ पुण्य" हवें, त्यांनीं खुशाल तिन्ही सोडावीं. "प्रवृत्तींत दोष नाहीं," इतकें पुष्कळांस पुष्कळ आहे. मांस खाणारे मांस खाण्यांत, दारु पिणारे दारु पिण्यांत, स्त्रीसंग करणारे स्त्रीसंग करण्यांत, जर पुण्य समजत असतील तर तो समज भलताच म्हटला पाहिजे. पण असा समज कोणाचा असेल असें वाटत नाहीं. प्रवृत्तींत पुण्य नाहीं, हें उघड; पुण्य आणि तें ही पुष्कळ एकट्या वृत्तींत असतें हें ही उघड. जर प्रवृत्तींत

पुण्य नाहीं, हें अगदीं उघड, तर प्रवृत्तींत पाप नाहीं, हें ही उघड. या प्रकारचा एक मोठा व्यापक सिद्धांत मनूनें केला आहे. "न मांसभक्षणे" हा मनूनें प्रकरणाच्या शेवटीं शेरा मारला आहे. ...............

**प्रवृत्तीचे दोन प्रकार:—** सांपडलें जनावर कीं कापलें आणि खाल्लें, असा मनूच्या वचनाचा अर्थ समजूं नये. हें वचन सिद्धांती आहे; म्हणजे या वचनांत जो सृष्टीमध्यें एक ठोकळ सिद्धांत ठरूं पहातो, तो मनूकडून दाखल करण्यांत आला आहे. मांस खाण्यांत एकंदरींत दोष नाहीं इतकाच या वचनाचा अर्थ आहे. मांस खाण्यांत एकंदरींत दोष नाहीं, हें पहिल्यानें दाखल करून मांस खाण्याचे प्रसंग कोणते तेही मनूनें उघड जाहीर करून ठेवले आहेत. प्रसंग कोणते अशी शंका आल्यास, "मधुपर्कांत, यज्ञांत, पितरांच्या किंवा देवतेच्या उद्देशानें केलेल्या कर्मांत — याच तीन प्रसंगीं पशु कापावे, दुसरे प्रसंगीं कापूं नयेत असें मनूनें म्हटलें आहे. वेदाचा ऐवज हातीं आलेला ब्राह्मण या तीन प्रकारच्या प्रसंगीं पशू कापीत होत्सांता आपणा स्वतःस व पशूस उत्तम गती मिळेशी करतो ( मधुपर्के च यज्ञेच...... ४१, ४२ ) असा याच पांचव्या अध्यायांत मनूनें निकाल लावला आहे. हाच न्याय दृष्टीपुढें ठेवून "दर महिन्यास अन्वाहार्य नांवाचें श्राद्ध करायाचें ते मना न केलेलें मांस शिजवून करावें. ( पितृणां मासिकं श्राद्धं...... १२३ ) असें मनूनें तिसऱ्या अध्यायांत स्पष्ट सांगितलें आहे. अर्थातच दर महिना श्राद्ध करायाचें ते मना न केलेलं मांस शिजवूनच केलें पाहिजे. जर हें असें न केलें तर झालेल्या अतिक्रमाबद्दल प्रायश्चित्त घेणें, हाच एक उजू मार्ग जर मांसानें श्राद्ध न केलें तर एका पशूस उत्तम गति मिळण्याच्या आड आल्याचें पाप श्राद्ध करणारास लागतें, आणि हातून पाप घडलें कीं प्रायश्चित्ताचा प्रसंग कोसळला.

"आमंत्रण घेऊन जो ब्राह्मण श्राद्धाचे प्रसंगीं मांस खात नाहीं, त्यास मेल्यानंतर एकवीस जन्म पशूचे घ्यावें लागतात." (यथाविधि नियुक्तस्तु... श्लोक ३५, अध्याय ५ ) अशी मनूनेंच जाहीरात लावली

आहे. याप्रमाणें अमुक प्रसंगीं मांस हवेंच, आणि ज्या पशूचें मांस प्रसंगीं खाल्लें जातें त्या पशूस खाणारा उत्तम गतीस पाठवतो; अर्थातच जसा कित्येक प्रसंगीं पशू कापून त्याची सागुती खाण्यांत बरेंच पुण्यही समजणारा, तसा सागुती न खाल्ल्यास पापही लागतें असें म्हणणारा एक पक्ष होता, असें मनूवरून ठरतें.

सागुती खाऊन पशूवर उपकार करतों म्हणणारी जशी मंडळी होती, तशी सागुती खाण्यांत दोष नाहीं, इतकेंच मानणारी मंडळीही हयात होती. "खरेदी केलेलें, स्वतः कापून किंवा कापवून केलेलें, अगर दुसऱ्यानें पाठवलेले मांस देवांस आणि पितरांस अर्पण करून खाणारास दोष लागतो. ( क्रीत्वा स्वयं...... ३२, अध्याय ५ ) असाही सिद्धांत मनूनें केला आहे. प्रत्येक ब्राह्मणाच्या घरीं रोज सांज सकाळ "वैश्वदेव" झाला पाहिजे. सकाळीं "सूर्याय स्वाहा, प्रजापतये स्वाहा, सोमाय वनस्पतये, अग्नीषोमाभ्याम्" वगैरे आहुती स्वैंपाकाच्या अग्नींत टाकल्यानंतर, याच देवतांस आणि आणखीही कांहीं देवतांस उद्देशून आहुती जमिनीवर ठेवण्यांत येतात, आणि लगेच अपसव्य करून "पितृभ्यः स्वधा" अशी एक आहुती दक्षिणेकडे ठेवावी लागते. अग्नींत आहुती टाकतात ती "होम" किंवा देवयज्ञ. जमिनीवर आहुती टाकतात तें "बलिहरण" किंवा "भूतयज्ञ;" पितृभ्य: स्वधा" हा 'पितृयज्ञ,' याच घडीस जो पाहुणा येईल त्यास जेऊं घालणें हा "मनुष्ययज्ञ" वेदाच्या नेमक्या ऋचा रोज म्हणणें हा "ब्रह्मयज्ञ" संध्याकाळीं "सूर्याय स्वाहा" या आहुतीच्या ऐवजीं "अग्नेय स्वाहा" अशी आहुती येते. याप्रमाणें "देवयज्ञ, भूतयज्ञ, पितृयज्ञ, मनुष्ययज्ञ, ब्रह्मयज्ञ" असें "पंचयज्ञ" प्रत्येक ब्राह्मणाचे घरीं झाले पाहिजेत. पहिल्या तीन यज्ञांस "वैश्वदेव" म्हणतात. अर्थातच खरेदी केलेलें, कापविलेलें किंवा पाठविलेले मांस शिजून त्याचा एकदां होम झाला आणि पितृयज्ञ झाला, म्हणजे यज्ञशेष मांस खाण्याच्या योग्यतेनें झाल्यामुळें खाल्ल्यास दोष लागत नाहीं. अलीकडेस वैश्वदेवाचें माहात्म्य मावळलेली घरें बरींच आढळतात. चित्राहुती

आणि प्राणाहुती या दोन प्रकारच्या आहुती प्रचारांत आल्यामुळें वैश्वदेवाचें माहात्म्य एकंदरींत मावळलेलें दिसतें. चित्राहुती उघड बलिहरणाच्या ऐवजीं आणि प्राणाहुती उघड होमाच्या ऐवजीं. चित्राहुती घातल्यानें भूतयज्ञाप्रमाणें पितृयज्ञही होतो, कारण जसा पितरांच्या राजास तसा त्याच्या दूतास आणि मुख्य कारकुनास बळी मिळतो. पांच प्राणाहुती घेतल्या म्हणजे सहावी "ब्रह्मणे स्वाहा" ही आहुती विशेष मातब्बरीची पडते. ब्रह्मार्पणं ब्रह्म हवि ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्" याचें रहस्य ज्यांस कळतें, त्यासच ब्रह्माहुतीची मातब्बरी कळण्याचा संभव. सारांश चित्राहुती घातल्या आणि प्राणाहुती घेतल्या कीं जें राहिलें तें यज्ञशेष झालें आणि यज्ञशेष झालें कीं खाण्याच्या योग्यतेचें झालें. जेथें मांसाचा होम मना केलेला असतो तेथें आश्वलायन स्पष्ट तसें सांगतो. लग्नाच्या अग्नींत "होम्यं च मांसवर्जम्" असें स्पष्ट म्हणून आश्वलायनानें मांसाचा होम मना केला आहे. पण वैश्वदेवाच्या संबंधानें "अथ सायंप्रातः सिद्धस्य हविषस्य जुहुयात्" इतकें आश्वलायन म्हणतो. जें घरांत "शिजलेलें हविष्य" असेल त्याचा होम करायाचा. "हविष्य" हें देवांस उद्देशून होम करण्यास योग्य ही योग्यता जशी शिजलेल्या भातास आहे, तशी शिजलेल्या बकऱ्याच्या सागुतीस ही आहे. अर्थातच चित्राहुती घातल्यानें आणि प्राणाहुती घेतल्यानें देवतांस आणि पितरांस अर्पण केलेलें मांस खाण्यास मनूच्या मतें उघड दोष नाहीं. जर मांस हविष्य आहे, आणि जर त्याच्या चित्राहुती घालून प्राणाहुतीही घेण्यांत आल्या आहेत, तर तें मांस खाल्लेंच पाहिजे; जर असलें यज्ञशेष मांस खाल्लें नाहीं, तर खाणारावर अर्थातच प्रायश्चित्ताचा प्रसंग कोसळेल.

जर "यज्ञासाठीं किंवा आईबापांच्या अगर पदरच्यांच्या पोषणासाठीं खाण्याच्या योग्यतेचे किंवा देवांस बळी देण्याच्या योग्यतेचे पशू किंवा पक्षी कापणें असतील" तर ते "कापण्याचा अधिकार ब्राह्मणास" आहे. कारण "अगस्त्यानें हा संप्रदाय घातला आहे. ( यज्ञार्थं ब्राह्मणैर्वध्याः....२२, अध्याय ५ ) असें मनू म्हणतो. अर्थातच असल्या

प्रसंगीं पशुपक्षी कापण्याचा किंवा कोणत्याही प्रकारें ठार करण्याचा अधिकार मनूच्या मतें ब्राह्मणास आहे. जर मांस विकायाचें किंवा मित्रमंडळीस पाठवायाचें, तर पशुपक्षी दुसऱ्यानें कापले पाहिजेत, ते ब्राह्मणास कापतां येणें नाहींत. असल्या नेमांच्या संबंधानें जसजसा सूक्ष्म विचार करावा, तसतशीं शास्त्रकारांच्या संबंधानें पूज्यबुद्धि अधिकाधिक वाढत जाते.

या प्रमाणें मांस खाण्यांत आणि पशुपक्षी कापण्यांत एकंदरींत पुण्य न समजतां पाप मात्र नाहीं, इतकेंच समजणारा हा दुसरा पक्ष. याच पक्षास याज्ञवल्क्यानें पाठबळ दिलेलें दिसतें. इतकेंच कीं याज्ञवल्क्यानें आणखी एक प्रसंग जास्त जोडला आहे. " प्राण जातोसा वाटल्यास (तो राखण्या-साठीं ); श्राद्धांतलें, एकाद्या वेदांतल्या देवतेच्या उद्देशानें शिंपडलेल्या पशूचें, ब्राह्मणास जेवूं घालून राहिलेलें, ब्राह्मणांस व पितरांस अर्पण करून राहिलेलें, इतक्या प्रकारचें मांस खाल्ल्यास पाप लागत नाहीं. " ( प्राणात्यये तथा श्राद्धे .... श्लोक १७९ ) असें आचाराध्यायांत याज्ञवल्क्य म्हणतो. " सर्वान्तानुमतिश्च प्राणात्यये दर्शनात् " या वेदांतसूत्राचा अर्थ " प्राणत्यागाचा प्रसंग असल्यास जें प्राण राखण्या जोगें असेल तें खुशाल खावें--" असा आहे, आणि शंकराचार्यांनी भाष्य केलें आहे, तें याच अर्थाचें आहे. रोगी वाचत नाहीं असें वाटणें, लढाईंत पुष्कळ महिने वेढा रहाणें, आणि दुष्काळ हे तीन प्राणनाशाचे प्रसंग. असल्या प्रसंगीं उंदीर घूस ही खाण्यास शास्त्राची आडकाठी नाहीं. विश्वामित्रानें कुत्रें ही दुष्काळाचें प्रसंगीं भाजून खाल्लें होतें.

याप्रमाणें प्रवृत्तीचे दोन प्रकार झाले. तिसरा प्रकार निवृत्तीचा. "वर्षोवर्ष अश्वमेध या प्रमाणें १०० वर्षें अश्वमेध करून जितकें पुण्य सांठतें, तितकेंच पुण्य मांस न खाल्यानें सांठतें. " ( वर्षे वर्षेऽश्वमेधेन श्लोक ५३, अध्याय ५ ) असें मनु म्हणतो. आतां दारूकडे वळूं या.

**सुरापानः** --"सुरा" प्राशन केल्यास पतित होतो आणि सुरापान हें पांच महापातकांपैकीं गणलें जातें, म्हणून सुरा हा पदार्थ कोणता, त्याचाही विचार करणे वाजवी दिसतें. " सुरा " शब्द श्रुतींत बराच येतो.

म्हणून पहिल्यानें श्रुतींकडे वळूं. तैत्तिरीय ब्राह्मणांत (देवा वै ब्राह्मणश्चान्नस्य...) पहिल्या अष्टकाच्या तिसऱ्या अध्यायाच्या दुसऱ्या अनुवाकांत श्रुति आहे. " देवांनीं वेदाचा मळ काढून टाकला, त्या मळास नाराशंसी गाथा म्हणतात. अन्नाचा मळ काढून टाकला त्या मळास सुरा म्हणतात. म्हणून गाणारापासून आणि सुरा प्यालेल्यापासून प्रतिग्रह करूं नये. जर केला, तर मळाचा प्रतिग्रह केल्यासारखा होतो, " हें या श्रुतीचें सार. " मरुतः परिवेष्टारो मरुतोऽस्यावसन्गृहे " या श्रुतीसारखी एकाद्या " मनुष्याची स्तुति करणारी श्रुति, " गाणारे आणि सुरा पिणारे हे श्रुतीच्या मतें एकाच खाणींतलीं माणकें. " अन्न " शब्द सातूंस, तांदुळास किंवा असल्याच धान्यास लावण्याचा वैदिक संप्रदाय आहे. अर्थातच, सातूंपासून, तांदुळापासून किंवा असल्याच दुसऱ्या धान्यापासून जी दारू होते ती वेदांतली सुरा " एल " ( ale ) किंवा आराक ( arraek ) ज्यास इंग्रजींत म्हणतात तें मद्य श्रुतीच्या मतें पिण्याच्या योग्यतेचें नव्हे. कारण " एल " सातूंची करतात आणि " आराक " तांदुळाचा करतात. जो " एल बीर, " किंवा " पोर्टर " पिईल किंवा " आराक " घशाखालीं ओतील त्याच्या हातचा प्रतिग्रह करणें श्रुतीच्या मतें वाजवी होणार नाहीं. अर्थातच " बीर, पोर्टर, आराक " ही इंग्रजी मद्यांची तिक्कल ज्याच्या घशाखालीं उतरेल त्यास श्रुतीच्या दृष्टीनें पातित्य येईल. " शांपेन, क्लारेट, शेरी, पोर्ट, बर्गंडी " असलीं द्राक्षांचीं विलायती मद्यें किंवा " ब्रँडी, रम् " असले विलायती अर्क गटगटवणाऱ्या आणि ताडी, फेणी, शिंदी, बेवडा, मोवडा असलीं गांवठी मद्यें घशाखालीं ओतणाऱ्या देशी माणसांवर सुरापानाचा किंवा सुरापानामुळें पातित्याचा आरोप आणणें असल्यास ही श्रुति निव्वळ निरुपयोगी होय.

जी दिशा श्रुतीनें दाखवली त्याच दिशेनें " सुरा म्हणजे अन्नाचा मळ आणि मळ म्हणजे पाप " ( सुरा वै मलं— श्लोक ९३, अध्याय ११) असें म्हणणारा मनु डोळे मिटून गेला आहे. अर्थातच स्मृतींत जीस "पैष्टी" म्हणजे पिठापासून केलेली दारू म्हणतात, तीच श्रुतींतली " सुरा" होय.

म्हणूनच श्रुतीचा मान करून ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तिन्ही वर्णांस (श्लोक ९३. अध्याय ११) सुरा पिण्याची मनूनें मना केली आहे. पुनः मनु " गौडी, माध्वी, पैष्टी अशा तीन प्रकारची सुरा (गौडी च माध्वीच...... श्लोक ९४, अध्याय ११ ) समजतो आणि ही तिन्ही प्रकारची " सुरा " ब्राह्मणास मना करतो. " सुरा " शब्दाचा वास्तविक अर्थ " पैष्टी " च असून " माध्वी " ( मधापासून झालेली ), किंवा " गौडी " ( गुळापासून झालेली ) कोणी ब्राह्मण पिईल तर प्रायश्चित्ताच्या संबंधानें त्या दोन्ही मद्यांस सुरेच्याच वर्गांत मनु घालतो, अशी व्याख्या विज्ञानेश्वरांनी मिताक्षरेंत केली आहे. तेव्हां श्रुतींच्या मतें पिठाची दारु पिणारा पतित होणार. मनूच्या मतें गुळाची आणि मधाचीही दारू जो ब्राह्मण पिईल तो पतित होणार. श्रुतीच्या पावलावर पाऊल जोपर्यंत स्मृति ठेवते, तों पर्यंत स्मृतीची मातब्बरी; श्रुतीच्या पावलाबाहेर स्मृति गेली कीं स्मृतीची मातब्बरी मावळली — असा एक ठोकळ सिद्धांत ब्राह्मणी धर्माचा आहे. या सिद्धांतावर भार टाकल्यास गुळाची किंवा मधाची दारु " सुरा " म्हणतां येत नाहीं; आणि ती सुरा म्हणतां न आलीं कीं पतितपणाशीं तिचा संबंध उरला नाहीं; हें जरी खरें आहे, तरी मनूनें आणि विज्ञानेश्वरांनीं एकंदरींत ब्राह्मणासाठीं म्हणून मुद्दाम दाखवलेली दिशा कोणती तें स्पष्ट कळवणेंही जरूरीचें आहे. याच अध्यायांतला ९५ वा श्लोक " ब्राह्मण म्हटला म्हणजे देवांस अर्पण केलेलें खाणारा; म्हणून ब्राह्मणानें यक्षांस राक्षसांस किंवा पिशाचांस अर्पण केलेलें अन्न, मद्य, मांस, सुरा, आसव हीं खाऊं नयेत " ( यक्षरक्षः पिशाचान्नं...... ) असा आहे. कैफ आणणाऱ्या भांगेसारख्या रसास " आसव " शब्द लावण्याची जुनी वहिवाट असावी. " यक्ष, राक्षस आणि पिशाच वा क्षुद्र देवता, यांस यज्ञांत भाग नाहीं; इंद्र, अग्नि, वरुण यांच्यासारख्या वैदिक देवतांस अर्पण केलेलें खाणारानें क्षुद्र देवतांस अर्पण केलेलें खातां कामा नये "— असा मनूचा अभिप्राय आहे. " अगस्तीनें यज्ञासाठीं आणि भृत्यांसाठीं पशुपक्षी मारून खाण्याचा संप्रदाय घातला; दर महिन्यास होणाऱ्या

श्राद्धांत मांस असलें पाहिजे; जो श्राद्धांत मांस खाणार नाहीं त्यास २१ जन्म पशूचे घ्यावे लागतात, देवास आणि पितरांस अर्पून मांस खाणारास दोष लागत नाहीं. देवांसाठीं किंवा पितरांसाठीं जो पशू कापतो त्यास कापलेल्या पशूनिशीं उत्तम गति मिळते " असें म्हणणारा मनु भांगेचा घोंटा घेऊन निव्वळ बडबड करतो, अशी जो कोणी कल्पना करील आणि " यक्षरक्षःपिशाच " ही पहिलींच तीन पदें न दिसण्यापुरता जाड मोतिबिंदू या श्लोकाचा अर्थ करण्याचे प्रसंगीं ज्याच्या डोळयांत पडला असेल, त्यास मात्र " जो ब्राह्मण म्हणवीत असेल त्यानें कधींही आणि कोणतेंही मांस खातां कामा नये, असा या मनूच्या श्लोकांचा अर्थ करतां येईल. सारांश, खाण्याजोगें मांस ब्राह्मण म्हणविणारासही उघड खाण्यास जशी मनूची मना दिसत नाहीं, तशी गुळाची किंवा पिठाची किंवा मधाची या तीन प्रकारची दारू वगळून दुसरी कोणतीही दारु ब्राह्मण म्हणविणारासही पिण्यास मनूची मना दिसत नाहीं.

विज्ञानेश्वरांनीं दाखल केलेल्या वृहद्विष्णूच्या मतें " मोहाची वगैरे दहा प्रकारची (माधूकमैक्षवं सैरं तालं खर्जूरपानसम् मधूत्थं चैव माध्वीकं मैरेयं नारिकेलजम् । अमेध्यानि दशैतानि मद्यानि ब्राह्मणस्य तु ) दारू ब्राह्मणास मना आहे. या वचनाचा थोडा जास्त विचार करणें जरूरीचें दिसतें. जीं दहा मद्यें दाखल केलीं आहेत, त्यांच्या बाहेरचें अकरावें मद्य पिणाऱ्या ब्राह्मणास प्रायश्चित्त घेण्याची जरूरी नाहीं हें उघड आहे. तरी पहिल्यानें " मद्य " शब्दाचा अर्थ स्पष्ट ठरेल, तेव्हांच प्रायश्चित केव्हां घेणें पडेल किंवा पडणार नाहीं, त्याचा नीट निकाल करतां येईल. केवळ रसास ताडीमाडी शब्द लावतात आणि भट्टींतून काढलेल्या माज आणणाऱ्या प्रवाही पदार्थासही ताडीमाडी शब्द लावतात; भट्टींतून निघाली कीं दारू बनली. दूध निराळें, दुधापासून होणारें दहीं निराळें; गाईचा मेंदू निराळा, त्या मेंदूतून निघणारें गोरोचन निराळें; तशीच रसाची ताडीमाडी निराळी, भट्टींत पडलेल्या ताडीमाडीपासून बनलेली फेणी किंवा फेणीसारखी दुसरीही दारू निराळी. जर रस अमेध्य तर अग्नीचें दिव्य

करून बनलेली दारू उघड मेध्य; जर रस मेध्य तर अग्नीनें विटाळलेली दारू उघड अमेध्य. दोन्ही अमेध्य मानल्यास २० प्रकारचें अमेध्य होतें. वृहद्विष्णूनें १० प्रकारचें मद्य अमेध्य मानलें आहे, २० प्रकारचें मद्य अमेध्य मानलेलें नाहीं. कोणतें दहा प्रकारचें मद्य वृहद्विष्णूनें अमेध्य मानलें आहे तें ठरलें म्हणजे अमेध्य मानलेल्याच्या बाहेरचें मद्य पिणारांस वृहद्विष्णूच्याच मतें प्रायश्चित्ताची जरूरी उघड उरणार नाहीं. इतकें काम आजच्या नवीन शिक्षण मिळालेल्या ब्राह्मणांवर मेहेरनजर ठेवून हिंदुधर्म-व्यवस्थापक सभा किंवा शिवरामपंत साधल्यांसारखे नामदार दाजीसाहेबांच्या कळकळीने ओतप्रोत भरलेले गृहस्थ जर करतील किंवा करवितील, तर त्यांचे निभ्रांत महदुपकार होतील.

---

१ न मांसभक्षणे दोषः विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर, आक्टोबर १८९५. पुस्तक २७ अंक ९-१० पृ. २२८-२३४

शिवरामपंत साधले हे सनातन मताचे अभिमानी असून त्यांच्या सल्यानेंच शास्त्रीबोवांनीं ' जशास तसें ' हें पुस्तक लिहलें असें म्हणतात. पुढें मात्र दोघांचें सख्य राहिलें नाहीं, कारण शास्त्रीबोवा न्यायमूर्ति रानड्यांस गुरुस्थानीं मानूं लागले. दाजीसाहेब खरे त्या काळचे मुंबईच्या ब्राह्मणसभेचे अध्वर्यु.

---

## — ३० —

## पुरूरवा- उर्वशी

१ चैत्ररथ, २ मंदाकिनीतट, ३ अलका, ४ विशाला, ५ नंदन, ६ उत्तरकुरू, ७ गंधमादन, ८ उत्तर मेरुशृङ्ग या आठ ठिकाणीं मिळून पुरुरव्यानें उर्वशीबरोबर ५९ वर्षें घालविलीं. मुलगे सात, वडील आयु व

धाकटा शतायु उर्वशी जातीची गंधर्व. गंधर्वीनें देव वरायचा न वरतां मनुष्य वरला, कारण तीस ब्रह्मशाप मिळालेला, मित्र आणि वरुण दीक्षित असतां उर्वशीस पाहून विरघळले, म्हणून उर्वशीस शाप मिळालेला. नुसत्या तुपावर आणि तेंही एक वेळ, ही शर्त उर्वशीनें केली. मसलत करून विश्वावसु नांवाच्या गंधर्वानें उर्वशी पुनः गंधर्वांच्या लोकीं नेली. तिच्यासाठीं वेड लागून फिरत असतां पुरूरव्यानें कुरुक्षेत्रांत प्लक्ष तीर्थीं हिमालय पर्वताच्या पुष्करणींत तिच्या पांच सख्यांसह उर्वशी क्रीडा करतांना पाहिली. उर्वशीनें "हा तो मनुष्य ज्याच्याशीं म्यां सलगी केली," असें सखींस पुरूरव्याकडे बोट दाखवून सांगितलें. " जाये होत्तिष्ठ मनसि घोरे वचसि तिष्ठ ह " असा संवाद सुरू झाला. " तुझे मुलगे घेऊन एक वर्षानें येईन आणि एक रात्र तुझ्या जवळ राहीन" असें वचन पुरूरव्यास उर्वशीनें दिलें, आणि तें पुरें ही केलें. " माझ्या संबंधानें तूं गंधर्वांजवळ मागणें कर" अशी मसलत उर्वशीनें पुरूरव्यास दिली. पुरूरव्यानें गंधर्वांजळ मागणें केलें, तेव्हा गंधर्वांनी थाळी भरून अग्नि दिला, आणि सांगितलें कीं "हा अग्नि घेऊन याग कर, म्हणजे मरणानंतर आमचे लोकीं येऊन उर्वशीबरोबर नांदशील." नंतर अग्नि एके अरण्यांत ठेऊन पुरूरवा मुलांस घेऊन आपल्या नगरीं आला. पुढें अरण्यांत जाऊन पाहातो तों थाळींतला अग्नि नाहींसा झालेला आणि अग्नीच्या ऐवजी पिंपळ रुजलेला. ही हकिगत गंधर्वांस कळवली, तेव्हां पिंपळाच्या अरणी घेऊन त्या एकमेकांवर घांसून आणि तीन प्रकारचे अग्नी संपादन करून यज्ञ करण्याची मसलत गंधर्वांनीं पुरूरव्यास दिली. नंतर नानाप्रकारचे यज्ञ करून मरणानंतर पुरूरवा गंधर्वांचें लोकीं गेला...

" मानस सरोवराच्या तीरावर उर्वशी क्रीडा करीत होती आणि भोगण्याची इच्छा दर्शवली तेव्हां ती पुरूरव्यास डोळयांत पाणी आणून म्हणाली, " हें भाष्यांतल्या उताऱ्याचें तात्पर्य. ब्रह्मशापामुळें उर्वशी अप्सरा असतां तीस पुरूरव्याजवळ येऊन रहावें लागलें, उर्वशी ५९ वर्षं पुरूरव्याजवळ राहिली, आणि उर्वशीस ७ मुलगे झाले, हे पहिल्यानें लक्ष जाण्याजोगे पौराणिकांचे ३ मुख्य मुद्दे. या तिहींपैकीं शेवटचे दोन फारशा

महत्त्वाचे नसल्यामुळें सोडून देऊन, पहिल्याच मुद्याकडे लक्ष पोंचवूं. ब्रह्मशाप मिळाला ही बाब उघड ब्राह्मणांचें वर्चस्व होतें अशाकाळीं घुसलेली. पूर्वीच्या ब्राह्मणांचा प्रभाव इतका कीं, स्वर्गातल्या अप्सरांचीही हवेलंडी उडे, इतकेंच दाखविण्याचा या प्रक्षेपाचा उद्देश. मैत्रावरुण नांवाचा एक ऋत्विज यज्ञामध्यें असतो. मैत्रावरुणत्वाची सुपारी वसिष्ठ गोत्रांतल्या ब्राह्मणास देण्याचा संप्रदाय कोणत्या तरी शाखेचा असावा आणि त्यामुळें मैत्रावरुण शब्दाकडे लक्ष पोंचलेल्या पौराणिकांचा वसिष्ठ हा मित्रावरुणांचा मुलगा असा समज झाला असावा. मित्र आणि वरुण हे देव मानलेल्यापैकीं असल्यामुळें त्यांचा संबंध अप्सरांशींच यावयाचा. उर्वशी पुरूरव्याकडे राहिली ही हकिकत माहीत होतीच. पुरूरवा हा ज्यापक्षीं देव उघड नव्हे, त्यापक्षीं जर त्याच्याजवळ उर्वशी राहिली, तर ब्रह्मशापाशिवाय काम झालेलें नव्हे असा तर्क पौराणिकांनीं पहिल्यानें चालविला, आणि या तर्काची वसिष्ठ हा मैत्रावरुण या माहितीशीं सांगड घालून दिली. वसिष्ठ हा जातीचा ब्राह्मण, तेव्हां बीजही ब्राह्मणाचें, अशा समजुतीनें मित्र आणि वरुण हे पौराणिकांनी ब्राह्मण केलेले होत......

या प्रमाणें हें जे लटपटीचे स्वरूप नुक्तेच नमूद करण्यांत आलें, तें सगळें जुनें गाणें झालें. इतकें जुनें गाणें गाऊनच ही लटपट झुगारून देतां येत नाहीं. या लटपटींत जो अखेरीस एक मोठा मुद्दा दाखल करण्यांत आला आहे, त्याच्या पुढें पूर्वीचे मुद्दे अगदीं फिक्के पडतात. गंधर्वांनीं मरणानंतर उर्वशी मिळावी म्हणून पुरूरव्यास थाळी भरून अग्नि दिला तो वनांत ठेवला असतां नाहींसा होऊन त्याच्या जागीं पिंपळ रुजला, त्या पिंपळाच्या लांकडाचे दोन तुकडे घेऊन आणि ते एकमेकांवर घांसून अग्नि उत्पन्न करण्याची मसलत गंधर्वांकडून पुरूरव्यास मिळाली. पूर्वीं एकाच प्रकारचा अग्नि गंधर्वांमध्यें होता. तो पुढें पुरूरव्यानें तीन प्रकारचा केल्यामुळें कर्मकांड्यांची "त्रेता" निघाली. आणि त्रेतेच्या बळावर यज्ञयाग केल्यामुळें मरणानंतर पुरूरव्यास स्वर्गाची अर्थातच त्यांतल्या उर्वशीची प्राप्ति झाली.

हा जो एक मोठा व्यापक मुद्दा उर्वशी आख्यानाच्या शेवटी दाखल केला आहे, हें एक नवीनच गाणें पुष्कळ गातां येण्याजोगें आहे.

जर या हकिगतीवर भरंवसा ठेवला, तर आजचे सगळे कर्मकांडी ब्राह्मण हे त्यांच्याच पौराणिक वडिलांनीं ठरवल्याप्रमाणें मूळचे क्षत्रियांचे बगलगचे समजल्याविना गति नाहीं. महाराजाधिराज पुरूरवा एक कलावंतिणीवर आसक्त झाला आणि ती अखंड सौभाग्यवती मेल्यावरही मिळावी म्हणून गंधर्वांनीं पाठीवर लादलेला कर्मकांडाचा अवजड बोजा घेऊन तो क्षत्रिय जातीचा खुळा एकदांचा चालता होतांच, त्याचा पवित्र कांसोटा धरून कर्मकांडी ब्राह्मणांचा तांडा आजपर्यंत स्वतःस धन्य आणि पुण्य समजत त्याच वाटेनें आक्रमीत चालला. अर्थातच वेदांतल्या कर्मकांडाची स्थापना करणारा कोण ? तर राजा पुरूरवा. जात क्षत्रिय. हें पौराणिक वृक्षास लागलेलें फळ आजच्या ब्राम्हणांस जरी कडू वृदांवना पेक्षांही कडू भासलें तरी चाखल्या शिवाय उपाय नाहीं. जर पुराणें प्रमाण मानायचीं, जर वेदवाक्याऐवजीं पुराणांचेच पोवाडे गात बसायाचे, तर जसे दीपदानासहित आणि शय्यादानासहित द्वादशीचे किंवा अंवसेचे यजमानाकडचे तांदूळ हवेत, तशीं पुरूरव्यासारख्या क्षत्रियाच्या पवित्र कांसोट्याचें पाणी तुम्ही पीत आला आहांत, ही एक मोठी गोष्ट भूदेव स्वतःस म्हणविणाऱ्या आजच्या दरोबस्त जातींच्या ब्राह्मणांस कळवणारास ही उत्तमोत्तम हकिगत ही हवी. " पदरीं पडलें, पवित्र झालें, " ही म्हण सुप्रसिद्ध आहे. एका तोंडानें ब्राह्मणांचे पोवाडे, तर दुसऱ्या तोंडानें ब्राह्मणांची नालस्ती--हा पौराणिकांचा एकंदरींतला दुतोंडेपणा थोड्याच विचाराअंतीं कोणासही कळून येण्याजोगा आहे. प्रक्षेप करणारा ब्राह्मण असला कीं ब्राह्मणांचे पोवाडे, तो ब्राह्मणेतर असला कीं ब्राह्मणाची नालस्ती. या प्रमाणें प्रक्षेप करणारांच्या जातीवर हा पुराणांचा दुतोंडेपणा अवलंबून राहिलेला दिसतो.[१]

---

१ वेदार्थयत्नंकारांचें स्मारक, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २८, पृ. १४–१६; जानेवारी, फेब्रुवारी, १८९६

## — ३१ —

# आजच्या ब्राह्मणांची समजूत अगदीं उलटी कशी झाली.

पूर्वींचे क्षत्रिय मांसमासळी खात होते, दारूही पीत होते. लढाईस जाण्याचे पूर्वीं क्षत्रियांचें वीरपण म्हणजे दारू पिणें पहिल्यानें होत असे. जर ब्राह्मणांच्याही स्त्री पितरांस " सुरा " लागत असे, तर, ब्राह्मणांच्या बायका तरी दारू पिणाऱ्या ठरूं पाहतात. एके बाजूस ब्राह्मण दुसरे बाजूस क्षत्रिय वैश्य यांच्यामध्यें खाण्यापिण्याचे अंतर होतेंसें म्हणण्यासमजण्यास अलीकडच्याही स्मार्त सारस्वतांत आधार नाहीं; तर तो पलीकडच्या स्मार्त सारस्वतांत कोठून असणार ? अध्यापन, प्रतिग्रह, याजन—हीं तीन कर्में मात्र ब्राह्मणांस जास्त होतीं, एऱ्हवीं ते व क्षत्रिय वैश्य यांच्यामध्यें आणखी दुसरा भेद आढळत नाहीं. पण श्राद्धयज्ञांतलीही हिंसा ज्या दिवशीं किंवा ज्या काळीं बंद करण्यांत आली, तेव्हांपासून ब्राह्मण नांवानें ब्राह्मण पण करणीनें पक्के बौद्ध किंवा पक्के पाखंडी बनले; अर्थातच मांसमासळी खाणें आणि दारू पिणें हें अनाचाराचें लक्षण ठरवण्यांत आलें आणि असला अनाचार करणाऱ्या लोकांचें युग पूर्वींचें समजून चालू युग आचाराचें समजण्याचा सम्प्रदाय पडला. " भट सांगेल ती अंवस " ही म्हण किती तरी सार्थ आहे. काळोखाच्या युगांत ज्या भटांच्या हातीं समाजाची कळ आली, त्यांचें अध्ययन व ज्ञान हीं तितपतच होतीं. जसा " आंधळ्यांमध्यें काणा राजा " तसा समाजामध्यें आचारविचाराच्या संबंधानें भट पुढारी झाला. मांसमासळीशीं किंवा दारूशीं संबंध न ठेवणारा भट ब्राह्मण म्हणवून स्वतःस सोंवळा आणि मांसमासळीशीं किंवा दारूशीं संबंध ठेवणारास ओंवळा समजूं लागला. अर्थातच या प्रकारचा ओंवळेपणा हें सोंवळ्या भटाच्या दृष्टीनें शूद्राचें लक्षण ठरलें. अशा प्रकारची सामाजिक घडामोड

झाल्यानंतर किंवा चालली असतां शिवाजी जन्मला. आजचे ब्राह्मणही त्यांच्या काळोखी मनूमधल्या पूर्वजांप्रमाणें नांवानें जरी ब्राह्मण म्हणवीत असले, तरी करणीनें पक्के बौद्ध किंवा पाखंडी बनलेले आहेत. त्यांस काळोखी मनूमध्यें पडलेल्या रूढीपुढें दुसरें कांहीं दिसत नसतें व नकोही आहे. त्यांस श्रुति नको, स्मृति नको, पुराण नको— रूढीच्या पलीकडे आणखी कांहीं नको. यांच्या खुळचट रूढीच्या आड शास्त्र आलेलें दिसलें, म्हणजे यांच्या आंगाचा तिळपापड होतो. " न मांसभक्षणे दोषो न मद्ये " म्हटलें कीं या सोंवळम्मन्य पक्क्या पाखंड्यांनीं तोंड सोडलें. हेच सोंवळ-म्मन्य पक्के पाखंडी मराठी क्षत्रिय वैश्यांची मुंज करण्यास तयार नसतात, आणि आंतून त्यास हीन मानून त्यांचा द्वेष करतात. कोठें ही गेलें, तरी पळसास पानें तीन; यांस सुरेख इंग्रजी शिक्षण मिळालेलें असलें, तरी हे पक्के पाखंडी ते पाखंडी.

आज रूढीचें पक्के पाखंड नको आहे, शास्त्राची बिनतोड जोत हवी आहे. रूढीचें पाखंड आज फिक्के पडलें आहे ज्यांस ब्राह्मणी धर्माचा आणि शास्त्राचा अभिमान असेल, त्यांनीं आतां बऱ्याच निश्चयानें हातभार लावला पाहिजे. रूढीचा काळ गेला. आजचा दिवस रूढीचा खास नव्हे. आम्हांस आज श्रुति हवी आहे, स्मृति हवी आहे, पुराण हवें आहे—— सगळें शास्त्र हवें आहे. शास्त्राची ज्योत जितकी पेटेल तितका उजेड अधिक पडेल. तर मग नको काय ? अलबत आहे. रूढि नको आहे. रूढीचा काळोख नको आहे. आजपर्यंत काळोख पुष्कळ झाला. आतां शास्त्राचा शांतपणें व पोक्तपणें अर्थ हवा आहे. हें सगळें काम इंग्रजी असल्यामुळें व इंग्रजी शिक्षणाचा उजेड पुष्कळ ब्राह्मणांच्याही हृदय खिंडींत पडल्यामुळें आज बरेंच हलकें झालें आहे. तर सरते शेवटी—

इदं याचे मदुक्तानि विचारयत सादरम्[१]

---

१ वपन व क्षत्रिय वैश्य, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २९, अंक १२, पृ. ३६४–३६५, डिसेंबर १८९८

# -- ३२ --

## फिरंगी गव्हर्नर आल्मीदा व कोचीनचा राजा

कनानूर मुक्कामीं असतां विजयनगरच्या नरसिंग, राय राजाचा हेजीब आल्मीदास भेटावयास आला, तें संभवतें, पण आपली मुलगी पुर्तुगालच्या युवराजास देण्याचें बोलणें काढलें, म्हणून फिरंगी म्हणतात, तें मात्र निव्वळ गप्पेसारखें भासतें. इतिहासामध्यें गप्पांशीं प्रसंग पडत नाहींसा नाहीं. दुतर्फी हकीकत जर दृष्टीस पडेल, तर खरें काय तें हुडकल्यास हातीं लागण्याचा संभव तरी असतो. पण इतिहासामध्यें पुष्कळ प्रसंग एकतर्फी हकीकतीशीं पडतात. दुतर्फी हकीकत सांपडली, तरी प्रसंगीं खरें कोणतें तें निवडतां येत नाहीं, कारण कधीं कधीं जो मुद्दा हुडकणारास पुष्कळ महत्त्वाचा वाटतो, तो एका हकीकतींतून अजीबात — कोणत्या तरी कारणानें — गाळलेला असतो. दुतर्फीही हकीकतीची जर अशी स्थिति खरोखरी असते, तर एकतर्फी हकीकतीची स्थिति जास्त शोच्य असल्यास नवल कोणतें ? मुद्दा संभाव्य असला, तरी तो खराच असतोसा नियम नाहीं. नरसिंगरायाच्या मुलीचें लग्न पुर्तुगालच्या युवराजाशीं झालें किंवा व्हावयाचें ठरलें, यांत बाहेरच्यास सर्व कांहीं संभाव्य वाटण्यासारखें आहे. पण तितक्यानें जर बाहेरचा ही गोष्ट खरी मानील, तर तो खचित खड्ड्यांत पडला. हिंदूमात्र फिरंग्यांच्या गलबतावर खाणें जेवणें अगदीं निषिद्ध मानीत असे. व त्यामुळें इ. स. १५०० मध्यें जे नाईर कोचीनकरानें काब्रालच्या मन्वारावर पाठवले होते ते, सांजसकाळ बदलावे लागत, — ही माहिती फिरंग्यांनींच नमूद करून ठेवलेली आहे, व ही माहिती अगदीं बिनचूक दिसते. जर मलबारच्या नाईर जमिनांची ही अशी हकिकत होती, तर विजयनगरच्या महाराजांचे स्वप्नीं तरी आपली मुलगी फिरंग्यांच्या युवराजास देऊं पहाण्याची कल्पना येण्याचा संभव कितीसा आहे,

त्याचा विचार विचारी वाचणारावरच सोंपवणें बरें. सारांश असले बोलणें काढल्याची गोष्ट निव्वळ गप्प मानणें हीच एक उजू वाट ठरते.

कनानूरहून अल्मीदा निघाला, तो पहिली नोवेंबर रोजीं कोचीन मुक्कामीं पोंचला. त्रिमम्पराच्या डोकीवर चढविण्यासाठीं एक सोन्याचा रत्नखचित मुकुट पुर्तुगालच्या राजाकडून अल्मीदानें आणला होता. पण त्रिमम्पर हा जुन्या हिंदू राजांच्या वर्गांत गणण्याच्या योग्यतेचा होता. म्हातारपणीं संसाराशीं संबंध तोडून सकुटुंब अरण्यांत जाणें आणि तेथें एखाद्या य:कश्चित् माणसाप्रमाणें "आपला हात जगन्नाथ" या म्हणीचा आश्रय करणें हें जुन्या काळच्या हिंदू राजांस अत्यंत इष्ट वाटत असें. हा संप्रदाय आज निदान आम्हां हिंदूस वाईट वाटत नाहीं, व खरोखरच वाईट वाटूं नये. घरांत पाणी भरणारी लक्ष्मी जरी गजान्ताच्या पुष्कळ पलीकडे गेलेली असली, तरी तिच्याशीं राजविलास सोडून देऊन कांहीं वर्षें तरी एखाद्या अगदीं किरकोळाप्रमाणें चालविल्यानें बरेंच शहाणपण शिकतां येतें. गर्भश्रीमंतास हें शिक्षण अवश्यमेव हवें. हें अपूर्व अंजन मिळाल्यानें दृष्टि पुष्कळ विशाल व मन पुष्कळ थोर होण्याचा संभव असतो. ब्राह्मणी धर्मानें जसें पहिल्या तसेंच चवथ्याही आश्रमांत हें शिक्षण – जसें रंकास तसें रावासही मिळून–गायत्रीच्या दरोबस्त अधिकाऱ्यांस नित्य करून ठेविलें होतें; या मुद्यांत पूर्वीच्या ब्राह्मणांचें सौभाग्य कोणाही पोक्तपणा आलेल्यास सहज कळण्याजोगें आहे. आज भांडवल आणि मजुरी या दोहोंमध्यें जो दांडगा झगडा सुरू झाला आहे, त्याचें मुख्य कारण गर्भश्रीमंतांस व त्यांच्या मुलांस "जगन्नाथ" झालेल्या "आपल्या हाताचें" शिक्षण नसतें हेंच दिसतें. जसें मुंज झाल्यानंतर, तसें उतारवयांत खुद्द राजानेंही हें शिक्षण घेण्याचा जो कित्ता पूर्वीं पडलेला होता तो फार फार सुरेख होता. या जुन्या काळांतल्या अतिसुरेख कित्त्यास अनुसरून त्रिमम्परानें सिंहासन सोडलें होतें आणि नम्बियदनची आज्ञा कोचीनच्या राज्यांत पाळण्यांत येत होती. त्यामुळें नम्बियदनास मुकुट मिळाला.[१]

---

१ फिरंग्याची इकडील हकीकत. विविधज्ञानविस्तार पुस्तक ३० पृ. १४७–१४८, मे, १८९९

# -- ३३ --

## बायकांची मुंज

**बायकांची मुंज वाजवी कीं गैरवाजवी ?** –आईबाप जर उभयतां ब्राह्मण असतील तर त्यांच्या मुलांस " ब्राह्मण " म्हणतां येईल. ब्राह्मणाची ही मुलें उपजत "शूद्र " असून, मुंज होते तेव्हांच त्यांस " ब्राह्मण " म्हणून घेण्याचा अधिकार येतो. जर मुलीची मुंज झाली नाहीं, तर ती उघड " शूद्र " झाली; ती " ब्राह्मण " म्हणतां येत नाहीं. आज मुंज झालेल्या ब्राह्मणांचीं लग्नें होतात, ती " ब्राह्मणींशीं होत नाहींत तर उपजतचा शूद्रपणा न गेलेल्या मुलींशी होतात. जिची मुंज झालेली नाहीं, असल्या शूद्रपणा न गेलेल्या मुलीशीं लग्न लावून घेणें हें " ब्राह्मण " म्हणवणारानें आपल्या " ब्राह्मणपणास " आंचवून घेणें नव्हे काय ? या दृष्टीनें पाहिलें, म्हणजे बायकांची ही मुंज होणें वाजवी दिसतें, गैरवाजवी दिसत नाहीं. जर ब्राह्मण वर्णांतल्या मुलाची मुंज होते, तेव्हांच त्यास ब्राह्मणत्व येतें, तर ब्राह्मण वर्णांतल्या मुलीचीही मुंज होईल, तेव्हांच तीस ब्राह्मणत्व येईल, जर मुंज झाली नाहीं, तर ब्राह्मणत्व येत नाहीं, असेंच समजणें– म्हणणें वाजवी होत नाहीं काय ? जर आईसच ब्राह्मणत्व आलेलें नाहीं, तर तिच्या मुलास तें सुतराम् आलेलें नाहीं, असेंच म्हणावें लागत नाहीं काय ? जर आजच्या प्रत्येक ब्राह्मण म्हणविणाराची आई शूद्र ठरूं पहात आहे, तर आजच्या ब्राह्मण म्हणविणारांस आई कडून ब्राह्मण समजणें कितीसें रास्त होईल ?

**बायकांची मुंज सशास्त्र कीं अशास्त्र ?**— खचित सशास्त्र, अशास्त्र नव्हे. आश्वलायनाचें व दुसऱ्यांचीही गृह्यसूत्रें कलियुगांतल्या लोकांसाठीं रचलेलीं आहेत, ही सूत्रें द्वापर किंवा त्रेता किंवा कृत या युगांतल्या लोकांसाठीं रचलेली नव्हत. यज्ञ व अग्निहोत्र हीं प्रत्येकास दर

दिवस करतां येण्यासारखीं नव्हत, म्हणून पाकयज्ञाची म्हणजे वैश्वदेवाची आणि विवाहाग्नीची योजना करण्यांत आली. श्रौत कर्म सगळें युगांतरादीसाठीं, स्मार्त कर्म सगळें याच युगासाठीं; श्रौतसूत्रें युगांतरादीसाठीं, गृह्यसूत्रें याच युगासाठीं. रामनवमी, आषाढीकार्तिकी, जन्माष्टमी, गणेशचतुर्थी, बायकांची हरताळका—ऋषिपंचमी, किंवा मंगळागौर शिवामूठ, दसरादिवाळी, शिमगा—हा सगळा इलाखा नव्हे श्रौत, नव्हे स्मार्त. हा इलाखा ब्राह्मणी धर्माचा म्हणजे श्रौत किंवा स्मार्त धर्माचा खचित नव्हे. या इलाख्यांत वस्ती करण्याची जरुरी ब्राह्मण म्हणवणारास बिलकुल दिसत नाहीं. जर ब्राह्मणपणा हवा, तर श्रौतसूत्रें नकोतशीं नाहींत, पण गृह्यसूत्रें खास हवीत. श्रौत धर्माचें शास्त्र श्रौतसूत्रें; स्मार्त धर्माचें शास्त्र गृह्यसूत्रें. कर्मठ ब्राह्मणांचीं हींच दोन शास्त्रें. तिसरें शास्त्र त्यांस नाहीं, तिसऱ्या शास्त्राची त्यांस जरुरी नाहीं. आजचा ब्राह्मण म्हणविणारा समुदाय आपणास एकंदरीत " कर्मठ " समजतो व म्हणवितो, श्रुतिस्मृतीच्या गोष्टी पुन्हां पुन्हां सांगत असतो; म्हणून श्रुतिस्मृतीची आठवण करून देणें अगदीं आवश्यक आहे. तूर्त विचार इतकाच करावयाचा कीं बायकांच्या मुंजीस श्रुतिस्मृतीचा आधार आहे कीं नाहीं ? जर श्रुतिस्मृतीचा आधार असला, तर बायकांची मुंज निभ्रांत सशास्त्र झाली.

आरंभीं एक लहानशीच प्रस्तावना करणें जरूर दिसतें; ती ही कीं मुंजलग्न वगैरे दरोब्रस्त स्मार्तकर्मैं स्मार्तच आहेत, श्रौत नव्हेत...... मुंज ज्या पक्षीं स्मार्त धर्मापैकीं आहे, त्या पक्षीं त्याचें शास्त्र स्मृतींतच हुडकल्यास सांपडेल; कितीही हुडकलें तरी तें श्रुतींत सांपडणार नाहीं.

सोडमुंजींत आणलेलें अनुलेपन " ब्राह्मणानें आपल्या तोंडास, क्षत्रियानें आपल्या बाहूंस, स्त्रीनें आपल्या मांडीच्या वरच्या भागास, सरणजीवीनें आपल्या मांडीच्या खालच्या भागास पहिल्यानें फांसावें "— असें आश्वलायन म्हणतो. 'सरणजीवि' शब्दानें टीकाकार सुतारासोनारासारख्या धंदेवाल्या जाती समजतो. जशी स्त्रियांस, जशी सुतारांसोनारांसही सोडमुंज होती— अग्निहोमाचा जर अधिकार श्रुतीनें " उपकृष्ट " म्हणून

सुतारासोनारांस उघड दिलेला आहे—तर मुंजही उघड असली पाहिजे. सुतारासोनारांस मुंजीचा अधिकार देणारी स्मृति अग्निहोत्राचा अधिकार देणाऱ्या श्रुतीच्या पावलांवर पावलें टाकून गेली आहे. जशी स्त्रियांची, तशी सुतारासोनारांची मुंजच जर होत नसती, तर सोडमुंजीचा प्रसंग त्यांच्यावर न कोसळता; जर सोडमुंज उघड होत होती, तर मुंजही उघड होत होती. जर ब्राह्मणाचे मुलाची मुंज आठवें वर्षीं होत होती, तर ब्राह्मणाचे मुलीचीही मुंज आठवेंच वर्षीं होत असावी. सोळा वर्षांपलीकडे जर ब्राह्मणाचा मुलगा मुंजीशिवाय राहिला, तर तो आश्वलायनाच्या दृष्टीनें "व्रात्य" झाला, अव्यवहार्य झाला; सोळा वर्षांपलीकडे ब्राह्मणाची मुलगीही मुंजीशिवाय राहिली, तर ती ही आश्वलायनाच्या दृष्टीनें "व्रात्यां" पैकीं झाली, अव्यवहार्यांपैकीं झाली. सुतारासोनारांस वैश्यांस नियम लागू होत असून, त्यांची मुंज १२ वें वर्षीं होत असावी. या प्रमाणें जशी बायकांची तशी सुतारासोनारांचीही मुंज सशास्त्र आहे; कलियुगांतही ती अर्थातच झाली पाहिजे. जे ब्राह्मण म्हणविणारे आज जशी स्त्रियांची, तशी सुतारासोनारांचीही मुंज लावण्यास तयार नसतील, ते ब्राह्मणी शास्त्राचा उच्छेद करण्यासाठीं जन्मलेल्या असुरांपैकीं किंवा राक्षसांपैकीं मानल्या म्हटल्यास अतिशयोक्तीचा आरोप येईल काय ? ब्राह्मणपणा शास्त्राच्या बळावर आहे; जर ब्राह्मणपणा हवा तर शास्त्र अवश्यमेव हवें. स्त्रियांची आणि सुतारासोनारांची मुंज करण्यास जे तयार नाहींत त्यांस शास्त्राचा वीट उघड आलेला आहे. ज्यांस शास्त्राचा वीट उघड आलेला आहे, ते ब्राह्मणपणासच विटल्यासारखे झालेले नव्हत काय ? [1]

---

१ ब्राह्मण म्हणविणारांस सवाल— हेमंतव्याख्यान माला १८९९ पृ. ३—५.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्वनाम
अनुक्रम 07516 वि: 1809
... 7024
नोंद दि: ...

## -- ३४ --

# ब्राह्मणांचा स्वधर्म.

'वेदविद्येचा ऊहापोह करणाऱ्या शास्त्रास मीमांसा म्हणतात.' असें म्हणून स्वर्ग, सर्वस्वदान, ब्राह्मण इत्यादि महत्त्वाच्या बाबी शबरस्वामीसारख्या समंजस ब्राह्मणांनीं कशा खुबीनें हाताळल्या आहेत तें शास्त्रीबोवांनीं संस्कृत उतारे देऊन मार्मिकपणें दाखविलें आहे. ही सर्व चर्चा सामान्य वाचकास कंटाळवाणी वाटण्याचा संभव आहे. म्हणून शास्त्रीबोवांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे या 'थोर सिद्धांतांचे' थोडक्यांत विवेचन पुढील प्रमाणें करतां येईल.

स्वर्ग म्हणजे ज्या प्रदेशांत 'गर्मी नाहीं, थंडी नाहीं, भूक नाहीं, तहान नाहीं, अस्वस्थपणा नाहीं, ग्लानि नाहीं, पुण्य करणारे मात्र मरून तेथें जातात' असा प्रदेश नव्हे. स्वर्ग म्हणजे प्रीति किंवा सुख. सर्वस्वदानांत भूमिदान श्रेष्ठ आहे. पण सार्वभौम राजा, सर्व भूमीचा मालकदेखील भूमि देऊं शकत नाहीं. कां ? तर "जितक्या भोगामुळें सार्वभौम भूमीचा मालक असतो, तितक्यानें दुसराही; त्यांत कांहीं अंतर नाहीं. सार्वभौमपणामुळें यास इतकेंच अधिक कीं, हा पृथ्वीवर पिकलेल्या भात वगैरेंच्या राखणेंमुळें वेतना प्रमाणें मिळालेल्या कांहीं अंशाचा मालक होतो—— जशी व जितकी तुमची आमची जमिनीवर मालकी, तशी व तितकीच राजाधिराजाचीही — इतकेंच कीं उत्पन्नाचा ६ वा अंश राजाधिराजास राखणरूपी नोकरी बजावल्यामुळें रयतेकडून स्वसंतोषानें देण्यांत येतो."

'ब्राह्मण' हा शब्द वेदाचें अध्ययन, यज्ञाचें अनुष्ठान आणि समंत्र विवाह या बाबतींत क्षत्रिय वैश्यांसही लावला जातो. त्याचप्रमाणें हजार संवत्सर म्हणजे हजार महिने. माणसाचें आयुष्य जास्तींत जास्ती १०० १५० वर्षांचें असतें. तेव्हां सहस्र संवत्सरें म्हणजे हजार महिने मानावें. याप्रमाणें सुरवात करून मग शास्त्रीबोवांनीं ह्या सिद्धांतांना पूर्वीच्या

ब्राह्मणांचा 'सजाणपणा' असें नांव दिलें. त्याचेंच विवरण पुढील उताऱ्यांत आलें आहे.

जाणणें पूर्वी होतें केव्हां ? लोपलें केव्हां व कां ? हा पूर्वीच्या ब्राह्मण म्हणविणारांचा सजाणपणा. असल्या सजाण ब्राह्मणांची पायधूळ जर क्षत्रिय वैश्य डोकीवर ठेवीत, जर त्यांच्यापुढें एकदां सोडून शंभरदां लोटांगण घालण्यास शरमत नसत, तर नवल कोणतें ? ही पूर्वीच्या ब्राह्मण म्हणविणारांच्या सजाणपणाची कमाल झाली नव्हे काय ?

आतां या ब्राह्मण म्हणविणाऱ्या सजाणांपुढें आजचे ब्राह्मण म्हणविणारे अजाण बसवूं या. म्हणजे दोहोंमधलें ठळक अंतर लागलेंच दृष्टोत्पत्तीस येईल.

आजचा ब्राह्मण म्हणविणारा स्वर्गांतल्या अमृताची, अप्सरांची, कामधेनूची, चिन्तामणीची, कल्पवृक्षाची गोष्ट करीत बसणार. आजचा ब्राह्मण म्हणविणारा अग्रहाराच्या किंवा इनाम जमिनीच्या किंवा असल्याच दुसऱ्या लोभानें आजच्या राजांची मालकी हव्या त्या पदार्थावर शाबीत करणार आणि तो पदार्थ आपल्या घशाखालीं उतरविणार. " ब्राह्मण " शब्द ब्राह्मण वर्गांतल्या गोवर्धन, पळशे, कुडाळे, शेणवी असल्या दुसऱ्या जातींस लागू केला, तरीही आमच्या मधल्या सोंवळेमन्यांच्या पायाची आग मस्तकीं जाणार; मग क्षत्रिय वैश्यांची गोष्ट दूरच राहिली. आजच्या ब्राह्मण म्हणविणारांस वेदांतल्या गोष्टी म्हटल्या कीं, त्या देवांच्या किंवा गंधर्वांच्या वाटतात. त्या काळीं माणूस हा प्राणी जसा काय जन्मलाच नव्हता; मग हजार सोडून दहा हजार वर्षांशीं प्रसंग पडला, तर काय ? यांच्या अकलेची दिवटी पाजळलेली असतेच. दोघेही वेदविद्येचे कैवारी; पण पूर्वीचा ब्राह्मण म्हणविणारा जितका खरा कैवारी होता, तितकाच आजचा ब्राह्मण म्हणविणारा सोंगाड्या कैवारी दिसतो. पुराणांतल्या गोष्टी इतिहासीक न समजतां त्या गोष्टींच्या पायांवर उभारलेल्या रघुवंशासारख्या काव्याचीही किंमत तितकीच करून, " शतायुर्वै पुरुषः " या श्रुतीची मातब्बरी न बिघडवणारा पूर्वीचा ब्राह्मण म्हणविणारा ब्राह्मण वेदविद्येचा खरा कैवारी.

पुराणांतल्या गोष्टी इतिहासीक समजून, त्यांच्या पायावरच्या रघुवंशा-सारख्या काव्यांतल्या " किंचिदूनमनूनर्द्धैः शरदामयुतं ययौ " ( श्राव-णाचा शाप झाल्यानंतर राज्य करीत असतां दशरथाचीं जवळ जवळ दहा हजार वर्षे गेलीं. ) असल्या भाकड गोष्टी इतिहासांतल्या समजणारा आणि " शतायुर्वै पुरुष " ही श्रुति दूर झुगारून देणारा आजचा ब्राह्मण म्हण-विणारा वेदविद्येचा सोंगाड्या कैवारी. वेदविद्येचा खरा कैवारी राजास मात्र अश्वमेधाचा अधिकार देणार; पण आजचा सोंगाड्या कैवारी परशु-राम ब्राह्मणाजवळूनही अश्वमेध करवितो आणि सगळी पृथ्वी परशुराम ब्राह्मणानें आपल्या वंशजांस दान दिलेली मानतो. रघूनें विश्वजित् यज्ञांत सर्वस्वाच्या दानांत भूमीचेंही दान केलें आणि त्यामुळें कौत्साची पूजा कर-तांना मातीची उपकरणें पुढें आलीं, ही सगळी कालिदासाची कविताशक्ति असतां, आणि "न देखे रवी तें देखे कवी " ही म्हणही जगजाहीर असतां, आजचा वेदविद्येचा सोंगाड्या कैवारी रघुवंश हा एक इतिहासीक ग्रंथ मानतो, आणि स्वतः खाड्यांत पडून आपल्या जवळच्यासही पाडूं लागतो. ही सगळी आजच्या ब्राह्मण म्हणवणाऱ्याच्या अजाणपणाची कमाल झाली नाहीं काय ? अजाणपणाची याच्या पलीकडे आणखी मजल शक्य आहे काय ?

हें पूर्वीचें जाणणें इसवी १३४० पर्यंत बरेंच कायम होतेंसे मानावें लागतें. वेदभाष्य करणारा माधव ऊर्फ सायण ऊर्फ विद्यारण्य— येथें सजाण ब्राह्मणांची पिढी संपली, वंश खुंटला. मुसलमानांच्या वावटळीनें जे संप्रदाय निर्वंश केले, त्यांच्यामध्यें हा सजाणपणाचा संप्रदायही घालावा लागत आहे. शेवटच्या पुरुषांमध्यें सजाणपणाची ज्योत किती जागती होती, तें पहाणें असल्यास त्याच्या ऋग्वेदाच्या भाष्याची आरंभींची प्रस्तावना पहावी म्हणजे पहाणारा खास थक्क होऊन जाईल आणि " विद्यारण्य " नांव यथार्थ मानील.

पुढें तालिकोटच्या लढाईत विजयनगर साफ बुडालें, तेव्हां दुर्दै-वाची पराकाष्ठा झाली; जो निर्वंश झाला होता, तो तसाच कायम राहिला.

हिंदूंचें राज्यच राहिलें नाहीं, तर मग जाणण्याची किंमत कोण करणार ? " प्रसवे तीच अभिज्ञा शल्या तैशी न वांझ वेणेची. " जाणण्याची किंमत करण्यास जाणणारे हवेत. सजागपणा रत्नपारखीपणासारखा आहे. रत्न-पारख्यास रत्न पारखतां येतें, सजाणच सजाणपणास ओळखूं शकतो. इतके सम्प्रदाय बुडाले, तें नवल नव्हे; तर व्याकरण, अलंकार, न्याय, काव्यनाटकें हे चार आज दिसत आहेत इतके राहिले. हें नवल होय.

**जाणण्याचा जीर्णोद्धार आज शक्य आहे कीं अशक्य ?** ज्या मनूमध्यें जाणण्याचा लोप झाला तो काळोखाचा मनू होता. मुख्य युगें वास्तविक दोनच असतात—उजेडाचें आणि काळोखाचें. जसा ऐन मध्यान्ह असतो, तशी ऐन मध्यरात्र असते. हे दोन मुख्य काळ दोन मुख्य युगांचीं किंवा मनूंचीं लक्षणें होत.

आज इंग्रजी आहे. इंग्रजी झाली तेव्हां हिंदुस्थानांत उजेडाच्या युगाची पहांट झाली. ज्या ब्राह्मणास आज स्वधर्मानें उजू जाणें असेल, त्याच्या भाग्याचे चारही दरवाजे आज उघडले म्हणावे लागत आहेत.

पूर्वीं काळोखाच्या मनूंत व त्याच्या पूर्वींच्या उजेडाच्याही मनूंत पुस्तकांचें भांडार कोठें एखाद्या राजधानींत असले तर असावयाचें; काव्य, नाटकें व अलंकारांचे ग्रंथ एके ठिकाणीं सांपडले, तर व्याकरणाचे ग्रंथ दूर दिगंतीं मिळावयाचे; बरें, ते एके दिगंतीं मिळाले, तर धर्मशास्त्राचे ग्रंथ दुसरे दिगंतीं — असे हालहवाल होते. समजा कीं इतके हे ब्राह्मणी धर्माचे ग्रंथ एकदां कसे तरी पहावयास सांपडले, तरी बौद्धांचे आणि जैनांचे कसे मिळ-णार ? ते यथाकथंचित् हातीं आले, तरी मुसलमानी किंवा ख्रिस्ती धर्मांचे कसे लागणार ? भांडार म्हटलें कीं लाखो रुपये आंत ओतावे लागत आणि पुष्कळ लिहिणारे बसवावे लागत.

पण आज हजार पंधराशें रुपयांत इतके संस्कृत ग्रंथ मिळूं शक-तात कीं तितके पूर्वीं लाख दीडलाख रुपये खर्चूनही मिळणें शक्य नव्हतें. आज इंग्रजीची कामधेनु ज्या ब्राह्मणांचे हातीं आली आहे, त्यांच्या तर भाग्यास पारावार नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. कारण इंग्रजी आल्यानें

विद्येच्या दहाही दिशा खुल्या झाल्या, त्यास कोणत्याही विषयांत किंवा शास्त्रांत किंवा धर्मांत मज्जाव राहिला नाहीं, प्रसंगीं गांठीं फारसा पैसा बांधलेला नसला तरी मोठमोठ्या राजधान्यांमध्यें महिना सहा आठ आणे खर्चल्यास आपला सगळा ग्रंथसंग्रह वाचण्या–जाणण्यासाठीं पुढें ठेवणारी सार्वजनिक भांडारें आहेत. आणखी दुसरें स्वधर्मानें चालू पहाणाऱ्या ब्राह्मणास काय हवें ? याप्रमाणें आजचा मनू हा ज्ञानसामग्रीचा दांडगा मनू आहे. या प्रकारचा मनू पूर्वी कधींही नव्हता.

चालू मनू जसा ज्ञानसामग्रीचा आहे, तसाच प्रवासाचा आहे. पूर्वीचा मनू कूपमंडूकपणाचा होता. ज्या त्या ब्राह्मणाची व ब्राह्मणेतराची स्थिति पूर्वी कूपमंडूकाप्रमाणें होती. उंबरांतल्या किड्यास उंबरापलीकडे जग दिसत नसतें; तसें पूर्वीच्या काळोखांत ब्राह्मणांस आणि ब्राह्मणेतरांस आपल्या गांवाच्या किंवा पोटजातीच्या पलीकडे कांहीं दिसत नव्हतें. पण आज प्रवासाचा मनू पडल्यामुळें दूरदूरचेही देश फारसा खर्च न लागतां पहावयास सांपडत आहेत, व एकमेकांचे आचारविचार एकमेकांच्या आचार-विचारांशीं ताडून पहाण्याचे ते प्रसंग अनायासें येत आहेत.

याप्रमाणें वाढलेली ज्ञानसामग्री सुलभ करण्याचे व नवीही ज्यास्त वाढवण्याचे श्रेय जसें छापण्याच्या तसें प्रवास सोपा व सोईचा केल्याचें श्रेय वाफेच्या कलेस द्यावें लागत आहे. आज इंग्रजी आहे, म्हणून या दोन्ही कला आमच्यामध्यें बऱ्याच फैलावल्या आहेत, आणि या अशा फैलावलेल्या असल्यामुळें सर्वतोपरी म्हणणें जाणणें ब्राह्मण म्हणविणारास आज सर्वतोपरी सवघड झालें आहे. म्हणून स्वधर्मानें चालू पहाणाऱ्या ब्राह्मणाच्या तोंडून इंग्रजीच्या उलट अक्षरही येण्याचा संभव बिलकूल नाहीं. सारांश, आज जाणण्याचा जीर्णोद्धार इंग्रजी असल्यामुळें जसा शक्य झाला आहे, तसा शक्य पूर्वी कधींही झाला नव्हता. आज ही इंग्रजी आहे, म्हणून जीर्णोद्धार असा शक्य झाला आहे. जर इंग्रजीच्या ठिकाणीं फिरंग्यांची सत्ता, किंवा मोंगलाई किंवा आमची ब्रह्म-बादशाही असती, तर जीर्णोद्धाराची कल्पना स्वप्नींही आली नसती.

जीर्णोद्धार म्हटला कीं थोडें तरी नवें आंत घुसलेंच; तें तसें घुसलेंही पाहिजे. श्रुतीप्रमाणें " वेदोऽध्येयो ज्ञेयश्च " हाच काय तो ब्राह्मणाचा स्वधर्म, दुसरा स्वधर्म ब्राह्मणास नाहीं, ज्यास ब्राह्मण म्हणावयाचें, त्यानें आपल्या या स्वधर्मानें चालले पाहिजे. ज्यांस स्वधर्मानें चालणें नाहीं, त्यांनीं ब्राह्मण म्हणवून घेऊं नये.

## स्वधर्मानें चालणाऱ्या ब्राह्मणांवरची जबाबदारी

ब्राह्मण स्वधर्मानें चालूं लागला, म्हणजे त्याच्या डोकीवर जबाबदारीचा बोजा दांडगा असतो. विद्या क्षत्रिय वैश्यांकडे न जातां आपणाकडे आली, हें जसजसें जास्त लक्षांत येतें, तसतसा जबाबदारीचा बोजा जास्त दृष्टीस पडूं लागतो. क्षत्रिय वैश्य पायधूळ डोकीवर ठेवण्यांस तयार असल्यामुळें गुरुत्व ब्राह्मणाकडे येतें, आणि तें गुरुत्व त्यास त्याच्या आंतल्या डोळ्यांत नेहमीं तेल घालूं लावतें. आजचे शास्त्री आणि भट आपली तूपपोळी चालण्यापुरतेंच गुरुत्वाकडे लक्ष देतात. जर तूप पोळी चालत नाहीं, तर ते गुरुत्वावर लाथ मारणार. पण गुरुत्व म्हटलें कीं तूपपोळीकडे गौणता आली. कित्त्याकडे मुख्यपणा आला. तूपपोळी मिळो वा न मिळो कित्ता घालणारानें कित्ता घालण्याचें आपलें पहिलें कर्तव्य पहिल्यानें बजावलें पाहिजे. कांटा अगदीं समतोल—केंसभर इकडे न कले, केंसभर न तिकडे कले, इतका सुरेख धरला पाहिजे.

एकदां गुरुत्वाकडे दृष्टि गेली, म्हणजे अन्तर्यामी देवतेशीं गांठ पडली, ही गांठ एकदां पडली कीं दुसरा प्रभु ब्राह्मणास राहिला नाहीं; बहुमताचीही चाड साफ लोपली, प्रभूस किंवा बहुमतास गोड लागो वा कडू लागो, जें जसें असेल, तें तसेंच ब्राह्मणाकडून निरूपण व्हावयाचें, त्यांत केंसभर किंवा सुईच्या अग्राही इतकें अंतर पडणें नाहीं.

" गौड " आणि " द्रविड " या भेदांस शास्त्राचा आधार दिसत नाहीं, तर ' महाराष्ट्र त्रिकलिंग[1] ' वगैरे द्रविडांच्या पोटभेदांस तो सुतराम्

---

१. तेलंगी.

पहा ) पण प्रो. भागवतांनीं म्हटल्याप्रमाणें साठे, भाटवडेकर वगैरे परांजप्यांच्या पंक्तीस जेवले नाहींत. समारंभच झाला नाहीं.' इंदुप्रकाशमध्यें शास्त्रीबोवांच्या लेखाला उद्देशून एक गृहस्थ म्हणतो, 'कोणाला लोकांच्या मुली आपल्या घरांत ध्यावयाच्या आहेत, कोणाला दुसऱ्या गृहीं द्यावयाच्या आहेत. तेव्हां उचलली जीभ लावली टाळयाला असें करणारांस या अडचणी काय होत?' यावर 'सुबोधपत्रिकेनें' म्हटलें आहे कीं 'रत्नागिरीस कांहीं गृहस्थांनीं मुंबईच्या आधींच परांजप्यांबरोबर पंक्तिव्यवहार केला. आतां त्यांतली कांहीं मंडळी त्यासाठीं प्रायश्चित्त घेऊन मोकळी होतात कीं काय, कोणास ठाऊक. पण 'परदेशगमन व परदेशांतून परत आलेल्यांशी उघडपणें पंक्तिव्यवहार करणें निर्दोष होय' असें चार चौघांनीं विचार करून ठरविलें पाहिजे, (२२-१२-१९०१) परधर्मांत गेलेल्यास परत घेणें व परदेशगमन केलेल्यास पण प्रायश्चित्ताशिवाय जवळ करणें ह्या गोष्टींना विशेष चालना १८८८ सालीं सामाजिक परिषद स्थापन झाल्यापासून मिळाली, असें न्यायमूर्ति रानड्यांच्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेल्या भाषणावरून समजतें. ( इंदुप्रकाश, २८-१-१८९५. )

## -- ३६ --

## महार कोण?

पण याच्या पुढें अल्मीदाचें वर्तन अगदीं गैर, बेशिस्तपणाची एकंदरींत कमाल झालेली, सर्वतोपरी त्याच्या नांवास काळिमा लावणारें, असें होतें. तिघां कप्तानांच्या नादीं लागून अधिकाराचा राजीनामा द्यावयाचा तो दिला नाहीं, या आल्मीदाच्या कृतीस शिक्षा कडकच हवी. असा कित्ता राजानें पडूं दिला कीं राज्य बुडालें म्हणून समजावें. अधिकाराचा राजिनामा द्यावयाचा तो न देतां अल्मीदानें उलट हुर्मुझचा सुभेदार सैफद्दीन व त्याचा दुय्यम अत्तर खोजा या दोहोंसही सगळें करणें रद्द केल्याचें पत्र पाठवलें. येथें मात्र आल्मीदानें हत्ती एवढी चूक केली. अल्बुकर्कांच्या निव्वळ द्वेषानें हें काम झालेलें दिसतें. द्वेष म्हटला कीं तेथें गैरवाजवीपणा

आला. वडया कामगारांनीं व त्यांतही गवर्नरानें खाजगी गोष्टी कितीही मनांत येऊं लागल्या, तरी त्या महाराच्या सांवलीप्रमाणें दूर ठेवल्या पाहिजेत. अलीकडचे कर्मठ ब्राह्मण महाराची सांवली बाटवणारी समजतात. ब्राह्मणांमध्यें जे वेदांती किंवा भक्त असतात त्यांचेंही मत तेंच आहें. तरी महार कोण ? या विषयीं मोठा वाद आहे. कर्मठ मंडळी– मग ती ब्राह्मणाची असो वा ब्राह्मणेतरांची असो— महार नांवाची जात आहे, त्या जातींतल्याची सांवली पडूं नये म्हणून फारच खबरदारी ठेवते. पण वेदांती किंवा भक्तांची मंडळी असते, ती ब्राह्मणांची असो वा ब्राह्मणेतरांची असो, ती " महार " म्हणजे " खाजगी द्वेषाच्या " तोडीचे जे दुर्गुण असतात, त्या दुर्गुणास " महार " शब्द लावते, व तसल्याच महारांची सांवली बाटविणारी समजून, जातीच्या महारांशी दळणवळण ठेवण्यास नाखूष नसते. अल्मीदा बाहेरच्या महारास शिवत होता; व त्यांच्या हातचें प्रसंगीं खात पीतही होता; तरी तितक्यानें तो निंद्य समजणें वाजवी होणार नाहीं. पण पुढें जीं कामें अल्मीदानें केलीं, त्यांच्यामुळें तो निंद्यपणाचें निव्वळ माहेर झालेला मानल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. बाहेरच्या महारांशीं दळणवळण बाटवणारे नव्हें; जे दळणवळण आतांच्या महारांशीं चालतें तेंच—जसें वेदांत्याच्या, तसें भक्तांच्याही दृष्टीनें– बाटवणारें ठरतें. [१]

---

१ फिरंग्यांची इकडील हकिगत, विविधज्ञानविस्तार पुस्तक ३०–अंक ५, मे १८९९ पृ. १५०–१५१. शास्त्रीबोवांच्या ह्या आणि कैसरकडून सुलतानाकडे ह्या पुस्तकांची भाषांतराची, नव्हे रूपांतराची पद्धत फार स्वैर आहे. तर्जुमा जरी हुबेहुब असला, तरी वरील प्रमाणें प्रवचनें ते पुस्तकांत खूप घालीत. त्यामुळें कैसरकडून सुलतानाकडे ह्या पुस्तकांची पृष्ठसंख्या मूळ इंग्रजी ग्रंथापेक्षां अडीचशें पानें वाढली. ' नादीरशहाची बखर ' हें भाषांतर मात्र हुबेहुब आहे. त्यांत भाष्य कुठें नाहीं. शास्त्रीबोवांचीं ऋग्वेद व उपनिषदें यांचीं भाषांतरें सुद्धां विद्वानाला साजेलशीं खोल आणि तंतोतंत आहेत. स्वतःचीं मतें त्यांनीं प्रस्तावनेंत आणि स्वतंत्र टीपा मांडून व्यक्त केलेलीं आहेत.

पहा ) पण प्रो. भागवतांनीं म्हटल्याप्रमाणें साठे, भाटवडेकर वगैरे परांजप्यांच्या पंक्तीस जेवले नाहींत. समारंभच झाला नाहीं. ' इंदुप्रकाशमध्यें शास्त्रीबोवांच्या लेखाला उद्देशून एक गृहस्थ म्हणतो, ' कोणाला लोकांच्या मुली आपल्या घरांत घ्यावयाच्या आहेत, कोणाला दुसऱ्या गृहीं द्यावयाच्या आहेत. तेव्हां उचलली जीभ लावली टाळयाला असें करणारांस या अडचणी काय होत ? ' यावर 'सुबोधपत्रिकेनें' म्हटलें आहे कीं 'रत्नागिरीस कांहीं गृहस्थांनीं मुंबईच्या आधींच परांजप्यांबरोबर पंक्तिव्यवहार केला. आतां त्यांतली कांहीं मंडळी त्यासाठीं प्रायश्चित्त घेऊन मोकळी होतात कीं काय, कोणास ठाऊक. पण ' परदेशगमन व परदेशांतून परत आलेल्यांशी उघडपणें पंक्तिव्यवहार करणें निर्दोष होय ' असें चार चौघांनीं विचार करून ठरविलें पाहिजे, (२२-१२-१९०१) परधर्मांत गेलेल्यास परत घेणें व परदेशगमन केलेल्यास पण प्रायश्चित्ताशिवाय जवळ करणें ह्या गोष्टींना विशेष चालना १८८८ सालीं सामाजिक परिषद स्थापन झाल्यापासून मिळाली, असें न्यायमूर्ति रानड्यांच्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून केलेल्या भाषणावरून समजतें. ( इंदुप्रकाश, २८-१-१८९५. )

## -- ३६ --

# महार कोण ?

पण याच्या पुढें अल्मीदाचें वर्तन अगदीं गैर, बेशिस्तपणाची एकंदरींत कमाल झालेली, सर्वतोपरी त्याच्या नांवास काळिमा लावणारें, असें होतें. तिघां कप्तानांच्या नादीं लागून अधिकाराचा राजीनामा द्यावयाचा तो दिला नाहीं, या आल्मीदाच्या कृतीस शिक्षा कडकच हवी. असा किस्ता राजानें पडूं दिला कीं राज्य बुडालें म्हणून समजावें. अधिकाराचा राजिनामा द्यावयाचा तो न देतां अल्मीदानें उलट हुर्मुझचा सुभेदार सैफद्दीन व त्याचा दुय्यम अत्तर खोजा या दोहोंसही सगळें करणें रद्द केल्याचें पत्र पाठवलें. येथें मात्र आल्मीदानें हत्ती एवढी चूक केली. अल्बुकर्काच्या निव्वळ द्वेषानें हें काम झालेलें दिसतें. द्वेष म्हटला कीं तेथें गैरवाजवीपणा

आला. बड्या कामगारांनीं व त्यांतही गवर्नरानें खाजगी गोष्टी कितीही मनांत येऊं लागल्या, तरी त्या महाराच्या सांवलीप्रमाणें दूर ठेवल्या पाहिजेत. अलीकडचे कर्मठ ब्राह्मण महाराची सांवली बाटवणारी समजतात. ब्राह्मणांमध्यें जे वेदांती किंवा भक्त असतात त्यांचेंही मत तेंच आहें. तरी महार कोण ? या विषयीं मोठा वाद आहे. कर्मठ मंडळी– मग ती ब्राह्मणाची असो वा ब्राह्मणेतरांची असो— महार नांवाची जात आहे, त्या जातींतल्याची सांवली पडूं नये म्हणून फारच खबरदारी ठेवते. पण वेदांती किंवा भक्तांची मंडळी असते, ती ब्राह्मणांची असो वा ब्राह्मणेतरांची असो, ती "महार" म्हणजे "खाजगी द्वेषाच्या" तोडीचे जे दुर्गुण असतात, त्या दुर्गुणास "महार" शब्द लावते, व तसल्याच महारांची सांवली बाटविणारी समजून, जातीच्या महारांशी दळणवळण ठेवण्यास नाखूष नसते. अल्मीदा बाहेरच्या महारास शिवत होता; व त्यांच्या हातचें प्रसंगीं खात पीतही होता; तरी तितक्यानें तो निंद्य समजणें वाजवी होणार नाहीं. पण पुढें जीं कामें अल्मीदानें केलीं, त्यांच्यामुळें तो निंद्यपणाचें निव्वळ माहेर झालेला मानल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. बाहेरच्या महारांशीं दळणवळण बाटवणारें नव्हें; जे दळणवळण आतांच्या महारांशीं चालतें तेंच—जसें वेदांत्याच्या, तसें भक्तांच्याही दृष्टीनें– बाटवणारें ठरतें. [१]

---

१ फिरंग्यांची इकडील हकिगत, विविधज्ञानविस्तार पुस्तक ३०–अंक ५, मे १८९९ पृ. १५०–१५१. शास्त्रीबोवांच्या ह्या आणि कैसरकडून सुलतानाकडे ह्या पुस्तकांची भाषांतराची, नव्हे रूपांतराची पद्धत फार स्वैर आहे. तर्जुमा जरी हुबेहुब असला, तरी वरील प्रमाणें प्रवचनें ते पुस्तकांत खूप घालीत. त्यामुळें कैसरकडून सुलतानाकडे ह्या पुस्तकांची पृष्ठसंख्या मूळ इंग्रजी ग्रंथापेक्षां अडीचशें पानें वाढली. 'नादीरशहाची बखर' हें भाषांतर मात्र हुबेहुब आहे. त्यांत भाष्य कुठें नाहीं. शास्त्रीबोवांचीं ऋग्वेद व उपनिषदें यांचीं भाषांतरें सुद्धां विद्वानाला साजेलशीं खोल आणि तंतोतंत आहेत. स्वतःचीं मतें त्यांनीं प्रस्तावनेंत आणि स्वतंत्र टीपा मांडून व्यक्त केलेलीं आहेत.

# श्वेताश्वतरी विद्येचा अधिकारी

( शास्त्रीबोवांनीं ऐतरेय व श्वेताश्वतर यांचीं इंग्रजी व मराठींत सुंदर भाषांतरें करून त्यांची मार्मिक छाननी केली आहे. श्रद्धा व व्यासंग ह्यांचा ह्या अभ्यासांत बेमालूम मिलाफ झाला आहे. मॅक्स मुलर, हेनिल फूरर, कट्झ वगैरे आंग्ल, फ्रेंच व जर्मन पंडितांनी शास्त्रीबोवांच्या ह्या आणि दुसऱ्या पण वैदिक लिखाणाची भरपूर स्तुति केली आहे. उपनिषदांचा हा अभ्यास शास्त्रीबोवांनीं आपली मृत कन्या सुभद्रा हिच्या स्मरणार्थ केला आहे. )

जो वाटेवर सांपडेल त्यास वेदान्तांतलें " ब्रह्म " कळवणें श्वेताश्वतरास इष्ट नव्हतें. ‘ ज्याचें अंगीं शान्ती नाहीं, जो मुलगा नव्हे, जो शिष्य नव्हे त्यास ही विद्या देऊं नये ’ — असें श्वेताश्वतर साफ सांगतो.... येथें मुसलमान, ख्रिस्ती हे दोघेही श्वेताश्वतरी विद्येवर आक्षेप घेऊं शकतील व प्रसंगीं घेतीलही. मुसलमान शब्दाचा मूळ अर्थ ‘ शांती असलेला ’ आहे. ख्रिस्तास तर शांतीचा राजा म्हणतात. प्रशान्तपणा ज्यास असेल त्यास अधिकार म्हटला, म्हणजे अधिकारीच मिळणें नाहीं. कारण कमजास्त अप्रशान्तपणा आपल्या नजरेस जिकडे तिकडे पडतो. म्हणून विद्याच प्रशान्तपणा आणणारी हवी. प्रशान्तपणा आणणारा धर्म असला म्हणजे दरोबस्त जातींच्या मानवी प्राण्यांस त्याच्यापासून बराच आध्यात्मिक लाभ होईल. कारण तो धर्म घेतल्यानें ज्यांचे आंगीं प्रशान्तपणा मुळींच नसेल, त्यांस तो फुटेल आणि ज्यांस फुटलेला असेल त्यांचा शुद्ध पक्षांतल्या चंद्राप्रमाणें वाढत्या कलेवर राहील. मुसलमानांप्रमाणें मुसलमानी व ख्रिस्ताप्रमाणें ख्रिस्ती धर्म प्रशान्तपणा नसल्यास आणणारा आणि असल्यास वाढवणारा आहे. म्हणून त्याची पायरी त्या त्या मतवाद्याप्रमाणें

वरंची आहे, श्वेताश्वतरी धर्माची खालची आहे—अशा प्रकारचा आक्षेप आणण्यास दोघे मतवादी प्रसंगीं कमी करणार नाहींत.

या आक्षेपाचें समाधान श्वेताश्वतरी करूं शकणार नाहीं असें नाहीं. मुसलमान म्हणतात कीं सुंतेनें मनुष्य निवळतो, ख्रिस्ती म्हणतात बाप्तिस्म्यानें निवळतो. अबू बकर, ओमर, अली हे तीन खलीफ निवळलेले मानतां येतील. पण उस्मान, मोआविया, यझीद हे तीन खलीफ निवळलेले मानतां येतील काय ? या सर्वांची सुंता झालेली होती. हे सगळे " ला इलाह इल्ललाह् व महम्मद रसूलल्लाह् " हा कलमा पढणारे होते. असें असतां, तिघांनींच निवळावें का ? तिघांनीं निवळूं नये कां ?

[1]थिओडियस बादशहा निवळलेला मानतां येईल, पण कुस्तुन्तैन निवळलेला मानतां येईल काय ? बाप्तिस्मा शेवटच्या घडीपर्यंत लांबणीवर टाकला होता, म्हणून कुस्तुन्तैनास निवळण्यास सवड सांपडली नव्हती, असें समाधान ख्रिस्ती करूं पाहतील. तर मग क्लोविससारख्या फ्रेंचांच्या राजाचें उदाहरण घेतलेलें बरें. चार्लमेन ही बाप्तिस्म्याचे—निदान नीतीच्या बाबतींत—निवळला नाहीं काय ? विलायतेच्या आठव्या हेन्रीचा बाप्तिस्मा काय झाला नव्हता ? बाप्तिस्मा झालेला असतां ही असली मंडळी निवळल्याशिवाय कशी राहिली ? उस्मान, मोआविया, यझीद यांस सुंतेपासून आणि क्लोविस, चार्लमेन, आठवा हेन्री असल्या राजांस बाप्तिस्म्यांपासून प्रशान्तपणा मिळाला नाहीं कसा ? असा उलट सवाल आमचा श्वेताश्वतरी—जसा मुसलमानांस तसा ख्रिस्त्यांसही घालूं शकेल आणि उभयतांसही समर्पक जबाब देण्यास बरीच अडचण पडेल. अमुक कोरड्या शब्दांपासून अमुक कोरड्या संस्कारापासून प्रशांतपणा येऊं शकतो किंवा येतो, ही गोष्ट श्वेताश्वतऱ्यास कबूल होण्यासारखी नाहीं, ही गोष्ट त्यास कबूल करूं लावणारी कोटीही जशी मुसलमानांजवळ तशीं ख्रिस्त्यांजवळही सांपडण्याचा संभव नाहीं. गणिताचे सगळेच अधिकारी नसतात. सगळेच मुत्सद्दीपणांत यश कमवूं शकत नाहींत. सगळेच सेनापति होऊं शकत नाहींत. प्रशान्तपणा

१ हे सर्व रोमन बादशहा होते.

सर्वांच्याच भागधेयीं नसतो कित्येक माणसांमध्यें प्रशान्तपणा बीजावस्थेंत असेल, कित्येकांमध्यें सुप्तावस्थेंतही असेल तर तो भाग निराळा. जर प्रशान्तपणा अंगीं नसला तर गुरु व बाप तरी तो येऊं लावणार कसा ? गुरु, बाप सुप्तावस्थेंत प्रशान्तपणास जागें करूं आणि बीजावस्थेंतल्यास मोड आणूं शकतील; पण नसतां प्रशान्तपणा येऊं लावण्याचें सामर्थ्य परमेश्वरी कृपेच्या अंगीं असावयाचें व असतें.[१]

१ श्वेताश्वतर-उपनिषद्, प्रस्तावना, पृ. ८-९; १९००.

---

## -- ३८ --

## कलिवर्ज्य म्हणजे काय ?

जशी प्रत्येक मानवी प्राण्याची तशी प्रत्येक राष्ट्राची जगन्नियंत्या महाप्रभूनें दिवसरात्रीशीं सांगड घातलेली आहे. प्रत्येक प्राण्याची दिवस रात्र ऐन एकंदरींत बारा बारा तासांची असते. जसा दिवसास तसा रात्रीसही आरंभ असतो, मध्यान्ह असतो, सरता शेवट ही असतो; आरंभापासून घटिके घटिकेस जो ठळक चढ लागतो, त्याची कमाल सरते शेवटीं होते. सकाळ, मध्यान्हकाळ, संध्याकाळ हीं दिवसाच्या तिरस्थळी अवस्थेचीं नांवें; प्रदोष, मध्यान्हरात्र, पहांट ही रात्रीच्या तिरस्थळी अवस्थेची नांवें. हाच न्याय, हेंच तिरस्थळी अवस्थेचें रहाटगाडगें प्रत्येक राष्ट्राच्याही पाठीस लागलेलें आहे; जसें राष्ट्राच्या, तसें त्या त्या मंडळाचेही पाठीस लागलेलें आहे. खिस्ती मंडळ घ्या, मुसलमानी मंडळ घ्या, हिंदु मंडळ घ्या. उदय, मध्यान्ह, अस्त ही जशी दिवसाच्या उजेडाची, तशी प्रदोष, मध्यान्ह रात्र, पहांट ही रात्रीच्या

काळोखाची तिरस्थळी अवस्था प्रत्येक राष्ट्राच्या आणि मंडळाच्या ललाटीं लिहिलेली असते; ती कोणासही टळणें नाहीं, कोणासही टाळतां येणें नाहीं. मनुष्यांच्या आणि राष्ट्राच्या किंवा मंडळाच्या दिवसरात्रीमध्यें अंतर इतकेंच कीं, मनुष्याची दिवसरात्र निव्वळ बारा बारा तासांची असल्यामुळें प्रत्येक अज्ञाच्याही लक्षामध्यें नीट पटलेली असते; राष्ट्राची किंवा मंडळाची दिवसरात्र कित्येक तपांची किंवा शेंकडोंही वर्षांची पडल्यामुळें, साधारण सूज्ञाच्याही लक्षांत येण्यासारखी नसते, मग प्रत्येक अज्ञाच्या लक्षांत कोठून येणार ? जे विचारी इतिहासज्ञ असतील त्यांचें मात्र लक्ष असल्या एकंदरींत दुरवगाह व दुर्ज्ञेय बाबींकडे जाणारच; जे विचारी पुरुष इतिहासाचे मार्मिक असतील, निदान कमजास्त रसिक तरी असतील, त्यांस मात्र असल्या बाबींची गोडी अधिकाराप्रमाणें कमजास्त कळणार. काळोखाच्या ऐन मध्यान्हास कलियुग आणि उजेडाच्या ऐन मध्यान्हास कृतयुग किंवा सत्ययुग म्हणतात. विधवेच्या लग्नाच्या आड येणारें हिंदी मंडळाचें कलियुग लागलें कधीं तें नीट ठरवितां येत नाहीं, पण संपेल कधीं तें साधारणपणें ठरवितां येतें. रामशास्त्री प्रभुण्याच्या मनांत ज्या दिवशीं बालविधवांच्या लग्नाचा विचार शिरला, तेव्हां दिशा बऱ्याच अंधुक होत्या, असें सामाजिक चालींचा विचारी इतिहासज्ञ सहज कबूल करील. बाळशास्त्री जांभेकरांचे काळीं अंधुकपणा बराच साफ गेला. गंगाधरपंत गद्र्यांनीं बालविधवेशीं लग्न केलें, अण्णासाहेब भांडारकरांनीं आपल्या बालविधवा झालेल्या मुलीचें कन्यादान केलें, तेव्हां या चालीच्या संबंधानें थोडा तरी उजळपणा आला, असें समजण्याम्हणण्यास हरकत दिसत नाहीं. बंगाल्यांत ईश्वरचंद्र पंडितांनीं बालविधवेचें सुनमुख पाहून आणि तिच्या तोंडांत साखर घालून या सामाजिक चालीचा उजेड तिकडच्या प्रांतीं थोडा तरी पडेसा केला. निदान या सामाजिक चालीच्या संबंधानें कलियुगाचा अवतार हिंदी मंडळांत जवळ जवळ संपला, असें समजण्याम्हणण्यास आज हरकत दिसत नाहीं. " कलिवर्ज्य " म्हणजे " काळोखाच्या युगांत " म्हणजे काळोखाच्या ऐन मध्यान्ह रात्रीस विधवेचें लग्न वर्ज होतें; पण

आज हिंदी मंडळाची काळोखाची ऐन मध्यान्ह रात्र जाऊन पहांट होत चाललेली असल्यामुळें, आजच्या काळीं विधवेचें लग्न वर्ज्य किंवा निषिद्ध न मानतां उक्त किंवा विहित मानणें वाजवी होत आहे. अशा प्रकारची व्यवस्था लावणें हीच एक तड सोईची आहे, दुसरी तड राहिलेली नाहीं.[1]

1 ( स्त्रियांचा पुनरुद्धार, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २९, अंक ३, पृ. ८९-९० मार्च, १८९९ )

— ३९ —

## राजसत्ता आणि धर्म

" ज्या धर्मास राजसत्ता अनुकूल नाहीं, त्या धर्मास उतरती कळा लागते, "—असा एक सिद्धांत होऊं पहातो, पण हा सिद्धांत होईल कीं सिद्धांताभास होईल ? यहुदी धर्मास किंवा पारशी धर्मास आज राजसत्ता अनुकूल नाहीं; तरी त्या धर्मास आज उतरती कळा लागलेली मानतां येईल काय ? जसें यहुद्यांचे, तसे पारश्यांचेही आज भगीरथ प्रयत्न चालले आहेत, त्यांत त्यांस यशही येत आहे, हें जो कोणी चौकशी करील किंवा डोळे उघडून पाहील, त्यास सहज दिसून येणार आहे. आविस्ती पल्हवी या दोन पारश्यांच्या आगमाच्या भाषा, यांचा प्रवेश विद्यापीटांत झाला ही साक्ष लहान आहे काय ? शेट खरशेटजी रुस्तमजी कामा सत्तर वर्षांचे झाले, तरी त्यांचे श्रम धर्मशिक्षण शाळांतून सुरु होण्याबद्दल आज चालले आहेत, विद्यापीठीं शास्त्राच्या भाषेचा प्रचार होतांच कृतकृत्य मानून हे स्वस्थ बसले नाहींत तर त्यांचे पुढचेही प्रयत्न चालू आहेत.

कामा साहेबांस व त्यांच्या बरोबर श्रम करणारांस राजसत्तेचा कोणत्या तरी प्रकारचा अनुकूलपणा आहे काय ? नाहीं. यहुदी लोकांचे श्रम चालले आहेत त्यांस तरी राजसत्ता अनुकूल आहे काय ? नाहीं. मुसलमानांच्या धर्मास तरी राजसत्ता अनुकूल आहे काय ? नाहीं. मुसलमानी धर्मास उतरती कळा लागलेली मानतां येईल काय ? नाहीं. मुसलमानी धर्मास उतरती कळा लागलेली जे म्हणतील त्यांची छाती उफराटी म्हणावी लागणार नाहीं काय ? काथोलिक धर्मास राजसत्ता अनुकूल आहे काय ? नाहीं. आज जी राजसभा येथें आहे, तिचें काथोलिक धर्माशीं मूळचेंच हाडवैर आहे, तरी काथोलिक धर्मास निदान हिंदुस्तानांत तरी उतरती कळा लागलेली दिसत नाहीं. असें का ? अमेरिकन मिशन किंवा गंगारुपी रमाबाईच्या अफाट कामास राजसत्तेचा अनुकूलपणा असल्यास तो कोणत्या प्रकारचा हें कोणास सांगतां येईल काय ? शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत जो आज इतका पसरला आहे, त्यास आज राजाश्रय आहे काय ? पूर्वीं तरी कधीं होता काय ? शरीफ महंमद यांच्यासारखे खोजे गृहस्थ शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांताच्या पायीं आपलें तन मन धन अर्पितात, तें त्यास राजाश्रय आहे, म्हणून कीं काय ? सारांश राजसत्ता, राजाश्रय यांच्या अभावाचा धर्माच्या उतरत्या कळेशीं संबंध नाहीं. " राजाश्रय ज्या धर्मास नाहीं, त्या धर्मास उतरती कळा लागते, " हा सिद्धांताभास होय. हा सिद्धांत म्हणतां येत नाहीं. जर ब्राह्मण म्हणवायाचें तर विचारीपणास फांटा देतां येत नाहीं; जर विचारीपणास फांटा द्यावयाचा असेल तर ब्राह्मण तरी म्हणवूं नये.[1]

---

१ राजसत्ता आणि धर्म, सुबोधपत्रिका ( १-१२-१९०१ )

## — ४० —

## " आज क्रांति हवी आहे."

" लांब तोंडाचें, मोठ्या पोटाचें, हत्तीच्या कानाचें " जें बाहुलें सालोसाल अलीकडेस होऊं लागलें आहे, तें परब्रह्म नव्हे, म्हणून तें नको आहे. तें झुगारून दिलें पाहिजे; तें पुन्हां येणार नाहीं, असेंच पाण्यांत बुडवून थेट रसातळास पोंचवलें पाहिजे, अशी कमजास्त खात्री होऊन, कमजास्त धैर्य आंगीं येण्यास आरंभ झाल्याशिवाय तदनुरूप कमजास्त यत्नही हातून झाल्याशिवाय राहणार नाहीं. जातिभेदही नको आहे, कारण त्यास शास्त्रांत आधार नाहीं. शास्त्रांतल्या वर्णांमध्यें रोटीच्या व बेटीच्या व्यवहारास उघड मोकळीक आहे. मुली कितीहि वर्षांपर्यंत अविवाहित ठेवण्यास शास्त्राची अडकाठी बिलकूल नाहीं. लग्न पाहिजे त्या महिन्यांत करण्यास ब्राह्मणी शास्त्र सांगत आहे; विधवा बाळ असो वा प्रौढ असो, तिच्या लग्नास शास्त्राची अडकाठी बिलकूल नाहीं.[१]

---

१ न्यायमूर्ति चंदावरकर, सुबोधपत्रिका, २२-६-१९०२.

## — ४१ —

## सहा शत्रु व मित्र

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर—हे सहा निव्वळ शत्रू मानले जातात, पण हे निव्वळ शत्रू मानणें बरोबर नाहीं. हे जसे शत्रू आहेत, तसेच मित्रही आहेत.

( १ ) स्त्रीनें पुरुषावर व पुरुषानें स्त्रीवर प्रीति करणें हें स्त्रीपुरुषांस परस्पर योग्य आहे. मरेपर्यंत एका स्त्रीवर एका पुरुषास व एका पुरुषावर एका स्त्रीस प्रीति करूं लावणारा काम मित्र होय, शत्रु नव्हे. एका स्त्रीची अनेक पुरुषांवर व एका पुरुषाची अनेक स्त्रियांवर एकेच काळीं प्रीति बसवणारा काम शत्रु होय, मित्र नव्हे.

( २ ) अनीति पाहून जो मनाचा क्षोभ होतो, तोही क्रोध होय; पण तो मित्र होय, शत्रु नव्हे. मुलगा खोटें बोलतांना आढळतांच जो क्रोध आईबापांस येतो, व ज्या क्रोधामुळें मुलास थोबाडांत मिळते किंवा छडी घ्यावी लागते, तो क्रोध मित्र होय, शत्रु नव्हे. विनाकरण किंवा स्वार्थ न साधल्यामुळें जो क्रोध येतो, तो शत्रु होय, मित्र नव्हे.

( ३ ) भीक मागण्याचा किंवा परक्यावर भार टाकण्याचा प्रसंग पडूं नये, म्हणून उजू वाटेनें नेणारा पैशाचा लोभ मित्र होय शत्रु नव्हे. आड वाटेनें दुसऱ्याच्या पैशाचा लोभ शत्रु होय, मित्र नव्हे.

( ४ ) बायकोस नवऱ्याचा, नवऱ्यास बायकोचा, बापास लेकाचा, लेकास बापाचा मोह मित्र होय, शत्रु नव्हे. या मोहामुळें सीता रामाबरोबर वनांत निघाली; बाबरनें आपला जीव घेऊन मुलास वांचवण्याची सफळ प्रार्थना देवास केली. स्वार्थाचा त्याग हें फळ या मोहास लागतें. ज्या मोहांत स्वार्थाचा त्याग होत नाहीं, तो मोह शत्रु होय, मित्र नव्हे.

( ५ ) सदभिमान उत्पन्न करणारा मद मित्र, दुरभिमान किंवा मस्ती उत्पन्न करणारा मद शत्रू. विद्येनें सदभिमान उत्पन्न होतो, तो हवा. दुरभिमान किंवा मस्तपणा उत्पन्न होतो, तो नको. जातीचा सदभिमान जितका इष्ट तितकाच दुरभिमान अनिष्ट. "मी ब्राह्मण; सर्वांस ब्राह्मण करीन, ब्राह्मणपणास लांछन लावणारें काम–प्राण गेला तरी बेहत्तर पण–करणार नाहीं" – हा जातीचा अभिमान. " मी ब्राह्मण, मी दुसऱ्या कोणासही ब्राह्मण म्हणणार नाहीं, कोणाही दुसऱ्याचें ब्राह्मणत्व कबूल करणार नाहीं; कितीही कुकर्में केलीं तरी मी ब्राह्मण तो ब्राह्मण " – हा जातीचा दुरभिमान.

(६) 'दुसऱ्याचा हेवा करणें' हा मत्सर शत्रू. दुसऱ्याशीं स्पर्धा करणें—हा मत्सर मित्र. सारांश, काम वगैरे सहा विकार शत्रू आहेत, मित्रही आहेत. शत्रूचा बळी देणें रास्त आहे, मित्राचा बळी देणें कधींही रास्त होणार नाहीं. शत्रू जितके अपकार करणारे, मित्र तितके उपकार करणारे.[१]

---

१ (सुबोधपत्रिका, १३-४-१९०२)

# -४२-

## अभ्यंकर आणि रामायण

रा. रा. सुधारककर्ते यांसः—

मराठी वाचणारांवर रा. म. गो. अभ्यंकरांचे मोठे उपकार झाले आहेत. त्यांचा वाल्मिकी रामायणावरील निबंध सर्वतोपरी विचार करण्याच्या योग्यतेचा झाला आहे. निबंध जर केवळ अनुमानांचाच असता, तर इतक्या योग्यतेचा मानण्यास अडचणी येत्या. पण वस्तुस्थितीचा भाग शेवटच्या ४६ पृष्ठांत आहे. तो प्रत्येक मराठी वाचणारानें—जसा लहानानें तसा मोठ्यानें—वाचून मनन करावा, अशी शिफारस आहे. असले शोध जसे पुरुषांच्या तसेच नायकांच्या वाचण्यांतून जातील तसा त्यांचा अधिकार जास्त वाढणार आहे. अधिकार वाढूं लागला कीं विचारीपणाचें पाऊल बुद्धींत पडण्यास आरंभ झाला समजावा.

रामायणाच्या कथेस वेदांत आधार नाहीं. अभ्यंकरांनीं एक राम (पृ. १७३) वेदांतून ओढून काढला आहे, पण हा "असुर" असल्याचा

दाखला मात्र त्यांच्या मनांत आहे. असला पोकळ दाखला देण्यांत अर्थ नाहींसा वाटतो, असले पोकळ आधार येऊं लागले, म्हणजे पुस्तक लिहिण्याचा मुख्य हेतु खुळकट समुदायाच्या खुळकटपणावर भर घालण्याचा असावा, अशी शंका कित्येकांस येणें साहजिक आहे. तरी अभ्यंकरांचा एकंदरींत हेतु क्षुल्लक नाहीं, हें मोकळें मनानें येथें कबूल करावें लागत आहे. तसला क्षुल्लक हेतू असता, तर त्यांच्या हातून पुढचा वस्तुस्थितीचा भाग खचित लिहिला गेला नसता. परिक्षित् जनमेजय वगैरे कांहीं भारती पात्रें कमजास्त मानतां येतील; पण कोणतेंही रामायणी पात्र वैदिक मानतां येणारें दिसत नाहीं. रामायण व भारत या कथा होत, यांस " इतिहास " म्हणणे म्हणजे " इतिहास शब्दाचा केवळ अपप्रयोग करणें होय. संस्कृतांत " इतिहास व " नीति " शब्द निराळया अर्थी वापरतात. मराठींत निराळया अर्थी वापरतात. संस्कृतांतली " नीति " खरें–खोटें, बरें–वाईट, पुण्य–पाप यांच्यामध्यें अंतर मानीत नाहीं. चापून राजद्रोह चालवावा, खूनही करावे किंवा करवावे व चापून सांगावें की " राजद्रोह चालवला नाहीं, खूनही केले–करवले नाहींत. " ही संस्कृतांतली " नीति " " वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा. " " इतिह " असें " आस " होतें, अशी इतिहास शब्दाची व्युत्पत्ति संस्कृतांत करतात, " इतिह " शब्दापासून " ऐतिह्य " असाही शब्द झाला आहे. " या झाडावर मुंजा रहातो, " हें "ऐतिह्याचें " उदाहरण देण्यांत येतें, अर्थातच " इतिहास–ऐतिह्य " शब्दाचा अर्थ संस्कृतांत " दंतकथा " होतो. मराठींत " नीति–अनीति " शब्द " बरें–वाईट " या अर्थी वापरण्यांत येतो, " अग्नींतून एक पुरुष निघाला त्यानें खीर दिली, त्या खिरीनें दशरथाच्या राण्या गरोदर झाल्या. कुंतीस यम, वायु, इंद्र या तीन देवांपासून तीन मुलगे झाले; आईनें भिक्षा सारखी वाटून घेण्याला सांगितली, म्हणून एक द्रौपदी पांचांनीं वाटून घेतली – " ही घडलेल्या हकीगतींत घालण्याची ज्या लोकांची छाती होईल, ते निव्वळ मूर्ख किंवा मतलबी मानल्याशिवाय सुटका आहे काय ? समजा कीं आज कोणी सांगितलें कीं अमुक बाई खिरीनें गरोदर

झाली किंवा अमुक बाई देवापासून गरोदर राहिली, किंवा आईनें सांगितल्यामुळें दोघां किंवा तिघां भावांनीं एकाच स्त्रीशीं लग्न लावलें, तर हें सगळें घडलेल्या हकीगतींत घालणारी मंडळी कितीशी खरें निघेल ? खुद्द टिळक किंवा खुद्द परांजपे हे व यांच्याच कंपूतलीं माणसें असला प्रसंग आज कोणावर ठेपल्यास काय खरें म्हणतील ? धन्य आहे हिंदू धर्माची कीं " अहल्या, द्रौपदी, तारा, सीता, मंदोदरी" या ज्या पांच बडया पतिव्रता त्या धर्मांत मानल्या आहेत, त्यांत राक्षसी मंदोदरीच काय ती बावन्नकशी सोनें ठरत आहे. सीतेविषयीं चापून शंका पुष्कळांस आली होती, म्हणून अग्नीचें दिव्य तीस करूं लाविलें, तारा पतिव्रता मूळची सुग्रीवाची असून वालीनें पळविली व आपले घरीं नांदविली, व ताराबाईही नांदली. द्रौपदीचे पांच नवरे, वर्षाचे बारा महिने पांचानीं सारखे वांटून घेतले होते. अहल्या तर व्यभिचाराचें फळ कैकयुगें भोगत होती. असल्या कुकर्मामुळें इंद्राच्या अंगावर व्रण पडले. पुढें रामाचा पाय लागताच शिळा पूर्वीची अहल्या झाली ! ! ! असल्या राजरोस भाकडकथा संस्कृत इतिहासांत खपतात, पण या मराठी इतिहासांत खपूं शकतील काय ? आजच्या काळींच्या अहल्यांची, द्रौपदींची, तारांची याद केल्यास किती तरी " पतिव्रता " सांपडतील ! ! ! मोठें दुर्दैव कीं आज जाडया जाडया विद्वानांचे यत्न मराठी वाचणारांच्या डोळयांत निव्वळ धूळ टाकण्याच्या मतलबी हेतूनें चाललेले उघड दिसत आहेत. रामायण व भारत हे मराठींतल्या " इतिहासाच्या " तोडीचे मानले कीं सर्वस्व बुडालें, देशांत मातेरें झालें.

भारती कथा व आंतला देवांनीं केलेला गोलंकार या दोहोंचा उल्लेख बौद्धांच्या ललितविस्तरांत येत असल्यामुळें, भारताचा कांहीं सांगाडा तरी १९०० वर्षांचा मानतां येईल. पण असल्या प्रकारें रामायणाचा उल्लेख ललितविस्तरांत आलेला माहीत नाहीं, इतकेंच नाहीं तर धनुष्य मोडल्याचें व पुढें रामाचा , बाण सात ताल वृक्ष फोडून गेल्याचें अशीं दोन आख्यानकें बुद्ध कथेतून ( पृ. १७६ व १७७ ) उचलून कोणी तरी रामकथेंत गोंवलेलीं असल्याची बळकट शंका येत आहे.

जुन्यांत जुना रामकथेस उल्लेख एक मृच्छकटिकांत एक दोन ठिकाणीं येतो. पण मृच्छकटिकाचा काळ नीटसा ठरवतां येत नाहीं. तशांत प्रस्तावना व धूतेचें सती जाणें हीं दोन आख्यानकें मूळच्या कवींचीं उघड नव्हत. " जावा " द्वीपाच्या दक्षिणेस " ब्रलि " द्वीपांत रामकथेची आठवण आहे. पण या वसाहती शालिवाहनाच्या ६।७ व्या शतकांतल्या आहेत. तशांत तिकडच्या कथानकांत व इकडच्यांत पुष्कळ अंतर असल्यामुळे जशी इकडची रामकथा होती, तशी तिच्याहून पुष्कळशी निराळी अशी एक रामकथा तेलंगणांत होती. ती तेलंगी लोकांनीं आपणाबरोबर नेली असें गृहीत धरावें लागत आहे. याप्रमाणें ग्रीस मधल्या " हेलेनी " कथेचेही बरेच प्रकार होते. अभ्यंकरच म्हणतात कीं बालकांडांतल्या सव्वा दोन हजार ( पृ. १६९ ) श्लोकांमध्यें गौडप्रत व मुंबईची प्रत यांच्या मध्यें फक्त ४७ श्लोक सारखे आहेत, मजकुरांत फारसा फरक नाहीं. ही रामायणाच्या ग्रंथाची स्थिति अभ्यंकरांनींच कबूल केली आहे. तर मग मूळची कथा कितीशी होती, तिचें स्वरूप कसें होतें, याचा निकाल लावायचा कसा ? पण टिळकी गणिताची कामधेनु तावडीस सांपल्यामुळें तीस पिळून, " रामास सहा सात हजार वर्षें झालीं, " इतकें दूध अभ्यंकरांस सहज काढतां आलें. तें त्यांनीं सादर केल्याबद्दल केसरीच्या ब्ऱ्याच वाचणारांनीं त्यांचे उपकार मानावे, हें वाजवी आहे. पण मोठी मौज दिसते ती ही कीं, आमच्या लोकांचा संप्रदाय भारतीय युद्ध पांच हजार वर्षांचें मानतो, वराहमिहिराचा जोतिषी संप्रदाय तें साडेचार हजार वर्षांचें ठरवितो; भीष्माष्टमीचा विचार करतां भारती कथा तीन हजार वर्षांहून जुनाट ठरविणें कठीण जातें. ऋग्वेदसंहितेंल्या एका सूक्तांत " फाल्गुनीस " " अर्जुनी " नांव मिळालेलें आहे, त्या पक्षीं आजची शाकल संहिता आमच्याच लोकांच्या संप्रदायाप्रमाणें पांच हजार वर्षांहून जुनाट ठरणें नाहीं. तरी हें नवीन टिळकी गणित ती सात हजार वर्षांची ठरवितें !!! दयानंदी लापनिकेच्या दुर्बिणीनें पाहिल्यास वेदांत तारायंत्र, आगगाडी वगैरे सर्व कांहीं दिसू लागतें. टिळकी गणिताच्या सांवलीखालीं बसल्यास

वेदांचा जुनाटपणा केवळ अफाट भासतो !!! वास्तविक विचार केल्यास असें दिसून येईल कीं, आजचें रामायण अनेक काळांतलें व अनेकांच्या हातचें आहे. शोधक रीतीनें पाहिल्यास तें एका काळांतले किंवा एकाच्या हातचें दिसण्याचा मुळींच संभव नाहीं. पूर्वींच्या गोष्टींचें स्वरूप कमजास्त निश्चितपणानें ठरवतां येणार नाहींसें नाहीं. "मुंज नव्हती" हें (पृ. २६६) अभ्यंकरांस कबूलच करावें लागलें आहे, तर मग वेदाधिकार तरी कसा असणार ? अभ्यंकरच म्हणतात कीं "संध्या, तर्पण, देवपूजा, अग्निहोत्र, व समाधि ही स्त्रियांचीं नित्य कृत्यें होतीं. ( पृ. २५७ )" जर वेदासच आरंभ नाहीं तर संध्या कोठून येणार ? अग्निहोत्राचा होम तरी कसा होणार ? दशरथानें अश्वमेध केल्याचें ही वर्णन बालकांडांत आरंभीं आलेलें आहे; जर मुंज नाहीं तर अश्वमेध तरी कसा होणार ? अग्निहोत्र श्रौत-सूत्रांतलें आहे, पण संध्या गृह्यसूत्रांतली आहे. "गृह्यसूत्रां"तलें कर्म "स्मार्त" समजतात, श्रौतकर्मांच्या पाठीमागून कैक वर्षांनीं स्मार्त कर्म जन्मलेलें मानावें लागतें. तर्पणही श्रौतकाळीं होतेसें म्हणण्यास आधार नाहीं, तें स्मार्त कर्मांतलें आहे. देवपूजा गृह्यसूत्रांत बिलकूल येत नाहीं. समाधीचीही तीच दुर्दशा. "देवपूजा" व "समाधि" या दोन्ही "स्मार्त" म्हणजे "गृह्यसूत्राच्या" काळाच्या पुढें जन्मल्या. जर रामायणाची कथा वेदाच्याही काळाच्या पूर्वींची किंवा वैदिक काळांतली मानण्याचा आग्रह कोणी करील, तर "संध्या, तर्पण," असल्या गोष्टी ज्या श्रौतकाळीं बिलकूल नसून पुढें स्मार्त काळीं जन्मल्या, त्यांच्या आजच्या रामायणांतल्या जाहीर उल्लेखाची उपपत्ती कशी करावयाची ! संन्यासाचा उल्लेख ( पृ. २५७ ) आला आहे. तोही अशाच प्रकारचा आहे. याच पृष्टावर चार्वाकाच्या मताचा उलेख आहे. "यथा हि चोरः स तथा हि बुद्धः, तथागतं नास्तिकमेव विद्धि" यांत बुद्धाचा जाहीर उल्लेख आहे. "गोहत्या हें महापातकांमध्यें ( पृ. २६८ ) व गाईस लाथ मारणें हें मध्यम पातकांमध्यें गणलें गेलें आहे; गोमांस खाल्ल्याचा उल्लेख कोठेंही नाहीं," असें अभ्यंकर म्हणत ( पृ. २७४ ) आहेत. वेदांत व "गृह्यसूत्रांत" तर गोवध पावलोपावलीं आहे. भवभूतीचा उल्लेख, गोमांसाचें

भक्षण ब्राह्मणांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या आड येत नाहीं, असा आहे. जनक क्षत्रियानें मांस सोडलें होतें, पण वसिष्ठ ब्राह्मणानें कालवड खाल्ली, तरी त्या विषयीं " आविर्भूतं ज्योतिषां ब्राह्मणानां ये व्याहारास्तेषु मा संशयो भूत् । भद्रा ह्येषां वाचि लक्ष्मीर्निषिक्ता। नैते वाचं विप्लुतां व्याहरन्ति । " अशी सत्य प्रतिज्ञा अरुंधती करूं शकली. गोवधाचा निषेध स्मार्त काळांतला ही नव्हे. तो " कलिवर्ज्यां " मध्यें मात्र आढळतो. तो आठशें किंवा नऊशें वर्षांहून जास्त जुनाट मानण्यास अनेक अडचणी आहेत. अशा अनेक बाडांनीं भरलेला ग्रंथ एकाच काळींचा मानतां येईल कसा ? सहा सात हजार वर्षांचा मानतां येईल कसा ? ग्रंथ अनेक काळींचा मानावा लागला, म्हणजे अनेकांचे हात आढळतील त्या सर्वांची माहिती व त्या सर्वांचा अधिकार सारखाच मानणें वाजवी होणार नाहीं, हेंही उघड आहे. ज्या अनेकांचे हात आढळतील ते अनेकही निरनिराळ्या देशांतील समजल्या शिवाय सुटका नाहीं; अर्थातच त्या त्या भागास स्थानिकपणा आला. त्याप्रमाणें आजचें रामायण आजच्या भारताप्रमाणें उघड खिचडीच्या स्वरूपाचें आहे. दोहोंचेही कांहीं भाग प्राचीन असतील, तर कांहीं अर्वाचीनही म्हणावे लागतील; कांहीं भागांस अधलें मधलें स्थान द्यावें लागेल. असल्याही खिचडींतून त्या त्या काळींच्या सामाजिक, धार्मिक वगैरे स्थितीविषयीं पुष्कळ ज्ञान आजच्या पिढीस मिळेसें करतां येईल. आमच्या लोकांचा अनेक प्रकारचा भ्रम घालवितां येईल; अभ्यंकर मात्र जास्त हवे आहेत. कांहीं ठळक गोष्टी खालीं दाखल करण्यांत येत आहेतः—

पृ. ( २५७ ) सीतेनें संध्या केली, कौसल्या अग्नींत मंत्राहुती देत होती. (पृ. २६२) स्त्रिया पुरुषांप्रमाणें दारू पीत. (पृ. २६५) बायकांस कासोटा व चोळी नसे. ( पृ. २६८ ) सुतक फिटल्यानंतर बारावे दिवशीं श्राद्ध होई, तेव्हां ब्राह्मणांस रत्नें, सोनें, रुपें, दास दासी व घरें देत व बोकडाचें मांस खाऊं घालीत. ( पृ. २७२ ) स्त्रियांचे नाकांत नथ, हातांत बांगडया व पायांत सांखळ्या नसत, व हे दागिने केव्हां प्रचारांत आले

हें समजत नाहीं. ( पृ. २७४ ) ब्राम्हणाशिवाय इतर सर्व वर्ण दारू पीत. कोशिंबिरी, सांडगे, पापड यांचा उल्लेख नाहीं. ”

असल्या माहितीनें हिंदु धर्मास कीड लागणार आहे, पण ब्राम्हणी धर्मास धास्ती बिलकूल नाहीं. उलट हिंदु धर्मास जितकी कीड लागेल, तितकें ब्राम्हणी धर्माकडे लक्ष जास्त लागणार आहे. हिंदु धर्माचें एक मोठें तत्व जातिभेद; एकमेकांस उघड किंवा चोरून तुच्छ मानणाऱ्या जाती हिंदुधर्मास अवश्यमेव हव्यात. दुसरें मोठें तत्व अनेक देव. या दुसऱ्या तत्वाची व्यभिचारी भक्तीशीं सांगड पडली आहे. शिवाचा सोमवार, विष्णूची एकादशी, गणपतीची विनायकी किंवा संकष्टी, देवीचें नवरात्र, याप्रमाणें सगळें करीत सुटणें हे व्यभिचारी भक्तीचें लक्षण. “ जाण अज्ञानाचा मूर्त । अवतार तो ” असें ज्ञानेश्वर व्यभिचारी भक्ति करणारास उद्देशून म्हणतात. ब्राम्हणी धर्माचा एका बाजूचा पाया चार वर्णांवर व दुसऱ्या बाजूचा अद्वितीय देवावर. वर्णव्यवस्था धंद्यावर बसवलेली असल्यामुळें रोटी बेटी व्यवहारास वर्णावर्णांमध्यें बिलकूल आडकाठी ब्राम्हणी धर्माप्रमाणें येत नाहीं. अद्वितीय देवाची अव्यभिचारी भक्ति असली म्हणजे चारही वर्णांमध्यें भावंडाचें नातें लागलें. भावंडाचें नातें लागलें कीं, बरोबरी झाली. जातिभेदाचा उंचनीचपणा झुगारून द्यावा लागला. सारांश जितकें हिंदुधर्माचें वाटोळें होईल, तितकें ब्राम्हणी धर्माचें व ब्राम्हणांचें कल्याण होणार आहे. म्हणून अभ्यंकरांच्या पुस्तकाकडे व त्यांतही विशेषें करून तस्तुस्थिती भागाकडे आजच्या पिढीचें लक्ष जितकें वळवतां येईल तितकें इष्ट सिद्धीचें लक्षण आहे. वर्गणी जमवून वस्तुस्थितीचा भाग तितका छापवावा, व पैशास–किंवा प्रसंगीं फुकटही–वाचणारास मिळेसा करावा; हा उपाय जर करतां येईल तर सुधारणेचें पाऊल सहज पुढें पडणार आहे. सुधारक म्हणविणारांनीं विचार करावा, अशी मोठ्यांस विज्ञापना, व बरोबरीच्या प्रमाणें धाकट्यांस विनंति आहे. [1]

---

१ सुधारक, १८, ८, १९०३

## -- ४३ --

# समुदाय व व्यक्ति

" प्रत्येक व्यक्तीनें आपापली सुधारणा आपापल्या शक्तीप्रमाणें करावी म्हणजे राष्ट्र आपोआप सुधारेल. "— अशा अर्थाची मसलत वर्तमान पत्रांतून देण्यांत येते; हिचा जास्त विचार करणें जरुरीचें दिसतें. थोडयाच विचारा अंतीं असें दिसून येईल कीं ही मसलत निर्दोष किंवा निर्व्यंग नाहीं. हिच्यांत दोष आहे.

दोष कोणता? व्यंग कोणतें ? तें पाहूं. नुसत्या व्यक्तीनें काम होणें नाहीं, कारण कोणतेंही राष्ट्र नुसत्या व्यक्तींचें बनलेलें नसतें. व्यक्ती कितीही असल्या तरी जो पर्यंत त्या व्यस्त असतात, तों पर्यंत हातून उलट होणें अशक्य असतें; व्यस्त असणाऱ्या व्यक्ती जेव्हां कशा तरी समस्त होतील, अर्थातच समुदाय बनवतील, तेव्हांच कार्याची सिद्धी जोराप्रमाणें कमजास्त होईल. रानटी माणूस व सुधारलेलें माणूस यांच्यामध्यें मुख्य अंतर तें हेंच कीं, रानटी माणसांत समुदायाची किंवा संघाची शक्ती नसते; सगळया व्यक्ती व्यस्त म्हणजे सुटया पडलेल्या असतात, त्या समस्त होऊं शकत नाहींत. व्यस्त असणाऱ्या व्यक्ती समस्त होऊं लागल्या, म्हणजे सुधारणेचें पाऊल पडण्यास आरंभ झाला, समुदाय मोठा बनणें शक्य झालें. समुदाय वाढूं लागला कीं समाज होतो, पुढें संघ किंवा राष्ट्र ही जमतें. व्यक्तीहून समुदायांत शक्ति जास्त असते; समुदायाच्या मणगटांत जोर समाजाच्या मणगटाहून कमी असतो. समाजाचें ही प्रसंगीं संघापुढें किंवा राष्ट्रापुढें चालत नाहीं. कोणताही खेळ मग तो राजकीय असो, सामाजिक असो, वा धार्मिक असो— व्यस्त किंवा सुटया व्यक्तीपासून होणें नाहीं. त्यास समस्त झालेल्या व्यक्ती हव्यात. नुसत्या अवयवांनीं किंवा अंगांनीं काम होत नाहीं. अवयव किंवा अंगें मिळून जेव्हां अवयवी किंवा अंगी जन्मतो,

तेव्हां काम होतें. जगांतल्या सगळया खेळांच्या मुळांशीं हा अवयवावयवी भाव किंवा अंगांगी भाव आढळेल. निरनिराळया काड्या काडकन मोडतात, पण एकदा जुडी बनली म्हणजे ती तशी मोडतां येत नाहीं. या विषयींची इसापनीतींतली गोष्ट सुप्रसिद्ध आहे. येथवर शास्त्राची उपपत्ति झाली. आतां उदाहरणाची उपपत्ति करूं या; पहिल्यानें विदेशी किंवा विधर्मी उदाहरणें घेऊन, पुढें स्वदेशाकडे व स्वधर्माकडे वळूं. हाम्पदन Hampden हा व काब्दन Cobden या केवळ व्यक्ती होत्या, व्यस्त किंवा सुट्या व्यक्ती होत्या. जर त्यांनीं समुदाय जमविण्यास यत्न केला नसता किंवा तो यत्न सफल झाला नसता, तर ह्या व्यक्तींच्या हातून कितीसें काम उरकलें असतें बरें ? " आपापलीं मतें ज्यानें त्यानें वाटल्यास सोडावीं व आमचीं मतें वाटल्यास घ्यावीं " इतकाच उपदेश ते करते, तर त्यांच्याच एकट्यांच्याच हातून निभाव लागता काय ? जर त्या त्या व्यक्तीस पूर्वींचीं मतें सोडू लावून व आपलीं नवी मतें घेऊं लावून व्यस्त व्यक्तीस समस्त करण्यास व समुदाय बनवण्यास उभयतांच्या हातून यत्न न होता, तर यांच्या हातून काय निष्पन्न होतें ? पण उभयतांच्याही हातून यत्न झाला म्हणून समुदाय बनूं शकला कार्यसिद्धि झाली. काथोलिक प्रातेस्तंत व ग्रीक — या तीन्ही संघांचा इतिहास असाच आहे. व्यस्त व्यक्तीचा केवळ उपदेशच न होतां जास्त व्यक्ती मिळवून समुदाय मिळविण्याकडे यत्न झाला व तो सफळता पावला, म्हणून इष्टसिद्धि शक्य झाली. शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ वगैरे इकडच्या आचार्यांचाही इतिहास असाच आहे. त्या व्यस्त व्यक्तीनें दुसऱ्या अनेक व्यक्ती समस्त करून, त्याचा समुदाय बनवण्यास यत्न केला व तो तडीस गेला, म्हणून तो तो पंथ आज नांवाजला आहे, किंवा कायम झाला आहे; कायमपणा समुदायास किंवा समस्तच व्यक्तींस आहे; व्यस्त व्यक्तींस नाहीं. एकटी शिवाजी व्यक्ति व दुसऱ्या व्यस्त व्यक्ती त्याही जशा स्वधर्मी तशाच विधर्मी समस्त करून समुदायच नव्हें, तर राष्ट्र पुन्हा जन्मवूं शकली. म्हणून राजारामाचे कारकी-

दींत मराठी लोकांचें मग ते हिंदू असोत वा मुसलमान असोत — स्वातंत्र्य कायम राहूं शकलें.

हाच न्याय आपण इकडच्या प्रार्थनासमाजास व आर्यसमाजास लावूं या, दुसऱ्याही सुधारक म्हणवणारांस लावूं या. पहिल्यानें प्रार्थना समाज घेऊं.

जर " समाज " नांव घेतलें आहे, जर त्या नावांत कांहीं अर्थ आहे, तर यत्न व्यस्त व्यक्ती घेऊन समस्त करण्याकडे हवा आहे, असा जर यत्न होईल तरच समाज बनेल, घेतलेलें नांव सार्थक होईल. एक प्रार्थनासामाजिक दुसऱ्या प्रार्थनासामाजिकास बंधू समजत असला पाहिजे. बंधूचें नातें एकदां लागलें, म्हणजे अडचणी ऐकल्या–ऐकवल्या पाहिजेत, सांगितल्या–सांगूं लावल्या पाहिजेत. दुसऱ्या जशा अनेक अडचणी असतात, तशाच सामाजिक असतात. सामाजिक प्रसंग पडतात, ते नातलगांशीं किंवा जातींशीं पडतात, आमच्या लोकांत प्रत्येकास आज जातीच्या पलीकडे समाज एकंदरींत दिसत नसतो. लग्नामुंजीच्या अडचणींचें माहेर एकंदरींत जास्त दिसेल; जात म्हटली म्हणजे लहान–मोठा समुदाय बनवूं शकतील तर जातीच्या समुदायाशीं टक्कर तरी कमजास्त मारतां येईल, यश–अपयश पुढें देवाच्या हातीं टेवल्या शिवाय सुटका नाहीं. प्रार्थनासमाजाच्या सिद्धांताप्रमाणें चालण्याचा यत्न करणें व चालणें हें प्रत्येक प्रार्थनासामाजिकाचें पहिलें कर्तव्य मानलें पाहिजे. प्रार्थनासमाजाचे सगळे सिद्धांत जातिभेदास प्रतिकूल आहेत. सिद्धांताप्रमाणें चालावें तर जात आड येते, जातीचें ऐकावें तर सिद्धांत आड येतात. पण तो तो व्यवहार आला म्हणजे ज्या पक्षी जातीचे ऐकावे लागतें, तें न ऐकल्यास क्षणोक्षणीं व पावलोपावलींही त्रास पडतो, त्या पक्षीं जातीचे ऐकल्या शिवाय चालत नाहीं, सिद्धांत गुंडाळून ठेवावे लागतात. जातीस दोष देण्यांत अर्थ नाहीं; कारण तो उघड देववत नाहीं; जरी उघड कोणीं दिला, तरी जो पर्यंत क्रियाप्रसंगीं जातींच्या म्हणण्याप्रमाणें होत आहे, किंवा विरुद्ध क्रियेवर कोणत्या तरी प्रकारें झांकण घालण्यांत येत आहे, तोंपर्यंत उघड

दिलेल्या दोषासही निव्वळ वाचाळपणा समजून जात तिकडे ढुंकूनही पहात नाहीं. जात लहान–मोठा हत्ती आहे; फुलांच्या वृष्टीस जुमानीत नसतो. क्रिया बरीक अंकुशाच्या ठिकाणीं असते. पण ती प्रसंगी परत घेतली किंवा कबूल केली नाहीं, म्हणजे तीस जात भिवविण्यासाठीं केलेला लांकडाचा अंकुश समजते. करावयाचें काम निमुटपणें करते. प्रसंगीं वांकवते. तशांत प्रार्थनासामाजिक एकजात नाहींत, निरनिराळ्या जातींचे आहेत; एक-जात असते तर त्यां एक जातीस तरी जोर येऊं शकता. पण सभासद निरनिराळ्या जातीचे आहेत, व कोणा सभासदाचा किल्ला जरी लहान मोठा पडलेला असला किंवा एकाद्यास तो पाडावासा वाटला, तरी तो वळवण्यास किंवा "पाडा" म्हणण्यास, प्रसंगीं कुटुंबांतलीं ही माणसें तयार नसतात. जात दूर राहिली. अशी जर हकीगत बाहेरच्यांच्या ही उघड नजरेस पडत आहे, तर प्रार्थना समाजांतल्या व्यस्त व्यक्तींनीं समस्त होण्यास व समुदाय करण्यास यत्न करणें हाच एक अद्वितीय उपाय नव्हे काय? राम मोहनाचा यत्न समुदायाच्या दिशेनें होता; नव-विधानाची दिशा समुदायाचीच आहे; साधारण ब्रह्म समाजानेंही समुदाया-चीच दिशा जाहीर पकडलेली आहे. ब्राह्म म्हणविणारांची वाट व दिशा ठीक दिसतात; "हिंदु" न म्हणविण्याकडे व एकजात करण्याकडे जी ब्राह्मांची प्रवृत्ति आढळते, ती यथायोग्य आहे. ती कोणत्याही प्रकारें वावगी नव्हे. "हिंदु" शब्द खिस्ती १० व्या शतकांचे पूर्वी नव्हता; तो जन्मल्यावर कैक वर्षांनीं "हिंदुधर्म" शब्द जन्मलेला असला पाहिजे—"हिंदु" म्हणवूं लागले कीं श्रुतिस्मृतिपुराणांबरोबर संबंध लागणें–लावणें अशक्य झाले; "हिंदु" शब्द संस्कृत सारस्वतांत कोठेंही आढळत नाहीं. "हिंदु' शब्दच जर आढळत नाहीं, तर "हिंदुधर्म" शब्द तरी कसा आढळणार? तशांत "हिंदु" व "हिंदुधर्म" शब्द पुढें आणल्यास रूढीचें स्तोम माजतें, शास्त्र पाठीमागें राहतें, शास्त्रांतला देव अर्थातच पुष्कळ पाठीमागें रहातो. जर रूढी नको, जर खुळकटपणा नको, जर शास्त्र हवें, जर शास्त्रांतला एकमेवाद्वितीय, स्वयंप्रकाश, स्वयंसिद्ध

जीवात्म्याच्या व पांच भूतांच्या पलीकडचा परमात्मा हवा, तर हिंदुत्वास व त्याच्याबरोबर हिंदुधर्मास वाटलींत घालून व बूच न निघेसा हातोड्यानें ठोकून, पुरुषभर ओंड खणलेल्या खड्ड्यांत पुरून टाकावें, हाच एक मार्ग तूर्त दिसत आहे; दुसरा मार्ग कोणास सुचत असल्यास सुचवणें, विचार करतां येईल. प्रार्थनासामाजिकांनीं " ब्राह्म " म्हणवावें, हा एक मार्ग; हा मार्ग पसंत नसल्यास, एकादा चांगलासा शब्द शोधून काढावा व स्वीकारावा, हा दुसरा मार्ग. " हिंदु " व हिंदुधर्म या शब्दांशीं तरी अजीबात संबंध तोडून टाकावा. व्यस्त व्यक्ती केवळ प्रार्थनेनें एकत्र जमून समुदाय जन्मेल, तर वाईट नाहीं; पण केवळ प्रार्थना निव्वळ बोलण्याच्या तोंडीची होईलशी वाटते. बेटीची देवघेव जास्त व्यक्तींमध्यें होईल, तरच समस्तपणा येऊन समुदायपणा जन्मणें शक्य आहे. पण बेटीची देव-घेव ही वरची पायरी असून, रोटीची जाहीर देवघेव ही खालची पायरी आहे. बेटीची देव-घेव या सांसारिक नाटकाचा पूर्वरंग रोटीची जाहीर देव-घेव होय. प्रार्थना, संस्कार वगैरेचा भास कोरडा पडतो. कोरड्यास कांहीं लागतें, तेव्हां तो घशाखालीं उतरतो. बेटीची देव-घेव जाहीर रोटीच्या देव-घेवी प्रमाणें कोरड्यास घशाखालीं उतरवणारी आहे. सारांश, व्यस्त व्यक्तींमध्यें रोटी-बेटीचा व्यवहारच त्यांस समस्तपणा आणून, त्यांचा समुदाय बनवूं शकेल; जेव्हां समुदाय बनेल, तेव्हांच " समाज " नांव जोडलेलें सार्थक होईल.

आतां आर्यसमाजाकडे अशीच नजर फेंकूं या. प्रार्थनासमाजास एका साधारण नांवाची जरुरी निःसंशय आहे; पण दयानंद स्वामीनें ती तसली जरुरी राहूं दिली नाही. " आर्य " नांव ठीक आहे, या नांवानें श्रुतिस्मृतिपुराणांशीं संबंध सुरेख लागूं शकत आहे; आर्यसमाजास स्मृति-पुराणांशीं संबंध नको, एकट्या श्रुतीशींच, व तोही केवळ संहितेशीं हवा, तो भाग निराळा. याप्रमाणें आर्यसमाजाजवळ साज सुरेख जमला आहे, त्याचें श्रेय दयानंद स्वामीस मिळत आहे. नवविधानी ब्रह्मांतल्या सुरेख साचाचें श्रेय केशव बाबू स्वामीस द्यावें लागत आहे. पण दोन्ही स्वामींची एक एक

जबरदस्त चूक झाली, ती त्यांच्या पंथाच्या जोराच्या प्रसाराच्या आड आली; ही चूक दुरुस्त होणें अशक्यासारखें आज भासत आहे. आपल्या पाठीमागें व्यवस्थापक परिषदेची स्थापना करून ठेविली, त्या गोष्टीवरून त्याची दृष्टि निःसंशय बरीच दूर पोंचली होती. पण "सर्वानुमतें काम झालें पाहिजे" हें एक कलम घातलें हा एक मिठाचा खडा दुधांत टाकला. दूध नासलें. जर काम बहुमतावर टेकून, प्रसंगीं मतें समसमान न झाल्यास, नेमक्या मंडळीनें निवडलेल्या अध्यक्षाच्या मतावर जोखीम टाकण्यांत येती तर कार्य-भाग सुरेख उरकता. पण सर्वानुमतें होणें अशक्य झालें आहे. केशवाचा समाज अर्थातच लंगडूं लागला आहे, लौकरच पुरा लुळा होईलशी धास्तीही कित्येकांस पडली आहे. दयानंदाच्या हातून, केशवाच्या इतकेंही काम झाले नाहीं. दयानंदाची दृष्टि फारशी दूर गेलेली अर्थातच मानता येत नाहीं. जर व्यवस्थापक परिषदेची संस्था दयानंदा कडून स्थापण्यांत येती व नित्यानंदस्वामीसारख्यास त्या परिषदेचें अध्यक्षस्थान मिळतें, तर सगळया स्थानिक आर्यसमाजांचें सूत्र नेमक्या मंडळीच्या हातीं येऊं शकतें, अध्यक्षाकडूनही काम सुरेख होतें. याप्रमाणें एक शास्ता अध्यक्ष व त्याच्या हाताखालीं जेव्हां शास्ती परिषद असते, तेव्हां पंथास प्रसंगीं धर्मपणा येतो. या प्रकारच्या सामुग्रीची शिस्त मिळाली म्हणून खिस्ती " पंथ " लौकरच खिस्ती धर्म झाला, व पटापट पसरूं शकला. महमदाच्याही पाठीं लोकांनीं निवडलेल्या खलीपांच्या हातीं सूत्रें आलीं, म्हणून शिस्त राहूं शकली. जो पूर्वी महमदाचा " पंथ " होता, तो लौकरच " धर्म " पद पावला. " आपल्या लोकांमध्यें पुरे जमण्याचे पूर्वीच फाटण्यास आरंभ होतो. फाटूं लागलें, कीं फाटणें आवरतां येत नाहीं. " असा उद्गार न्यायमूर्ति रानडे कधीं कधीं काढीत असत. त्यांत तथ्यांश बराच आहे. खिस्त्यांमध्यें व मुस-लमानांमध्यें फाटे; फाटत नसेसे नाहीं. पण बेमालुम रफू लौकरच होई. पुन्हा जमूं लागे. अर्थातच विस्तार होई. पण आमच्या मध्यें एका बाजूस जमूं लागतें, तोंच दुसरे बाजूनें फाटूं लागतें; फाटूं लागतें तें असें फाटूं लागतें की, ठिगळही लागत नाहीं. बेमालूम रफू दूर

राहिला. ब्राह्मसमाजाचें उदाहरण मराठी देशाबाहेर व आर्य-समाजाचें दाराबाहेर जवळच आहे. तीनं वर्णांच्या बाहेर शूद्र समजण्याचा संप्रदाय आहे, तरी दयानंदानें त्यासही अधिकार देऊन चालू वहिवाटीस हरताळ लावला, त्याबद्दल त्याची पुष्कळ तारीफ करावी लागते. पण हें सगळें बोलणें झालें; चार वर्ण, चारांसही वेदाधिकार, चारांहीमध्यें रोटीबेटीची आडकाठी नाहीं, हीं सगळीं पुराणांतली वांगीं झालीं. इकडच्या आर्य समाजांत दक्षिणी नाहींत. एकादा दुसरा असला तरी तो नांवानें आपल्या कामापुरता आपणांस आंत शिरलेला समजतो. गुजराथीही त्यास तसेच मानतात. गुजराथ्यांस जातीभेदानें दक्षिणींहून जास्ती पछाडलें आहे. " त्याचे येळकोट राहीना मूळ स्वभाव जाईना." दयानंद स्वामीचें नांव घेऊं लागला, आर्य म्हणवूं लागला, " हिंदु " शब्द झुगारून दिला, तरी बेटा आंतून हिंदु तो हिंदु; हाडीं खिळलेली जात सुटते कशी ? आर्य-धर्माच्या लंब्या लंब्या गप्पा जनांत मारण्यास आर्यसमाजी कमी करीत नाहीं. मनांत मात्र अनार्य हिंदुधर्माची पूजा शोडषोपचारांनीं चालवतो !!! " वेदधर्मप्रचारिणी " सभेकडून कांहीं काम उरकल्यास न कळे. पण मुंबईच्या आर्यसमाजांत तरी जोर निदान बाहेरच्यास दिसत नाहीं. लाहोरची बातमी नीटशी मिळत नाहीं.

आतां सुधारक म्हणवणारांकडे वळूं या. कोणत्याही एकाच सुधारणेनें आज तड लागणें नाहीं, आज अनेक सुधारणा हव्या आहेत. जर एकाहून जास्त सुधारणा घेण्याची तक्रार नसली तर नसली. एकच सुधारणा घेऊन आसन मांडी घातलेली वाईट नाहीं. पण आपली नव्हे, अशी दुसरी सुधारणा घेऊन आसनमांडी घातलेल्यांशीं व एकाहून जास्त सुधारणा हातीं घेतलेल्यांशीं ही जाहीर रोटीची तरी देव–घेव हवी आहे. जीं सुधारक म्हणवणारीं माणसें असतील, त्यांनीं निरनिराळ्या एक वा अनेक सुधारणा—मग त्या धार्मिक असोत वा सामाजिक असोत–हातीं घेतलेल्या असतील, त्या सर्वांस एकदां एके ठिकाणीं खाजगी जमवून व प्रसंगीं दोन तीनही सभा भरवून एकदां निकाल लावण्यास यत्न केलेला बरा. व्यस्त व्यक्ती

समस्त होऊन जर सुधारकांचा समुदाय जन्मेल, तर राष्ट्रास बरें पडेल. सुधारकांचा समुदाय जन्मला, म्हणजे अनादि शिरस्त्याप्रमाणे असुधारकही सुधारकांस गालिप्रदान देत देत त्यांच्याच पाठीमागून जाण्यास शरमणार नाहींत. त्यांचाही समुदाय जन्मल्या शिवाय रहाणार नाहीं; तो तसा जन्मो अगर न जन्मो, सुधारक म्हणविणारीं माणसें तरी आपल्या कर्तव्यास जागल्या सारखीं होतील. जर व्यस्त व्यक्ती समस्त करून सुधारकांचा समुदाय बनविण्यास यत्न पुढाऱ्यांच्याही हातून होत नाहीं, तर बाबा पदमनजींनीं व नारायण शेषाद्रीनें, मध्यंतरीं गोविंदराव काण्यांनीं व नारायणराव वालिंकरांनीं, अलीकडेस गंगाधरपंत गद्र्यांनीं व नगरकर टिळकांनीं जो राजरस्ता स्वीकारला, त्या शिवाय दुसरी प्रशस्त गति आहे काय ? राजरस्ता हवा आहे, चोरवाटा नको आहेत. बालविधवेस चोरवाटा दाखविण्यांत जितके पाप आहे, तितकेंच प्रौढविधवेस दाखविण्यांत नाहीं काय ? " पाप " शब्द क्षणभर गुंडाळून ठेवूं; तरी " लग्नाचा अधिकार जसा पुरुषास असतो, तसाच स्त्रीस कां असूं नये ? " हा सवाल आहेच.[1]

---

१ सुधारक, २६-२-१९०४. २९-२-१९०४

---

## -४४-

## बौद्धधर्म काळोखच

प्रापंचिकाची पायरी खालची व भिक्षूंची वरची हें जर खरें, तर गृहस्थाची पायरी खालची; स्त्रीशीं संबंध ठेवणारांची पायरी खालची

झाली. स्त्रीचीही अर्थातच खालची झाली. ब्राम्हणी धर्मात गृहस्थाश्रम पहिल्या महत्वाचा मानला आहे.

' बौद्ध धर्म ब्राह्मण धर्माचें 'अपत्य ' म्हटल्यानें अपत्य होत नाहीं. अपत्यपणा दाखवला पाहिजे. एकाची दिशा पूर्व, तर दुसऱ्याची पश्चिम; अपत्यभाव कसा ?

बौद्धांच्या छळाची दंतकथा दक्षिणेंत मात्र आहे. नर्मदेच्या उत्तरेस स्थिति होती, तिच्यावरून बौद्धांचा छळ ब्राह्मण करीत नसत, असेंच म्हणावें लागत आहे. मृच्छकटिक व मालतीमाधव या दोघांचीहीं साक्ष आहे. बौद्ध धर्माचा शेवट संसार कडू मानण्यांत, ब्राह्मणी धर्माचा शेवट संसार गोड मानण्यांत. कित्येक गोष्टी स्वतःसिद्ध सारख्या आहेत. 'दया धर्मका मूल' हें ब्राह्मणी धर्माचेंही तत्व आहे. इतकेंच कीं, ढेंकणाचिलटांची किंवा विंचवापिसवांची मात्र दया ब्राह्मणी धर्मास मान्य नाहीं; तसली दया बौद्ध धर्मास मान्य असल्यास न कळे. बौद्ध धर्माचे खोटे गोडवे नको आहेत, ब्राह्मणी धर्माची भलती सलती निंदा नको आहे. गीता निरीश्वरवाद्यांची नव्हे, तींत कोठेंही निरीश्वरवाद नाहीं; उलट निरीश्वरवादाची म्हणजे सृष्टीस स्रष्टा नाहीं म्हणणाऱ्या मताची स्पष्ट निंदा दैवासुरविभागांत आहे. ज्यांस बौद्ध व्हावयाचें असेल त्यांनीं खुशाल तो धर्म स्वीकारावा. आज कोणी कोणाच्या आड येऊं शकत नाहीं. पण बौद्ध धर्मास ब्राह्मणी धर्माचा मुलगा बनवण्याचें भलतें सलतें काम करण्याचीं भानगड ही मंडळी जर न करील तर बरी. बौद्ध धर्म उघड काळोख आहे. ब्राह्मणी धर्म उघड उघड उजेड आहे, ब्राह्मणास काळोख नको असतो. उजेड हवा असतो. 'तमसो मा ज्योतिर् गमय' हेंच ज्यांस ब्राह्मण म्हणवायाचें त्यांचें एकमेवाद्वितीय परमेश्वराजवळ मागणें असलें पाहिजे. ज्यांस ब्राह्मण म्हणवायाचें नाहीं, ज्यांस ब्राह्मणी धर्माचा आंतून वीट आलेला असतो, त्यांचा मार्ग निराळा असल्यास नवल नाहीं. '[1]

---

सुधारक, १९०३

१ शास्त्रीबोवांचें बौद्ध व जैन धर्माबद्दल मत चांगलें नव्हते. बुद्धाला व महावीराला ते मान देत, पण त्यांच्या मतांतला निरीश्वरवाद त्यांस बिलकुल

पसंत नसे. अहिंसेचें खाण्यापिण्यांतलें स्तोम माजल्यामुळें ब्राह्मण शाकाहारी होऊन बहुजनसमाजापासून वेगळे पडले, त्यामुळें ते स्वतःला श्रेष्ठ व इतरांना तुच्छ लेखूं लागले. पूर्वींचा रोटीचा व्यवहारसुद्धां बंद होऊन जातिभेद बळावला असें त्यांचें म्हणणें. ब्राह्मणी धर्मांत ब्रह्मचर्य व संन्यास ह्यांची महती गायिली असून देखील गृहस्थाश्रमाला पहिलें स्थान दिलें आहे. अर्थात् शास्त्रीबोवांचीं बौद्ध मतासंबंधानें सगळीं मतें आजही सर्वच घेतां येतील असें नाहीं. 'सुधारकांत'च बौद्ध धर्माबद्दल नवीं नवी इंग्रजी पुस्तकें वांचून कांहीं मंडळींनी शास्त्रीबोवांना 'आव्हान' दिलें ( जुलै १९०३ ) त्यांत शेंवटचें पत्र प्रतिपक्षाचें होतें, ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ( शास्त्रीबोवांचे हे एक प्रतिपक्षी श्री. पु. गो. काणेकर-शारदाश्रमवासी-असून हें लेखन त्यांचें अगदीं प्रारंभींचें आहे. काणेकरांनीं आपला हल्ला मोजक्या इंग्रजी ग्रंथांवर भिस्त ठेवून पण शिस्तवार केलेला आहे. अर्थात् यांतलें ज्ञान आलें असलें तरी युक्तिवाद चांगला आहे. ही एवढी चकमक वजा केल्यास काणेकर हे शास्त्रीबोवांच्या लिखाणांचे चाहते होते.) तरी पण आज बुद्ध व बौद्धधर्म यांच्याबद्दल सर्व साधारण जनतेंत आपुलकी व आदर निर्माण झाला असूनही बौद्धधर्म हिंदुस्थानांत समूळ नष्ट कां झाला याची मीमांसा अजूनही व्हावी तशी नीट झालेली नाहीं. ज्ञानकोशांत डॉ. केतकरांनीं शास्त्रीबोवांप्रमाणेंच बौद्ध धर्माची पिछेहाट होण्याचीं कारणें दिलीं आहेत. ( महाराष्ट्रीय ज्ञानकोश – भाग ४, प्रकरण ८, पृ. १३५–१६१ ).

पण त्यांच्यावरही चहूंकडून टीकेचा भडीमार होऊन त्यांनीं कै. धर्मानंद कोसंबींचा रोष आजन्म स्वतःवर ओढवून घेतला.

---

## – ४५ –

## महाभारतांतील आख्यानें

( हप्ता ३. )

चैत्ररथ पर्व एकन्दरींत अगदीं पोरकट आहे. या पर्वाचा मूळच्या इतिवृत्ताशीं सम्बन्ध बिलकूल दिसत नाहीं. याजोपयाजांचें माहात्म्य वाढ-

वणाऱ्या व्यासानें फाजिलपणाचा कळस केला आहे. अग्नीच्या ज्वाळांमधून पुत्रोत्पत्ती आणि वेदीच्या मधून कन्योत्पत्ती होऊं लावून, हीं दोन अयोनिज रत्नें, द्रुपदाच्या बायकोपुढें झुगारणाऱ्या आणि द्रुपदाच्या निर्वंशाची कळी खुंटून टाकणाऱ्या बेटया याजोपयाजांनीं कामापुरतें लग्न लावून पुत्रोत्पत्ती करून देणाऱ्या बिचाऱ्या साक्षात् वेद व्यासास आणि वर उडून जाऊन साक्षात् सूर्याशीं बोलणें चालवणाऱ्या त्याच्या बिचाऱ्या पणजोबास डोकें खालीं घालूं लावलें खरें. जी शक्ति त्याच्याच मूळ पुरुषाच्या व त्या मूळपुरुषांच्या पणजोबाच्याही ललाटीं नव्हती, ती नरकातलें फळ उचलणाऱ्या आणि गुरुगृहीं सांपडेल त्याचें उष्टें, खरकटें मटकवण्यास किळस न वाटणाऱ्या याच्या व त्याच्या धाकट्या भावाच्या भोगवटयास घालण्याच्या पूर्वीं व्यासानें थोडा विचार केला असता, तर बरें होतें. पण एकदां आध्यात्मिक काळोखाचा अम्मल सुरु झाल्यामुळें बुद्धी पङ्गु होऊन अनाथ झाली, म्हणजे तिची धांव खुंटली, अर्थात सम्भाव्य किती आणि असम्भाव्य किती तें तीस कळेनासें झालें. त्रिमूर्तींतल्या एका मूर्तीची व तिच्या द्वारें साक्षात् परमेश्वराची अवज्ञा होते, महाप्रभूची टेर केल्यासारखी होते, महायोजकाची मस्करी उडते, असल्या पोक्त विचारांची सावलीही ब्राम्हणाच्याही मेंदूवर पडेनाशी झाली, म्हणजे ब्राम्हणाच्याच हातून धर्माचें मातेरें होऊं लागलें. गुरुचीच स्थिति अशा प्रकारची होऊन बोज गेला म्हणजे शिष्याची आध्यात्मिक तारम्बळच नव्हे, तर प्रसंगीं दाणादाणही होऊन गेल्यास नवल कोणतें ? गुरू एकटा बुडत नाहीं, तर शिष्यांसही घेऊन बुडतो म्हणून गुरूवर जबाबदारी पुष्कळ जास्त असते, शिष्यांवर पुष्कळ कमी असते. असल्या गोष्टींचा विचार जास्त करण्याचा अधिकार ब्राम्हणांसच नव्हे काय ?

क्षत्रिय वाट चालूं लागतील तेव्हां आघाडीस ब्राम्हण ठेवल्यास त्यांस गन्धर्व राक्षसांची भीति बिलकूल नसते, जर आघाडीस ब्राह्मण नसेल, तर त्यांस गन्धर्व राक्षसांकडून उपद्रव बराच पोंचतो.. ही ब्राम्हणाची महती ऐकणाऱ्या क्षत्रियांस कळावी, म्हणून चैत्ररथाच्या आख्यानाची जोड निषेधी मनूमधल्या व्यासानें कौरवपांडवांच्या कथेस मुद्दाम दिलेली

दिसते. वेदांतही " सप्तसिन्धु " येतात. " सात सिन्धूंचा प्रदेश " जसा आम्हा आर्यांच्या तसा आर्याणांच्या म्हणजे आजच्या पारशांच्या पूर्वजांच्याही शास्त्रामध्यें येतो पण त्या " सातसिन्धु " निराळ्या, चैत्ररथाच्या आणि टीकाकाराच्या सात नद्या निराळ्या.[१]

---

१ सुधारक-ता. २७।१२।१९०३. या लेखांतले विशिष्ट शुद्ध-लेखन पहा. संस्कृत इकारांत शब्द दीर्घ लिहिण्याचा प्रयोग थोडे दिवस शास्त्रीबोवांनीं केला. त्याचें हें एक उदाहरण. भाषेचे असे प्रयोग केल्यामुळें त्यांच्या भाषेचें स्वरूप पालटत गेलेलें आहे.

आर्याण=इराणी ?

---

## – ४६ –

# शाळांतून धर्मशिक्षण

" शाळांतून धर्मशिक्षण हवें " अशी ओरड आज बरेच दिवस चालली आहे, " आपण धर्मशिक्षण देत असतों " असें मुंबईतील "एक " शाळाही म्हणूं लागली आहे. या लोकांच्या ओरडींत व " एका " शाळेच्या म्हणण्यांत अर्थ कितीसा आहे, तो पाहिला पाहिजे. आमच्या लोकांत चालू मन्वंतरांत वाढत चाललेल्या " वाचाळते"चाच सगळा भाग या दोहोंतही—म्हणजे " ओरडींत व म्हणण्यांत "—आहे कीं थोडा तरी " क्रिया " रूपीं अर्थही यांत आहे ? याचा ऊहापोह करणें जरूरीचें आहे. समुदायास कित्ता घालून देऊं पहाणारांची स्थिति आज बरीच शोच्य झालेली आढळत आहे म्हणून हा उहापोह जरूरीचा वाटत आहे. जे कित्ता घालून देऊं पाहातात, त्यांस कमजास्त विचारही केल्याशिवाय सुटका नसते. जर विचार करावयाचा नाहीं, जर विचाराशिवाय नुसता वाचाळतेचाच विडा उचलण्यांत आला, तर कित्ता तरी पडणार

कसा? जर वळण कोणतें द्यावयाचें, त्याचा विचार केलेला नाहीं किंवा तो करावयाचाच नाहीं, तर कित्ता तरी कसा घालून देतां येईल? जर कोरड्या वाचाळते पलीकडे आणखी दुसरा कित्ता घालून द्यावयाचा नसला तर बोलणें बिलकुल नाहीं; पण तो उद्धारक किंवा सुधारक "कोरड्या वाचाळते पलीकडे जाणें नाहीं." ही गोष्ट कबूल करण्यासारखी दिसत नाहीं.

समजा कीं एक माणूस "हिरा हवा, हिरा, हवा" म्हणून म्हणूं लागलें, तर हिऱ्याचें स्वरूप कमजास्त ओळखण्यास शिकल्याशिवाय सुटका आहे काय? हिऱ्याचें स्वरूप कळेल, तेव्हांच हिरे नसणारामधून हिरा त्यास पारखून घेतां येईल. "सोन्याची पुतळी" जर हवी असली, तर सोन्याच्या स्वरूपाची कमजास्त माहिती असल्याशिवाय चालेल काय? हिऱ्याशीं सामना कांचेचा असतो, सोन्याशीं पितळेचा असतो; अशा प्रकारें त्या त्या मोलाच्या पदार्थाशीं सामना करणारे कमती मोलाचे पदार्थ बरेच असतात; प्रसंगीं हे कमी मोलाचे पदार्थ कमजास्त घातकही असतात.

धर्म हा पदार्थ मोलाचा असेल किंवा नसेल. जे हा पदार्थ मोलाचा मानीत नसतील, त्यांनीं ओरड केल्यास ती सगळी पोकळ समजल्याशिवाय सुटका आहे काय? "मी किंवा आम्ही हा पदार्थ मनस्वी मोलाचा मानतों" असें केवळ तोंडानें म्हणण्यांत अर्थ नाहीं, तर असें म्हणणारांच्या म्हणण्याचा त्यांच्या करणीशीं मेळ घराबाहेरच्यांस पटला पाहिजे; जर मेळ पटला नाहीं तर "तोंडानें मनस्वी मोलाच्या गोष्टी सांगतो, तरी करणीनें वस्तू बिनमोलाची सिद्ध करून देत आहे."—— असें तिऱ्हाईत राजरोस म्हणण्यास कमी करीत नाहींत. शेतांतली काळी माती जो कस्तूरीच्या मोलाची म्हणून, तीस पुन्हा शेतांत जशीच्या तशीच राहूं देतो, तो, तो पदार्थ कस्तूरी नव्हे हें करणीनें सिद्ध करीत नाहीं काय? कोणत्याही पदार्थाचें मोल त्याच्या स्वरूपावर असतें. जसें ज्याचें स्वरूप, तसें त्याचें मोल. जर स्वरूप कस्तुरीचें ठरलें, तर मोल अर्थातच वाढेल. जर स्वरूप काळ्या मातीचें ठरलें, तर मोल अर्थातच कमी झालें.

जर धर्म हा पदार्थ मोलाचा वाटत असेल, तर ज्यांस तो तसा वाटत असेल, त्यांच्या हातून त्याचें स्वरूप पहिल्यानें ठरवण्यांत आलें

पाहिजे, नव्हे काय ? जेव्हां धर्माचें स्वरूप ठरविण्यांत येईल तेव्हांच अधर्माचें स्वरूप ठरेल. जशी धर्माविषयीं प्रवृत्ति इष्ट असते, तशीच अधर्मापासून निवृत्ति इष्ट असते. धर्म जितका असतो, तितकाच — किंबहुना त्याहून जास्त अनिष्ट अधर्म असतो.

" शाळांतून धर्मशिक्षण हवें " —- अशी ओरड अलीकडे ज्यांनीं बरेच दिवस चालवली आहे, व " आमच्या शाळेंत धर्मशिक्षण होतें, " असें जीं म्हणत आहेत, त्यांनीं धर्माचें स्वरूप ठरवून ठेवलें आहे काय ? " आमच्या धर्माचें स्वरूप आज नवें काय ठरवायाचें ? ते ठरवून ठेवल्यास आज किती तरी वर्षें झालीं आहेत ! ! ! " असा जबाब ओरड करणारी मंडळी देईल, व या जबाबाचा प्रतिध्वनि धर्मशिक्षण-वाल्या शाळेच्या मंडळीच्या तोंडून निघेल. इतकेंच नाहीं तर अधर्माचेंही स्वरूप — " इंग्रज लोक अंगास रंग लावून नग्न फिरत होते, अशा काळीं—पूर्वींच सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या आमच्या पूर्वजांनीं नीट ठरवून ठेवलें आहे," असाही जबाब एकीकडून प्रसंगीं येऊन, दुसरीकडून लगेच त्याचा प्रतिध्वनीही उठेल, तर मग "मुगटा नेसून सोंवळ्यानें जेवणें, शेणवी कुडाळू यांस त्रिकर्मी व पळशांस शूद्र चित्पावनकऱ्हाड्यांनीं समजून, त्यांच्या पंगतीस न बसणें, चित्पावनास कऱ्हाडयांनी चितेपासून पावन झालेले व कऱ्हा-डयांस चित्पावनांनीं पाहुण्यास विष घालून मारणारे मानणें उभयतांनीं देवरुख्यांच्या पंगतीस बसल्यास सहा महिनें दरिद्र येतेंसे मानणें, विधवेचा विवाह भ्रष्टाकार मानणें, वपन सोंवळें करणारें समजणें, पोटभेदांत बेटीचा व्यवहार झाल्यास गोलंकार झालासा मानणें वगैरे वगैरे धर्म, व ओंवळ्यानें जेवणें, सोडा लेमोनेड पिणें, इराण्याच्या दुकानांत चहा पिणें, कुळंब्याच्या हातचें पाणी घेणें, परजातीकडे जेवणें, वगैरे वगैरे अधर्म— असेंच धर्माचें व अधर्माचें लक्षण बरोबर ना ? शाळेंत ज्याचें शिक्षण मुलांस मिळतें तो हाच धर्म ना ? जुने लोक हाच धर्म आज समजत आहेत. न्यायमूर्ति रानडयांचा धर्म हाच होता काय ? न्यायमूर्ति रानडे ज्या प्रार्थनासमाजाचे सभासद होते, त्या प्रार्थनासमाजाचा धर्म हाच

कीं काय ? " न्यायमूर्ति रानड्यांची तसबीर टांगण्याचा समारंभ धर्मशिक्षणवाल्या शाळेंत मोठ्या थाटानें झालेला आठवतो, म्हणून असे प्रश्न निरुपायानें विचारावे लागत आहेत. "दुसऱ्याचें मन दुखवणार नाहीं, असें आमचें धर्म शिक्षण असतें, "— असें म्हणणें पडेल. विधवा-विवाह करावा म्हटल्यास, जुन्याचें मन दुखवावें लागेल; न करावा म्हटल्यास नवे रागावतील म्हणून असल्या बाबी, अजिबात सोडण्यांत येतात— असें म्हटल्यास, " कर्तव्य काय सांगतां, अकर्तव्य काय सांगता ? कर्तव्या-कर्तव्याचा उपदेश होतो कीं नाहीं ? जर होतो, तर कोणत्या प्रकारें होतो–" याचा खुलासा हवा आहे. कर्तव्य म्हटलें कीं कोणाचें तरी मन दुखवावें लागतें, तें दुखवल्या शिवाय कर्तव्य करतां येइलसें वाटत नाहीं. " यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नो करणीयम् " म्हणणारांनीं आईचें ऐकलें नाहीं, तेव्हां आईचें मन त्यांनीं दुखविलें कीं नाहीं ? रामदास लग्नांतून पळून गेला तेव्हां त्यानें " सर्वां मुखीं मंगल " बोलवलें काय ? " रामदासाचे, तुका-रामाचे वगैरे अभंग शिकवतों, असल्या म्हणण्यावरून लोकांनीं समजावें काय ? " ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट, तरी तो तिहीं लोकीं श्रेष्ठ " हा अभंग तुकारामाचा; " ब्राह्मण तो एक चोखा ही महार; अभक्त-ब्राह्मण जळो त्याचें तोंड, " हे ही अभंग तुकारामाचे. " ब्राह्मण कोण " । असा प्रश्न एकाद्या धूर्त मुलानें केल्यास कोणाचेंही मन न दुख-वणारा असा जबाब शिक्षकाकडून येणार कसा ? " असले प्रश्न विचारणारीं मुलेंच नाहींत— " असा जबाब आल्यास तो पोकळ मानावा लागेल, " सहाव्या सातव्या यत्तेमध्यें ही असली मुलें मुळीच नाहींत " असें म्हट-ल्यास, असले प्रश्न विचारल्यास शिक्षा असावी म्हणून मुलें विचारण्यास धजत नाहींत " अशी शंका घेण्यास ऐकणारास सवड सांपडेल. " धर्म " पदार्थ एकदा घुसला कीं असले प्रश्न चुकवणार कसे ? जर धर्मशिक्षण मुळींच नसेल तर गोष्ट निराळी. " धर्मशिक्षण देण्यात येतें—" असें एकदां म्हटलें कीं हा ब्रह्मघोंटाळा टाळतां येणार कसा ?

म्हणून एकंदरींत असें दिसतें, असें स्पष्ट म्हणावें लागत आहे कीं, " शाळांतून धर्मशिक्षण हवें " म्हणणारी व " आमच्या शाळेंत

धर्मशिक्षण देतों " म्हणणारी या दोन्ही वर्गांतल्या माणसांनीं धर्माचें स्वरूप ठरविलेलें नाहीं. " धर्मशिक्षण देतों" म्हणणाऱ्या मंडळीनें जर धर्माचें स्वरूप ठरवलेलें असतें, तर छापण्यांत इतका मुग्धपणा किंवा निव्वळ उडवाउडवीचा भाग नसता. कोणी कदाचित् असें म्हणेल कीं " आमच्या या धर्माचें स्वरूप जर मुळीं ठरवतांच येत नाहीं तर तें आज ठरवायाचें कसें " ? असें कोणी म्हटल्यास, त्याच्या म्हणण्यांत कितपतसा जीव आहे तें पाहूं. आमच्या धर्मास कोणतेंही नांव द्या. त्यास हिंदु म्हणा, ब्राह्मणी म्हणा, सनातन म्हणा, आर्य म्हणा; नांवात विशेष नाहीं, सगळी मातब्बरी अर्थांत आहे. आमच्या धर्मांतला कोण ? आमच्या धर्माबाहेरचा म्हणजे विधर्मी कोण ? कोणत्या गोष्टी केल्यास आमच्या धर्मांतला म्हणतां येईल ? कोणत्या केल्यास आमच्या धर्मापासून बाह्य झालेला मानावा लागेल ? अशी चार प्रकारची व्यवस्था हवी आहे. आणखी ही एक व्यवस्था फार फार जरूरीची आहे, ती ही कीं, ज्या ग्रंथांस "शास्त्र" म्हणावयाचें, त्या ग्रंथांची यादी हवी व प्रत्येक ग्रंथाची श्लोक संख्या ही हवी. " श्रुति, स्मृति, पुराणें शास्त्र " --असलें मोघम म्हणणें उपयोगी पडणें नाहीं, श्रुतीशीं संबंध पत्करतो, पण स्मृतीशीं पुराणांशीं संबंध बिलकुल पत्करत नाहीं; स्मृतींची संख्या ही नीटशी ठरीव झालेली नाहीं. अठरा पुराणें म्हणतात, पण भागवताच्या संबंधानें घोटाळा पडतो, व पुराणांत एकमेकांशीं विरुद्ध भाग फार येतात. अशा प्रकारची व्यवस्था अशक्यापैकीं ठरवतां येईल काय ? धर्माचें स्वरूप ठरवतां येत नाहीं, या म्हणण्यांत जीव नाहीं, कारण पूर्वींच्या ब्राह्मणांनीं तें ठरवून ठेवलें होतें. जें काय पूर्वींच्या ब्राम्हणांनीं केलें तें त्यांच्याच वंशजांत अशक्यापैकीं म्हणतां येईल काय ? स्वरूप ठरवण्यास आज अडचणी आहेत, नाहींतशा नाहींत. " आज शंकराचार्य कोणी जन्मेल तरच हें धर्माचें स्वरूप ठरेल —" असा आक्षेप विचारी पुरुषांकडून तरी येतां कामा नये. शंकराचार्यांनीं ब्रम्हाचें स्वरूप ठरविलें. त्यांनीं धर्माचें स्वरूप ठरविलें, असें मानण्यास आधार नाहीं. यां गोष्टीचा खल तरी

मोकळ्या मनानें हवा आहे. तशांत हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आजचा काळ एकाचा उघड नव्हे, तो उघड चौघांचा आहे. शिक्षण पुष्कळ पसरलेलें आहे, विचार करणारीं माणसें बरींच आढळतील; विचारीपणा म्हटला कीं प्रसंगीं मतभेदासाठीं जागा हवी. एकाचा दुराग्रह अशिक्षितांमध्यें चालेल, विचारीपणावर दडपण टाकूं पहाणाऱ्या शिक्षितांमध्यें चालेल; पण राष्ट्र मोकळे मनानें विचार करणारांचें आहे ही गोष्ट लक्षांत वागवलेली बरी. आजचा तरी काळ चौघांचा आहे, एकाचा नव्हे, हें त्या पश्चिमेकडच्या राष्ट्रांत स्पष्ट दिसत आहे. " चौघांचा " म्हणजे " चौघा शिक्षितांचा, विचार करणारांचा " हेंही विसरतां कामा नये. सारांश जर शिक्षित व विचार करणारे चौघे एके ठिकाणीं मिळाले व विचार करूं लागले, तर धर्माचें स्वरूप ठरवणें अशक्यांमध्यें घालतां येऊं नये.[1]

---

१ ( सुधारक २७-६-१९०३ )

---

## -- ४७ --

## विवाह व लग्न.

( शास्त्रीबोवांनीं वैदिक विवाहविधीचा कसून अभ्यास केला. आश्वलायन सूत्राच्या आधारें त्यांनीं लग्नांतलें खरे मंत्र व विधि तेवढेच हुडकून काढून बाकीच्या उत्सवास फांटा दिला. विवाह हा पवित्र संस्कार असून तो शक्य तितक्या कमी खर्चांत व्हावा म्हणून त्यांनीं फार खटपट केली. बहिष्काराचा धाक सोसला. विक्षिप्तपणाची पर्वा केली

नाहीं. महाराष्ट्रांत वैदिक विधीनें विवाह करण्याची प्रथा ह्यांनींच प्रथम पाडली. विवाहांत पाणिग्रहण, अश्मारोहण, लाजाहोम, व सप्तपदी हे वैदिक विधि आवश्यक आहेत. बाकीचे विधि 'लग्न' म्हणजे पौराणिक किंवा रूढींतून निघालेले आहेत असें शास्त्रीबोवांचें म्हणणें. )

पूर्वी विवाहास आरंभ पाणिग्रहणापासून समजत, व विवाहाची पूर्णता सप्तपदींत झालेली समजत.

पण आज मंडळी बोलावण्यांत येते ती विवाहास म्हणून बोलावण्यांत येत नाहीं, ती लग्नास म्हणून बोलावण्यांत येते. अर्थातच ती सप्तपदीपर्यंत रहात नाहीं. इतकेंच नव्हे, तर पाणिग्रहणासही आरंभ होण्याचे अगोदर म्हणजे विवाहाचे आरंभींच चालती होते. सारांश लोकांमध्यें आज शास्त्रांतल्या विवाहाचें माहात्म्य बिलकूल नाहीं. सगळें माहात्म्य शास्त्राबाहेरच्या लग्नाचें आहे. "शुभलग्न सावधान झालें" व अंतरपटाचा पडदा एकेबाजूस काढण्यांत येऊन वधूनें वरास माळ घातली कीं आमंत्रणानें आलेली मंडळी चालती झाली.

लग्न म्हणजे काय ? तर शुभ लग्न या शब्दांवरच लग्न शब्दाचा खुलासा होऊं शकतो. जोश्यानें सांगितलेलें "शुभ लग्न ( मेष, वृषभ वगैरे )" म्हणजे "शुभ वेळ ( आला )." तर सावधान म्हणजे "लक्ष लावलेलें असा", कारण या शुभ लग्नावर वधूनें वराच्या गळयांत माळ घालण्याचा समारंभ व्हावयाचा. पाहिलेल्या शुभ लग्नावर म्हणजे मुहूर्तावर वधूनें वराच्या गळयांत माळ घातली कीं लग्न झालें, लग्नांस आमंत्रण केलेली मंडळी आपापले घरीं चालती झाली—हा लग्नाचा इत्यर्थ. हा अर्थातच विवाहाच्या इत्यर्थाहून अगदीं निराळा. लग्नांत वेदोक्त बिलकुल नाहीं. सगळें पुराणोक्त, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. स्त्रीच्या दुसऱ्या लग्नाच्या आड येणारें असें लग्नाच्या विधींत बिलकुल नाहीं. मंगलाष्टकें मूळचीं आठच असावीं, ज्यास्त असण्याचा संभव नाहीं हें 'अष्टक' शब्दच जाहीर करीत आहे. 'कुर्वंतु वो मंगलम्' हें शेवटचें पालवपद मंगलाष्टकांची मूळची भाषा संस्कृत होती हें जाहीर करीत आहे. चार

मंगळें वधुपक्षानें व चार वरपक्षानें म्हटलीं म्हणजे अंतरपट एके बाजूस निघाला. वधूनें माळ वराच्या गळ्यांत घातली, मेहुणाचा संबंध स्त्रीपुरुषांमध्यें जन्मला, अर्थातच लग्न लागलें अशी पूर्वीची लग्नाची पद्धत दिसते. अर्थातच लग्न म्हणजे मेहुणाचा संबंध जन्मला; अर्थातच विवाह पिष्टपेषणापैकीं झाला, हें उघड आहे. सारांश मेहुणाचा संबंध स्त्रीपुरुषांमध्यें उत्पन्न करणाऱ्या आजच्या कृत्यास लग्नविवाह असें दुहेरी नांव शोभतें. लग्न किंवा विवाह असें एकेरी नांव शोभत नाहीं. कारण मूळचीं दोन निराळीं कृत्यें एकमेकांस जोडून आजचें कृत्य जन्मास आलें आहे.

वधूनें वराच्या गळ्यांत माळ घालण्याचा सांप्रदाय उघड स्वयंवरविधींतला आहे. महाभारतरामायणांत व दुसऱ्याही पौराणिक ग्रंथांत माळ घालण्याचें माहात्म्य कमज्यास्त वर्णन केलेलें असतें; पण हें माहात्म्य क्षत्रियांच्या व विशेषेंकरून राजकन्येच्या विवाहसमारंभांत येतें. राजकन्या कोठेंही आली कीं तिच्या स्वयंवराचा समारंभ आला. गांधर्व विवाह हा स्त्रीपुरुषांमध्यें खाजगी करारानें होत असे. त्यास तिसऱ्याची जरूरी नसे. पुढें साक्षी म्हणून एखाद दुसरा जवळ बसण्याचा संप्रदाय पडलेला असल्यास तो भाग निराळाच. पण माळेशीं संबंध गांधर्व विवाहाचा लावलेला निदान गृह्यसूत्रांत येत नाहीं. स्वयंवराचा समारंभ जाहीर होत असे. माळ हें स्वयंवराचें सर्वस्व मानलेलें असे. म्हणून स्वयंवराचा अंतर्भाव आठांपैकीं कोणत्याही विवाहांत होऊं शकत नाहीं. स्वयंवर हा विवाहाचा नववा प्रकार गृह्यसूत्रांमध्यें दाखल न होण्याचें कारण हें दिसतें कीं हा क्षत्रियांमध्यें मात्र प्रचारांत होता; ब्राह्मणांमध्यें नव्हता. जे आठ प्रकार ब्राह्मणामध्यें कमजास्त प्रचारांत होते, तितक्यांचीच नोंद गृह्यसूत्रकारांनीं ठेविली आहे. लग्न हा उघड स्वयंवराचाच एक प्रकार आहे. अर्थातच हा मूळचा मराठी क्षत्रियांचा असून त्याच्यापासून मराठी ब्राह्मणांनीं उचलून घेतलेला मानावा लागत आहे. देवकाचा ही प्रकार मूळचा मराठी क्षत्रियांचा होता, तो पुढें त्यांच्यापासून मराठी ब्राह्मणांनीं उचलला. देवक एकदां बसलें कीं लग्न रहात नाहीं, ते झालेंच पाहिजे; ही चाल मूळची मराठी क्षत्रियांची होय; ही चाल मूळची

ब्राह्मणांची नव्हे. देवक म्हणजे 'क्षुद्र देवता' देवाच्या ठिकाणीं मानलेली. गांधर्व लग्नास, साक्षी कोणी पाहिजे. त्या साक्षीच्या ऐवजी 'देवका' ची योजना पूर्वी झालेली असावी. एखादा पदार्थ बाहेरून आणावयाचा, व त्याची अधिष्ठात्री देवता कल्पून, तिचें सांनिध्य त्या पदार्थांत मानावयाचें, अर्थातच हा बाहेरून आणलेला पदार्थ देवक म्हणजे ( लग्नास साक्षी असलेली ) क्षुद्र देवता समजावयाची –– अशी पूर्वींची मराठी क्षत्रियांमधली पद्धत दिसते. मराठी क्षत्रिय देवक असा एकेरीच शब्द वापरीत. मराठी ब्राह्मणांनीं ' देव ' शब्द पूर्वी जोडून गणपति वगैरे देवांस जागा ठेवली व ' देव – देवक ' असा दुहेरी शब्द प्रचारांत आणला.

" मनासारखा भ्रतार । वडासारखा विस्तार । महादेव पार्वती । तुला माझा नमस्कार ।" ही निव्वळ मराठी कविता गौरीहाराचा मंत्र समजतात. मराठी क्षत्रियांपासून मराठी ब्राह्मणांनीं हा गौरीहर उघड उचललेला मानावा लागत आहे. ' भेटबकऱ्या ' सारख्या लग्नांतल्या बाबी बरेच विचारतरंग उठवण्यास कारणीभूत होतात. ' भेटबकऱ्याचा ' मान मुलीच्या आईकडून मुलाच्या आईस मिळत असतो. ही चाल जशी देशावर, तशीच कोकणांतही आहे. ब्राह्मण म्हणविणारी माणसें आज बकऱ्याची भेट न पाठवतां, एका बकऱ्याची किंमत अजमासानें पोंचती करतात, तो भाग निराळा. पण भेटबकरा हें नांव बरेंच सूचक भासत आहे. बकऱ्याची भेट पाठवायाची, तिच्या हेतूची अटकळ करण्यास जाडें शिक्षण नको आहे, ब्राह्मणांमध्येंही ही चाल ज्या पक्षीं आहे, त्या पक्षीं ब्राह्मणांमध्येंही बकऱ्याची – जशी क्षत्रियांमध्यें आजही होत असतें, तशी – योग्यसंभावना पूर्वी होत असावी, असें अनुमान निर्बाध निघूं पहात आहे. क्षत्रिय हे धनी असल्यामुळें, आपल्या धन्यांची चाल त्यांनीं सहज उचलली, व लग्नांत बकऱ्याची यथायोग्य संभावना करण्यास ते क्षत्रियांपासून शिकले, असेंही असूं शकेल.[१]

---

१ विवाह व लग्न, हप्ता ३ रा. सुधारक, ८।६।१९०३

'महाराष्ट्रधर्मा'नंतर शास्त्रीबोवांनीं जर कांहीं एक भरींव कामगिरी केली असेल तर ती ही कीं लग्नांतले सर्व फालतू सोहाळे काढून टाकून केवळ अर्ध्या तासांत आणि

अगदीं थोड्या खर्चांत तें करता येईल असा विधि त्यांनी आश्वलायन सूत्राच्या आधारें तयार करून १८९९ सालीं आपले चुलतबंधु श्री. रामचंद्र भास्कर भागवत यांचें लग्न त्या प्रमाणें लावलें. त्या वेळीं खूप खळबळ झाली. हे विधि त्यांनीं – खानापूरच्या धुरीण ( २६ जून १८८९ ) ह्या पत्रांत ते छापून प्रसिद्ध केले होते. याप्रमाणें वैदिक विधींप्रमाणें लग्न करण्याची प्रथा शास्त्रीबोवांनीं महाराष्ट्रांत सुरू केली. मुंजीचा विधि देखील त्यांनींच प्रथम सुटसुटीत केला.

---

## —४८—

## क्षत्रियांचें अस्तित्व

हा प्रश्न तूर्त मराठी मुलखांतल्या पुरता आहे; इतर मुलखांतल्यांचा विचार तूर्त कर्तव्य नाहीं. मराठी मुलखांत क्षत्रिय आहेत किंवा नाहींत ? मराठी मुलखांतल्या कित्येक जाती पोटजाती स्वतःस क्षत्रिय म्हणवितात त्यांस क्षत्रिय न म्हणतां शूद्र म्हणतें कोण ? तर स्वतःस ब्राह्मण म्हणविणाऱ्या ज्या जाती आहेत त्या म्हणतात कीं, ‘ आज पृथ्वीवर एकही क्षत्रिय उरला नाहीं. जे क्षत्रिय आज आहेत ते तमाम शूद्र आहेत. ’ या प्रमाणें ब्राह्मण म्हणविणाऱ्या तमाम जाती—पोटजाती आज फिर्यादी पक्षकाराच्या ठिकाणीं असून क्षत्रिय म्हणविणाऱ्या तमाम जाती, पोटजाती विरुद्ध पक्षकाराच्या ठिकाणीं आहेत. हा दावा आजकालच्या दाव्यापैकीं नव्हे. हा बराच प्राचीन आहे: इतकेंच कीं बरींच वर्षें हें क्षत्रियांचें गंजिफा गुलदस्ताबाहेर पुरें पडलें नव्हतें. थोडे बहुत प्रसंगीं हें जरी बाहेर पडलें तरी तें गुलदस्तांतच पुन्हां जोरानें घाडून आणखी पुन्हां जोरानें जपून ठेवण्यास व प्रसंगीं अनृत भाषणाचें महापातकही करण्यास ब्राह्मण म्हणवि-

णाऱ्या जाती शरमत नसत. विरुद्ध पक्षकार उलट पोटदावा फिर्यादी पक्षकाराविरुद्ध आणतात कीं ब्राह्मण म्हणविणाऱ्या जाती–पोटजातींचें ब्राह्मणत्त्व अजून कितीसें कायम आहे, जर त्यांचें ब्राह्मणत्त्व आज कायम नाहीं तर या जातीपोटजातींस वादीच होतां येत नाहीं. ज्यांचें ब्राह्मणत्त्व अजून कायम असेल, त्याच जाती–पोटजातींस क्षत्रियत्त्वाविषयीं दावा क्षत्रिय म्हणविणाऱ्या जाती पोटजातींवर आणतां येईल.

याप्रमाणें या अतिभयंकर दाव्याचें स्वरूप आहे. ब्राह्मण म्हणविणाऱ्या जाती–पोटजाती ब्राह्मणत्त्वास व क्षत्रिय म्हणविणाऱ्या जाती क्षत्रियत्त्वास एकदां आंचवल्या म्हणजे दोन वर्ण अजिबात उडाले. अर्थातच चातुर्वर्ण्य रसातळीं गेले. ही स्थिति धार्मिक दृष्टीनें अतिभयंकर नव्हे काय? राष्ट्रीय पुरुषाच्चें म्हणजे ' विराट स्वरूपाचें ' डोकें एकदां उडालें व तसेच बाहु तोडले म्हणजे उरलें काय ? उरलेल्यानें पिंडाचें योगक्षेम चालणें कितीसें शक्य आहे याचा विचार क्षत्रिय म्हणविणाऱ्या जाती–पोटजातींहून ब्राह्मण म्हणविणाऱ्या जाती–पोटजातींसच विशेष केला पाहिजे नव्हे काय ? जर ब्राह्मण म्हणवावयाचें, जर वर्णगुरुत्वाचीं शेखी मिरवायची, तर ब्राह्मण म्हणविणाऱ्या जाती पोटजातींनींच एक जंगी परिषद राजरोस भरवून हा प्रश्न एकदांचा निकालांत काढला पाहिजे. क्षत्रिय म्हणविणाऱ्या जाती–पोटजातींकडून हें अत्यंत महत्त्वाचें व अपार जबाबदारीचें काम उरकण्याजोगें नाहीं. समजा कीं त्यांनीं व त्यांच्या संस्थानिकांनीं आमंत्रण केलें तर ब्राह्मण म्हणविणाऱ्या जाती–पोटजाती म्हणतील कीं ' ही बेटें शूद्रें, कुळंबटें, यांनीं भरलेल्या परिषदेंत आम्ही ब्राह्मणांनीं काय म्हणून जावें ? व आम्ही ब्राह्मणांनीं या कुळंबटांपुढें किंवा या कुळंबटांनीं नेमलेल्या ब्राह्मणेतरांपुढें श्रुतिस्मृतीचा काथ्याकूट कसा करावा ? म्हणून/ क्षत्रिय म्हणविणाऱ्या जाती–पोटजातींस व त्यांच्या संस्थानिकांस या मुद्यानिमित्त परिषद भरविणें अशक्यापैकीं होय, हें उघड आहे; म्हणून जर या प्रकरणानिमित्त परिषद भरविणें असेल तर ती ब्राह्मण म्हणविणाऱ्या पोटजातीनींच भरविली पाहिजे. जर ती तशी भरविण्यासाठीं ब्राह्मण म्हणवि-

णाऱ्या जाती पोट-जातींपैकीं कोणीही यत्न केलेला दिसत नाहीं, ऐकिवांत नाहीं, तर कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं ही मनस्वी खेदाची स्थिति लक्षांत आणून, ज्यास क्षत्रियत्वाचा अभिमान असेल त्यांनीं तरी आपला क्षत्रियत्वाचा पायपोस आपल्या पायांत ठेवावा व तो मतलबी माणसांच्या दुष्ट उपदेशानें पडला असल्यास पुन्हां घेऊन घालावा, हेंच उक्त नव्हे काय ? ज्यांस शूद्र किंवा कुळबट म्हणून घेणें असेल, त्यांनीं खुशाल म्हणवून घ्यावें; त्यांच्या आड आज कोणी काय म्हणून यावें ? पण जर क्षत्रिय म्हणवून घेणें असेल तर वर लिहिलेला एकच रामबाण मात्र दिसत आहे. दुसरा माहीत नाहीं.[१]

१ दीनबंधु, ऐतिहासिक गंजिफा, गंजिफ १. १९०४

---

## -- ४९ --

# जिजाबाई

शीवाजी हा अवतारी पुरुष शहाजीचा मुलगा. जिजाबाई ही शहाजीची बायको नानासाहेब पेशव्याच्या बायकोप्रमाणें लोकोत्तर होती. माधवराव पेशवा गोपिकाबाईच्या पोटांतून आला, म्हणून तिचे सगळे लोकोत्तर गुण त्याचे अंगीं येऊं शकले. जिजाबाईचे सगळे लोकोत्तर गुण शिवाजीचे अंगीं उतरले होते. गोपीकाबाईनें लाविलेलें वळण कांहीं वर्षें पेशवाईच्या सौभाग्याचें कुंकुम झालें; जिजाबाईनें लावलेल्या वळणामुळें शिवाजी मराटे-शाहीचा स्थापक होऊं शकला. असल्या लोकोत्तर बायका असतात, त्या पुरुषांच्या स्वेच्छाचारांखालीं वाकत नसतात; गोपिकाबाई व जिजाबाई या दोघी आपल्या यजमानांवर नाराज होऊन त्यांच्यापासून निराळ्या राहूं

लागल्या. गोपिकाबाई नाशिकीं राहूं लागली, जिजाबाई पुण्यास राहूं लागली. शहाजिनें मोहिते कुळींतल्या तुकाबाईशीं लग्न केलें, तेव्हांपासून जिजाबाईस आपला अपमान झालासा वाटला; ती शहाजीपासून दूर राहूं लागली. जें काम आपल्या बायकोनें केलेलें पुरुषास खपत नाहीं, तेंच काम आपल्या नवऱ्यानें केलेलें बायकोस खपावें कसें? जीस असलें नवऱ्याचें काम न खपेल तीच नवऱ्याची सहचरी म्हणतां येईल. जीस खपेल ती नवऱ्याची बटीक झाली. जिजाबाई बाणेदार बायकांपैकीं होती. सहचरी होण्याची लायकी तिच्या अंगांत होती. बटकुर होण्यास ती सर्वतोपरी नालायक होती. शिवाजी, शिवाजी झाला, त्याचें सगळें श्रेय एकट्या जिजाबाईस दिलें पाहिजे.[१]

---

१ श्री. शिवाजी महाराजांचें चरित्र. ता. ३१ एप्रिल १९०५ रोजी शिवजयंतीच्या दिवशीं शास्त्रीबोवांनीं ठाकुरद्वारीं जें व्याख्यान दिलें त्यांतील उतारा. शिवजयंतीची प्रथा महाराष्ट्रांत शास्त्रीबोवांनींच सुरू केली. (शिवावतार, हिंदुधर्मविवेचक १८८७). हें व्याख्यान ज्ञानप्रकाशांत ८-५-१९०५ या रोजीं छापून आलें.

— ५० —

## हिंदु व हिंदु धर्म

" हिंदु " शब्दाचा अर्थ फारसींत गुलाम होतो. हिंदु म्हणजे " सिंधु ( नदी वाहणारा उत्तरेकडचा मुलूख ) " " सिंद-सिंध " व " हिंदु " हे दोन्ही शब्द सिंधु शब्दापासून आहेत; इतकेंच कीं " हिंदु " शब्द केवळ मुसलमानांनीं जन्मविलेला असून त्यांच्यापासून पुढें इकडच्या

लोकांनीं उचललेला आहे. " हिंद " व " हिंदु " हे शब्द सख्खे बंधु होत. दोघांसही जन्मविणारे मुसलमान होते. गझनीकर महमूद वगैरे तूर्क मंडळी पहिल्यानें देशावर किंवा या भरतखंडावर स्वारी करूं लागली ती सगळी जातीनें तूर्क असून फार्सी भाषा समजणारी व दरी बोलणारी होती. या हिंद पलीकडच्यांनीं हिंद अलीकडचे इतके लोक कैदी करून नेले व गुलाम करून विकले कीं " हिंदु " शब्द अफगाण लोकांत " गुलाम " चा वाचक होवून राहिला; हा शब्द त्यांच्यामधून रूम प्रांतीं म्हणजे आशिया मायनरमध्यें गेला; व इ. स. १४ शतकांतल्या जलालुद्दीन रूमीनें तो आपल्या काव्यांत दाखल करून ठेविला आहे. " हिंदुस्थान " म्हणजे " हिंदूंचें " म्हणजे " मुसलमानांची गुलामगिरी करणारांचें स्थान." हिंदु-धर्म म्हणजे " मुसलमानांची गुलामगिरी करणारांचा धर्म " याप्रमाणें " हिंदु ", " हिंदुधर्म " या दोन शब्दांचें रहस्य आहे. जर " हिंदु " शब्दच संस्कृत सारस्वतांत कोठेंही येत नाहीं, तर " हिंदु-धर्म " शब्द तरी कोठून येणार ? " हिंदु " शब्द इ. स. १००० पुढें जन्मलेला आहे. आज हा शब्द ९०० वर्षांहून जास्त प्राचीन नाहीं. " हिंदु " शब्द जन्मास आल्यानंतर पुढें " हिंदु-धर्म " शब्द जन्मला. तो ९०० वर्षांचाही म्हणतां येत नाहीं. " हिंदु " धर्मास " धर्म " हें भरींव नांव शोभत नाहीं. असें कां ? तर " धर्म " शब्द घेतला कीं त्यांत भावंडाचें नातें जाहीर ध्वनित होतें. खिस्ती म्हटला कीं प्रत्येक खिस्ती त्यास आपला बंधु समजतो, त्याच्याशीं जाहीर बंधुत्व लावतो. त्याच्या हातचें पाणी घेण्यास व त्यानें केलेल्या स्वैंपाकाच्या आहुती आपल्या आंतल्या अग्निहोत्रांत होमण्यास संकोच बिलकूल बाळगीत नाहीं. खिस्त्याहूनही हें बंधुत्वाचें नातें मुसलमान जास्त पटवूं शकतात. हे दोन्ही धर्म जिवंत आहेत. जो धर्म विधर्म्यांस जाहीर आंत ओढून त्याच्याशीं बंधुत्वाचें नातें जाहीर लावतो तो धर्म जिवंत होय. तो धर्म भगवती भागीरथीचा दांडगा प्रवाह होय. पारशी व यहुदी हे दोन्ही धर्म आज जिवंत नाहींत. ते आज मुर्दाड होवून पडले आहेत. तरीही जसा पारश्यांचा तसा यहुद्यांचा समाज

लागल्या. गोपिकाबाई नाशिकीं राहूं लागली, जिजाबाई पुण्यास राहूं लागली. शहाजिनें मोहिते कुळींतल्या तुकाबाईशीं लग्न केलें, तेव्हांपासून जिजाबाईस आपला अपमान झालासा वाटला; ती शहाजीपासून दूर राहूं लागली. जें काम आपल्या बायकोनें केलेलें पुरुषास खपत नाहीं, तेंच काम आपल्या नवऱ्यानें केलेलें बायकोस खपावें कसें? जीस असलें नवऱ्याचें काम न खपेल तीच नवऱ्याची सहचरी म्हणतां येईल. जीस खपेल ती नवऱ्याची बटीक झाली. जिजाबाई बाणेदार बायकांपैकीं होती. सहचरी होण्याची लायकी तिच्या अंगांत होती. बटकुर होण्यास ती सर्वतोपरी नालायक होती. शिवाजी, शिवाजी झाला, त्याचें सगळें श्रेय एकट्या जिजाबाईस दिलें पाहिजे.[१]

१ श्री. शिवाजी महाराजांचें चरित्र. ता. २१ एप्रिल १९०५ रोजी शिवजयंतीच्या दिवशीं शास्त्रीबोवांनीं ठाकुरद्वारीं जें व्याख्यान दिलें त्यांतील उतारा. शिवजयंतीची प्रथा महाराष्ट्रांत शास्त्रीबोवांनींच सुरू केली. (शिवावतार, हिंदुधर्मविवेचक १८८७). हें व्याख्यान ज्ञानप्रकाशांत ८-५-१९०५ या रोजीं छापून आलें.

— ५० —

## हिंदु व हिंदु धर्म

"हिंदु" शब्दाचा अर्थ फारसींत गुलाम होतो. हिंदु म्हणजे "सिंधु (नदी वाहणारा उत्तरेकडचा मुलूख)" "सिंद-सिंध" व "हिंदु" हे दोन्ही शब्द सिंधु शब्दापासून आहेत; इतकेंच कीं "हिंदु" शब्द केवळ मुसलमानांनीं जन्मविलेला असून त्यांच्यापासून पुढें इकडच्या

लोकांनीं उचललेला आहे. " हिंद " व " हिंदु " हे शब्द सख्खे बंधु होत. दोघांसही जन्मविणारे मुसलमान होते. गझनीकर महमूद वगैरे तूर्क मंडळी पहिल्यानें देशावर किंवा या भरतखंडावर स्वारी करूं लागली ती सगळी जातीनें तूर्क असून फार्सी भाषा समजणारी व दर्बारी बोलणारी होती. या हिंद पलीकडच्यांनीं हिंद अलीकडचे इतके लोक कैदी करून नेले व गुलाम करून विकले कीं " हिंदु " शब्द अफगाण लोकांत " गुलाम " चा वाचक होवून राहिला; हा शब्द त्यांच्यामधून रूम प्रांतीं म्हणजे आशिया मायनरमध्यें गेला; व इ. स. १४ शतकांतल्या जलालुद्दीन रूमीनें तो आपल्या काव्यांत दाखल करून ठेविला आहे. " हिंदुस्थान " म्हणजे " हिंदूंचें " म्हणजे " मुसलमानांची गुलामगिरी करणारांचें स्थान." हिंदु-धर्म म्हणजे " मुसलमानांची गुलामगिरी करणारांचा धर्म " याप्रमाणें " हिंदु ", " हिंदुधर्म " या दोन शब्दांचें रहस्य आहे. जर " हिंदु " शब्दच संस्कृत सारस्वतांत कोठेंही येत नाहीं, तर " हिंदु-धर्म " शब्द तरी कोठून येणार ? " हिंदु " शब्द इ. स. १००० पुढें जन्मलेला आहे. आज हा शब्द ९०० वर्षांहून जास्त प्राचीन नाहीं. " हिंदु " शब्द जन्मास आल्यानंतर पुढें " हिंदु-धर्म " शब्द जन्मला. तो ९०० वर्षांचाही म्हणतां येत नाहीं. " हिंदु " धर्मास " धर्म " हें भरींव नांव शोभत नाहीं. असें कां ? तर " धर्म " शब्द घेतला कीं त्यांत भावंडाचें नातें जाहीर ध्वनित होतें. ख्रिस्ती म्हटला कीं प्रत्येक ख्रिस्ती त्यास आपला बंधु समजतो, त्याच्याशीं जाहीर बंधुत्व लावतो. त्याच्या हातचें पाणी घेण्यास व त्यानें केलेल्या स्वैंपाकाच्या आहुती आपल्या आंतल्या अग्निहोत्रांत होमण्यास संकोच बिलकूल बाळगीत नाहीं. ख्रिस्त्याहूनही हें बंधुत्वाचें नातें मुसलमान जास्त पटवूं शकतात. हे दोन्ही धर्म जिवंत आहेत. जो धर्म विधर्म्यांस जाहीर आंत ओढून त्याच्याशीं बंधुत्वाचें नातें जाहीर लावतो तो धर्म जिवंत होय. तो धर्म भगवती भागीरथीचा दांडगा प्रवाह होय. पारशी व यहुदी हे दोन्ही धर्म आज जिवंत नाहींत. ते आज मुर्दाड होवून पडले आहेत. तरीही जसा पारश्यांचा तसा यहुद्यांचा समाज

एकजात आहे. जसें पारश्यांचें पारश्यांशी तसें यहुद्यांचें यहुद्यांशी नाते बंधुत्वाचें असतें. रोटीच्या दळणवळणास बिलकुल आडकाठी नसते. बेटीच्या व्यवहारांत पैशाकडे जास्त लक्ष देण्यांत येतें, तो भाग निराळा; गरीबही पैसेवाला झाला असला म्हणजे आपल्या पैसेवाल्या बंधूशीं त्याचें दळणवळण चालू होतें. आडकाठी रहात नाहीं. धर्म म्हटला कीं हें भावंडाचें नातें जाहीर ध्वनित झालें पाहिजे. हें धर्मांचें एक लक्षण, हा धर्माचा एक जरीपटका.

धर्मांचें दुसरेंही एक लक्षण आहे; त्यास दुसरा ही एक पटका असतो. हा जरीपटका "शास्त्र" ह्या नांवानें प्रसिद्ध असतो. शास्त्राच्या मजबूत पायावर त्या त्या धर्मांची व पंथाची लहान मोठी इमारत उभारलेली आढळेल. ख्रिस्त्याचें शास्त्र 'बायबल' मुसलमानांचें 'कुराण', पारश्यांचें 'अवेस्ता', यहुद्यांचें 'जुना करार', पंजाबांतल्या शिखांचें 'ग्रंथसाहेब' म्हणजे गुरु नानकची वाणी. याप्रमाणें बंधुप्रीति व एकजातपणा व शास्त्र हे दोन त्या धर्मांचे जरीपटके होत. ज्यास हे दोन जरीपटके असतील त्यासच 'धर्म' हें नांव शोभतें.. ज्यास हे दोन जरीपटके नाहींत, त्यास धर्म हें नांव कसें शोभणार ?

"हिंदुधर्मास" बंधुप्रीतीचा म्हणजे एकजातपणाचा जरीपटका आहे काय ? तो असणें शक्य तरी आहे काय ? नन्नाचा पाडा दोनदां वाचला, म्हणजे दोन्ही सवालांत योग्य जबाब मिळाला. "अठरा पगड" किंवा "अठराशें पगड" जाती हें "हिंदुधर्मांचें" स्वरूप; जातीमध्यें आणखी पोटजाती झालेल्या असतात, त्यामुळें केवळ जातीनें काम न होतां पोटजातीशीं निरुपायानें पुन्हां पुन्हां प्रसंग पाडावा लागतो. "तूं कोण ?" तर "हिंदु." इतक्यानें समस्या पूर्ण होत नाहीं; अर्थातच पोटजात विचारावी लागते. जात विचारली तर "न्हावी" जात समजली म्हणजे "कोंकणस्थ" "देशस्थ" कीं "जुनऱ्या" ह्या तीन पोटजातींतली जात समजेल तेव्हांच समस्या सर्वांशीं पूर्ण होते. क्षत्रिय म्हणविणारांची अशीच दुर्दशा. "भोंसले, सावंत, गुजर मोहिते" ही रावांची जात झाली. "राव" किंवा "राय"

हा शब्द मूळचा "राज" शब्दाचें स्वरूपांतर होय. "राव" हे सगळे मूळचे लहान मोठ्या राजांचे वंशज होत. "राव" ही एक पोट – जात "प्रभू" ही दुसरी पोटजात. "प्रभु" म्हटल्यानेंही पुरा बोध होत नाहीं; कायस्थ की पाताण्या ? ह्या प्रश्नास सवड राहतेच, कायस्थ म्हटले म्हणजे दक्षिणी कीं दवण्या ? हा प्रश्न दत्ताप्रमाणें खडा राहीलच. ब्राह्मण म्हणविणाऱ्यांची दुर्दशा प्रसंगीं जास्त म्हटल्यास चालेल, कमी तर नाहींच. ब्राह्मण म्हणवूं लागला म्हणजे "धान्याहारी" कीं "मांसाहारी" ? ही समस्या पुढें टाकलीच. "धान्याहारी" म्हणवूं लागला म्हणजे चित्पावन, कऱ्हाडा, देवरुखा, ह्या कोंकणांतल्या तीन मुख्य जाती व देशावरच्या ऋग्वेदी व यजुर्वेदी देशस्थ या दोन मुख्य पोटजाती मिळून पांच पोटजातींचा प्रश्न पुढें आला. बारघरे, नरोणे, ( वेंगुर्लेकर व मालवणकर ) बारदेसकर, कुडाळे, सारस्वत या पांच मुख्य पोटजाती मांसाहारींच्या बनल्या आहेत. एका वर्गातल्या एका पोटजातीचें दुसऱ्या पोटजातीशीं प्रसंगीं रोटीबेटी दळणवळणही नसतें. बेटीचें दळणवळण दूर ठेवावें लागतें. एक पोटजात दुसऱ्या पोटजातीस कमी समजते; प्रसंगीं स्वतःस पुरी बारा मासे समजून दुसरीस अकरा–मासे समजण्यास कमी करीत नाहीं. या त्या त्या पोटजाती पासून पाघळणाऱ्या गुणास "जातिमत्सर" हें योग्य नांव मिळालें आहे; याचें व बंधुप्रीतीचें म्हणजे एकजातपणाचें, दोन घोडीं एकेठिकाणीं पाणीं कशीं पिणार ? ही एकमेकांस पाण्यांत पहाणारीं नव्हेत काय ? सारांश एकजातपणाचा चुकूनही प्रवेश होवूं न देणारा जातिमत्सर हा हिंदुधर्माचा एक जरीपटका ठरतो. हा जरीपटका तो तो धर्माभिमानी केवळ अधर्माचा जरीपटका समजणार व जसा भट किंवा भटाचा बगलबच्चा महाराच्या सांवलीस वचकतो तसा या जातिमत्सराच्या सावलीस वचकणार.

शास्त्राचा जरीपटका तरी ह्या अर्ध्या मुसलमानी धर्मास कोठून असणार ? असें कां ? एकाद्या पोटजातीस असा प्रश्न विचारावा कीं "अमुक पोटजातीशीं तुमचें रोटीचे ही दळणवळण कां नाहीं ?" या प्रश्नास "आमची पूर्वापार चाल नाहीं," असा ठरीव जबाब मिळणार. अर्थातच "पूर्वापार

चाल " किंवा " रूढी कुळाचार " यांच्या पलीकडे दुसरें शास्त्र " हिंदु " म्हणविणारास माहीत नसतें आणि नको ही असतें. श्रुति, स्मृति पुराणाचें सोंग प्रसंगीं "ब्राह्मण" म्हणविणारे हिंदु घेतात, ते केवळ इतरांच्या डोळ्यांत धूळ घालण्यासाठीं घेतात. " क्षत्रिय आजही श्रुतिस्मृतिपुराणांवरून आहेत असें शाबीत करतों " असें कोणी म्हणाला म्हणजे या ब्रेव्यांनीं व त्याच्या बी. ए., एम्. ए. व एल्. एल्. बी. या बगलबच्चयानीहीं श्रुतिस्मृति पुराणें लाथेनें दूर झुगारून देवून पूर्वापार रूढींचें देव्हारे पुन्हा माजविले! कोल्हापूरकर ग्रंथमाला व समर्थ, यांचे असले प्रसंगीं वाईकर हिंदुधर्माशीं एकंदरीत कसें होतें, ती मजा तिऱ्हाइतानें विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

शास्त्रांचा जरीपटका म्हटला कीं त्याचा पत्ता पैगंबराच्या किंवा अवताराच्या द्वारें केवळ परार्थ साधणाऱ्या परमेश्वरापर्यंत आपोआप लागलाच. बौद्ध व जैन हे निरीश्वरवादी पडल्यामुळें, सर्वज्ञपणा पावलेल्या बुद्धापर्यंत व जिनापर्यंत पत्ता लावतात, परमेश्वरापर्यंत पोंहोचण्याची ताकद त्यांच्या दृष्टींत रहात नाहीं. तेथें निरुपाय आहे. तरी धर्माच्या महानदीचा पत्ता थेट उगमापर्यंत लागूं शकतो; मूळ झऱ्याची प्रवृत्ति केवळ परार्थ असते, हा मोठा सिद्धांत बौद्ध व जैनासही मान्य आहेच.

पण जर शास्त्र नाहीं तर परार्थाची दिशा हिंदूस कशी बरें दिसणार? याच्या चालीची किंवा रुढीची मजल एकंदरींत पोटोबांत म्हणजे निव्वळ स्वार्थांत संपते. स्वार्थाच्या सांवलीच्या पुष्कळ पलीकडे वस्ती असून केवळ परार्थ प्रवृत्तीचें माहेर झाल्यास विठोबापर्यंत तिची मजल पोंचावी कशी? जर सरकारावर व सुधारकावर मनःपूत कोरडे ओढून, दर महिना एक हजार रुपयांच्या कमाईचा स्वार्थ साधतां येतो, तर स्वार्था पलीकडे बिलकूल न दिसणाऱ्या हिंदुधर्माभिमानी गृहस्थांनीं आपला वर लिहिलेल्या दोन शास्त्रांचा हिंदु धर्म कां बरें गाजवूं नये?

जोपर्यंत हिंदु म्हणणें सोडून देतां येत नाहीं, जोपर्यंत हिंदुत्वाची आवड अस्थिगत ज्वराप्रमाणें सोडून जात नाहीं, तोपर्यंत हिंदु धर्माचा मोठा अभिमान वाटतो, तोपर्यंत राष्ट्राची किंवा देशाची गोष्टही

असलेल्यांच्या पुढें नको, व विठोबाची सुतराम् नको आहे. हिंदुत्वाचें व त्यांच्या अभिमानाचें रुजलेलें रान देखील काढून टाकण्यास ज्यांचे हात लट-लट कापतात, त्यांच्या हातून राष्ट्राकडे किंवा देशाकडे मजल मारतांना वाटे-वर पडलेल्या लहानमोठ्या कांट्यांची योग्य निरवानिरव लागणार कशी ? क्षत्रिय म्हणवा; ब्राह्मण म्हणवा; ही दोन्ही नांवें अशीं आहेत कीं योग्य अभिमान बाळगतां येणाऱ्या भूतकाळींच्या इतिहासाशीं व ऐतिहासिक गोष्टींशीं नातें या दोन्हींपैकीं हव्या त्या नांवानें सहज जोडतां येतें. हीं दोन्हीं श्रुतिस्मृतिपुराणांच्या पदरीं पडून पवित्र झालेलीं आहेत. भागवत नांवही यांच्याच तोडीचें आहे, किंबहुना जास्त महत्त्वाचें आहे. भागवतामध्यें जसा राजर्षींचा तसा ब्रह्मर्षींचाही समावेश होत असतो. मराठा नांवही वाईट नाहीं. ज्ञानेश्वरासारख्या व एकनाथासारख्या ब्रह्मर्षींच्या, शिवाजी-सारख्या राजर्षींच्या व तुकोबासारख्या संत शिरोमणींच्या पदरीं पडल्या-मुळें त्यास विशेष पवित्रपणा आला आहे. हे सगळेही मराठे होते. मराठी भाषेचे दांडगे कैवारी होते. या सर्वांचेही जन्म व जिणें हीं केवळ देशार्थी होतीं. दरमहा हजार रुपयांच्या लोभानें सरकारावर व सुधारकांवर लाथा झाडणाऱ्या गृहस्थाप्रमाणें व त्यांच्या दरोबस्त बगलबच्च्यांप्रमाणें या सर्वांची दृष्टि स्वार्थापलीकडे ढुंकूनही पहात नसे. केवळ मराठे म्हणवा, मराठे ब्राह्मण म्हणवा, मराठे क्षत्रिय म्हणवा, भागवत म्हणवा हे सगळे शब्द आज वंद्य झालेले आहेत. " हिंदु " व " हिंदुधर्म " हे शब्द वंद्य झालेल्यांपैकीं नव्हत. इतकेंच नाहीं, तर वर लिहिलेल्या कारणांनीं उघड निंद्य झालेल्यांपैकीं आहेत. या दोन्हीही शब्दांत जर बंधुप्रीतीकडे आणि शास्त्राकडे व शास्त्राचे द्वारा परमेश्वराकडे दृष्टी पोंच-विण्याची ताकद उघड रीतीनें राहिलेली नाहीं, उलट या शब्दांच्या अर्थांचें तमाम तत्व जर सर्वथैव अनिष्ट जातिमत्सरांत, पोरकट किंवा खुळचट चालींत व निव्वळ पोटोबांत संपत आहे, तर त्या दोन्ही बकऱ्यांचा बळी परार्थाच्या पीठापुढें देणें हेंच प्रत्येकाचें पहिलें मुख्य कर्तव्य नव्हे काय ? इतकेंही असून, बापाची विहीर म्हणून खारें पाणी ज्यांस प्यावयाचें असेल,

ते तें खुशाल पिवोत बिचारे; पण ही दिशा व या दिशेची वाट, या दोन्ही अगदीं अनिष्ट व म्हणूनच एखाद्या विषवृक्षाप्रमाणें समंजसास केवळ वर्ज्य वाटणें साहजिकच नव्हे काय ? [१]

---

१ ऐतिहासिक गंजिफ २. दीनबंधु–१९०५; २६-६–१९०६

कोल्हापुरास ग्रंथमाला प्रो. विजापुरकरांनीं चालविली होती व वाईस भाऊशास्त्री लेले यांचें 'धर्म द्विसाप्ताहिक चालू होते. दोघेहि ब्राह्मण्याचे पुरस्कर्ते असले तरी प्रो. विजापूरकरांची दृष्टि अधिक व्यापक व राष्ट्रीय होती. भाऊशास्त्री पूर्ण सनातनी असल्यानें त्यांचे खटके उडत त्यास अनुलक्षून शास्त्रीबोवांनीं हे उद्गार काढले आहेत !

---

## -- ५१ --

# मराठीचा एक कॅथोलिक भक्त.

( खिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या चळवळीवर शास्त्रीबोवांनीं 'हिंदुधर्मविवेचकां'त खरमरित कोरडे ओढले आहेत. ते विचार त्यांचे शेवटपर्यंत बदलले नाहींत. विधर्मीयाला स्वधर्मी करून घेण्याचा आपला 'व्रात्यस्तोमा'चा तोडगा पण त्यांनीं धीटपणानें लोकांपुढें ठेवला. तरी देखील खिस्ती धर्म किंवा बायबल, यांबद्दल त्यांची पूज्य बुद्धि होती. इतकेंच नव्हे, तर खिस्ती धर्मावर खरोखरी श्रद्धा बसून जे हिंदु खिस्ती होऊन लोकसेवा करीत राहिले त्यांच्या बद्दल शास्त्रीबोवांनीं सतत आदर बाळगिला. पंडिता रमाबाईंना त्यांनी सदैव गौरविलें. त्यांचा विरोध खालच्या जातींच्या लोकांच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा फायदा घेऊन मिशनरी त्यास बाटवून

त्यांचें सत्वहरण करतात या गोष्टीला होता. या बाबतींत त्यांचें धोरण तंतोतंत आगरकरांशीं जुळणारें होतें. खालील उताऱ्यांत हीं मतें स्पष्ट दिसून यतात. फादर स्टीफनसंबंधीं लिहिणारे शास्त्रीबोवा पहिलेच हिंदु विद्वान. )

मराठे ख्रिस्ती मराठीचे सेवेकरी बनले आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. जसा एखाद्या मराठे हिंदूस मराठीचा अभिमान असतो, तसाच रेवरेंड बाबा पदमजी व रेवरेंड नवलकर, या दोन वयोवृद्ध व विद्यावृद्ध मराठे ख्रिस्त्यांस आहे. रेवरेंड टिळक यांच्या कवितेचा लाभ होत आहे, हेहीं देशी ख्रिस्त्यांचें भाग्य सामान्य नव्हे. मराठे ख्रिस्त्यांची घरची भाषा मराठीच असते.

मराठे किरिस्तांवांमध्यें मात्र मराठीचा अभ्यास व्हावा तसा होत नाहीं, ही गोष्ट दिलगिरी उत्पन्न करणारी आहे. पण मराठे न म्हणवतां कोंकणी म्हणवून, कोंकणी म्हणजे जसे काय मराठे नव्हत— असें समजण्याचें वेड या मराठे किरिस्तांवांच्या डोकींत भरलेलें आहे. तरी बरें, कीं सोहिरोबा, विठ्ठल, सुभानंत वगैरे गोंवेकर शेणवी या वेडाचा लेप लागूं न देतां राहिले, व ते मराठीचे मनोभावें सेवेकरी बनले. या कोंकणी हिंदूंनीं मराठे हिंदूंमध्येंच स्वत:स खपवून घेतलें.

कोंकणी ही एक बोली आहे, हीस भाषा हें भव्य नांव शोभत नाहीं. गोमांतकाच्या वर कोंकण नाहींसें नाहीं.

पाखियांमध्यें मयोरू
वृखियांमध्यें कल्पतरू
भाषांमध्यें मानूं थोरू
मराठि येसी ॥ १२४ ॥
तारामध्यें बारा राशी
सप्त वारांमाजी रवि–शशी
या द्विपींचिया भाषांमध्यें तैसी मराठिया ॥

किती हा काथोलिक इंग्रजास मराठीचा अभिमान ! त्यानें रचलेले हे मराठी अभंगही किती तरी शुद्ध, गोड व प्रासादीक !! जरी या ओंव्या

दिसतात, तरी स्तेफेन्सननें यांस अभंग म्हटलें आहे. ओंवी व चारचरणी अभंग, यांच्या मधलें अंतर फारच सूक्ष्म असतें. पैटणी एकनाथानें भागवत धर्माच्या प्रसाराचा अधिकार मराठीस यावा म्हणून ज्या काळीं त्याच भाषेस खिस्ती धर्माच्या प्रसाराचा अधिकार यावा म्हणून साष्टींस या इंग्रजानें तसेच यत्न चालवले होते. एकनाथ जन्मानें मराठा होता, पण गृहस्थाश्रमी होता. स्तेफेन्स हा जन्मानें इंग्रज असून मराठा बनला होता, व जेसुईत फादरांपैकीं असल्यामुळें, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हीं दोन महाव्रतें घेतलेल्यांपैकीं होता, चतुर्थाश्रमी होता. मग यास ब्राह्मणांच्या परमहंस परिव्राजकांमध्यें घालावें, वा जैनांच्या संवेगीमध्यें घालावें. एकनाथ व स्तेफेन्स हे दोघेही मराठीचे, निस्सीम कैवारी होत. एकनाथास आपल्या पयोदात्रीचा त्याग न करतां पदरी पडलेल्या मराठीचा विडा सहज उचलतां आला, व तो त्यानें उंचललाही. स्तेफेन्सला पहील्यानें आपल्या पयोदात्रीचा त्याग करावा लागला, तो करून, आणि मराठी पदरीं पडलेली नसतां, उलट तिच्या पदरीं आपण होऊन पडून तिचा निस्सीम कैवार घेतला. यांत स्तेफेन्स परिव्राजकाचा जास्तपणा मोकळ्या मनानें मराठ्यांस कबूल केला पाहिजे. भागवतधर्म व खिस्ती धर्म या दोहोंमध्यें सारखेपणा थोडा थोडका नाहीं, पुष्कळ आहे. आजच्या विहिरींतल्या व त्यांतही आणखी डोळे मिटलेल्या बेडकांच्या डोळयांस दमणच्या खाडीपर्यंत वर कोंकणच आहे. हे उत्तर कोंकण होय. गोमंतक हा दक्षिण कोंकणचा एक भाग होय... गोमंतकी माणसें व बोली यांच्या पलीकडे कोंकणी माणसें व बोली नाहींत, अशी हकीगत नसतांही, हे जसा काय आपला 'गोमंतकी' शब्द चोरून, त्याच्या ठिकाणीं केवळ स्वत:पुरता कोंकणी शब्द प्रयोगांत व प्रचारांत आणतात ! जीं म्हणून कारवारी वा मंगळुरी—मग ती सारस्वतां पैकीं असोत वा नसोत—माणसें स्वतःस कोंकणी म्हणवतात, तीं सगळीं पूर्वी रक्तानें मराठी असलीं पाहिजेत, त्या सर्वांचा 'मराठे' या इतिहासीक नांवांत पूर्वी समावेश होत असला पाहिजे......

फादर स्तेफेन्सनें गोमंतक प्रांतांतल्या साष्टी तालुक्यांत आपलें वय घालविलें. अर्थांतच त्याची मराठी भाषा साष्टीकरांस त्या काळीं समजत होती, तेही स्वतः तीच भाषा बोलणारे होते, स्वतःस मराठेच म्हणवीत असले पाहिजेत.

फादर स्तेफेन्स

परम शास्त्र जगीं प्रगटावया
बहुतां जनां फळसिद्धी व्हावया
भाषा बांधोनि मराठिया
कथा निरोपिली ॥ १२१ ॥

असें पहिल्याच अवस्वरांत म्हणत आहे. कवि आपल्या काव्याची भाषा मराठी म्हणतो...........

पुढच्या चार चरणीं अभंगांत मराठीचा पोवाडा या इंग्रजानें गायला आहे, तो खालीं दाखल केला आहे.

जैसी हरळांमाजी रत्नकुइला
कीं रत्नामाजी हिरा निळा
तैसी भाषांमाजी चोखळा
भाषा मराठी ॥ १२२ ॥
जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी
कीं परिमळामाजी कस्तूरी
तैसी भाषांमाजी साजिरी
मराठिया ॥ १२३ ॥

तो सारखेपणा दिसण्याचा संभव नाहीं, हें जसें निर्विवाद आहे, तसें आपल्या विहिरीच्या बाहेर पडून डोळे उघडून पाहणाऱ्या न्यायमूर्ति रानड्यांच्या व त्याच्या कंपूतल्यांच्या दृष्टींत तो भरल्याशिवाय पूर्वी राहिला नाहीं व आजही रहात नाहीं.[१]

---

१ मराठीचा कॅथोलिक भक्त, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ३७. पृ.४६०–४६२; १९०६; या शास्त्रीबोवांच्या लेखावर कै. वि. का. राजवाडे यांनीं अत्यंत

प्रखर व तितकीच कोती व दूषित टीका केली आहे. स्टीफन्सच्या ग्रंथांतलें गद्य सर्वांत जुनें मराठी गद्य आहे हा एकच मुद्दा राजवाडे यांनीं खोडून काढलेल्या मुद्यांपैकीं बरोबर आहे. बाकी सर्व मुद्यांत राजवाडे यांचे पूर्वग्रह आणि त्यांची प्रतिपक्षावर तुटून पडतांना वापरली जाणारी एकेरी आणि तुच्छ भाषा या टीकेंत चांगली व्यक्त होते. हें पुराण भागवतांनीं वर 'काव्य' म्हणून म्हटलें आहे, त्याला राजवाड्यांनी 'महाकाव्य' असें रूप दिलें आहे. म्हारांच्या अशिष्ट, गांवढळ बोलींतलें हें पुस्तक आपल्या नजरेस अगोदरच पडलें होतें पण 'अशिष्ट आणि अपभ्रष्ट' भाषा म्हणून आपण त्याकडे मुद्दामच लक्ष दिलें नाहीं. 'अतिशयोक्तिनिष्णात' राजारामशास्त्री भागवत यांनीं 'हें पुराण महाकाव्य आहे असें आग्रहानें, अतिशयोक्तीनें व स्वजनजुगुप्सेनें प्रतिपादिलें आहे' स्टीफन्सच्या गांवढळ भाषेचें शास्त्रीबोवांनीं केलेलें वर्णन 'निर्लज्ज व अज्ञ' आहे; असें राजवाडे यांचें थोडक्यांत म्हणणें आहे. त्यांत म्हारापोरांची बाजू सदैव घेऊन पांढरपेशांशीं विशेषतः ब्राह्मणांशीं झुंजत असणाऱ्या शास्त्रीबोवांना राजवाड्यांनीं शिष्ट भाषेची आणि हिंदुधर्माची कड घेऊन कडकडून चिमटा घेतला आहे. ( स्टेफन्सचें ख्रिस्तपुराण, वि. का. राजवाडे, विश्ववृत्त, वर्ष २ अंक ८ पृ. १-१९. फेब्रुवारी १९०८ )

---

## -५२-

## राजारामशास्त्री भागवतांचीं कांहीं मननीय वचनें

( १ ) स्वार्थावर लाथ मारून, विविध लोकांच्या बोलण्याकडेस यत्किंचित्‌ही लक्ष न पोंचवतां, केवळ परार्थासाठीं देह झिजवणें ही इहलोकांतील सद्वृत्तीची पराकाष्ठा होय. ( एकनाथाचें चरित्र )

( २ ) नदीस फूग आल्यानें जोरावलेल्या जळांचा पूर हळू हळू आसपासच्या जमिनी सुपिक करतो, आणि बुद्धीस फूग आल्यानें बळावलेल्या विचारांचा ओघ हळू हळू आसपासच्या वृत्तींचा वांझपणा घालवतो.

( लक्ष्मीबाई झांशीकरीण)

( ३ ) प्रकाश देणाऱ्या वस्तूंमध्येंही पायऱ्या आहेत. काजव्याची पायरी अगदीं खालची, सूर्याची पायरी अगदीं वरची. काजव्याची पायरी काजव्यास देण्यांत येऊन सूर्याची सूर्यास मिळाली, म्हणजे सृष्टीचा रंग खुलला; काजव्यास अगदीं वर झुगारून, सूर्यास अगदीं खालीं घडघडवलें; कीं सृष्टीचा बेरंग झाला. जो न्याय या विशाळ परमेश्वरी चित्रास लागू होतो, तोच न्याय चित्रास आणि लिहिलेल्या इतिहासास लागू करायचा. रंग खुलवण्याकडे आणि बेरंग न होऊं देण्याकडे जसें चित्र चितारणाराचें लक्ष तसें इतिहास लिहिणाराचेंही लक्ष हवें. ( लक्ष्मीबाई झांशीकरीण )

( ४ ) ज्या देशांमध्यें किंवा ज्या लोकांमध्यें प्रत्येकाचा दुसऱ्या लहान मोठ्याशीही रोटीचा किंवा बेटीचा व्यवहार एकंदरींत शक्य असेल, त्या देशामध्यें किंवा त्या लोकांमध्यें "देशबंधु" शब्द शोभेल. जयाजीच्या ( शिंद्याच्या ) जातीशीं रावसाहेबाच्या जातीचा जसा बेटीचा तसा रोटीचाही व्यवहार जर अगदीं अशक्य, तर आमच्या देशामध्यें आज दिसणारी समाजाची तुटक स्थिति कायम असेपर्यंत देशबंधुत्वास कोंभ फुटणें अशक्य. ( लक्ष्मीबाई झांशीकरीण )

( ५ ) मराठीस व दुसऱ्याही देशी भाषांच्या ज्ञानास व वाढीस संस्कृत भाषेच्या अध्ययनाची जरूरी आजमितीस उरलेली नाहीं "— या अर्थाचें क्यांडी साहेब बोलले तेंही यथार्थ आहे, त्यांत अतिशयोक्तीचा भाग तिळभरही नाहीं. " बाळकृष्णा " च्या ठिकाणीं " बालकृष्ण, " " त्रिंबकाच्या ठिकाणीं " त्र्यंबक, " लक्ष्मणाच्या ठिकाणीं ' लक्ष्मण " धोंडूबद्दल " धोंडदेव ", कोंडूबद्दल " कोंडदेव " ही संस्कृताच्या जास्त अध्ययनानें जन्मलेली ' भिक्षुकी " पद्धत जितकी लवकर निमेल, तितकी

बरी. मराठी, गुजराथी, कानडी, या रानटी भाषा नव्हत, तर प्रौढपणास आलेल्या राष्ट्रीय भाषा आहेत; यांचा इतिहास लिहिण्याजोगा आहे.

( न्यायमूर्ति क्यांडी व देशी भाषा )

( ६ ) ज्यांस खावयास सागुती म्हावरें हवें, त्यांस खाटिक कोळी हवेत. जेवण पुढें आलें म्हणजे त्यांनीं एकदां तरी शिजलेल्या सागुती म्हावऱ्याचा नैवेद्य दाखविला पाहिजे. पूर्वी खाटिक कोळी निवेदन करीत असतील तर तो भाग निराळा. ज्या ब्राह्मणास खावयास सागुती म्हावरें हवें त्यांस हिंसायज्ञ अवश्यमेव हवा; जर हिंसायज्ञाशिवाय सागुती म्हावरें खाण्यांत आलें, तर पोटधर्माच्या दृष्टीनें विटाळलेलें मानावें लागत आहे. हिंसा-यज्ञाहून जास्त श्रेयस्कर यज्ञ असतील, तो भाग निराळा. तरी ज्यांस सागुती म्हावरें हवें, त्यांस हिंसायज्ञाशिवाय सुटका नाहींशी वाटते; मग निवेदन खिस्त्यांप्रमाणें एकदां होवो वा मुसलमानांप्रमाणें दोनदां होवो. हिंसायज्ञ सांगणारा वेद सांगतो; तें गैर दिसत नाहीं. ( यज्ञ हवा कीं नको )

( ७ ) प्रीतिभोजनासारख्या प्रसंगीं आमचे धर्मबंधु चोखामेळे आणि भक्तिबंधु खिस्ति मुसलमान यांस निमंत्रण करून त्यांच्याशीं रोटीचा व्यवहार राजरोस चालू केल्यानें 'तमसो मा ज्योतिर्गमय' हें देवाजवळ मागणें कांहीं अंशीं तरी सफळ झाल्यासारखें बऱ्याच बाहेरच्यांस दिसणार नाहीं काय ?. ( प्रार्थना समाज आणि जातिभेद )

( ८ ) दुसऱ्या पोटवर्गांत तानाजी, सूर्याजी, मुरारबाजी, फिरं-गोजी नर्साळा, रामशास्त्री; असली सर्व प्रकारें मराठ्यांनीं अभिमान बाळ-गण्याच्या योग्यतेची मंडळी यावयाची. या मंडळीस नाहीं बढती किंवा पैशाची चाड, नाहीं नांवलौकिकाची चाड, नाहीं मानमरातबाची चाड. जें राज्यप्रकरणीं लहान मोठें कर्तव्य दिसत होतें, किंवा प्रसंगीं दिसलें, तें या मंडळीनें—जसें धर्मप्रकरणीं पुढील संततीस सुरेख कित्ता घालून देणाऱ्या एकनाथानें किंवा रामदासानें केलें, तसेंच—केवळ देवाचें भय राखून, दुसऱ्या कोणाही छोट्या बड्यास न भितां रुजू केले. जर प्रसंग असले किंवा आले, तर असल्यांचे गुण झळकतात; जर प्रसंग नसले, किंवा आले

नाहींत, तर असल्यांचे गुण बाभळीच्या फुलाप्रमाणें जंगलांतले जंगलांतच अखेरीस महासंहारक काळाचा हात नेमलेल्या वेळेस पडून वाळून जातात.

( लक्ष्मीबाई झांशीकरीण )

( ९ ) 'एकदां एक हिंदु व एक मुसलमान असे दोघे नदींत बुडूं लागले, तेव्हां मुसलमान एका अल्लाचेंच चिंतन करूं लागला, व हिंदु गृहस्थ घटकेंत शिवाला, विष्णूला, गणपतीला अशा अनेक देवांना हांका मारूं लागला; अखेरीस मुसलमान तरला व हिंदु बुडून मेला.' अशी एक गोष्ट हरदासी कथेंत सांगत असतात, तर यांतील सार हेंच कीं कोणातरी एका देवतेच्या ठिकाणीं विश्वास पाहिजे आहे. अनेक देवांच्या ठिकाणीं असून कांहीं उपयोगी नाहीं. ज्याप्रमाणें एखादी वेश्या गांवच्या वेशीजवळ उभी राहून जो येईल तो आपला यजमान समजून त्याच्याशीं सलगी करिते, परंतु कायमचा असा कोणींच नाहीं त्याप्रमाणें जो दगड धोंडा दिसेल तो देव व त्याची भक्ति करावयाची, अशाप्रकारें सर्वकाळ भ्रमण करणारा मनुष्य केवळ मूर्ख होय.

(व्यभिचारी व अव्यभिचारी भक्ति, हिंदुधर्मविवेचक)

( १० ) आजपर्यंत धर्माच्या पायीं मोठे अनर्थ झाले आहेत. धर्मवासना सर्वांची सारखी असते असें नाहीं. तरी ज्या धर्मांत ज्याचा जन्म झालेला असतो तो धर्म त्यास थोडा बहुत प्रियच असतो. तेव्हां धर्माच्या संबंधानें लेख लिहिणे हें मोठें नाजुक काम होय.

( हिंदु धर्माविषयीं हिंदु म्हणविणारांची अवस्था—हिंदुधर्मविवेचक )

( ११ ) शास्त्राची बाब आली कीं ती ( कामगिरी ) शुष्क व गंभीर झाली. तींत कींव आणणारें, कळकळ उत्पन्न करणारें, किंवा डोळ्यास पाणी आणू लावणारें, असलें सावेश व सजोर भाषणरूपीं काव्य नको आहे. कांहीं गोष्टी नाटकगृहांत किंवा वक्तृत्वाच्या नाटकीं बैठकींत शोभतात, शास्त्राच्या भव्य व गंभीर मंडपांत शोभत नाहींत.

( राष्ट्रीय सामाजिक परिषद सुबोध पत्रिका, )

( १२ ) ' मूर्ती तितक्या प्रकृती ' हें जर खरें, तर सर्व मनुष्य एका मताचे कधींही होणार नाहींत. ख्रिस्ती, महंमदी व बौद्ध या धर्मांस धर्म शब्द न लावितां मत शब्द लाविला तर तो अधिक साजेल. नवीन ब्राह्म धर्माची ही अवस्था हीच. तें मत होय, धर्म नव्हे. ज्या प्रमाणें शैव मत व वैष्णव मत त्याच प्रमाणें बंगाली लोकांचें ब्राह्म मत. ख्रिस्ती मताप्रमाणें ब्राह्म, शैव वगैरे मतें ही व्यक्तिनिष्ठ. इतकेंच कीं ख्रिस्ती वगैरे मतें उपासक व्यक्तिनिष्ठ व शैव वगैरे मतें उपास्यव्यक्तिनिष्ठ. ख्रिस्त वगैरे कित्येक पुरुष विशिष्ट देवतेचे किंवा संप्रदायाचे उपासक होऊन गेले, त्यांच्या नांवानें जीं मतें फैलावलीं तीं उपासकव्यक्तिनिष्ठ. शिव, विष्णु हीं पडलीं विशिष्ट देवतांचीं म्हणजे उपास्यांचीं नांवें. त्यांच्या नांवानें जीं मतें फैलावलीं तीं सर्व उपास्यव्यक्तिनिष्ठ होत.

तेव्हां जितके म्हणून व्यक्तिनिष्ठ धर्म आहेत; ते सर्व मतें होत. धर्म असतात ते जातिनिष्ठ असतात. व्यक्तिनिष्ठ नसतात. हिंदुधर्म एका पुरुषानें, अर्थात् व्यक्तिविशेषानें स्थापिलेला नव्हे. हिंदु लोकांत जे मोटमोठे महात्मे व सत्पुरुष होऊन गेले त्यांनीं जे जे संप्रदाय घातले ते सर्व मिळून धर्म झाला आहे.

धर्म म्हणजे अनेक मतें मिळून झालेला, व अधिकारभेदानें ज्यांत व्यवस्था लावलेली असते तो. असा धर्म एव्हांच्या काळीं या भूमंडळावर एक हिंदु धर्म होय.

( हिंदुधर्म अधिकार भेदानें व्यवस्था लावतो तेंच योग्य— हिंदुधर्मविवेचक )

( १३ ) आमचे व गुजराथ्यांचे आचार विचार जवळ जवळ सारखेच आहेत. जितके गुजराथीमध्ये व मऱ्हाठीमध्यें सादृश्य आहे, तितकें दुसऱ्या हिंदुस्थानी भाषेंत व मराठींत नाहीं. मऱ्हाठ्यांची मुख्य देवता विठोबा व क्षेत्र पंढरपुर. या दोहोंविषयीं जशी मऱ्हाठ्यांची तशीच— किंबहुना अधिक–गुजराथ्यांची पूज्य बुद्धि असते. जसा मऱ्हाठ्यांचा पूर्वेकडील फांटा कानडी, तसा उत्तरेकडील गुजराथी. सारांश हे मूळचे एक

लोक. देव करो व माधवबागेत अंकुर फुटलेले हे गुजराथ्यांचे व मऱ्हाठ्यांचें ऐक्य दिवसेंदिवस वाढत जावो, कारण ऐक्याशिवाय पाश्चात्य लोकांपुढें आमचा टिकाव लागण्याचा संभव नाहीं.

( माधवबागेतील हिंदु लोकांची सभा—हिंदुधर्म विवेचक )

( १४ ) नामदेव मोठा भक्त पण ज्ञानी भक्त होता. पंढरपूरचे जितके वारकरी तितके सर्व ज्ञानी भक्त होते. ते भक्त तर खरे, पण नुसते भक्त नव्हत; तर ज्ञान व भक्ति ही दोन्ही त्यांस इष्ट असत, सर्वत्र समदृष्टिपणा त्यांच्या वाचेंत जसा राही, तसा कायेंत व मनांत राही. ‘ सर्वां भूतीं परमेश्वर ’ हें म्हणणें फार सोपें आहे, पण ते खरोखरी आपल्या मनावर प्रतिबिंबिलें आहे, दुसऱ्याची खात्री करून देणें मात्र मोठें कठिण काम आहे. कुत्र्यानें भाकर पळविली, तीस तूप लाविलेलें नव्हतें, म्हणून हातांत तुपाची वाटी घेऊन ती पुढें ठेवण्यासाठीं कुत्र्याच्या पाठीं लागणारा नामदेव सर्वत्र समदृष्टि खरा. पण ‘सर्वां भूतीं परमेश्वर ’ तोंडानें म्हणून—तिर्यंची सृष्टि तर दूर राहूं द्या पण—प्रसंग पडतो तेव्हां हा माझा मुलगा व हा दुसऱ्याचा किंवा हा माझा भाऊ व हा दुसऱ्याचा, असा भेद ज्याच्या मनांत वागतो, तो केवळ दांभिक होय. त्यानें ‘सर्वां भूती परमेश्वर ’ मंत्राचा कितीहि मोठ्यानें जप चालविला तरी इतर जगांतील लोक त्यास आपल्यापैकींच समजतात, व तो कितीही विद्याढ्य किंवा धनाढ्य असला, तरी त्याच्याविषयीं लोकांची यत्किंचित्‌ही पूज्य बुद्धी नसते.

( संतमंडळी——नामदेव, हिंदुधर्मविवेचक )

( १५ ) परमात्मा तेजोमय व मंगलमय आहे खरा. पण तो पडला अदृश्य. सूर्य तेजोमय आहे, हे आपण प्रत्यक्ष पहातों. सर्वांस प्रकाश देतो व उष्णता देतो त्यापक्षीं तो मंगलमयही आहे. तेव्हां तेजोमय व मंगलमय पण अदृश्य अशा परमात्म्याचें तेजोमय व मंगलमय असा सूर्य दृश्य प्रतिबिंब समजून तद्द्वारा उदयकालीं व अस्तमानकालीं परमात्म्याच्या अनंत तेजोमय व अनंत मंगलमय स्वरूपाचें चिंतन करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होय. पहांटेस उठून पहिल्यानें संध्यारूपीं परमात्म-

चिंतन करून लागलेच काम धंद्यास लागल्यानें आळस जाईल, इतकेंच नाहीं तर शरीरही सुदृढ राहील. ( संध्या, हिंदुधर्मविवेचक )

( १६ ) गुरूच्या घरीं वास करणें जरूर असल्यामुळें दुसऱ्याच्या घरीं रहावें कसें हें प्रत्येक हिंदूस समजे; व ताठा, डौल, असहिष्णुता वगैरे जे दुर्गुण श्रीमंताच्या मुलांच्या आंगांत अन्यथा मुरण्याचा संभव असतो त्या सर्वांस मुळींच थारा मिळत नसे. ह्या क्रमास जर पुनः आरंभ होईल तर आमच्या प्रिय देशाचें निःसंशय कल्याण होईल, व पूर्वींच्याप्रमाणें बरकतीचे दिवस पुनः येण्यास विशेष विलंब लागणार नाहीं.

( चातुराश्रम्य, हिंदुधर्मविवेचक )

( १७ ) खरोखरीं पहातां जर अध्ययनाध्यापनांत व लोकहित करण्यांत आयुष्याचा व्यय करणे असेल तर पहिला व चवथा या दोहोंपैकीं एका आश्रमाचाच आश्रय केला पाहिजे. गृहस्थाश्रम घेतल्यानें प्रायः प्रपंच विस्तारतो व संततीबरोबर चिंता वाढत जाऊन अनेक प्रकारची विघ्नें येतात व चित्त अस्वस्थ होतें. शंकराचार्यादिकांनीं प्राचीनकाळीं सर्व हिंदुस्थानावर व रामदास वगैरे सत्पुरुषांनीं अर्वाचीनकाळीं आपल्या या महाराष्ट्र देशावर उपकार केले ते गृहस्थाश्रमाच्या भानगडींत न पडल्यामुळेंच यांत कांहीं संशय नाहीं. ( चातुराश्रम्य, हिंदुधर्मविवेचक )

( १८ ) रामजयंतीसारखी जयंती जर हिंदुलोक विसरतील तर हिंदूसारखे हतभाग्य लोक दुसरे या भूपृष्ठावर नाहींतच असें म्हणणें भाग पडेल. ( रामावतार, हिंदुधर्मविवेचक )

( १९ ) दुष्यंतासारखे राजे किंवा मुलगे आज झाल्यानें रयतेस किंवा वडिलांस सुख होईल कीं दुःख होईल? शकुंतलेसारखी मुलगी–बहीण वागली, तर बापाभावास बरें वाटेल कीं वाईट वाटेल? शकुंतला आणि मालती किंवा दुष्यंत आणि माधव, यांच्यामध्यें पहिल्या स्त्रीपुरुषांच्या जोडीचा कित्ता वळणदार म्हणून आजच्या संततीपुढें ठेवावा कीं दुसऱ्या स्त्री-पुरुषांच्या जोडीचा?

( ब्राह्मणांचा स्वधर्म, हिंदुधर्मविवेचक )

(२०) ज्ञानेश्वर प्रभृति मंडळीचे लेख आम्हां महाराष्ट्रांचे श्रुतितुल्य धर्मग्रंथच होत. एक भगवद्गीता सर्व श्रुतींचें सार होय. ती जवळ असली व ज्ञानेश्वरी नीट समजली म्हणजे आम्हां महाराष्ट्रांस तरी अन्यत्र तत्वाच्या शोधासाठीं जाण्याची मुळींच जरूरी नाहीं.

(संतमंडळीं–हिंदुधर्मविवेचक)

(२१) ऐतरेय ब्राह्मणांत रोहिताप्रत इंद्राची उक्ति अशी आहे– तमिंद्रः पुरुषरूपेण पर्यत्योवाच ।

[1] कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।

उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ॥

यावरून पाहतां उद्योग न करितां झोंप घेतली म्हणजे तेंच कलियुग होय. अर्थातच आपण अनुद्योगी राहिलों तर कलियुग येईल हें उघड आहे. ही गोष्ट अनुभवासही जुळतें. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांतील लोक आमच्या सारखे झोंप घेत नसून उद्योग करितात, त्यामुळें त्यांच्या हद्दींत कलि जाऊं शकत नाहीं. त्याच उद्योगाच्या बळावर ते म्हणतात कीं, दिवसें दिवस काल चांगलाच येणार. तर मग कलीचें राज्य संपूर्ण भूतलावर आहे कीं, आमच्याच देशांत? पृथ्वीवर असलें तर तो हिमालयापलीकडे कां बरें जात नाहीं? हे आम्हांस अगदीं जुन्या पक्षांतील कोणी सांगेल काय?... श्रुतिस्मृतिपुराणवचनांवरून स्पष्ट दिसतें कीं युगें हीं आपल्या बऱ्या वाईट वर्तनाची फलें आहेत व जसे दिन, रात्र, मास, वर्ष इत्यादि कालाचे विभाग केले आहेत त्याचप्रमाणे मोठमोठ्या कालविभागास कृतत्रेतादि संज्ञा दिल्या आहेत. धर्माधर्मांशीं त्या कालाचा कांहींच संबंध नसून, धर्माधर्मांचा संबंध आपल्या मनाशीं व वर्तनाशीं आहे. आपण जर अज्ञाननिद्रेंतून जागृत होऊन श्रुतिवाक्याप्रमाणें उद्योग करूं लागलों तर कलि खचितच आपल्यास भिऊन पळून जाईल. (कलियुग–हिंदुधर्मविवेचक)

(२२.) जी 'श्रुति' अशी पूर्वापार वहिवाट चालत आलेली आहे ती 'श्रुतिः' हें श्रुतीचें लक्षण. अमुक श्रुति आहे कीं नाहीं हा निर्णय करण्या-

१ निजलेला कलि, बसलेला द्वापर, उठलेला त्रेता, कृत चालता होय.

चा अधिकार दशग्रंथी असतील त्यांस. श्रुतीचें अध्ययन दोन प्रकारचें आहे. एक अक्षर ग्रहणापर्यंत व दुसरें अर्थबोधापर्यंत. जितकी श्रुति अधिक मुखोद्गत असेल तितकें पुण्य अधिक. जर अध्ययन अर्थबोधासहित असलें तर दुधांत साखर पडली. साखरेशिवायही जसें दूध मिष्ट व पथ्य असतें तसें अर्थबोधाशिवायही श्रुतीचें अध्ययन मिष्ट व स्वादिष्ट व पथ्य असतें. जरी मधुर वास घ्राणेंद्रियांत भरला नाहीं तरी मालतीच्या पुष्पांची माला नयनेंद्रियांस मोहून टाकिते. आजमितीस श्रुती हजारों वर्षांपूर्वी होत्या तशाच राहिल्या हा हल्लींच्या काळांत जवळ जवळ सर्वांच्या तोंडचें गालिप्रदान अभिनंदनीय मौन धारण करून खाणाऱ्या भिक्षुकांचा प्रसाद. ते जर नसते तर शिवाजी महाराजांशिवाय महाराष्ट्रदेशाचे तसेच वेदपुरुषाचे हाल झाले असते. (श्रुती, स्मृती, पुराणें व शिष्टाचार–हिंदुधर्मविवेचक)

( २३ ) सृष्टिक्रम, वस्तुस्थिति व सत्य या तिहींचीही गति अशी आहे कीं दुराग्रहाचे व दुरभिमान्यांचें दरोबस्त यत्न वायां जाऊन, या तिहींची अखेरीस फत्ते व्हावयाचीच व्हावयाची.

( शालिवाहनी काळांतील वसाहती )

( २४ ) दैवी संकेतानें होणाऱ्या प्रचंड राज्यक्रांति या दैवी संकेतानेंच होणाऱ्या प्रचंड ज्वालामुखींप्रमाणें होत. देवाच्या इच्छेनें प्रचंड ज्वालामुखी देवी एकदां एखादे स्थळीं प्रादुर्भूत झाली, म्हणजे पुढें तिची सर्वतोमुखी उपपत्ति करितां येते, व तिची भक्त मंडळीही लौकरच गोळा होते. इतकेंच कीं ती देवी प्रादुर्भूत होणार कोठें हें मात्र कोणाच्याही लक्षांत पूर्वी येत नाहीं. जशी ज्वालामुखी देवी, तशीच ही राज्यक्रांति देवी होय. इतकेंच कीं ज्वालामुखी देवीचा अंमल अचेतन भूतावर चालून राज्यक्रांतीचा अंमल सचेतन भूतलावर चालतो. जशी ज्वालामुखी देवी भूपृष्ठावर अनेक टोलेजंग फेरफार घडवून आणिते, तशी राज्यक्रांति देवी जनसमाजावर अनेक टोलेजंग फेरफार घडविते.

( आमच्या देशाचा राजकीय इतिहास )

( २५ ) जात्यभिमानापासून राष्ट्रीय दृष्ट्या बिलकुल फायदा न होतां पुष्कळ नुकसान मात्र होईल.

( मनोरंजन व निबंधचंद्रिकाकारास )

( २६ ) जर गुलाम नाहीं, तर धनी नाहीं, जर धनी नाहीं, तर गुलाम नाहीं—धनीपणा आणि गुलामगिरी हें एक रहाटगाडगें आहे. जो नांगरणारा, तोच पिकाचा उपभोग घेणारा नसतोसा नाहीं; तरी हळू हळू नांगरणारा निराळा पडतो, पिकाचा उपभोग परक्याकडे जातो, अशी स्थिति येते. नांगरणाऱ्या जातींचेही जुटाशिवाय चालत नाहीं. जूट बनला कीं कान पिळणारा व कान पिळून घेणारा–हे दोन वर्ग जन्मले. हे दोन वर्ग एकदां जन्मले म्हणजे पिकवणारे कुळंबी निराळे आणि पिकाचा उपभोग घेणारे पांढरपेशे निराळे—अशी सामाजाची रचना झाली. पांढरपेशास कुळंबी हवा, कुळंब्यास पांढरपेशा हवा. जसें धनी-गुलामाचें, तसें कुळंबी-पांढरपेशांचेंही रहाटगाडगें बनलेलें असतें. तिसऱ्या अवस्थेमध्यें जसे माल खपवणारे असतात, तसे माल तयार करणारे असतात; हे ही एक रहाटगाडगें आहे. या तीनही अवस्थांमध्यें धनी, पांढरपेशे, शेटसावकार हे कान पिळवटणारे, आणि गुलाम, कुळंबी, माल तयार करणारे हे कान पिळून घेणारे ठरले आहेत.

( चातुर्वर्ण्य–विविधज्ञानविस्तार )

( २७ ) आमची मऱ्हाठी भाषा इंग्रजी भाषेप्रमाणेंच जिवंत झऱ्याचें पाणी आहे. नवीन शब्दांची गरज पडल्यास इंग्रजीच्या जशा लाटीन व ग्रीक या दोन खाणी आहेत, त्याप्रमाणेंच अर्वाचीन मराठीच्याही संस्कृत व फारशी या दोन खाणी आहेत.

( मऱ्हाठ्यांसंबंधानें चार उद्गार. )

( २८ ) दान विद्येचें किंवा पैशाचें, व तेंही पंक्तिभेद न करितां; अर्थातच पैशाचें दान पुण्य क्षेत्रांतल्या भटांस पर्वकाळीं नव्हे, तर दुष्काळ पडलेल्या देशी महारमांगांस दुष्काळासारख्या काळीं. तप, लोकांमधलें

सोंवळ्याचे व उपोषणाचे प्रकार नव्हत. तर कायिक, वाचिक, मानसिक सोंवळेपणा राखणें आणि कायावाचामनावर दाब ठेवणें.

( ब्राह्मणी धर्म व भटी धर्म )

( २९ ) ब्राह्मणी धर्म सांसारिक पदार्थ परमेश्वराजवळ मागण्यास सांगतो; संसार सोडून जाण्याचा उपदेश वैदिक ऋर्षींचा नव्हे. विश्वामित्र, वसिष्ठ, जमदग्नि, अगस्ति, वगैरे वैदिक ऋषि संसारी होते, संसारांत सुख मानणारे होते, स्त्रिया नांदवणारे होते.

बौद्ध धर्म संसार दुःखमय समजतो, म्हणून संसार सोडून जाण्याचा उपदेश करतो; म्हणून स्त्रीच्या घरीं नांदण्यानें उत्पन्न होणाऱ्या सुखाचा आस्वाद घेण्याचें सोडून देऊन महारामांगाप्रमाणें समजून, तिच्या सांवलीपासूनही दूर राहण्यानें बुद्धाचा अनुयायी स्वतःस कृतकृत्य झालेला समजतो.

( बौद्ध धर्म व ब्राह्मणी धर्म )

( ३० ) जर विद्या पाहिजे, तर सर्व लक्ष विद्येकडेस लागलें पाहिजे. जो खरा विद्वान् व विद्याप्रिय असतो, त्याचें खाण्यापिण्याकडेस किंवा कपडयालत्त्यांकडेस मुळींच लक्ष नसतें; व ज्याचा वेळ खाण्यापिण्यांत किंवा कपडयालत्त्यांत विशेष जातो, त्यास विद्येचें व्यसन असण्याचा संभव नाहीं. विद्यानंद हा कांहीं साधारण आनंद नव्हे, जो सर्व व्याप सोडून आराधना करील, त्यासच सरस्वतीबाई प्रसन्न होईल.

( मऱ्हाठयांसंसंबधानें चार उद्गार. )

( ३१ ) जो सर्वांभूतीं देव पहातो, जो आपणांत जसा दैवी अंश आहे, तसाच मार्गावरून सर्पटणाऱ्या अतिक्षुद्र पिपीलिकेंतही आहे असें समजून तिच्यावर पाय टाकीत नाहीं, जो आकाशांतून मंद मंद संचार करणाऱ्या मेघांत महापुरुषाचें चैतन्य पाहून ब्रह्मानंदांत दंग होतो, जो विशाल सृष्टीची भव्य शोभा पाहून प्रेमाच्या रंगांत येतो, ज्याचें मन उंच उंच गगनास फोडीत गेलेले पर्वत अवलोकन करून लोकोत्तर उन्नतीप्रत पावतें, ओढयांचा, झऱ्यांचा व नद्यांचा मधुर व हृदयंगम कलकलाट श्रुतिपथीं पडतांच विश्वजनकाचें स्मरण होऊन ज्याचा देह रोमांचित होतो,

साळुंखीसारख्या पक्ष्याचा मंजुळ शब्द कानीं पडतांच परमेश्वराचा गुणानुवाद चालला आहे, असा ज्यास भास होतो, व हळू हळू पाठीं, पुढें, बाजूस, खालीं, वर, आंत बाहेर, सर्व स्थिर व चर व्यापून राहिलेल्या परमात्म्याचा बहिरिंद्रियांचे दरोबस्त व्यापार बंद करून टाकणारा सात्विक साक्षात्कार झाल्यामुळें ज्यास देहभानही रहात नाहीं त्यास परमार्थाचा लाभ झाला खरा. ( मऱ्हाठ्यांसंबंधानें चार उद्गार )

( ३२ ) आठव्या वर्षी मुलीचें लग्न होत होतें, म्हणून सगळेच आठवें वर्षी करीत नव्हते. जसें आठवें वर्षी होत होतें, तसें पुढच्याही कोणते तरी वर्षी होत होतें. उपवर झाल्यानंतर लग्न करणें जर सदोष समजणारे होते, तर सदोष न समजणारेही होते. जसें विधवेचें वपन करणारे होते, तसे न करणारेही होते. लग्न न करतां आयुष्य सफळ करणाऱ्या विधवा असत, तर लग्न करून पुन्हां लोकवस्ती वाढवूं पहाणाऱ्याही विधवा असत. शास्त्र म्हटली म्हणजे पूर्ण मोकळीक आली, जुलूम जबरदस्ती गेली, ब्राह्मणी धर्म पूर्ण मोकळिकीचा आहे, जुलूम जबरदस्तीचा नव्हे. काळोखाच्या मनूमध्यें आचाराच्या संबंधानें एकवाक्यता करण्याची कल्पना निघाली, तेव्हां जुलूम–जबरदस्तीचा ब्राह्मणी धर्मामध्यें चंचुप्रवेश झाला, अज्ञ समुदायाचा पगडा सज्ञांवर बसला, रूढीस शास्त्राच्या डोकीवर पाय देण्यास परवानगी मिळाली, जातिभेदास खुळें पीक आलें, संघशक्ति फिक्की पडली. ही आचारांच्या संबंधाची एकवाक्यता एकदां सज्ञपणा आलेल्यांनीं मेंगेप्रमाणें झुगारून दिली, म्हणजे जुलूम जबरदस्ती हद्दपार झाली; सज्ञांची पायरी सज्ञांस आणि अज्ञांची अज्ञांस मिळाली; शास्त्राच्या डोकीवरचा पाय काढणें रूढीस भाग पडलें; जातिभेदाचें बंड मोडलें, मराठी समाजास टवटवी आली. ( वपन आणि क्षत्रिय वैश्य )

( ३३ ) महाराष्ट्रांतील लोकांस महाराष्ट्राचा इतिहास चांगला समजला म्हणजे प्रत्येक महाराष्ट्रीयाचें एक कर्तव्य झालें असें मी समजतों.

( संस्कृत भाषेचे कैवारी व भागवत )

---

# परिशिष्ट

## — १ —

## शास्त्रीबोवांचें ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालेलें वाङ्मय व व्याख्यानें

### ऐतिहासिक

( १ ) हिंदुस्थानचा छोटा इतिहास, भाग १–४ ( ब्राह्मण छापखाना मुंबई १८८७ )

( २ ) मऱ्हाठ्यांसंबंधानें चार उद्गार ( निर्णयसागर छापखाना, मुंबई १८८७ )

( ३ ) रत्नाकरपंत आपा, अहल्याबाई होळकरीण व सिधोजी निपाणकर ( फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८८९ )

( ४ ) शिवछत्रपतींचें चरित्र ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९२ )

( ५ ) संभाजीचें चरित्र ( ब्राह्मण छापखाना, मुंबई, १८९६ )

( ६ ) राजारामाचें चरित्र ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९२ )

( ७ ) शिवछत्रपतीच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे ( हेमंत व्याख्यान माला, आर्यभूषण छापखाना, पुणें, १८९३ )

( ८ ) शककालविचार ( फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८९३ )

( ९ ) एकनाथाचें चरित्र ( ब्राह्मण छापखाना, १८९३ )

( १० ) कैसरकडून सुलतानाकडे ( गिबनकृत Rise and Fall of the Roman Empire वर श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं लिहिलेल्या टिप्पणांचें भाषांतर; नेटिव ओपिनियन प्रेस, मुंबई, १९०६ )

### धर्मविषयक

( १ ) ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म ( हेमंत-व्याख्यानमाला, आर्यभूषण छापखाना, पुणें, १८८९ )

( २ ) मोगल व मोगली धर्म ( हेमंतव्याख्यानमाला, आर्यभूषण छापखाना, पुणें १८९० )

( ३ ) पार्स व पार्शी धर्म ( हेमंतव्याख्यान माला, आर्यभूषण, छापखाना १८९१ )

( ४ ) महाराष्ट्रधर्म ( ब्राह्मण छापखाना मुंबई, १८९५ )

( ५ ) व्रात्यस्तोम ( हेमंतव्याख्यानमाला, आर्यभूषण, १८९६ )

( ६ ) ऐतरेयोपनिषद् ( निर्णयसागर छापखाना, मुंबई, १८९८ )

( ७ ) श्वेताश्वतरोपनिषद् ( निर्णयसागर, १९०० )

( ८ ) वेदांतला कोणता भाग कलियुगांतला, कोणता कलियुगा पूर्वीचा ( पार्वतीवरदा प्रेस मुंबई १८९९ )

( ९ ) ब्राह्मणी व भटी धर्म ( सुदर्शन छापखाना, अहमदनगर, १८९९ )

( १० ) साठ श्लोकी श्रीमद्भगवद्गीता सार्थ ( आत्मतत्वप्रकाश, बेळगांव, १९०९ )

( ११ ) विवाह व उपनयन सार्थप्रयोग ( श्रुतिबोध छापखाना, मुंबई १९११ )

## सामाजिक

( १ ) जशास तसें ( फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई १८८४ )

( २ ) जशास तसें पुरवणी (फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८८५)

( ३ ) विधवा विवाह सशास्त्र कीं अशास्त्र ? (जगदीश्वर प्रेस , मुंबई ( १८८५

( ४ ) आमची देशीभाषा विद्यापीठीं शोभणारी आहे कीं नाहीं ( हेमंतव्याख्यानमाला, आर्यभूषण, पुणें १८९२ )

( ५ ) उमेदवाराची साडेसाती ( हेमंतव्याख्यानमाला, ब्राह्मण छापखाना, मुंबई, १८९५ )

(६) ब्राह्मण म्हणविणारांस सवाल '( हेमंतव्याख्यानमाला निर्णयसागर, मुंबई १८९९ )

(७) ब्राह्मणांचा धर्मासंबंधीं जुलूम ( नेटिव ओपिनिअन १८९९)

(८) पुनर्विवाहाच्या प्रचारार्थ आजपर्यंत झालेला उद्योग व त्याचें फल ( सन दिलेला नाहीं पण १८९० च्या सुमाराचा असावा. छापखान्याचें नांव पण अज्ञात ).

## भाषाशास्त्र, व्याकरण अलंकार, इत्यादि

(१) अलंकारमीमांसा ( ब्राह्मण छापखाना मुंबई १८९० )

(२) संस्कृत भाषेची विचिकित्सा ( श्री समर्थ प्रसाद छापखाना, कोल्हापूर )

(३) प्राकृत भाषेची विचिकित्सा भा० २ (कर्नाटक प्रेस, मुंबई १८९६ )

(४) रेवतीचें पहिलें पुस्तक ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६ )

(५) मराठी भाषेचें छोटें व्याकरण- ( ब्राह्मण छापखाना, मुंबई)

## मराठी कवींच्या काव्यांतील उतारे

(१) मोरोपंती कर्णपर्वांतील वेंचे (ब्राह्मण छापखाना १८९६ )

(२) मोरोपंती गदापर्वांतील वेंचे ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६ )

(३) भीष्मभक्तिभाग्य ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६ )

(४) रामदासी वेंचे ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६ )

(५) मोरोपंत त्रिपर्वी वेंचे ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६ )

(६) वामनी वेंचे हरिविलासांतील ( ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६ )

## संस्कृत संक्षिप्त कृति

(१) स्वल्प कौमुदी ( ब्राह्मण छापखाना, सन अज्ञात )

( २ ) पंचतंत्रसारम्–प्रथमतंत्र सारम् ( ब्राह्मण छापखाना, सन अज्ञात )

( ३ ) भगवद्योग— ( श्रीमद्भगवद्गीतासारम् ) ( ब्राह्मण छापखाना मुंबई १८९६ )

## इंग्रजी लिखाण

( 1 ) Eleven Upanishads— Aitareya and Shwetashwatara ( Nirnayasagar Press, Bombay 1898; 1900 )

( 2 ) A Course of Eight Lectures in Sanskrit ( The Wilson Philological Lectures; Native Opinion Press, Bombay 1903 )

( 3 ) Khordeh Avesta Searched From a Vedic Point of View ( Native Opinion Press Bombay 1904 )

( 4 ) The Original Bhagavadgita Unearthed ( Native Opinion Press 1905 )

( 5 ) The Divings into The Bhagavadgita ( Native Opinion Press 1904 )

( 6 ) An attempt to analyse The Bhagavadgita ( Native Opinion Press 1905 )

( 7 ) Is Hinduism a Religion ( Indian Interpretor, Oct. 1906 )

( 8 ) To All Vegetarian Brahmins ( Scottish Mission Industries, Poona 1907.)

( 9 ) The Samhita of The Rigveda Searched ( J. B. R. S. 1902 )

( 10 ) The Vedic Shakhas ( Unpublished )

या शिवाय शास्त्रीबोवांनीं मराठी म्हणींचा व वाक्संप्रदायांचा एक शब्दकोश तयार केला होता. तो त्यांनीं मृत्युसमयीं डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ह्यांचें हवालीं केला होता. असें कीर्तिकरांनी कै. विद्याधर वामन भिडे यांना १९०९ सालीं लिहिलेल्या एका पत्रावरून समजतें. कीर्तिकर तो ग्रंथ छापणार होते. तो कां छापला गेला नाहीं व त्याचें काय झालें तें समजत नाहीं. तें पत्र असें आहे —

*True-Copy*

Alexandra Lodge,
Andheri,
30th Sept. 1909

My dear Mr. Bhide,

I know you well by repute as the author or 'राघवीय परिवाह' a splendid poem it is, be sure.

As I am myself publishing the MS you ask for, I am sorry I can't lend it to you.

Our revered friend R. R. B. left the MS with me with the sacred trust of Publication. That trust I am going to justify by publishing the Idioms soon in R. R. B's sacred memory.

I am sorry to disappoint you by not sending to you the MS at once.

But you will, I hope, be able shortly to see it in print.

With kind regards,

Believe me,
Yours sincerely,
Sd/–K. R. Kirtikar.

# – २ –

## नियतकालिकांतील लिखाण व टीका

'विविधज्ञानविस्तारा'खेरीज इतर नियतकालिकांतलें म्हणून जें शास्त्रीबोवांचें लिखाण दिलें आहे, तें सर्व अपुरें आहे. काळाच्या दाढेंत सर्वस्वीं गडप झालेलें लिखाण पुढील प्रमाणें आहे. 'दंभहारक' मासिकांतील लेख; वऱ्हाडांतील 'ज्ञानसंग्रहांतील' लेख; सदाशिवराव केळकरांच्या 'कामगारबंधू' पत्रांतील लेख; 'काशीविद्यासुधानिधी'तील लेख; मधुमक्षिका, चिकित्सक व धुरीण ह्या बेळगांवकडील मासिकांतलें व वृत्तपत्रांतील लेख आणि 'पुणें वैभव' पत्रांतील लेख. वार्ताहरांतील लेख; हिंदुधर्मविवेचकांतील बरेचसे लेख, 'ऐतिहासिक गंजिफा'तील लेख. इत्यादि.

### ( १ ) हिंदुधर्मविवेचक

हें १८८५ पासून १८८७ पर्यंत चालू होते. ह्याचे फक्त खालीं दिलेले लेख उपलब्ध आहेत. ह्या मासिकाला 'हिंदु युनियनक्लब'चा आधार होता. ह्यांतील दोन लेख सोडून बाकी सर्व शास्त्रीबोवांचे आहेत. शास्त्रीबोवांची संपादकीय कामगिरी ह्यात चांगली दिसून येते. आटोपशीरपणा व शास्त्रशुद्ध विचारसरणी हें या मासिकाचें वैशिष्ट्य आहे. शके १८०७ ( १८८५ )

( १ ) कार्तिकः--श्रुति, स्मृति, पुराणें व आचार हा हिंदु धर्माचा पाया.
( २ ) मार्गशीर्षः– हिंदुधर्म अधिकारभेदानें व्यवस्था लावतो तेंच रास्त
( ३ ) पौषः– श्वेताश्वतर उपनिषद्.
( ४ ) माघः– श्रुति, स्मृति, पुराणें व शिष्टाचार.
( ५ ) श्वेताश्वतर.
( ६ ) फाल्गुनः– चातुर्वर्ण्य,
( ७ ) चातुराश्रम्य.

( ८ ) श्वेताश्वतर.

( ९ ) ज्येष्ठः– ज्ञानोदय व हिंदुधर्मविवेचक.

( १० ) आषाढः– मूर्तिपूजा.

( ११ ) श्वेताश्वतर.

( १२ ) श्रावणः– संध्या.

( १३ ) श्वेताश्वतर.

( १४ ) भाद्रपदः– श्वेताश्वतर.

( १५ ) आश्विनः– माधवबागेंतील हिंदु लोकांची सभा वर्ष २ रें शके १८०८.

( १६ ) कार्तिकः– कुटुंबमित्र व हिंदुधर्मविवेचक.

( १७ ) मार्गशीर्षः– श्वेताश्वतर.

( १८ ) पौषः– योगशास्त्र.

( १९ ) माघः– आमचे इंग्रजी शिकलेले लोक काय करीत आहेत ? सुधारणा कीं समुन्मूलन ?

( २० ) तैत्तिरीयोपनिषद्.

( २१ ) फाल्गुनः– सांख्यशास्त्र ( २२ ) तैत्तिरीयोपनिषद्

( २३ ) चैत्रः– कलियुग ( २४ ) शिमग्याचा सण.

( २५ ) तैतिरीयोपनिषद्

( २६ ) वैशाखः– द्वैत आणि अद्वैत ( २७ ) तैत्तिरीयोपनिषद्

( २७ ) जेष्ठः– संतमंडळी.

( २८ ) आषाढः– संतमंडळी.

( २९ ) श्रावणः– आपली हल्लींची सामाजिक स्थिति (२) संतमंडळी.

## ( २ ) वार्ताहार

'वार्ताहर' हें 'फॅमिली प्रिंटिंग' प्रेसचें पहिल्यानें साप्ताहिक व मग द्वै-साप्ताहिक व कांहीं दिवस दैनिक पण होतें. एक वर्ष ( कोणतें वर्ष तें ठाऊक नाहीं. बहुधा १८८४ असावें ) त्याचे संपादक पण होते. पण

ह्या पत्राच्या केवळ तीन वर्षांच्याच फायली उपलब्ध असल्यामुळें शास्त्रीबोवांचें संपादन कार्य ह्यांत कशा प्रकारचें झालें त्या बद्दलचा उल्लेखही करतां येणें शक्य नाहीं, अपवाद म्हणून १८८४ सालीं शास्त्रीबोवांचा व गुंजीकरांचा जो वाद झाला, त्यासंबंधीं 'जशास तसें' या पुस्तकावर 'वार्ताहरकर्ते' या नांवानें लिहिलेलें संपादकीय स्फुट 'आमचे दोन शब्द' हें त्या पुस्तकास पुरवणी म्हणून जोडलेलें आहे. हें पत्र सुधारकांच्या विरुद्ध असल्याचें दिसतें. "ब्राह्मणांची निंदा करण्याकरतां दीनबंधूचा अवतार आहे. म्हणून त्या अवताराचा अंमल मोडण्याकरतां वार्ताहराचा अवतार आहे" असे संपादकीय उद्गार १२-६-१८८७ च्या 'वार्ताहरांत' आढळून येतात. ज्या 'हिंदुधर्मविवेचकाचे' संपादक शास्त्रीबोवा १८८५-१८८७ सालीं होते त्याची जाहिरात ह्या पत्रांत प्रामुख्यानें येत असे. त्याचप्रमाणें फॅमिली प्रिंटिंग प्रेस मध्यें छापलेल्या 'वार्ताहराच्या किताबखान्यांतील' 'जशास तश्या' पासून अगदीं प्रारंभींच्या पुस्तकाच्या जाहिराती ह्यांतच येत असत. शास्त्रीबोवांच्या अलंकारशास्त्राची व अलंकारशास्त्र शिकवण्याच्या मोफत वर्गाची जाहिरात पण ह्यांतच येत असे. ह्यांतील कांहीं उद्गार पत्र रूपानें आलेले शास्त्रीबोवांच्या बहुतेक विरुद्ध आहेत. दोन संपादकीय व एक पत्र मात्र त्यांच्याबाजूचें आहे. ते उल्लेख असेः-

(१) "मराठ्यां संबंधानें चार उद्गार" या नांवाचें नुकतेंच एक पुस्तक बाहेर पडलेलें सुप्रसिद्धच आहे. त्या संबंधानें हक्का बद्दल त्याचे प्रकाशक व मालक, आमचे उदार-प्रकृती जावजी दादाजी, येथील निर्णयसागर छापखान्याचे चालक, हे मोठ्या उदार बुद्धीनें, कर्ते रा. रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांना कांहीं रक्कम देण्याला तयार होते; परंतु त्यांनीं ही ती मोठ्या थोर मनानें स्वीकारली नाहीं, असें आम्हाला चांगल्या आधारानें माहीत आहे. असें असतां शास्त्रीबोवांनीं एक बडी रक्कम घेतली अशी जे क्षुद्रबुद्धि गृहस्थ गांवांत व्यर्थ कूट खात आहेत,

ती सर्वथैव निराधारी आहे, असें आम्ही स्पष्ट म्हणूं शकतों".
( १८–७–१८८८ )

( २ ) अलीकडील विद्यालयांतून स्वधर्मशिक्षणाचा पूर्ण अभाव असल्यामुळें धर्मोन्नतीचें पाऊल बरेंच मागें पडलें आहे. त्या कामीं अधिक मदत व्हावी, म्हणून येथील मराठा हायस्कूलच्या व्यवस्थापकांची (राजाराम शास्त्री भागवतांची) आज कित्येक दिवस खटपट सुरू आहे— व त्याच संबंधानें त्यांची स्वतंत्र पुस्तकमालाही तयार होत आहे. असें असतां ते पुस्तकमाला करूं इच्छित नाहींत, म्हणून आम्ही त्या कामीं हात घातला, असे एक गृहस्थ गांवांत सांगत फिरत आहेत, तें केवळ व्यर्थ व तोंडपुजेपणाचें असें आम्हीं समजतों. ( ८–७–१८८८ )

( ३ ) पोंचः– भगवद्गीतेचें भाषांतर भागवतांचें कीं गुंजीकरांचें ? याबद्दल संपादकाच्या शंकेला भागवतांनीं तें आपलें नव्हें म्हणून कळविलें.
( ७–१०– १८८८ )

( ४ ) उमेदवारांची साडेसातीः– टीकाः– काल हेमंतोत्सवांत उमेदवारांची साडेसाती सुरू झाली ती तब्बल एक तास बोकांडीस बसून संपली. हेमंतोत्सवांत साडेसातीस आरंभ केला राजारामपंत भागवतांनीं. हे नव्हत प्रोफेसर, नव्हत शास्त्री. प्रोफेसर पदवी मिळण्यास एम्. ए. हवा, आणि प्रार्थनासमाजाचा सभासद नसला तर " वेद ईश्वरप्रणीत नव्हत " इतकीं तरी थेट देठांपासून गर्जना करणारा केसरी, अगर गर्जना न झाल्यास शिमगा तरी माजवणारा भक्का भक्कम सुधारकाचा बच्चा हवा. भागवत नाहींत प्रार्थनासमाजाचे सभासद, नाहींत ' वेद ईश्वरप्रणीत नव्हत' असें समजणारां पैकीं. बरें, शास्त्री म्हणावे तर यांनीं बिसमिल्लाचें ही शास्त्र म्हटलेलें आणि इराण्याच्या चहाशीं प्रवासाच्या हकीकतींत वारंवार प्रसंग आलेला. शास्त्र्यांस नसतो इराण्याच्या चहाचा निजध्यास. म्हणून हे प्रोफेसर भागवत नव्हत, राजारामशास्त्री भागवत नव्हत, तर राजारामपंत भागवत.... हे उपजत खरडते. अभ्यासाचा बोजा कमी कसा होईल, परीक्षांमध्यें बेतबात राहून उमेदवारांचे हाल कमी कसे होतील,

असले उमेदवारांस उद्देशून अनेक प्रश्न आज उद्भवलेले आहेत त्या पैकीं कित्येकांचा उल्लेख कालच्या साडेसातींत आला होता. असल्या प्रश्नांचा ब्राह्मणसभेस जितका अधिकार तितका दुसऱ्या सभेस नाहीं.... जर ब्राह्मणांनीं आपले अधिकार टाकून दिले, तर जगाची रहाटी चालणार कशी ? या चिंतेनें दिवसास अन्न गोड लागत नाहीं, रात्रीस झोंप येत नाहीं, " ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् " महापुरुषाच्या मुखानें आपली कामगिरी झुगारली कीं जगाचें वाटोळें. तर ब्राह्मणांनों, आपलें मुखत्व गाजवा, आणि उमेदवारांची साडेसाती कमी होईल अशी व्यवस्था करण्याचें मनावर घ्या. तशांत हें काम बिनभांडवली. यास भांडवल काय तें अकलेचें. तें तर अक्षय्यतृतीयेच्या श्राद्धाच्या फळाप्रमाणें तुमच्या आंगीं अक्षय्य मुरलेलें. तर जसें धर्मशाळेचें आणि हिंदुमुसलमानांमध्यें सलोखा करण्याचें तसें उमेदवारांच्या साडेसातीवर आपल्या अनिवार्य ब्रह्मास्त्राचा प्रयोग अश्वत्थाम्याप्रमाणें करण्याचेंही काम एकदां घ्या मनावर आणि प्रोफेसर भय्यासाहेबांच्या ( जिनसीवाल्यांच्या ) उपजत वक्त्यांच्या परमगुरूस द्या एकादा चांगलासा उद्योग करून– " भुकेलेला भट ( २०–२–१८९५ )

( ५ ) टीकाः– भागवतांस " निबंधाचार्य " चेष्टेनें म्हटलेलें.

भुकेलेला भट ( १३–३–१८९५ )

( ६ ) महाराष्ट्रधर्मांची आगगाडीः— भागवत " अल्लोपनिषदांचें अध्ययन केलेले...... दीडतासानें हा राजारामपंती गोंधळ संपला. इत्यादि, भुकेलेल्या भटाचे उद्गार. ( २४–४–१८९५ )

( ७ ) 'भुकेलेल्या भटा'स उत्तरः— संपादकास लिहिलेलें पत्रः– " आपण अश्यां संस्कृत शिव्यांनीं भरलेल्या ताळ ना तंत्र असलेल्या पत्रांस थारा देऊं नये......... महाराष्ट्रधर्मांची गाडी काय, रानड्यांस शिव्या काय, रा. राजारामपंतांची विचारसरणी अगदीं चुकली असेल, टीकेस पात्र असेल पण त्या विषयीं माहिती देतांना अगर टीका करतांना ह्या कोंकराच्या उड्यांप्रमाणें संस्कृत शिव्या काय होत ! नामदार न्यायमूर्ति रानडे व राजारामपंत अशा लेखांना कसचे भीक घालायला

बसले आहेत म्हणा ? पण आपणा सर्वांनीं मिळून एकदां तरी सदिच्छेनें लेखकाला दोन गोष्टी सांगणें आवश्यक दिसतें— अरे भुकेलेल्या भटा ! बाबा ! विचार करून व आपणांस खरोखर कांहीं लिहावयाचें आहे, अशी खात्री झाल्यावांचून केवळ ‘ लिहिणारा ’ म्हणून लिहावयाचा हा नाद तूं सोडून दे. गृहस्था, कोठें तूं व कोठें नामदार रानडे, डॉ. भांडारकर, रा. राजारामपंत आदिकरून मंडळी ? बरें, खरोखर जर तुला कांहीं म्हणावयाचें असतें, तर गोष्ट निराळी. तूं आपल्या शंका अगर उलट विचार पत्रांत लिहितां क्षणींच तुझें त्या विद्वद्वर्यांनीं समाधान करून दिलें असतें. पण तूं काय लिहितोस; कोणीकडे कसा बहकतोस, मध्येंच कांहीं विनोदाच्या रूपानें आपली योग्यता कशी प्रगट करतोस हें तुझें तुलाच तरी कळतें कां ? विषय म्हणून घेतोस कोणता, त्याला उपमा देतोस काय व पर्यवसान करतोस कोणीकडे ! कशाचा कशास पत्ता तरी ? तुझ्यामध्यें थोडा ज्ञानशून्यत्वानें जरी असला तरी अभिमान दिसतो. पण त्याचा उपयोग असा अविचारांत ? घेतली लेखणी आणि मारले खराटे असें करूं नकोस ...... तूं भुकेलेला आहेस म्हणून हें लेखरूपीं भोजन दिलें आहे. त्याचा स्वीकार करून समाधान पाव व नीट मार्गाला लाग. भुकेलेल्या भटजींचा यजमान. ( २२–५–१८९५ ). यानंतर २७–५–१८९५ च्या अंकांत जरी इराण्याकडे, शेणव्याकडे खाणारे ‘फराळी ब्राह्मण’ ‘बिसमिल्ला’ ब्राह्मण वगैरे जरी टीका, भुकेलेल्या भटानें एकदां आडून केली तरी नंतर रानडेभागवतांच्या नांवाचा मजकूर त्यानें लिहिला नाहीं. लिहिलें तें टिळक जिनसीवाल्यांच्या स्तुतीपरच.

## ( ३ ) केसरी

केसरी, मराठा, वाईचें मोदवृत्त, इत्यादि नियतकालिकांशीं शास्त्रीबोवांचें कधींच पटलें नाहीं. सुधारकांशीं त्यांचें जितकें जुळलेलें, तितकेंच ह्या पत्रांशीं त्यांचें फाटलेलें असायचें. सुबोधपत्रिकेंतल्या बहुतेक लेखांत ह्या पत्रांच्या व त्यांच्या संपादकांच्या धोरणावर वेळोवेळीं कडक टीका आहे. त्यांच्या

धार्मिक व सामाजिक मतांना ते ' भिक्षुकी ' मतें म्हणत. त्यांच्या राजकीय मतांबद्दल शास्त्रीबोवांनीं शेंवटपर्यंत कांहीं एक वांकडें लिहिलेलें नाहीं, ही एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. साहेबाची मानसिक गुलामगिरी शास्त्रीबोवांनीं कधींच पत्करली नाहीं. सरकारी नोकरीवर त्यांचा कटाक्ष. समाजांत सर्वांगीण सुधारणा झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं अशी त्यांची आगरकरांप्रमाणेंच भावना होती. पण आगरकरांचा पिंड जितका सुधारकाचा तितकाच राजकीय प्रवृत्तीचा होता. शास्त्रीबोवा संशोधक म्हणूनच समाजसुधारक होते. केसरी प्रमाणेंच निबंधमालेंचा व शास्त्रीबोवांचा संबंध विरोधभक्तीचाच होता. पण ' निबंधमाले'चा अवतार फार लहान व तेंव्हां त्यांतील उल्लेख कांहीं अंशीं केसरींतच अंतर्भूत आहेत अशी समजूत करावी लागते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें मराठी इंग्रजी छाप पडलेलें व अलंकारांनीं भरलेलें, नखरेल असें होतें. शास्त्रीबोवांस तें आवडत नसें. त्याला तें ' पिळांनीं फुगलेलें पुणेरी मराठी ' म्हणत. केसरींत शास्त्रीबोवांच्या बद्दल उल्लेख आले आहेत ते असे:—

( १ ) ' उमेदवारांची साडेसाती ' ह्या हेमंतव्याख्यानमालेंतल्या व्याख्यानाचा परामर्श ' केसरी ' नें सहानुभूतीनें लिहिला आहे कारण शास्त्रीबोवांची व केसरीकारांचीं मतें तंतोतंत एक होतीं. शास्त्रीबोवा विद्यार्थ्यांविषयीं कळवळा बाळगणारे; म्हणून त्यांना विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय असह्य होई. केसरीकार राष्ट्रीय आणि इंग्रजी घोरणाला हाणून पाडणारे. तेव्हां त्या दोघांचें कसें जुळलें हे ऐकणें मजेचें आहे. ही मनमिळणी होण्यास मुख्य कारण झालें तें हें कीं, १९ फेब्रुवारीला लॉर्ड हॅरिस हे चान्सेलर असतांना डॉ. भांडारकर या व्हाइस चान्सेलरचें भाषण झालें. हॅरिससंबंधीं लोकमत चांगलें नव्हतें. भांडारकरांनीं त्याची स्तुति वारंवार करावी. त्यामुळें चिडून जाऊन त्यांचें भाषण होतांना विद्यार्थ्यांनीं टवाळी केली. त्यावेळीं सर्व वर्तमानपत्रांत (केसरीखेरीज) विद्यार्थ्यांवर खरपूस टीका आली. त्या सुमारास शास्त्रीबोवांचें व्याख्यान झालें, व मॅट्रिकपासून ते बी. ए.

पर्यंतच्या विद्यार्थ्यांचीं गाऱ्हाणीं त्यांनीं प्रथम वेशीवर टांगलीं. एकंदर विद्याक्रम कसा व किती असावा ह्या विषयीं चर्चा केली. " बरेच निर्बुद्ध आणि आळशी असे उमेदवार पसार झाले तर ते बिचारे सुटले; तें ठीक झालें. सुबुद्ध आणि मेहनती असे उमेदवार जर नापसार होतात तर तें उघड गैरवाजवी होतें. निरपराधांस साडेसाती नडत आहे. ती न नडेल, अशी व्यवस्था विद्यापीठानें लावली पाहिजे. " असें शास्त्रीबोवा म्हणतात. ( २६–२–१८९५ )

( २ ) शास्त्रीबोवांच्या अभिनंदनाचा प्रसंग केसरीला १८९५ सालीं मिळाला. त्या वर्षी न्यायमूर्ति रानड्यांनीं भागवत धर्मावर प्रार्थना-समाजांत आणि ठाकुरद्वारला मुंबईत व्याख्यानें दिलीं, तीं शास्त्रीबोवांच्या प्ररणेनें. मराठी संतवाङ्मयाचा अभ्यास शास्त्रीबोवांनींच रानड्यांस करा-वयास लावला, आणि प्रार्थनासमाजाचीं तत्वें अधिक लोकप्रिय करायची असल्यास देवळांतून व्याख्यानें करा, आणि संतांस विसरूं नका असा आदेश शास्त्रीबोवांनीं स्वतःस गुरुस्थानीं असलेल्या रानड्यांस दिला.

( २–१–१८९६ )

( ३ ) 'व्रात्यस्तोम अगर ब्राह्मणी धर्माची दीक्षा,' ह्या व्याख्याना-बद्दल सुद्धा एकमत असल्यानें थोडी कडक टीका सोडल्यास विरोधी पक्षाचा सुद्धां एक सूर होता. अनार्यांस आर्य करणें, मूळचे हिंदु ख्रिस्ती झाले असल्यास व त्यांना पश्चात्ताप झाल्यास शुद्ध करून घेण्यास हरकत नसावी असें मत स्पष्टपणें मांडलें आहे. ( १८–१–१८९६ )

( ४ ) 'न मांसभक्षणे दोषः' या ' विस्तारांती'ल लेखावर कडक टीका. ' सुधारक अलीकडे ज्या वातावरणांत भ्रमण करीत असतात त्याहूनही उंचीवरच्या वातावरणांत शास्त्रीबुवांनीं उड्डाण केलें आहे. '

' ताडी, फेणी, शिंदी, बेवडा, म्होवडा', इत्यादि दारूची नांवें शास्त्रीबोवांनीं दिलेली पाहून केसरीकार म्हणतात " अबब ! काय ही माहिती ! किती तरी हीं नांवें. इतकीं नांवें माहीत होण्याला कितीतरी परि-श्रम करावे लागले असतील ? सारांश शास्त्रीबुवा ब्राह्मण असूनही त्यांनीं

दारूच्या कार्यांतील हें जें आपल्या चौकसपणाचें दिग्दर्शन केलें आहे, तें अतिशय वर्णनीय आहे यांत शंका नाहीं." ( ३१-३-१८९६, ७-४-१८९६ )

( ५ ) 'ब्राह्मण म्हणविणारास सवाल:'— " विषयाची मांडणी विलक्षण व एककल्ली असून त्यांच्या निबंधापैकीं कांहीं भाग ग्राह्य नसला तरी विचार करण्यासारखा आहे— असलीं नाष्कळ व चावट व्याख्यानें देण्यास परवानगी देऊन ' जस्टिस ' सारख्या पिशाच्चांना दिवाणखान्यांत हुतुतू घालावयास लावण्याचें श्रेय कमिटीनें कां घेतलें कळत नाहीं."

( १४-१-१८९९, १७-१-१८९९ )

( ६ ) 'ब्राह्मण म्हणविणाऱ्यांस केलेल्या सवालाचा जबाब.' ह्या श्री. काशिनाथ वामन लेले यांच्या व्याख्यानास पाठिंबा. 'बायकांची मुंज ' ही कल्पनाच मूर्खपणाची अशी टीका. ( २४-१-१८९९, १४-२-१८९९)

( ७ ) 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता,' ( टिळकी धर्मावर भागवती टीका ) ह्या व्याख्यानावर केसरीकार म्हणतात 'आजच्या स्थितींत आम्हांस हितकारक सद्बोध करणारीं माणसें पाहिजेत. विघातक टीकाकार नकोत '. ( १-१२-१८९९ )

( ८ ) क्षत्रियांची मूळची पायरी:- ह्या व्याख्यानावर कडक टीका.

( २३-११-१९०१ )

ह्या उल्लेखांशिवाय शास्त्रीबोवांबद्दल अत्यंत त्रोटक मृत्युलेख पण केसरींत आला आहे. त्यांतही आदरापेक्षां सुटकेचा निश्वासच टाकल्याचा भास होतो. ( केसरींतील मृत्युलेख )

### ( ४ ) निबंधचंद्रिका.

हें मासिक ' निबंधमाले'चाच नवा अवतार असून चिपळुणकरी बाण्याचें होतें.

विविधज्ञानविस्तारांतील विचारमाधुकरी.

दशावतार-विचार यावर कडक टीका.

रा. रा. निबंधचंद्रिकाकार यांस: —

वि. वि. पुढील लेखास स्थळ द्यावें. बंधुप्रीतिपाशांत पडून मला अर्धचंद्र द्याल कीं काय, असा संशय येतो. परंतु तसें होणार नाहींसें वाटून आलों आहे.

भगवद्भक्तांचें पहिल्या तीन विचारांतलें विलक्षण तार्किक वाचून पोट धरधरून हसूं येते ! तसेंच ह्या विचारांतलेंही वाचून होतें. तीन विचार वाचतां वाचतां जें जें विलक्षण किंवा चुकीचें किंवा टीकार्ह वाटलें त्यावर खूण करीत गेलों. शेवटीं पहातां सर्वच चिन्हमय होऊन गेलें. तेव्हां थक्क होऊन विचारमाधुकरी हें एक काव्यच समजून स्वस्थ बसलों ! आज चवथा विचार वाचतां वाचतां साहजिकच ज्या शंका इत्यादि आल्या त्या लिहाव्याशा वाटून लिहीत आहे.

२— ‘नरहरि व वराह हें अतिप्राचीन काळीं कश्यप सरोवराजवळ असावें’ असें म्हणण्यास आधार काय ? बरें हें विधान संशयात्मक केलेलें असून त्याजवरच अवलंबून असणारे दुसरें विधान “काश्यप सरोवराजवळ असतां हिरण्याक्ष नांवाच्या असुर राजाचा वध एका वराहानें व त्याचा बंधु हिरण्यकशिपु याचा वध एका नहिरीनें किंवा नरहरीनें केला, हें निश्चयात्मक कसें करितां आलें ? बरें तें कसेंहि असलें तरी त्यास आधार काय ? ह्या गोष्टी कोणत्या काळीं झाल्या ? ह्या कलमावरील १६ व्या टीपेंत हिराडोटसवरून जें सांगितलें आहे त्याचा काळ कोणता ? कश्यप भरतभूमींत येण्यापूर्वी उपनिषत्काळ झाला असें भगवद्भक्तमत दुसऱ्या विचारावरून दिसतें. औपनिषदांच्या गांजणुकीनें सुकलेली यज्ञविद्या कश्यपागमनानें टवटवीत दिसूं लागली असें ते म्हणतात. कश्यपांबरोबर वराह आले व त्यांनीं आल्यावर वराहावतार कल्पना केली ! तर मग उद्धृतासि-वराहेण कृष्णेन शतबाहुना ” असें भूमीस उद्देशून एका उपनिषदांत म्हटलें आहे, हें कसें ? या वाक्यांत वर्णिलेल्या वराहकृत्याची उपपत्ति भगवद्भक्त कशी करितात ? त्यांच्या कविप्रतिभेच्या घरीं उपपत्ति पाणी भरतें आहे. तेव्हां त्यांस ही उपपत्ति दुर्घट नाहीं. परंतु सहज विचारलें.

( ३ ) याज्ञिक काश्यपांतें कधीं गेले ? रामचरितांत वसिष्ठरघुसंबंध याज्ञिकांच्या वाचण्यांत आला तें रामचरित वाल्मिकीचेंच कीं कोणतें ? जर विश्वामित्रयज्ञरक्षणार्थ राम गेला ही ब्राह्मणांची कृती; रामाचा अश्वमेध, दशरथशाप, शंबुकवध ही दीनबंधु फुले प्रभृति महाशोधकांच्या व, त्यांबरोबरच कीं काय कोण जाणे, आमच्या खऱ्या शोधक भगवद्भक्तांच्या दृष्टीनें लबाड ठरलेल्या भूदेवांची कल्पना; सगळी यज्ञविद्या रामचरितांत मागाहून ढकललेली अर्थात् पुत्रप्रात्यर्थ दशरथयज्ञ अित्यादी झाडून सारें यज्ञवर्णन हल्लीं रामायणांत असलेलें हें लबाडांचें काम; परशुरामकथा मागाहूनच घुसली; अहल्योद्धार तसाच; तर रामचरितांतलें मूळचें काय ? " ब्राह्मण अवतार झाले कृतयुगांत. त्रेताद्वापरांत क्षत्रिय कुलांत मात्र भगवंतानें अवतार घेतले असें ब्राह्मण म्हणू लागले, व त्यांवरून उलटीं बौद्धांनीं त्यांचीं तोंडें बंद केलीं. " या म्हणण्यास आधार काय ? या गोष्टीचा काल कोणता ? कोणते ब्राह्मणअवतार कृतयुगांत झाले असें ब्राह्मण म्हणतात ? " परशुराम शक मलबारांत चालतो त्या वरून परशुराम हा ख्रिस्ताच्या पूर्वी १२ व्या किंवा १३ व्या शतकांत झाला " हें कोणतें न्यायशास्त्र ?

( ४ ) यांत कूर्मावताराची उपपत्ति आहे. वाचकहो, समुद्रमंथन तें काय ? व कोठें झालें म्हणाल तर, गंधर्वाप्सरस हे कश्यप ( कास्पियन ) समुद्राच्या अैलतीराहून पैलतीरास गेले हें तें होय. अप्सरस, असुर, आशर, हे एकच. युरोपिअन अितिहासकारांनीं आपल्यास माहित करून दिलेले तुर्कस्तानांतील निनव्हीचे आसीरिअन लोक हेही त्यांतलेच. आणि हे सर्व मूळचे खलाशी ( अप्सु सरति-अप्सरस ). भगवद्भक्तांपूर्वी शेकडों वर्षें- त्यांच्याच मतें साडेचार हजार वर्षें-होऊन गेलेल्या वाल्मीक्यादिकांनीं केलेलें असुर अित्यादी शब्दांचें निर्वचन भगवद्भक्तकृत विवेचनापुढें त्याज्य ! वाल्मीक्यादि बिचाऱ्यांस कश्यप समुद्र कोठें माहीत होता ! असो, अप्सरस् शब्दाचा स्त्रीलिंगी प्रयोग तैत्तिरीय वेदांत शेंकडों ठिकाणीं आहे. उदाहरणार्थ " ऋताषाड्ऋतधामाग्निर्गंधर्वस्तस्यौषधयोप्सरसः...

स इदं...परन्तु...ताः... पांतु " हा अनुवाक् ( तैत्तिरी. संहि—अष्टक ३ प्रपाठ ४ अनु. ७ ) पहा. ह्या पहिल्याच वाक्यावरून व पुढील " चंद्रमा गंधर्वांच्या नक्षत्रें ह्या अप्सरा " अित्यादि वाक्यांवरून अप्सरा ह्या गंधर्वपत्नी ही समजूत स्पष्ट दिसते. तर ह्याची व्यवस्था काय ? वैष्णव-मत-विचार यांत भगवद्भक्तंच म्हणतात कीं ' गंधर्वांच्या बायका अप्सरा ' तसेंच त्रिमूर्ति-विचारांत ते म्हणतात कीं " द्वंद्वशब्दाचा मूळचा अर्थ स्त्री पुरुष " आणि ह्या कलमांत तर गंधर्वाप्सरस् हा द्वंद्व असें म्हणत असूनही अप्सरस् हे पुरुष झाले !

( ५ ) महाभारतांतलें मत्स्योपाख्यान हें मत्स्यावताराचें बीज, हें उपाख्यान भगवद्भक्तांच्या वेदव्यासाचें कीं द्वैपायनाचें ?

( ६ ) भगवद्गीता रचना काल भगवद्भक्तांच्या मतें बुद्धानंतर परंतु भगवान् बुद्धानंतर कीं काय ? "भगवंताच्या मतें बुद्ध हा अवतारच" या वाक्यावरून बुद्धानंतर भगवान् असें होतें. विचार २ कलम ३२ या वरून व ५ व्या विचारांतील कांहीं वाक्यांवरून कृष्ण हाच भगवद्गीतेंतला भगवान् हें भगवद्भक्तांस मान्य दिसतें. तर कृष्णही बुद्धानंतरचा कीं काय ? पांचव्याच विचारांत कृष्ण हा पांडव समकालीन ठरविला आहे. तेव्हां या सगळ्यांची एकवाक्यता कशी ? अश्वत्थ हा यज्ञवृक्ष याज्ञिकांचा मूळ-चाच नव्हे काय ? अश्वत्थाचा उल्लेख तैत्तिरीय संहितेंत पुष्कळ ठिकाणीं आहे. ऋक्संहितेंतही अश्वत्थ हा कल्याणकारक वृक्ष अशी समजूत दिसतें. ( ऋ. सं. अष्ट ८ अध्या. ५ ' अश्वत्थेवो निषदनं ' इ० वाक्यें पहा ). " आश्वत्थप्लाक्ष इतीध्मो भवति " ( तैत्ति. सं. अ. ३ प्र. ४ अनु. ८ पहा ). या वरून अश्वत्थ हा यज्ञवृक्ष बुद्धांपासून चोरलेला नव्हे, हें स्पष्ट होय. आश्वलायनही अश्वत्थास यज्ञवृक्ष म्हणतो.

( ७ ) गीतगोविंदांतील अवतारक्रम हल्लींच्या प्रमाणेंच आहे. नैषधकार श्रीहर्षानंतरचा जयदेव असें भगवद्भक्तांचें मत दिसतें. त्यास आधार काय ? श्रीहर्षकवि या निबंधांत विविधज्ञानविस्तारावतारकार भगवद्भक्तांनीं ( भाषादि सादृश्यावरून हें सहज दिसतें. ) नैषधकाराचा

काल सुमारें विक्रम संवत् १२२० ठरविला आहे. परंतु या पूर्वी फार वर्षे जयदेव झाला असें कवि चरित्रकार लिहितात तें कसें ?

प्रसंगोपात दुसऱ्या कांहीं शंका लिहितों. गोत्रकर्ते मुख्य ऋषी सात. त्यां पैकीं ४ हिंदुस्थानांतले. दोन दक्षिणात्य आणि दोन औत्तराह–त्यांत अत्रि दंडकारण्यांतले; अगस्ति त्याहून दक्षिणचे कावेरीतीरचे; कौशिक कनोज देशांतले; आणि वसिष्ठ कोसलांतले. बाकीचे तीन–अंगिरस, भृगु आणि कश्यप–हे हिंदुस्थानाबाहेरचे, म्हणजे काबूल पासून कास्पियन समुद्रापर्यंत रहाणारे. कण्व हे भरतच. ते वरील चौहोंमध्यें अंतर्भूत होतात त्याप्रमाणेंच. हें भगवद्भक्तांचें मत. आतां चमत्कार पहा. ह्या वेव्ह्या सगळ्यांची भाषा एक. सगळे वेदसूक्त द्रष्टे. सगळयांची प्रार्थनापद्धति बहुधा सारखीच. सगळयांनीं योजलेली छंदेंहि सारखींच. त्यांच्या स्थलांमध्यें हजारों कोसांचें अंतर; चिंता नाहीं. स्थल-भेद असल्यावर कालसाम्य असेलच असें नाहीं; हरकत नाहीं. हिंदुस्थानांत हल्लीं वीस पंचवीस भाषा आहेत. कावेरी पासून कास्पियन समुद्रापर्यंत यांहून जास्त असणें शक्य; म्हणून काय झालें ? कालांतरानें भाषांतर होतें; तरी काय हरकत ? कश्यप आणि अगस्त्य यांची भाषा एक असली तरी यांतला एक ऋषी कश्यप ( कास्पियन ) समुद्रावर रहाणारा व दुसरा कावेरी तीरीं रहाणारा दिसणें भगवद्भक्त कविदृष्टीस अशक्य नाहीं; असो भाषाकोविद भगवद्भक्त तार्किकांनीं याचा विचार केलाच असेल.

विश्वामित्रकाळ खि. पू. १२ वें किंवा १३ वें शतक : शुनःशेप तेव्हांच झाला. शुनःशेपाच्या नांवावर मोडणाऱ्या सूक्तांचा कर्ता शुनःशेप हें अनुक्रमणिकाकारांचें अज्ञान. वस्तुतः ती शुनःशेपानंतर बऱ्याच वर्षांनीं झालीं. त्या नंतर बव्हृच शौनक झाले. नंतर पहिला ब्राह्मण काल. नंतर दुसरा ब्राह्मण काल. याच सुमारास पाणिनि ( पाणिनिच्या अगोदर किंवा त्यासुमारास कल्पसूत्रांचा काल झालाच पाहिजे ). पाणिनि नंतर शाश्वतिकविरोधवादी हिंदुस्थानांत आले. आणि त्यांनीं तिसरा ब्राह्मणकाल प्रवृत्त केला. देवासुरांचा शाश्वतिक विरोध तर खि. पू. १०व्या शतकाच्या

अखेरीस झाला. तेव्हां या सर्व भगवद्भक्तांप्रमाणें खि. पू. १३ व्या शतका पासून १० शतकाच्या अखेरी पर्यंत हें सर्व झालें. बौद्धकाल व उपनिषत्काल यांतच. आणि हा सर्व खेळ म्हणजे कांहीं मंत्र ( संहिता ), कांहीं ब्राह्मणें कल्पादिवेदांगें, उपनिषद् आणि यांतच बौद्धांची गडबड अितकें होण्यास तीनशें किंवा चारशें वर्षें लागलीं ! !

पाणिनिच्या वेळचें संस्कृत स्वरित. तर मग खुद्द अष्टाध्यायी स्वरित कां नाहीं ? तशीच पाणिनीची शिक्षा स्वरित कां नाहीं ? पाणिनीस कल्प माहित होते. मग कल्प स्वरित पाहिजेत. तसे कोणते आहेत ? पाणिनीस कल्प माहित होते, त्या अर्थी आश्वलायन, सत्याषाढ, बोधायन, कात्यायन अित्यादी पैकीं कांहीं कल्पसूत्रें तरी पाणिनीच्या पूर्वींचीं असलीं पाहिजेत. आणि स्वरविरहित तेवढें पाणिनी नंतरचें. तेव्हां वरील कल्पसूत्रें पाणिनी नंतरचीं असें होतें तर हें कसें ? "अग्निमुखावैदेवाः पाणिमुखाः पितर अितिह ब्राह्मणं" ( आश्वला. सू. अध्या, १६ स्वं. ७ ) असें आश्वलायन म्हणतो. आणि "अग्निमुखाः" हें वाक्य अैतरेय ब्राह्मणांतलें आहे. अशीं आणखीही ब्राह्मणवाक्यें आश्वलायन सूत्रांत आहेत. आश्वलायन सूत्र पाणिनीच्या पूर्वींचें असलें पाहिजे. आणि त्यापूर्वींचें अैतरेय ब्राह्मण असें वरील वाक्यावरून निश्चित होते. तेव्हां ऐतरेय ब्राह्मण पाणिनीच्या पुष्कळ पूर्वींचें असलें पाहिजे. परन्तु आमचे भगवद्भक्त म्हणतात तें स्वरविरहित म्हणून पाणिनी नंतरचें ! ! देवांसुरांचा शाश्वतिक विरोध प्रतिपादक वाक्यें तैत्तिरीय ब्राह्मणांत तर पुष्कळच आहेत. परन्तु तैत्तिरीय संहितेंतही पुष्कळ सांपडतील. तैत्तिरीय उपनिषदांतही आहेत. तर मग तैत्तिरीय संहिता, ब्राह्मण व उपनिषद् हीं पाणिनि नंतरचीं कीं काय ? तिन्ही स्वरित आहेत. तेव्हां भगवद्भक्तांच्या एका सिद्धांताप्रमाणें तर तीं निश्चयें पाणिनीच्या पूर्वींचीं ! याची व्यवस्था काय ?

तित्तिरीहो, बेटे धन्य तुम्हीं. तुमचें मूलस्थान तार्तरी हा भगवद्भक्तप्रसाद तुम्हांस लाधला; मोगलचीनसखित्व आणि साधर्म्यानें पेरुमेक्सि-

कोवासिसखित्वही तुम्हांस मिळालें! हतभाग्य अर्वांदिकांच्या कपाळीं असें कांहीं स्पष्टपणें नाहीं. भटकणाऱ्या तित्तिरींस साग्निकयाग कोठून? भगवद्भक्त महाराज नरमेध, निरग्निक पशुमेध या खेरीज तैत्तिरीय संहितेंत जें कांहीं आढळेल ती कोणा भगवद्भक्तांची कृती? तें वेगळें केलें म्हणजे तैत्तिरीय सहितेचा अष्टमांश तरी राहील काय? तो जो अल्पांश तेवढाच काय मूळचा तित्तिरींचा वेद?

द्वैपायनाचें भारत वेदव्यासानें अन्यथा केलें; द्वैपायन हा पांडवांच्या वेळचा; आणि त्याच्याही पूर्वींचा वाल्मीकि असें भगवद्भक्ताचें मत दिसतें. पांडवांचा काल त्यांच्यामतें खिस्तापूर्वी सुमारें २५०० वर्षें आणि संहिताकाल तर त्यांच्यामतें खि. पू. फार तर १३०० वर्षें. तर मूळचे वाल्मीकिकृत समचरित सर्व वेदांपेक्षांहि प्राचीन काय? पांडवांच्या वेळची अति प्राचीन संकृत भाषा हल्लीं लुप्तच झाली. या भगवद्भक्त मतावरूनही हल्लीं प्रत्यक्ष असलेलें वेदादि सकल वाङ्मय हें पांडवांहून व त्यांच्या पूर्वींच्या रामचरिताहून अर्वाचीन ठरलें! पांडवांच्या वेळचें संस्कृत जर आज अनुमेयच आहे तर वाल्मीकिचें रामचरित व द्वैपायनाचें भारत अशा तऱ्हेचें कांहीं पांडव कालीं होतें असें तरी कशावरून? रामपांडवांचें एवढें तरी नशीब म्हणावयाचें कीं रामपांडव म्हणून कोणी होते एवढें तरी भगवद्भक्त म्हणतात! पांडव, राम हे असले तरी ते जंगली होते कीं त्यांच्या वेळीं आचार विचार कांहीं होते? त्यांच्या वेळीं श्रुत्यादि कांहीं नव्हतें तर त्यांचा धर्म कोणता? त्यांचें देव कोण? त्यांच्या वेळीं ज्योतिषादि कांहीं शास्त्रें होतीं कीं नव्हतीं?

भगवद्भक्त 'हें कांहीं सामान्य धेंड नव्हे' ते जबरे वाचक, मोठे विद्वान् व महाशोधक दिसतात. त्यांचा उद्योग पाहून आश्चर्य वाटतें व त्यां विषयीं एक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. हें लिहिण्यास मला खरोखर मोठा आनंद वाटतो. असो हें सर्व खरें खरें, तरी त्यांचें लेख वाचतांना ते एकंदरींत काय म्हणतात हें समजण्याची आमच्या सारख्या जडधींस मारामार पडते; दुर्बोधता, दूरान्वय, वाक्यरचनानियमभंग इत्यादि दोष येथें

दाखविण्याचें कारण नाहीं. वाचकांस मासला पाहिजे असल्यास मऱ्हाठे-शाहींतलें ( मराठेशाही हें एक भगवद्भक्तांचें विविधज्ञानविस्तारकाराव-तारित हें सहज दिसतें. ) ३६ ओळींचें एक वाक्य ( वि. ज्ञा. वि. पू. ६ अं. १२ पृ. २६९ ) व २५ ओळींचें एक वाक्य ( वि. ज्ञा. वि. १६ अं. ११ पृ. २४६ ) पहावें. भगवद्भक्तांचे कांहीं उद्गार वाचतांना ते काढणारा मिशनरी आहे कीं काय असा भास होतो ! परंतु भक्तांच्याच इतर विचारांवरून व प्रेषित प्रलापांस वि. ज्ञा. विस्तारांत जागा मिळणार नाहीं अशी खात्री असल्यामुळें तो भास झांकावा लागतो. तरी मिशनरी-शिष्यत्व स्वीकारून, विष्णु शिव तुलना इत्यादि कांहीं स्थलीं जो निर्लज्यपणा प्रकट केला आहे, तो पाहून शिष्यांनीं गुरू जिंकले एवढेंच वाटून रहात नाहीं, तर पुराणांस शिमगा म्हणणाऱ्या भगवद्भक्तांनीं विविधज्ञान-मिशानें शिमगा गाजविला आहे असा भास दृढ होऊं पहातो !

भगवद्भक्तांस विनंति आहे कीं आजपर्यंतच्या विचारांत त्यांचीं जीं निरनिराळीं अनुमानें किंवा सिद्धांत झाले आहेत ते त्यांनीं एकदां सगळे एकत्र लिहावे. तसें करण्यास शेपन्नासापेक्षां जास्त ओळीं खर्च करण्यास नकोत; परंतु तेवढ्यांनीं माझ्यासारख्या मूढ वाचकांवर फार उपकार होतील. चंद्रिकाकार महाराज, मी येथें खेडेगावांत पडलों. माधुकरी मागण्याचें सामर्थ्य नाहीं व या खेडेगावांत मिळण्याचाही संभव नाहीं. इतकेंच नाहीं तर महाभाग भगवद्भक्तांनीं आयती आणून वाढलेली माधुकरी खाण्याचेंही सामर्थ्य नाहीं. खेडेगावांत कोरड्यास तरी कोठून मिळतें ! घशाखालींच ती उतरेना ! जेमतेम खाऊं लागलों तों ही शुद्ध माधुकरीच आहे कीं, माधुकरी मागून आणून तींत पदरचे अनेक पदार्थ मिसळून पुन्हां शिजवून तिची घाण केली आहे, तसेंच म्लेंच्छयवनविचारछायेनें ती विटाळलेली आहे कीं काय, असें वाटूं लागलें. बळेंच कांहीं खाल्ली तों ओकून पडली. थोडीचा तरी पोटांत पाक होईल कीं नाहीं, झाला तर तो पुष्टिप्रद होईल कीं विकारमात्र उत्पन्न करील हें कांहीं समजत नाहीं ! तर माधुकरीदात्या भगुबुवांनीं, किंवा इतकें लांब तरी कशाला, साध्या

उच्चाराच्या भगोबांनीं माधुकरी खाणारांची तृप्ति करावी. भगोबा म्हटलें म्हणून मला गांवढळ व दांडगा म्हणाल तर तसें नाहीं हो ! खऱ्या प्रेम-भावानें असें म्हटलें. मी रहातों या गावांत भगवान् देवाचें महात्म्य आहे. येथलें साधे भोळे ' महारथीं'चे वंशज, वेदांपेक्षांही प्राचीन अशा संस्कृत भाषेशीं संबंध ठेवणारी मराठी भाषा बोलणारे, हे भगवान् हा शब्द भगु; भगोबा, किंवा भग्या असा म्हणतात. आणि भगवद्भक्तांच्या भाषाशास्त्रा-प्रमाणें पाहिलें तर तोच उच्चार खरा. भगवान् हें ' संस्कृतज्ञ ब्राह्मणाच्या लष्ठकल्पनाशक्तीचें अपत्य ' ! भक्त हा बुवा याचा अपभ्रंश म्हणा किंवा तो पर्याय म्हणा. भगवद्भक्त मजवर कोपणार नाहींत असा दुसऱ्याही कार-णानें मला भरंवसा आहे. कारण मी आहें पशुपति अर्थात् भगवानाशीं सवर्ग्य. कसा तो पहा : पशुपति, भगवान्, गोपाल, अजापाल, मेषपाल, हे सगळे पर्याय शब्द ' शिवस्य हृदयं विष्णुः ' असेंही पाहिजे तर म्हणा. अथवा पशुपति व भगवद्भक्त हीं एकाच प्रकृतीचीं अपभ्रष्टरूपें म्हणतां येतील. कशीं तर पहा : पशुपति–पाशुवत–फाशुक्त-भाशुवत–भागवत–भगवद्भक्त. कां आहे कीं नाहीं खाशी फायलालजी ' ! इतक्याही सिद्धते-उपर ते रागावून म्हणतील कीं, हा माधुकरी खाणारा आहे मूर्ख, द्वादशी सोडणारा भोजनभाऊ, आयतें खाऊन उलट्या शिव्या देणारा. तर मी आहेंच खरोखर द्वादशीचा बोलून चालून–मुक्काम द्वादशी, भगवत्सन्निधि.

ता. २४ डिसेंबर १८८४. मु. वाई.

पशुपति.

श.

( ही टीका बहुधा भाऊशास्त्री लेले यांची असावी. )

## ( ५ ) केरळकोकीळ

केरळकोकीळच्या १८९९ च्या अंकांत ( पुस्तक १३, पृ. १३६ ) पुढील प्रमाणें टीका शास्त्रीबोवांबद्दल आली आहे. शास्त्रीबोवांच्या ' ब्राह्मण म्हणविणारांस सवाल ' ह्या व्याख्यानाला कै. योगी यांनी सवालास प्रति-

सवाल म्हणून उत्तर दिलें आहे. त्यावर संपादक म्हणतात. ' प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनीं केलेल्या ब्राह्मण म्हणविणारास सवाल ह्या व्याख्यानाचे विचार व त्यावर उत्तरें देणारांची झालेली घांदल वर्तमानपत्रांवरून सर्वश्रुत झालीच आहे. प्रोफेसर मजकुरांचें माथें अघटित विचारांनीं कसें भ्रमत असतें याची साक्ष आमच्या कोकिळांतल्या 'मऱ्हाठ्यांविषयीं चार उद्गार' ह्या पुस्तकपरीक्षेवरून व त्यांच्या इतरत्र चमकत असलेल्या पुस्तकमालिकेवरून व विचारमालिकेवरून बहुतेक महाराष्ट्रीयांस पटलेलीच आहे. त्याच मासल्याचे हे सवाल होत — त्यांस उत्तर म्हणून बाळकृष्ण गणेश योगी यांनीं तयार केलें आहे......किता घेण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रतिपक्ष म्हटला कीं त्यांची टर करायची, विनोद करावयाचा, भेदक शब्द वापरायचें त्याचा ह्या टीकेंत मागमूस नाहीं.' बायकांची मुंज व चातुर्वर्ण्य यांवर टीका. त्याच सुमारास ग्रंथमालेंत ( त्यावेळीं शास्त्रीबोवांचे लेख ' संस्कृत भाषेची विचिकित्सा ', 'प्राकृत भाषेची विचिकित्सा' ) येणाऱ्या लेखांबद्दल कै. कृष्णाजी नारायण आठल्ये, संपादक केरळकोकीळ म्हणतात कीं ' अनेक पदवीधर व विद्वान लोक मिळून कोल्हापूर मुक्कामीं एक ग्रंथमाला नांवाचें प्रचंड मासिकपुस्तक काढित असल्याचें प्रसिद्धच आहे. या मालेंतील लेखांची भाषा रद्दड व पिचपिचित असल्याचा गवगवाही कोणास माहित नाहीं असें नाही. हा मारून मुटकून प्रचारांत येणाऱ्या विद्वान व जगन्मान्य भाषेचा मासला. ' ( पुस्तक १५, पृ. २८२, १९०१ )

केरळकोकीळाच्या एकंदर उथळ विचारसरणीनें जरी काव्यविषयांत त्याचा नंबर बराच वर लागला तरी त्याला फारसा मान नसे हें त्या काळच्या अनेक लोकांच्या मतावरून दिसून येतें. नाहींतर ग्रंथमालेसंबंधीं असे उद्गार त्यांत निघते ना.

## ( ६ ) काळ

काळासंबंधानें त्वेषाचे उद्गार शास्त्रीबोवांनीं सुबोधपत्रिकेंत दोनचार ठिकाणीं काढले आहेत ( उदाहरणार्थ, १४–११–१९०१ ) काळकर्त्यांनीं देखील आपल्या खुबीदार छद्मी लेखणीनें शास्त्रीबोवांवर शस्त्र परजलें आहे.

( १ ) काळांतील निबंध, भाग ५ यांतला यांत 'एका गुणी माणसाची बदछान' हा औपरोधिक लेख म्हणजे शास्त्रीबोवांचें एक व्यंगचित्र आहे. तें असें. "इतक्यांत एक गबाळ्यासारखे धोतर नेसलेला, अंगांत बाराबंदी घातलेला व डोकीवर एक मोंगली टोपी ठेविलेला गृहस्थ दिसल्यावरून हे कोण असावे म्हणून प्रश्न विचारण्यांत आला. तेव्हां त्याच्याकडे पाहून त्रिंबकराव अगदीं गोंधळून गेल्यासारखे दिसूं लागले. त्यांच्या मनांतील गोंधळाचें स्वरूप पुढील प्रमाणें होतें. हा कोण असावा ? याला काय म्हणूं ? हा मोंगल म्हणूं कां ब्राह्मण म्हणूं ? एकीकडे धोतर नेसला आहे, पण दुसरीकडे मोंगली टोपी आहे. याच्या हातांत कसलीशी पोथी दिसते आहे, पण त्या फाटक्या खिशांतून बिस्किटाचा अर्धा खाल्लेला तुकडा डोकावतो आहे. गळ्यांत जानवें दिसतें, पण रस्त्यांतल्या महार चांभारांना धक्के मारून चालत आहे. असा हा विलक्षण प्राणी कोण असावा ? अशा रीतीनें पुष्कळ वेळ गोंधळून अखेरीस त्रिंबकरावांनीं सांगितल्यावर " अहो हे एक मोठे शास्त्री आहेत" असें एकजण मोठ्यानें ओरडले. ........
" हे क्षत्रिय शाखेंतील ब्राह्मण. यांचें नांव मल्हारीभट्ट मोहिते. राणोजीशास्त्री कदम. यांच्या मुलीची वेदोक्त मुंज आज व्हावयाची आहे, तिकडे बहुत करून चालले असावेत. ( काळ, अग्रलेख, १०-१०-१९०२ ) शास्त्रीबोवांनीं एका मराठ्याच्या मुलीची मुंज लावली होती त्या प्रसंगास अनुलक्षून हे उद्गार काढलेले आहेत.

( २ ) त्याचप्रमाणें 'सगळेच नरसू' हें दुसरें एक आचार-भ्रष्ट व स्वार्थी निर्बुद्ध सुधारकाचें व्यंगचित्र देखील शास्त्रीबोवांनाच उद्देशून लिहिलें आहे असें मला प्रो. नरहर रघुनाथ फाटक यांनीं सांगितलें. ह्यांतला टोला 'न मांसभक्षणे दोषः' ह्या शास्त्रीबोवांच्या धोरणाला हाणला आहे. त्याचप्रमाणें ह्यांत शास्त्रीबोवांनीं १९०२ सालीं सामाजिक परिषद्, व बोलघेवडे सुधारक ह्यांची जी कानउघाडणी केली आहे तिच्यावर हल्ला केला आहे. त्या वेळीं सामाजिक परिषद् अगदीं गडगडली होती. पण त्यांतल्या त्यांत समारोप असा केला आहे कीं "अखेरीस एक वृद्ध गृहस्थ

उठून म्हणाले थोड्याबहुत प्रमाणानें आपण सगळेच नरसू आहोंत. कांहीं अंशीं आपली अशी स्थिति आहे खरी व म्हणून हिंदुसमाजांतील बाकीची स्थिति सुधारण्याच्या कामीं आपण आपली स्थिति सुधारली पाहिजे." हें भाषण ऐकून सर्वांना त्यांतील सत्यता भासून जिकडे तिकडे शांतता झाली व सभेचें काम सुरळीत चालूं झाले. (काळांतील निबंध, भाग ६, पृ. १६४)

## (७) निबंधमाला

निबंधमालेंत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं शास्त्रीबोवांसंबंधानें तुच्छतापूर्वक उल्लेख 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' वर जी टीका केली आहे त्यांतील तळटीपेंत 'भट्ट प्रोफेसर' म्हणून त्यांचा उल्लेख करून मागासलेल्या जातींची बाजू घेऊन ब्राह्मणांवर ताशेरा झाडणारे असून देखील त्यांनीं 'दीनबंधू'स ऐकवलेले सवाल मनन करण्याजोगे आहेत असें विष्णुशास्त्री म्हणतात. त्यांच्याच भाषेंत सांगावयाचें झाल्यास 'हे गृहस्थ ब्राह्मणांचे पक्षपाती कितपत आहेत हें सर्वांस माहीत आहेच. असें असतांही त्यांनीं केवळ समान दृष्टीनें सदरील विषयावर जे विचार प्रगट केले, ते विशेषतः सत्यशोधक मंडळीनें ऐकण्यासारखे होते (निबंधमाला पृ ४६८)

## (८) इंदुप्रकाश

इंदुप्रकाश पत्राच्या फायली फक्त पांच वर्षांच्या (१८८३, १८८४, १८८५, १८८६, व १८९५) तेवढ्याच शिल्लक आहेत. त्यावरून काय ती शास्त्रीबुवांच्या लेखनाची परीक्षा करावी लागते. ह्यांत शास्त्रीबोवांचे तीन लेख व पुढीलप्रमाणें उल्लेख आहेत ते असे.

कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर व शास्त्रीबोवा ह्यांची खडाजंगी झालेली फार प्रसिद्ध आहे. विषय जातिवाद होता. गुंजीकरांनीं १८८४ मध्यें 'सरस्वतीमंडळ' नांवाचें पुस्तक लिहून महाराष्ट्रांतील ब्राह्मणांविषयीं माहिती दिली त्यांत त्यांचा सारस्वत जातीबद्दल दुरभिमान दिसून येत होता. त्यावर प्रथम इंदुप्रकाशांत (व नेटिव ओपिनियनमध्यें देखील) असें म्हटलें आहे कीं सरस्वतीमंडळांत "सामान्यत्वें मनुष्य स्वभावास,

अनुसरून जो एक प्रकार आम्हांस वाटत होता तो बराच दृष्टीस पडतो. स्वजातीवरचे अपवाद दूर करणें आणि अन्य जातीवरचे अपवाद युक्तीनें प्रगट करणें हें त्यांत स्पष्टपणें दिसून येतें. अशा लेखांनीं उगीच एकमेकां-विषयीं मत्सर मात्र व्हावयाचा." त्यानंतर श्री. हरी लक्ष्मण देशमुख नांवाच्या गृहस्थांचें सुद्धां असेंच पत्र आलें असून त्या पुस्तकांत अर्थ नाहीं असें त्यांनीं म्हटलें आहे. ( ह्या शिवाय 'सरस्वती मंडळास उत्तर' म्हणून एक दीड आणा किंमतीचें चोपडें पण त्या वेळीं प्रसिद्ध झालें होतें. )

( ३-११-१८८४ )

त्यानंतर 'जशास तसें' हें शास्त्रीबोवांचें गुंजीकरांना दिलेलें उत्तर प्रसिद्ध झालें. त्यांत चित्पावनांची कड घेऊन सारस्वतांवरच्या विधानांस त्यांनीं खोडून काढिले होते. ह्या दोन पुस्तकांचा उल्लेख इंदुप्रकाशांत असा आला आहे कीं 'सरस्वतीमण्डळ, जशास तसें, ह्या पुस्तकांवरून असें दिसतें कीं यांच्या योगानें रिकामा वाद मात्र उत्पन्न होतो, वैमनस्यें वाढतात आणि परस्परांच्या उणेपणानें पांढरें कागद म्हणून अशा प्रकारच्या ग्रंथरचनेच्या भरीस आमच्या समंजस मंडळीनें पडूं नये हें उत्तम.'

( ३–११–१८८४ )

त्यानंतर एक वर्षानें लॉर्ड रिपन यांनीं आपल्या भाषणांत, 'सरस्वती-मंडळ', 'जशास तसें', 'भ्रमनिरास' व दीनबंधूतलें जोतिबा फुल्यांचे लेख ह्या सर्वांचा उल्लेख करून हिंदुलोकांमध्यें व त्यांतल्या त्यांत सुशिक्षितांमध्यें पण कशा फळया पडल्या आहेत याचें वर्णन केलें.

त्यानंतर शास्त्रीबुवांनीं फिरून कधीं ह्या वादांत मन घातलें नाहीं. गुंजीकरांना निरुत्तर करण्याचा एवढाच त्यांचा हेतु होता. कारण प्रारंभापासून अखेरपर्यंत त्यांनीं जातिभेदावर कोरडेच ओढलें आहेत. येथें एक गोष्ट मात्र नमूद करून ठेवावीशी वाटते कीं, 'जुना ओळखी' नांवाच्या इसमानें 'विविधज्ञानविस्तारांत' शास्त्रीबोवांवर जी टीका केली आहे तिच्यांतलें मुद्दे विद्वत्तेला साजेसे नसून त्यांत 'सरस्वती मंडळाचेच' पड-

साद स्पष्ट उमटले आहेत. शास्त्रीबोवांचीं उत्तरें मात्र केवळ विषयप्रतिपादनाला धरून आहेत. जातीय उल्लेखाकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें आहे.

शास्त्रीबोवांचे इंदुप्रकाशांतले लेखः—

उमेदवारांची साडेसाती ( उपोद्घात ) १८-२-१८९५

शिवाजीचे स्मारक, २१-७-१८९५

खाफीखान आणि शिवाजी १२-८-१८९५

इंदुप्रकाशाच्या जुन्या फायली अधिक मिळत्या तर शास्त्रीबोवांच्या प्रासंगिक लिखाणांत महत्वाची भर पडलेली दिसती. निदान त्यांच्या विषयींच्या साधक बाधक टीकांचें तरी स्वरूप अधिक स्पष्ट झालें असतें यांत शंका नाहीं.

## ( ८ ) सुबोधपत्रिका

सुबोध पत्रिकेचे १९०१ पर्यंतचे अंक नष्ट झाल्यामुळें १९०१ पासून १९०८ पर्यंतचे शास्त्रीबोवांचें संशोधनात्मक मराठी लेख ज्याप्रमाणें बहुतेक विस्तारांत आले आहेत त्याप्रमाणें सर्वसाधारण सामाजिक प्रश्न 'पत्रिकेंत' हाताळलेले आहेत. जातिभेद, सामाजिक खुळचट चाली; इत्यादींवर झणझणीत शब्दांत लिहिलें आहे.

( १ ) विधवा विवाह केल्यानें भ्रष्ट होत नाहीं. भक्ष्य मांसाहार केल्यानें ब्राह्मण नष्ट होत नाहीं. कोणत्याही वर्णातल्याशीं दळणवळण केल्यानें भक्ति करणारा भ्रष्ट होत नाहीं. ( २२–९–१९०१ )

( २ ) भिक्षुकांचें वेदोक्त व पुराणोक्त ( १०–११–१९०१ )

( ३ ) अमेरिकेतलें राजाध्यक्ष व शिद्दी ( १०–११–१९०१ )

( ४ ) कोणत्या कर्मकांडाशीं ब्राह्मणांचा उभा दावा ( १७–११–१९०१ )

( ५ ) क्षत्रियांची मूळची पायरी ( २४–११–१९०१ ), ( २२–१२–१९०१ )

( ६ ) राजसत्ता आणि धर्म ( १–१२–१९०१ )

( ७ ) रँगलर परांजपे ( १५–१२–१९०१ ) यावरून तुका-

माच्या ब्राह्मणाचें शास्त्रीबोवांस उत्तेजनपर पत्र व 'पत्रिकेच्या' संपादकाचें त्यांच्या विरुद्ध लिहिणाऱ्या इंदुप्रकाशास उत्तर, ( १९–११–१९०१ व २२–१२–१९०१; १९–१–१९०२ )

( ८ ) राष्ट्रीय सामाजिक परिषद ( १२–१–१९०१ )

( ९ ) स्त्री व पुरुष ( १९–१–१९०१ )

( १० ) उमरावतीचे मुधोळकर आणि निकृष्ट जाति ( १६–१–१९०२ )

( ११ ) एक विधवागृह हवें आहे. २३–४–१९०२

( १२ ) जास्त खुलासा करण्याची मेहरबानी कोणी करील काय ? ( ६–४–१९०२ )

( १३ ) हा मान कीं अपमान ( यांत कै. रानड्यांची तोंडी स्तुति पण रँगलर परांजप्यासारख्यांना किंवा कर्व्यांना पंक्तीलाभही देण्याचें मनोधैर्य नसलेल्या बोलघेवड्या सुधारकांची कानउघाडणी केली आहे ) ( २–३–१९०२ )

( १४ ) न्यायमूर्ती क्यांडी व देशी भाषा ( १६–३–१९०२ )

( १५ ) सहा शत्रु व मित्र ( १३–४–१९०२ )

( १६ ) यज्ञ हवा कीं नको ( २०–४–१९०२ )

( १७ ) साताऱ्यांतील ब्राह्मण म्हणविणारीं माणसें ( ४–५–१९०२ )

( १८ ) प्रार्थनासमाज आणि जातिभेद ( ११–५–१९०२ )

( १९ ) एक आनंदाची गोष्ट ( ८–६–१९०२ )

( २० ) प्रो. जिनसीवाले व प्रार्थनासमाज ( २२–६–१९०२ )

( २१ ) न्यायमूर्ती चंदावरकर ( २२–६–१९०२ )

( २२ ) इतिहासाचीं साधनें कोठें राहिलेलीं बरीं ? विलायतेंत कीं आमच्या देशांत ? ( हें त्याच मथळ्याच्या केसरीतील लेखास उत्तर आहे. )

( २३ ) वामनराव केळकरांचें प्रायश्चित्त ( २४-८-१९०२ ) या लेखावर 'पत्रिके'च्या ३१-८-१९०२ च्या लेखांत दोन टीका आल्या आहेत. त्यांचा आशय असा:- ' शास्त्रीबोवांनीं आपल्या लेखांत ' चित्त-पावन,' 'भट,' 'भिक्षुक' वगैरे व्यक्तीला किंवा व्यक्तिसमुदायाला लागतील असें शब्द न वापरतां आपल्या विद्वत्तेला शोभेल अशा भारदस्त भाषेच्या-द्वारें व शास्त्रांतील निरनिराळ्या साधुसंतांच्या वचनांच्या आधारें जर ते आपल्या आवडत्या विषयांचा ऊहापोह करतील, तर त्यांच्या विशाल ज्ञानापासून लोकांस बराच फायदा होईल. '

( २४ ) ब्राह्मणी धर्म ऊर्फ चित्पावनी पद्धत ( १३-७-१९०२)

( २५ ) आर्यसमाज आणि जातिभेद ( १८-५-१९०२ )

( २६ ) व्यभिचारी व अव्यभिचारी भक्ति ( आर्यमहिला समा-जातर्फे झालेलें पहिलें पुराण, ४-९-१९०४ )

( २७ ) अस्सल श्रुती, स्मृती व व्रतें ( २ रें पुराण,
२५-९-१९०४, २-१०-१९०४ )

या पुराणांत स्त्रियांनीं जातिभेदांतीत दृष्टि ठेवावी. खुळीं व्रतें सोडावीं. कोणाला तुच्छ लेखूं नये म्हणून सांगितलें आहे. उदाहरणार्थ, कायस्थांबद्दल ' काकात् क्रौर्यं यमात् लौल्यम् ' असल्या श्लोकांच्या आधारानें कायस्थ, म्हणजे ( का ) कावळ्याप्रमाणें लोभी, ( य ) यमाप्रमाणें क्रूर, ( स्थ ) हाडें फोडणारा असा कांहीं मंदमति ब्राह्मण अर्थ करतात त्याप्रमाणें अर्थ घ्यायचा नाहीं, तर कायस्थ म्हणजे राजाच्या नजिक असणारा.

### राजारामशास्त्री भागवतांविषयीं ' सुबोधपत्रिका '—

( १ ) भागवतांच्या गीतेवरील प्रभुत्वाची प्रशंसा. त्यांनीं सांगित-ल्याप्रमाणें आद्यगीता ६०-ते ८५ श्लोकी होती. भागवतांना तीं मराठींत प्रसिद्ध करण्या बद्दल विनंति. कारण शास्त्रीबोवांचा उद्योग किती किती दांडगा आहे याची कल्पना त्यांच्या अनेक ग्रंथांवरून व लेखावरून होण्यासारखी आहे. ( १७-७-१९०४ )

( २ ) विधवाविवाहाबद्दल झालेलें व्याख्यान भांडारकरांच्या अध्यक्षतें खालीं पुण्यांत झालें व ज्ञानप्रकाशांत समग्र छापून आले त्याचा उल्लेख करून 'पत्रिका' म्हणते 'राजारामशास्त्र्यांस आडपडदा माहीत नाहीं. आपल्या मतांस अनुसरून भाषण करावयाचें. मग तें लोकांस रुचो वा न रुचो.'

( ३ ) दीनबंधूमध्यें 'रा. रा. भां'चें प्रार्थनासमाजाचे एक सभासद श्री. सय्यद यांस अनावृत्त पत्र. सय्यद प्रथमपत्नी वारल्यानंतर १५ दिवसांनी दुसरें लग्न जुळवीत आहेत असें कळल्यानंतर लिहिलेलें. व श्री. सय्यदांच्या शीघ्र विवाहेच्छु वृत्तीवर ताशेरे झाडणारें. त्याचा कडक निषेध श्री. द्वा. गो. वैद्य, वा. स. सोहनी इत्यादींच्या सह्यांनींशी 'एक विलक्षण थट्टा' या नांवानें. ( ३–६–१९०६ )

या पत्रानंतर शास्त्रीबुवा व 'पत्रिका' यांच्यांत तेढ पडलेली दिसते. कारण शेंवटच्या दोन वर्षांत शास्त्रीबोवांचे लेख 'पत्रिकें'त न येतां 'दीनबंधू'त येऊं लागले ते शेंवटपर्यंत. पण अखेर शास्त्रीबोवांचें भाकीत खरें झालें व सय्यदांच्या द्वितीय विवाहाच्या बातमीचा इनकार करणारांची बाजू अर्थातच कमजोर ठरली.

( ४ ) जानेवारी १९०८ मध्यें शास्त्रीबोवांबद्दल 'पत्रिकेंत' मृत्युलेख आला होता. तो फार आदरपूर्वक व दुःखभरानें लिहिला होता. जणूं कांहीं शेंवटचा प्रकार त्यांच्या दीर्घ प्रेम-स्मृतींत पार लोपून गेला.

( ५ ) या नंतरच्या शास्त्रीबोवांच्या मतांचें सार 'पत्रिकें'त आलें आहे. तें फार मोलाचें आहे. त्या लेखाचें नांव, 'प्रो. राजारामशास्त्री भागवत यांच्या विचारांची आठवण' ( २–२–१९०८ ). मृत्यूमुळें सर्व भेद मिटल्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे.

## ( १० ) नेटिव ओपिनियन

नेटिव ओपिनियन मध्यें शास्त्रीबोवांवर साधक बाधक टीका बरीच आली आहे. नेटिव ओपिनियनचे तुटक फुटक अंक जे एकंदरींत

मिळाले, त्यांत शास्त्रीबोवांबद्दल उल्लेख पुढील प्रमाणें आहेत. हें पत्र चिपळुणकरी बाण्याचें होतें. टिळकांस पाठिंबा देणारें होतें.

( १ ) ‘ जशास तसें ’ किंवा ‘सरस्वती मंडळावर खरमरित टीका’ या शास्त्रीबोवांच्या पुस्तकाची जाहिरात. पुस्तकें नेटिव ओपिनियनच्या ऑफिसमध्यें ठेविलीं होतीं. ( २५–१–१८८५ )

( २ ) शास्त्रीबोवांच्या बॉम्बे हायस्कूल बद्दलची माहिती. ‘दादीशेट अग्यारी लेनमध्यें पहिले चार वर्ग सुरू केलें आहेत. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचा कित्ता डोळ्यांसमोर ठेऊन नेकीचे शिक्षक निवडले आहेत’, इत्यादि ( १-३-१८८५ )

( ३ ) मराठी ग्रंथकारांस सूचना—गुंजीकर व शास्त्रीबोवांस या लेखांत इषारा. विशेषतः जातिवैमनस्याच्या वादाचा पाया घालणाऱ्या गुंजीकरांवर त्वेषाची टीका ( २४-५-१८८५ ).

( ४ ) मराठ्यांविषयीं चार उद्गार---ह्यांतील पहिल्या भागावर एका टीकाकाराची कडक टीका. या टीकेंत गुण सोडून केवळ दोष टिपणारा लेखक म्हणून ‘केंस सोडून त्यांतील उवा टिपणाऱ्या दुष्ट माकडाची’ उपमा शास्त्रीबोवांस दिली आहे. टीकाकार पेशव्यांचा कैवारी असून शास्त्रीबोवांनीं बाळाजी विश्वनाथाची केलेली संभावना त्यास झोंबलेली आहे. पेशवे मंडळीच्या ‘ गुणावगुणाविषयीं इतिहासदृष्टया विचार करणें ’ ही शास्त्रीबोवांची भूमिका त्याला पटत नाहीं. शास्त्रीबोवांनीं केलेली माधवराव पेशव्यांची स्तुति मात्र त्या टीकाकाराला दिसली नाहीं.

त्याचप्रमाणें धनाजी पितृभक्त राजारामाची पत्नी ताराबाई हिला सोडून शाहूला मिळाला म्हणून शास्त्रीबोवांनीं त्याला स्वामिद्रोही म्हटलें आहे. त्यावर पण टीकाकार घसरला आहे (३-७-१८८७; ४-९-१८८७).

ही टीका झणझणीत आहे. तिच्यांत शास्त्रीबोवांना ‘ सूर्यावर थुंकणारा’ म्हटलें आहे. जरी या टीकेंत टीकाकाराची चित्पावनांबद्दलची अभिमानाची भावना ठळक दिसून येत असली तरी तिच्यांत कांहीं ठिकाणीं मार्मिकपणाहि आहे. शास्त्रीबोवांना चित्पावनांचे वैरी ठरविलें आहे, तो

शेरा मात्र अस्थानीं आहे. कारण शास्त्रीबोवांचें हें पुस्तक जातिभेद नष्ट व्हावा म्हणून कळवळ्यानें लिहिलें आहे. त्यांत ' जशास तसें ' ही वृत्ति औषधाला सुद्धां सांपडत नाहीं.

( ५ ) शास्त्रीबोवांचें ' संस्कृत भाषा नको ' हा छोटा निबंध प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर फार मोठें वादळ झालें. मराठी भाषा विद्यापीठांत असावी ह्या कै. वामन अबाजी मोडक व न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं चालविलेल्या चळवळींत शास्त्रीबोवांनीं प्रतिपक्षाला डिवचून जेवढें जागृत केले, तितकें कुणी केलें नसेल.

नेटिव ओपिनियनमध्यें ' संस्कृतभाषेचा कैवारी ' व शास्त्रीबोवा यांचा मोठा पत्रव्यवहार आलेला आहे. त्यांत कैवारी प्रारंभीं म्हणतात, " त्यांनीं ( भागवतांनीं ) हल्लीं आपल्या लेखणीला आणि तद्वारा वाचकांना बरेंच शिणविलें आहे. प्रथम त्यांनीं मराठ्यांविषयीं चार उद्गार म्हणून एक बरेंच लांबलचक चऱ्हाट वळलें आहे. त्यांत इतके असंबद्ध प्रलाप आहेत कीं जर एखाद्या मनुष्यास लहान अपराधाबद्दल शिक्षा देणें असेल तर त्यास तें पुस्तक तीन चार वेळां वाचण्यास सांगावें. त्यांतील लेखांनी सर्व पुरातन पंडितांचे विद्वत्तेस सुद्धां या जाड्या विद्वानानें हरताळ लाविला ! धन्य त्याची–संस्कृत भाषा मराठी भाषेपासून निघाली, कालिदास कवी वाईट, बाणकवीचे कवितेंत चावटपणा फार, अशा कल्पनेच्या भराऱ्या मारून त्यांनीं तर्कशास्त्राची फटफजिती करून टाकिली. यामुळें प्रतिष्ठित वर्तमानपत्रकारांनीं त्यांच्या पुस्तकाबद्दल चकार शब्द काढिला नाहीं, यामुळें आपला लेख लोकांना आवडला असें जाणून भागवतांनीं आपल्या पोतडींतून आणखी एक चोपडें बाहेर काढिलें. हें त्यांस इतकें चांगलें वाटत आहे कीं, त्यांच्या शेंकडों प्रति छापून मोठमोठ्या लोकांकडे पाठविल्या आहेत. असे लेख वाचणें व त्यावर टीका करणें यासारखा कालाचा अपव्यय दुसरा नाहीं, असें पुस्तकाचें हेडिंग पाहण्याबरोबर होईल; मग समग्र वाचल्यास तर मनाची स्थिति काय होईल हें इथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तथापि लोकांच्या

मौनानें भागवत यांचा भलताच ग्रह होऊन ते आणखी आपला एखादा स्कंध काढूं लागतील म्हणून चार शब्द लिहिले आहेत. बाकी जोतिबा फुले, दीनबंधु, भागवत यांचें समाधान करणाऱ्यानें 'प्रयत्नें वाळूचें' ही भर्तृहरीची उक्ति ध्यानांत ठेवावी हें बरें."

यापुढें शास्त्रीबोवांच्या लेखाला 'क्षुद्र' लेख म्हणून कैवाऱ्यांनीं 'संस्कृत नको व मराठी हवें' या शास्त्रीबोवांच्या विधानास 'गाईबरोबर वत्साचाही नाश करण्याचा भागवतांचा बेत दिसतो,' असा टोमणा मारला आहे. त्याला उद्देशून शास्त्रीबोवा म्हणतात 'संस्कृत नको पण मराठी पाहिजे' असें म्हटल्यानें गाईबरोबर वत्साचा नाश करण्याचा आरोप मजवर कसा येतो! गाय म्हातारी झाली, मरावयास टेकली आहे. सृष्टि-क्रमानें ती मेलीच पाहिजे. तिच्यावर 'कैवाऱ्यां'नीं खुशाल थडगें किंवा तुळशीवृंदावन बांधावें. वत्साचें संगोपन करावें हाच असल्या प्रसंगीं सर्वांचा धर्म होय. रडून छाती पिटण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पण असली अलंकारीक भाषा येथें कशास हवी? मराठी कांहीं वासरूं नव्हे, तर चांगली तरणी ताठी गाय आहे असें मी समजतो. मराठीचें स्वरूप शुद्ध रहाणें म्हणजे काय याचा 'कैवाऱ्यां'नीं कृपा करून अधिक खुलासा करावा. मला वाटतें कीं भूमंडळावरील कोणत्याही लोकांचें स्वरूप शुद्ध नाहीं, तसें कोणत्याही भाषेचें स्वरूप शुद्ध नाहीं.

यास उत्तर म्हणून कैवाऱ्यांनीं फिरून दोन लेख लिहिले. त्यांत मराठीला विद्यापीठांत स्थान हवें तर द्यावें पण संस्कृतास ढकलून देऊं नये असे विचार प्रगट करून शेवटी म्हटलें आहे, 'भागवत म्हणतात संस्कृ-ताच्या कैवाऱ्यांनीं कांहीं केले नाहीं. संस्कृताचे कैवारी काय करतात आणि भागवत तरी काय करतात. करणारे वेगळेच आहेत. तेथें राजा बोले आणि दळ हाले ...... याप्रमाणें चाललें आहे. त्यांस जागें करण्यास भागवतांसारखे उद्योगी पाहिजेत, हें खरें आहे, पण तो उद्योग त्यांनीं मार्गानें करावा, आडमार्गानें करूं नये अशी विनंती करून भागवतांची

रजा घेतों व पुनः असें तुषकंडन करण्यास कैवारी तयार नाहीं असेंही कळवितों.

यावर 'कैवारी व भागवत' म्हणून शास्त्रीबोवांनीं अखेरचा लेख तयार केला त्यांत ते म्हणतात आज संस्कृताप्रमाणें आमच्या देशी भाषेस विद्यापीठांत स्थळ मिळाल्यास यांच्यासारख्या कैवाऱ्यांस तरी अनिष्ट नाहीं, हें उघडपणें जाहीर व्हावें, म्हणूनच "संस्कृत व देशी भाषा" हें पुस्तक छापविलें व इतर कैवाऱ्यांप्रमाणें या कवाऱ्यांकडेही पाठविण्यांत आलें. पुस्तक छापवून वाटण्याचें हें एक मुख्य प्रयोजन कैवाऱ्यांनीं कृपा करून लक्ष्यांत ठेवावें....संस्कृत ग्रंथकारांच्या उखाळ्या पाखाळ्या काढिल्याशिवाय कैवाऱ्यासारखे जे संस्कृताचे फाजिल अभिमानी आहेत, त्यांचे डोळे उघडले नसते. जर संस्कृताच्या फाजिल अभिमान्यांनीं देशी भाषांस निरुपयोगी व नादान ठरवून त्यांच्या आंगीं नसता कमीपणा आणण्यास व त्यांच्या तर्फेचा मजकूर केवळ दुराग्रहानें दाबून टाकण्यास यत्न केला नसता तर संस्कृताच्या उखाळ्या पाखाळ्या निघत्या ना. ......

ब्राह्मण हे ऐतिहासिक प्राणि अजून जिवंत आहेत. त्यांनीं जें कांहीं चांगलें किंवा वाईट इतिहासांत केलें असेल त्याचा ऊहापोह करणें जसें प्रत्येक हिंदूचें तसें प्रत्येक महाराष्ट्राचें कर्तव्य होय. ज्या गोष्टी त्यांनीं केल्या त्यांबद्दल त्यांस दोष दिल्यास अस्सल ब्राह्मणास वाईट वाटण्याचें प्रयोजन नाहीं. माझा लेख दरोबस्त ब्राह्मणांच्या संबंधानें नव्हता व कधींहि नसतो. ज्या एकनाथ स्वामींस देशी भाषेत ग्रंथ केल्यामुळें वाळींत रहावें लागले, ते जातीचे ब्राह्मणच होते, ते कांहीं ब्राह्मणेतर नव्हते. ब्राह्मण जातीचा जो मला विशेष अभिमान आहे, तो एकनाथ स्वामींसारखे केवळ परार्थ पुरुष तींत अनेक जन्मून गेले म्हणून आहे. एकनाथ स्वामींचा छळ केला, हें काम ब्राह्मणांनीं आपल्या वंद्य जातीवर धुतां धुतां न जाणारा कलंक लावणारें केलें, असें मी समजतों. तेव्हां मी कांहीं दरोबस्त ब्राह्मण जातीच्या उखाळ्या पाखाळ्या काढल्या नाहींत."

यानंतर शास्त्रीबोवा म्हणतात कीं आज आमचा पक्ष फारसा वजनदार नाहीं तरी आमच्या पक्षांतील मंडळी दरवर्षी वाढत जात आहे." शास्त्रीबोवांचें भाकित खरें ठरून मराठी १९०० सालीं मुंबई विद्यापीठांत एम्. ए. करितां प्रविष्ट झाली. त्याचप्रमाणें प्राकृत ( वरील टीकाकारानें ज्यांना चुकीनें मराठी म्हटलें आहे.) ह्या लौकिक संस्कृता पूर्वीच्या लोकभाषा आहेत या शास्त्रीबोवांच्या भाषाशास्त्रीय सिद्धांताबद्दल देखील आतां वाद राहिला नाहीं. (१०-१-१८८९; १३-१-१८८९; १७-२-१८८९; २१-२-१८८९; ३-३-१८८९ ).

( ६ ) हेमंतोत्सव व्याख्यानमाला. 'वेद व वैदिक धर्म' या शास्त्रीबोवांच्या व्याख्यानाचा सारांश दिला आहे. ह्यांत प्रस्तुत निबंध 'जुन्या माहितीनें व नवीन कल्पनांनीं पूर्ण भरला' आहे असें सांगून, 'एकंदरींत व्याख्यान सुरस व ज्ञानप्रचुर होतें' असा समारोप केला आहे. ( ३-६-१८८९ )

( ७ ) शिवछत्रपतीचें चरित्र:-- हा अभिप्राय एका उत्कृष्ट अभिप्रायाचा मासला म्हणून पुढें दिला आहे. तो असा—हें "लहानसें द्वादशपत्री सांच्याचें त्र्यायशीं पानांचें पुस्तक वे. शा. सं. रा. रा. राजारामशास्त्री भागवत यांनीं लिहिलें आहे. यांनीं काढलेलें 'मराठ्यांविषयीं चार उद्गार' ज्यांनीं वाचलें असतील त्यांना हें पुस्तक कसें उतरलें आहे हें सांगावयाला नको. शास्त्रीबुवांचा महाराष्ट्राविषयींचा अभिमान योग्य असून नांवाजण्यासारखा आहे. या लहानशा पुस्तकांत त्यांनीं शिवाजी विषयीं व इतर तत्कालीन महाराष्ट्रीयांविषयीं वाचकांची यथार्थबुद्धि करून देण्याचा बराच प्रयत्न केला आहे. वस्तुतः पहातां शास्त्रीबुवांनीं हा जो ग्रंथ केला आहे, त्यांत त्यांचा हेतु शिवाजीचें समग्र चरित्र लोकांस सादर करण्याचा नसून आजपर्यंत जे लेख या महापुरुषाविषयीं प्रसिद्ध झाले आहेत, यांच्यावर टीका करून लोकांचे कित्येक अज्ञानमूलक भ्रम दवडण्याचा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि हा त्यांचा हेतु बराच सिद्ध झाला आहे; हें चरित्र वाचलें असतां आम्हां महाराष्ट्रीयांचें नांव ज्यानें इतिहासांत अमर करून

ठेविलें त्या प्रौढप्रताप शिवछत्रपतीच्या ठायींची न्यायबुद्धि, पापभीरुता निःसीम स्वदेशाभिमान, मातृपितृभक्ति, गुणज्ञता, शौर्य, धैर्य, दीर्घदृष्टि, दया, दाक्षिण्य, सौजन्य, राजकार्यकुशलता, महामनस्कता इत्यादि गुण कसे वसत असत हें समजून त्याच्याविषयीं आपल्या ठायीची पूज्यबुद्धि वाढते. त्याचप्रमाणें चरित्रकारांनीं आमच्या शिवाजीची शिकंदर, सीझर, नेपोलियन, औरंगझेब व लॉर्ड क्लैव यांशीं तुलना करून तो त्यांच्याहून किती श्रेष्ठ होता हें स्पष्ट दाखविलें आहे.

अफझुलखानादिकाशीं शिवाजीनें कपटानें आचरण केलें म्हणून त्यास किती एक इतिहासकार जो दोष लावितात तो बिलकूल सत्य नव्हें, असें शास्त्रीबोवांनीं या पुस्तकांत सांगितलें आहे. त्याचप्रमाणें त्यास कित्येक इंग्रज इतिहासकार चोर लुटारू म्हणतात, त्याच्या निरसनार्थ दोन शब्द लिहिल्यास बरें झालें असतें. तसेंच दादोजी कोंडदेव व श्रीसमर्थ रामदास ह्यांचाही ह्या चरित्रामध्यें उल्लेख होणें इष्ट होतें.

शास्त्रीबुवांचा यासारख्या आणखी दुसऱ्या ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचा उद्देश आहे, असें त्यांच्या मळपृष्ठावरील उल्लेखावरून कळतें. हा त्यांचा उद्योग स्तुत्य आहे. आमच्या पूर्वीं होऊन गेलेल्या महाराष्ट्र वीरांनीं काय काय पराक्रम केले, व त्यांच्या अंगीं कोण कोणते गुण होते हें आम्हांस समजल्यानें आमच्या ठायीं त्यांच्याविषयीं आदरबुद्धि वृद्धिंगत होऊन आम्हीं जे त्यांचे वंशज म्हणवितों त्या आमच्या ठायीं त्यांस शोभेल असें काय आहे हें नीट समजेल. शास्त्रीबोवांच्या ह्या छोटेखानी पुस्तकांतच गोपीनाथपंत, मुरारबाजी, प्रतापराव, सूर्याजी, बाजी प्रभु, हंसाजी मोहिते, इत्यादिकांच्या आंगचा स्वदेशाभिमान, निःसीम स्वामिभक्ति, अचाट शौर्य, व अद्वितीय आत्मनिरपेक्षता या गुणांचें वर्णन वाचून त्यांच्याविषयीं मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते, आणि वाटतें कीं धन्य ते महात्मे.

सारांश हें चरित्र सर्व महाराष्ट्रीयांनीं वाचून मनन करण्यासारखें आहे. आतां खुद्द चरित्रकारांसच ज्या कांहीं सूचना करावयाच्या आहेत त्या पैकीं पहिली ही कीं, अशीं त्रोटक चरित्रें सोडून जर ते शिवाजीचें

एक समग्र चरित्र लिहितील, तर महाराष्ट्रजनांवर त्यांचे बहुत उपकार होतील. दुसरी सूचना करावयाची ती ही कीं, त्यांनीं भाषेच्या लौकिक स्वरूपाकडे विशेष लक्ष देऊन ग्रंथरचना करावी. म्हणजे त्यांच्या भाषेचें सध्यांचें रुक्षत्व जाऊन तींत मनोरमत्व विशेष येईल." ( १८ ४-१८८९ )

(८) 'मराठी विरुद्ध संस्कृत' हा इंग्रजींत लिहिलेला लेख मराठा हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट श्री. म. स. बापट यांचा आहे. तो उघडच शास्त्रीबोवांच्या मतांचें मंडन करण्याकरितां लिहिलेला आहे

( ३०-६-१८८९ )

(९) शिवछत्रपतींचें चरित्रः- या पुस्तकावर केसरीशी सहमत असणाऱ्या 'एका मित्रा'ची टीका आली आहे. या टीकेचा मुख्य रोख (१) भागवतांच्या साधारण समजुतीच्या विरुद्ध असलेल्या मतांविरुद्ध आहे. (२) भाषा तुटक व बोजड असल्याची तक्रार (पण ती रास्त आहे) आहे. (३) संस्कृताचा द्वेष व अस्सल महाराष्ट्रीबद्दलच्या फाजील अभिमानाबद्दल टोमणा आहे. (४) सर्वांत मुख्य म्हणजे रसद, हेजीब, राजकारण, व अविंध वगैरे शुद्ध फारशी किंवा लुप्तप्राय जुने मराठी शब्द योजल्या बद्दल शास्त्रीबोवांना दोषी ठरविलें आहे.

आजकालचा वाचक मात्र 'राजकारण' ह्या शब्दासारखा सुंदर व आमच्या जीवनांत आतां खोल शिरलेल्या शब्दाला शास्त्रीबोवांनीं जुन्या मराठींतून वर काढून रोजच्या भाषेंत रुळविल्याबद्दल धन्यवादच देईल. 'हेजीब' हा शब्द हरीभाऊ आपट्यांनीं आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत अमर केला आहे. 'रसद' व 'अविंध' हे शब्दहि आतां मराठींत चांगलेच रुळले आहेत. (२९-८-१८८९, १-९, १८८९; ५-९-१८८९, ८-९-१८८९ ).

(१०) वर उल्लेखिलेल्या टीकाकारानें 'भागवतांनीं हें पुस्तक मराठा हायस्कूलांतील खालच्या इयत्तांतून इतिहासा ऐवजीं लाविलें आहे' या बातमीबद्दल खेद व्यक्त केला आहे. त्यावर शास्त्रीबोवा लिहितात. हें पुस्तक सर्व इयत्तांतून लावलें आहे. रत्नाकरपंत आपा हेंही लावा-

वयाचें आहे. व एकनाथाचें चरित्र प्रसिद्ध झाल्यावर तेंही लावण्यांत येईल. जर ह्या गृहस्थांना व त्यांच्या मित्रांना आपल्या मुलांस शाळेंतून काढावयाचें असेल तर त्यांनीं जरूर काढावें ( या उत्तरांत मित्राच्या 'हे मुलांचीं मनें दूषित करतात ' या विधानाला उत्तर देतांना शास्त्रीबोवा म्हणतात कीं ' मी मुलांची मनें दूषित करीत नाहीं तर भूषित करतो. ' )

( १२–९–१८८९ )

( ११ ) ' मित्रा'चे भागवतांच्या वरील पत्रास उत्तर. शाळा व पुस्तक सार्वजनिक असल्यानें दोष दाखविणें कोणाचेंही कर्तव्य आहे, हा त्याचा मुद्दा.

( १२ ) ' संस्कृत ब्रह्मकर्म ' हा नुकताच प्रसिद्ध झालेला शास्त्रीबोवांचा निबंध हा देशी भाषा कां हवी ह्यावर असून वर दिलेल्या त्यांच्या मतांस पुरवणी म्हणूनच आहे. त्यावर कडक टीका. देशी भाषा झाल्या कीं प्रांताप्रांतांत एकमेकांचे विचार कळण्यास कठीण जाईल म्हणून संस्कृत भाषा सार्वत्रिक म्हणून हवी असें टीकाकारानें म्हटलें आहे.

( १०–१०–१८८९ )

त्याला उत्तर म्हणून ' संस्कृत भाषा हल्लींच्या काळीं गतार्थ व निरुपयोगी आहे ' ह्या लेखांत शास्त्रीबोवा म्हणतात. वेगवेगळ्या प्रांतांत किंवा विद्वानाविद्वानांत कोणती भाषा सार्वत्रिक म्हणून उपयोगांत आणायची हा मुद्दा सध्यां गौण आहे. मुख्य गोष्ट म्हणजे त्या त्या प्रांतांतल्या विद्वान व अशिक्षित लोकांत परस्पर दळणवळण वाढलें पाहिजे. हें सत्कार्य संस्कृत शिकल्यानें होणार नाहीं. तर देशी भाषांवरच सर्वांशीं ह्या सत्कार्याचा भार टाकला पाहिजे.

( १३ ) विविधज्ञानविस्तारांतल्या ( पुस्तक २१, पृ. २२८ ) रा. रा. भा. यांच्या उत्तरावर प्रत्युत्तर ( १५–१२–१८८९; १९–१२–१८८९; २२–१२–१८८९, २६–१२–१८८९ ) हीं सर्व प्रत्युत्तरें वर उल्लेखिलेल्या टीकाकारांची व ' शिवछत्रपतीच्या चरित्रा 'संबंधींच आहेत.

( १४ ) हेमंतव्याख्यानमालेंतलें शास्त्रीबोवांचें ब्राह्मण म्हणविणारांस सवाल ( ब्रायकांची मुंज ) व्याख्यान झाल्यावर त्यावर इतके वादळ झाले कीं त्यावर्षीं हेमंतव्याख्यानमालेनें वादविवाद बंद केला. त्यामुळें काशी-नाथशास्त्री लेले यांनीं 'सवालांस जबाब' 'भारतीय व्याख्यानमाला' नवीन सुरू करून तिथें दिलें. तें समग्र छापलें आहे. ( २९–१–१८९९ )

( १५ ) 'आमचा इतिहास, इतिहास लेखक व आम्ही' या संपा-दकीय लेखांत, वि. का. राजवाडे, वासुदेव वामन खरे, पारसनीस हे स्वतंत्र व पहिल्या प्रतीचे इतिहासकार, भागवतशास्त्री, भानु, रानडे, भवानराव पावगी, इत्यादि दुय्यम प्रतीचे इतिहासकार असून हे सर्व 'चलाख मेह-नती आणि कळकळीचे लोक' आहेत असें म्हणून त्यांचे अभिनंदन केलें आहे. शेवटीं 'हे आपले कर्तव्य चोख बजावीत आहेत, पण हजारों वाचक व आश्रयदाते व निदान 'दहावीस तरी साधक बाधक उत्तम टीकाकार मिळावयास हवेत,' ते मिळत नाहींत ही जनतेची इतिहासवाचनाबद्दलची उदासीनता अक्षम्य आहे असें म्हटलें आहे. ( २९·१-१८९९ )

( १६ ) प्रो. राजाराम रामकृष्ण भागवत कळवितात कीं, सातारा मुक्कामीं आश्वलायन सूत्राच्या अनुरोधानें झालेल्या विवाहाच्या प्रयोगाची ज्यांस माहिती हवी असेल त्यांनीं २६ जूनचा 'धुरीण' ( बेळगांव, खानापूरचा ) पहावा. पुढचेही धुरीण पहावे. ( २-७-१८९९ )

( १७ ) रानड्यांचें भाषण (डिसेंबर १८९९ ) प्रथम शेणव्याच्या ठाकुरद्वारीं मुंबईत ज्ञानेश्वरीवर झालें. तें मराठा हायस्कूलच्या चालकांच्या मार्फत करविण्यांत आलें. ( रानड्यांचा मृत्युलेख, २०-१-१९०१ )

## ( ११ ) दीनबंधु

हे जोतिबा फुल्यांनीं सुरू केलेलें सत्यशोधक समाजाचें मुखपत्र. फुल्यांच्या मृत्युनंतर तें कै. लोखंडे यांनीं मुंबईस चाविलेलें. नंतर तें कोल्हापुरास जाऊन अजिबात बंद पडलें. या साप्ताहिकांत शास्त्रीबुवांचे पुष्कळ लेख आले आहेत. त्यांतल्या त्यांत 'ऐतिहासिक गंजिफा' म्हणून

त्यांची लेखमाला येत असे, ती फार प्रसिद्ध व मनोरंजक होती. दीनबंधूचे लेख काळाच्या भक्ष्यस्थानीं पडले आहेत. फक्त कांहीं गंजिफा डॉ. नवले यांनीं नव्या दीनबंधूंत पुनर्मुद्रित केल्या. त्यांची यादी खालीं दिल्याप्रमाणें आहे.

( १ ) क्षत्रियांचें अस्तित्व ( गंजिफ नं. १; ६-६-१९०४ ).

( २ ) चित्पावन व कऱ्हाडे ( गंजिफ नं. २; ५-७-१९०५ ).

( ३ ) हिंदु व हिंदुधर्म ( गंजीफ ३; १९०५; २२-६-१९०६ ).

( ४ ) ब्राह्मण म्हणविणाराचा पिंड ( गंजीफ नं. ४. २७-६-१९०५ ).

( ५ ) श्रावणी ( गंजीफ नं. ७; ३-८-१९०५ ).

( ६ ) लग्न व विवाह ( गंजीफ नं. १०; ).

( ७ ) महाभारत [ गंजीफ नं. ११ ].

( ८ ) वैश्यवर्ण ( ११-९-१९०६ ].

शास्त्रीबोवांचें ' दीनबंधूंबरोबर प्रत्यक्ष संबंध फुल्यांच्या मृत्यूनंतर झालेला दिसतो. बाबा पदमजींचा व शास्त्रीबोवांचा जसा स्नेह होता तसा फुल्यांबरोबर कधींच नव्हता. ओळखही बेताचीच असावी. या बाब-तींत ' सुधारका'च्या व त्यांच्या संबंधाचें विलक्षण साम्य आहे. सत्यशोधक समाजानें शास्त्रीबोवांचा कोल्हापूरच्या वेदोक्त चळवळींत ( १९०० ) सालीं पुष्कळ फायदा करून घेतला. त्यावरच शिवरामपंत परांजपे यांनीं हल्ला चढविला आहे. वि. का. राजवाडे यांनीं सुद्धां त्या बाबतींत त्यांना टोमणा मारला आहे. ( ग्रंथमाला १९०८, डिसेंबर, फादर स्तेफेन्स याचे ख्रिस्तपुराण ) डॉ. केतकरांनीं शास्त्रीबोवांच्या वेदोक्त चळवळी-विषयीं राजवाड्यांचीच री आपल्या ' संकीर्ण निबंधांत ओढली आहे. ' पुढें मात्र त्यांचा सत्यशोधकांशीं कांहीं संबंध आलेला नाहीं. एवढेंच नव्हे तर मराठे व इतर जाती यांच्या बद्दलचें त्यांचें कार्य त्यांनीं 'मराठा परिषदे-मार्फत' चालू केलें. त्या साठीं त्यांनीं १९०७ सालीं वऱ्हाडांत दौरा काढला होता.

## ( १२ ) सुधारक

सुधारकांत शास्त्रीबोवांचे पुढील लेख आले आहेत. आगरकरांच्या मृत्यूनंतर हा संबंध आला. ह्या दोघांचा परिचय होता असें वाटत नाहीं. मीं शोध केला पण पत्ता लागला नाहीं.

( १ ) शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत ( ३०-७-१९०२ ).
( २ ) शंकराचार्यांचा वेदांत ( १८-८-१९०२ ).
( ३ ) जिन्सीवाले व भागवत ( १९-५-१९०२ ).
( ४ ) विवाह व लग्न ( ८-६-१९०३ ).
( ५ ) राजा कालस्य कारणम् ( २२-६-१९०३ ).
( ६ ) शाळांतून धर्मशिक्षण ( २९-६-१९०३ ).
( ७ ) बौद्धधर्म काळोखच ( ३-७-१९०३ ).
( ८ ) बौद्धधर्म व ब्राह्मणी धर्म ( १३-७-१९०३ ).
( ९ ) मानवगृह्यसूत्र विवाहाचें पुच्छ (१० व १७-८-१९०३).
( १० ) धर्म आणि अधर्म ( १४-८-१९०३ ).
( ११ ) आपली संध्या ( १५-१२-१९०३ ).
( १२ ) मानवगृह्यसूत्र व मनुस्मृति ( २८-१२-१९०३ ).
( १३ ) समुदाय व व्यक्ति ( ३१-३-१९०४ ).
( १४ ) जुनें हवें कीं नको, नवें हवें कीं नको ( २५-४-१९०४ ).
( १५ ) इतिहास व नीति ( १४-६-१९०४ ).

## ( १३ ) ज्ञानप्रकाश

ज्ञानप्रकाशांत शास्त्रीबोवांचे कांहीं लेख व त्यांच्यावर टीका पण येत. पण मला जुन्या फायली पहायला मिळाल्या नाहींत. पुढें दिलेले उल्लेख तेवढें माहित आहेत.

( १ ) श्री शिवाजी महाराजांचें चरित्र ( ८-५-१९०५ ).
( २ ) विधवाविवाह ( १८-५-१९०५ ).

## ( १४ ) पुणें वैभव

मोरोपंतांच्या नलोपाख्यानाचें विवेचन, १८९३. हे लेख पहायला मिळाले नाहींत. ऐकून माहिती झाले.

## ( १५ ) विविधज्ञानविस्तार

विविधज्ञानविस्तार हें महाराष्ट्राचें चिरायु व श्रेष्ठ दर्जाचें आणि सार्थ नांवाचें मासिक. कोल्हापूरच्या ग्रंथमालेनें ह्याचा 'पुराण व पूज्य मासिक' म्हणून गौरव केलेला आहे. या मासिकानेंच शास्त्रीबोवांना लेखक म्हणून पुढें आणलें. टीकेच्या वावटळी त्यांच्या भोंवती उठत असतां, त्यांना वेळोवेळीं आधार दिला. या मासिकाची दीर्घकालीन चालक मंडळी स्वतः जातिभेदातीत असल्यानें शास्त्रीबोवांच्या लेखांमागची कळकळ त्यांस समजे. आणि त्यामुळेंच शास्त्रीबोवांच्या विरोधकांच्या टीकांना त्यांनीं उदार मनानें ह्या मासिकांत जागा दिली, तरी शास्त्रीबोवांच्या उत्तरांना तितकीच मोकळीक ठेवली. शास्त्रीबोवांनींही वीस वर्षांवर आपली लेखणी अव्याहत या मासिकाकरितां झिजवली. कांहीं कांहीं वेळां तर मासिकाचे कित्येक अंक केवळ त्यांच्याच लेखांनीं भरलेले दिसतात. शास्त्रीबोवांनीं अत्यंत विपत्कालांत ह्या मासिकाला सर्वांत तत्परतेनें हात दिला. त्यांच्या मृत्यूचा उल्लेख करतांना 'विस्तारानें' 'मराठी भाषेचा निःसीम भक्त, संस्कृत भाषेचा प्रोफेसर, कर्ता सुधारक, जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, मराठामंडळाचा कैवारी, विविधज्ञानविस्ताराचा पस्तीस वर्षांचा अकृत्रिम स्नेही" असे उद्गार काढले आहेत. ( जानेवारी १९०८ )

शास्त्रीबोवांच्या प्रतिभेच्या सर्व अवस्था, त्यांच्या जिज्ञासेच्या सगळ्या कक्षा या मासिकांत जशा दिसून येतात, तशा इतर ठिकाणीं दिसून येत नाहींत. या मासिकांतलें त्यांचें लिखाण इतकें विविध प्रकारचें आहे कीं त्यानें मन खरोखरीच थक्क होऊन जातें. विद्वत्ता ही शास्त्रीबोवांनीं सहज पेलून धरलेली वस्तु आहे, ती त्यांच्या आयुष्याचा एक भागच आहे हें या लेखांवरून स्पष्ट दिसून येतें. प्रतिस्पर्ध्यास आव्हानांत हार न जाणारी

त्यांची मर्द लेखणी येथें किती आवेशानें आणि तितक्याच धीमेपणानें चालते, हें पहावयास मजा वाटते. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे 'कैवारी तो सकल विविधज्ञानविस्तारकांचा' हें कै. हरि महादेव पंडित यांना उद्देशून रे. टिळकांनीं काढलेले उद्गार शास्त्रीबोवांस तंतोतंत लागू पडतात. शास्त्रीबोवांनीं 'विस्तारांत' १८७४ फेब्रुवारी पासून 'संक्षिप्त भारतवर्षीय दर्शन' ही लेखमाला संस्कृत 'सर्वदर्शनसंग्रहाच्या' आधारें लिहावयास सुरवात केली. त्यावेळीं त्यांचें वय २३ वर्षांचे होतें. १९०७ सालीं ऑक्टोबर महिन्यांत त्यांचा 'देव आणि असुर' हा शेवटला 'विस्तारांतला' लेख. एवढें मोठें निबंध-वाङ्मय निर्माण करणारे शास्त्रीबोवा लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक, आगरकर यांच्या खास तोलाचे लेखक होते यांत संशय नाहीं.

विस्ताराच्या कांहीं अंकांत शास्त्रीबोवांचे लेख अजिबात आलेले दिसत नाहींत. उदाहरणार्थ अनुक्रमें ९ ( १८७७ ), १० ( १८७८ ) ११ ( १८७९ ), १२ ( १८८० ), १३ ( १८८१ ), १४ ( १८८२ ) आणि ३१ ( १९०० ), ३२ ( १९०१ ), ३२ ( १९०२ ) व ३३ ( १९०३ ), ह्या सालीं त्यांनीं 'विस्तारांत' लेखन केलेलें दिसत नाहीं. पहिल्या पांच वर्षांच्या ह्या अवधींत त्यांनीं कांहींच लिहिलें कीं नाहीं व कां लिहिलें नाहीं तें कळत नाहीं. लेखनाच्या दृष्टीनें त्यांच्या आयुष्यांतला हा अज्ञात काळ आहे. कारण 'स्वयंवर' ही कादंबरी व 'हर्षचरित', फार काय, पण गोंडी भाषा ही लेखमाला देखील त्यांनीं अर्धवटच सोडली आहे. ती फिरून कधींच त्यांनीं हातीं धरलीं नाहीं. त्यानंतर त्यांनीं 'मराठेशाही' व 'विचारमाधुकरी' ह्या दोन मोठ्या लेखमाला १८८३ पासून अनुक्रमें 'एक मराठा' व 'एक भगवद्भक्त' या टोपणनांवांनीं सुरु केल्या. त्यांवर झालेला जाहीर पत्रव्यवहार मात्र ते आपल्या खऱ्या नांवानें चालवीत. टोपणनांव हें खरें नांव गुलदस्तांत ठेवून लेखणी स्वैर चालविण्याचें साधन म्हणून त्यांनीं वापरलें नाहीं तर टोपणनांवामुळें त्या त्या विषयावरील स्वतःची मनोवृत्ति प्रगट व्हावी व ती भक्तिपर वृत्ति

विनम्रपणेंच प्रगट व्हावी असा त्यांचा हेतु दिसतो. तेव्हां लेखामुळें होणाऱ्या टीकांना त्यांनीं सर्वदा बेडरपणें तोंड दिलें, तें जाहीर न्यायासनासमोर आरोपी प्रगट होऊन स्वतःवरचे दोषारोप जसा उघडपणें पदरीं घेण्यास तयार असूनही स्वतःची कैफियत साद्यंतलोकांपुढें ठेवतो, त्याच रीतीनें भाषांतरें, टांचणें, संशोधन, इतिहासकथन, चर्चा, वाङ्मयविवेचन इत्यादि तऱ्हेतऱ्हेचे विषय त्यांनीं अगदीं स्वतंत्र बाण्यानें 'विस्तारां'त दिले आहेत. 'विस्तारां'तले शास्त्रीबोवांचे सगळेच लेख थोडे दोष वगळले, तर मननीय आहेत. 'गोंडी भाषा' 'ज्ञानेश्वरी महासागरांतील बुड्या', 'आमचा देश, आमचे देशी लोक, आमची देशी भाषा ' ह्या लेखमाला तर मराठी भाषेंतली अमोलिक रत्नेंच समजलीं जावींत अशा योग्यतेच्या आहेत. त्यांच्या खालोखाल, ' विचारमाधुकरी, ' ' मऱ्हाठेशाही, ' ' मऱ्हाठ्यांसंबंधानें चार उद्गार ' ह्या लेखमाला विविधतेनें परिपूर्ण अशा आहेत. ' विचारमाधुकरी'बद्दल ' विस्तारा 'च्या संपादकांनीं पुढील उद्गार काढले आहेत. ' विचारमाधुकरीच्या संबंधानें आम्हांस इतकेंच सुचविणें आहे कीं यांतील विषय फार गंभीर व फार खोल विचाराचे आहेत, व चांगले मनन व परिशीलन केल्याविना सहज समजण्याजोगे नाहींत. हे विषय लिहिणाराला किती मनन, किती ग्रंथावलोकन, व किती शोध करावा लागला असेल व किती बुद्धि व विद्वत्ता खर्ची घालावी लागली असेल, व किती श्रम व घस सोसावी लागली असेल या गोष्टींचा विचार करून व विषय समजून घेऊन नंतर ज्यांस या विषयांवर प्रतिकूल लेख लिहावयाचे असतील त्यांनीं लिहावे. पण त्या योगें त्यांचेंच पाणी जोखलें जातें, ही गोष्ट मात्र तशा मंडळींनें विसरूं नये. ( पुस्तक २२, पृ, १०; जानेवारी–फेब्रुवारी १८९० ). Indian antiquary च्या धर्तीवर मराठींत पूर्ण स्वतंत्र विचारांनीं भरलेली अशी ही प्रचंड लेखमाला शास्त्रीबोवांनीं पहिल्यानेंच सुरू केली असें त्यांचे पहिले चरित्रकार श्री. देव यांनीं म्हटलें आहे. टीकेच्या रूपानें कां होईना पण मराठीवाचकांच्या मनांत त्यांनीं या गहन विषयांबद्दल कुतूहल उत्पन्न केलें. महाराष्ट्राच्या बुद्धीला व विचारांना जोराची चालना

दिली. आज त्यांचें हें लिखाण कालाच्या महिम्याप्रमाणें जरी सदोष ठरलें, तरी अशा तऱ्हेचें तडफदार, व्यासंगपूर्ण आणि ज्ञानाच्या तळमळीनें भरलेले स्वयंपूर्ण वाङ्मय कोणत्याही काळीं कोणत्याही भाषेला भूषण आहे. खालीं दिलेली सूची 'विस्तारा'च्या सूचीच्या आधारें पण सनवारीप्रमाणें बदल करून तयार केली आहे.

## ( १ ) तत्वज्ञान

( १ ) १८७४–१८७६ ; संक्षिप्तभारतवर्षीय दर्शन; ( १ ) चार्वाकदर्शन ( पुस्तक ६, पृ. २५ ); ( २ ) बौद्धदर्शन ( पृ. ४१ ), ( ३ ) अर्हत् किंवा जैनदर्शन ( पृ. ८१; १०१ ); (४) रामानुजदर्शन ( पृ. ८१ १०१ ); ( ६ ) निंबार्कदर्शन ( पृ. १०६ ); ( ८ ) पाशुपतदर्शन ( पृ. १२१ ); ( ९ ) तांत्रिक शैवदर्शन ( पृ. १४१ ); ( १० ) प्रत्यभिज्ञादर्शन ( पृ. १६१ ).

( २ ) १९०६; भगवद्गीतेंतील बुडग्या ( रा. रा. भा. यांच्या मूळ इंग्रजीवरून बा. ना. देव यांनीं केलेलें भाषांतर, पुस्तक ३६, पृ. ३८५ ).

## ( २ ) कविता

( ३ ) १८७५–१८७६; प्राचीनभरतखंडस्थिति ( पुस्तक ७, पृ. ५९ ; पुस्तक ८ , पृ. ३ )

## ( ३ ) कथा

( ४ ) १८७५–१८७६; कृत्रिमपणाचा व सरळपणाचा परिणाम ( पुस्तक ७, पृ. २०६ )

( ५ ) हर्षचरित ( भाषांतर; पुस्तक ७, पृ. १६३; १८५; २१४ पुस्तक ८, ३५, ६६ अपूर्ण. ) हें पुढें श्री. ल. रा. वैद्य यांनीं चालू केलें पण तेंही अपूर्ण राहिलें

( ६ ) स्वयंवर ( स्कॉटच्या टॅलिसमनचें भाषांतर; पुस्तक ७ पृ. २२१; पु. ८, पृ. ५; २८; ४९ अपूर्ण )

## ( ४ ) पुस्तक परीक्षण

(७) १८७४; शांकरदिग्विजयनाटक (पुस्तक ६, पृ. १२१; पुस्तक ७, पृ. २७; ४९ १८९५. )

(८) लक्ष्मीबाई झांशीकरीण १९०५;

(९) अलंकारशास्त्र (पुस्तक ३६; पृ. ४८१)

(१०) ऋग्वेदाचें मराठी भाषांतर (पुस्तक ३६, पृ. ४८५)

(११) १९०७ मोडी लिपीची सुधारणा (पुस्तक ३८, पृ. १९४

## (५) वैद्यक व आरोग्य

(१२) १८७६; अन्न (पुस्तक ८, पृ. २१)

## (६) पदार्थविज्ञान

(१३) १८७६; अस्मानी पाणी (पुस्तक ८, पृ. ४४)

## (७) भाषाशास्त्र

(१४) गोंडी भाषा (पुस्तक ८, पृ १, ४१ अपूर्ण)

(१५) १८८८ मराठी भाषेचें व्याकरण (पुस्तक २० पृ. ६६)

(१६) १८८९; १८९० 'दामोदर,' 'पोहरा' ह्यांच्या व्युत्पत्तीबद्दल गुंजीकरांचा लेख. (पुस्तक २१, पृ. १९२). त्याला उत्तर म्हणून भागवतांचा लेख. 'पोहरा' या शब्दाची व्युत्पत्ति गुंजीकरांच्या मतें 'पयोधर' या शब्दापासून आहे, तर भागवतांच्या मतें ती 'अपोहर' पासून आहे (पृ. २२, पृ. ४४, २८६).

(१७) मराठी भाषा व वाङ्मय; १८९१, १८९२, १८९३.

ज्ञानेश्वरी महासागरांतील बुड्या, (पुस्तक २३, पृ. ९५ ११९, १६८; पुस्तक २४, पृ. २३; ७२; १६८).

(१८) मोरोपंती भारत, मोरोपंती उतारे व संस्कृत मूळ (पुस्तक २४, पृ. २१४; पुस्तक २५, पृ. ४४).

(१९) १९०५, १९०६ मोडी लिपी (पुस्तक ३६, पृ. ४३३; पुस्तक ३७, पृ. ३९ श्री. बा. आ. गुप्ते यांचें पत्र व त्याला उत्तर (पुस्तक ३७, अंक ८ कव्हर, अंक ९ कव्हर).

(२०) साहित्यशास्त्र;

१८९२, काव्यमीमांसा, प्रकरण पहिलें, अलंकारमीमांसा, अर्थालंकार व शब्दालंकार ( पुस्तक २४, पृ. २५; ४९; ७३; ११०; १९३.

(८) प्राचीन संस्कृतिसंशोधन इतिहास व समाजशास्त्र

( २१ ) १८८३; १८८४; १८८५; १८८७; १८८८; १८९१;

विचारमाधुकरी

( १ ) शककालविचार ( पुस्तक १५, पृ. २५; ७३; पुस्तक १६, पृ. ६३; ६७ )

( २ ) वैष्णवमतविचार ( पुस्तक १५, पृ ९७, १९३ ),

( ३ ) त्रिमूर्तिविचार ( पुस्तक १५ पृ. २४१ )

( ४ ) दशावतार ( पुस्तक १६, पृ. १५, ७६ )

( ५ ) यदुक्षेत्र कोणतें, त्यांत ब्राह्मण आले केव्हां ( पुस्तक १६ पृ. ९७; १२१; १८७; २५९; पुस्तक १७, पृ. १४१; १८०; २०५; २२५; २४९. )

( ६ ) पंचजनविचार ( पुस्तक १८, पृ. १, २५; ५९; २२५; २५५; पुस्तक १९, पृ. ८९; १५७; २१७ )

( ७ ) यज्ञविद्येचें विशकलन ( पुस्तक २०, पृ. ९७; २१३; पुस्तक २३, पृ. १५४; १७७; १९३, २२४ )

'विचारमाधुकरी' चे पहिले चार विचार आल्यानंतर संपादकांनीं पुढील वर्षाच्या निबंधांसंबंधानें असें जाहीर केलें कीं 'या वर्षी चार विचार येऊन गेले आहेत, पुढील विचार येत्या सालच्या अंकांत येतील. या निबंधांत क्वचित् वादग्रस्त मतें येण्याचा संभव आहे. अशा मतांबद्दल योग्य चर्चा होणें रास्त आहे. या करितां त्या संबंधानें कोणी कांहीं शंका लिहून कळविल्यास त्यांचा नीट विचार केला जाईल असें आम्हीं 'भगवद्भक्तांच्या' वतीनें कळवितों. ( अंक ११-१२; १८८३ ) यानंतर वेगवेगळ्या विषयांवर झालेली चर्चा अधून मधून दिसून येते. त्यापैकीं 'एक शोधक' व शास्त्रीबोवा यांच्यामध्यें झालेली चर्चा फार मार्मिक असून शास्त्रीबोवांचीं उत्तरें समर्पक आहेत. एका साताहिकांत आलेल्या 'स्पष्टवक्ता

अभियोगी ' यांच्या टीकेलाही शास्त्रीबोवांनीं उत्तर दिलें आहे. मूळच्या टीकेंत दूरान्वयी मुद्दे अधून मधून आहेत. त्यामुळें उत्तरांतही विसंगति आलेली आहे. मात्र शास्त्रीबोवांनीं आपलीं मतें पटवून देण्याची शिकस्त केली आहे. ( पुस्तक १७, पृ. २१; इतर टीका व उत्तरें पृ. २९; ३३; ३६ ; ७८ )

( २२ ) १८९०–१८९३; आमचा देश, आमचे देशी लोक व आमची देशी भाशा—

१ आमचा देश—

( १ ) आमच्या देशाची चतुःसीमा ( पुस्तक २२, पृ. ८१ )

( २ ) आमचा देश आर्यावर्ताच्या बाहेर आहे ( पुस्तक २२ पृ. ८१ )

( ३ ) आमच्या देशाचे इलाखे व जिल्हे ( पुस्तक २२ पृ. ९८ )

( ४ ) आमच्या देशाचा राज्येतिहास ( पुस्तक २३, पृ. २५ )

२ आमचे देशी लोक—

( १ ) प्राक्शालिवाहनी काळांतील वसाहती ( पुस्तक २३, पृ. ( १२१

( २ ) शालिवाहनी काळांतील वसाहती ( पुस्तक २३; पृ. १२१ )

( ३ ) शालिवाहन काळाच्या पुढच्या वसाहती ( पुस्तक २३ पृ. १२२ )

( ४ ) कोंकण मंडळांतील लेखणीचे विविध अधिकारी ( पुस्तक २३, पृ. २१७; २४१; २६६ )

( ५ ) देशावरील लेखणीचे विविध अधिकारी ( पुस्तक २५, पृ. १६७; २०८ )

( ६ ) आमच्या मंडळांतील हत्याराचे व शेतकीचे विविध अधिकारी ( पुस्तक २५, पृ. २१६ )

( ७ ) आमच्या मंडळांतील व्यापाराचे विविध अधिकारी ( पुस्तक २५, पृ. २१६ )

( ८ ) धर्म, गांवगन्ना, व्यवस्था व राजसत्ता ( पुस्तक २५, पृ. २१७ २५९; अपूर्ण )

**पत्रोत्तरें: –** ( १ ) 'जुना ओळखीनें घेतलेले आक्षेप. यांत तात्विक वादापेक्षां भागवतांवर वैयक्तिक हल्लाच जास्ती चढविलेला आहे. त्यांत गुंजीकरांच्या 'सरस्वती मंडळा' चे पडसाद स्पष्ट उमटलेले आहेत. त्यावर शास्त्रीबोवांनीं 'जुना ओळखी व भागवत' म्हणून उत्तर देऊन त्यांत ऐतिहासिक बाबींचा खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. यांत वैयक्तिक उल्लेख किंवा अपशब्द मुळींच नाहींत. विवेचन मुद्यांना धरून व फार मोठें आहे. त्यांत प्रतिपक्षानें मुद्दे अधिक द्यावे म्हणून सूचना केली आहे (पुस्तक २२, पृ. ६९ ). त्यावर 'जुना ओळखी' नें भागवतांनीं 'सरासरी मुद्दे' काढून नुसती उडवाउडवी केली आहे. असें म्हटलें आहें, व फिरून वैयक्तिक हल्ला चढविला आहे. 'अनाद्यंत चऱ्हाट वळून तें उकलीत बसा म्हणून लोकांपुढें मांडावयाचें' असा टोमणा शेंवटीं मारला आहे. ( पृ. ११२ ).

( २३ ) **मराठेशाही** 'मराठेशाही' बद्दल १८८३, सालअखेर ह्या सदरांत, संपादकांनीं असें म्हटलें आहे कीं 'हल्लीं उपलब्ध झालेल्या मराठ्यांच्या संबंधाच्या ऐतिहासिक लेखांवरून विलायतेंतील प्रसिद्ध 'रिव्ह्यू'चे धर्तीवर 'मऱ्हाठेशाही' या सदराखालीं छत्रपति शिवाजी महाराजांचें चरित्र सादर करावयाचें आहे.

१८८४; १८८५; १८८७; १८८८; १८८९.

( १ ) शिवाजी ( पुस्तक १६ पृ. १; ३६; १५४; १९३; २२६, २४१; २६६ )

( २ ) संभाजी ( पुस्तक १७ पृ. २५; ८२; १६३; १९३ )

( ३ ) राजाराम ( पुस्तक १९, पृ. २४३ )

( ४ ) शिवाजी–दुसरा ( पुस्तक १९ पृ. २४३ )

( ५ ) उपसंहार पुस्तक २० पृ. ११२; १९३; २२५; पुस्तक २१ पृ. ४२; ७३; १४५ )

( २४ ) मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्गार ( पुस्तक १८ पृ. १; २५; ९२; अपूर्ण. पुढें पुस्तकांत हें पूर्ण झालें ).

पत्रोत्तरें; मऱ्हाठेशाही व मऱ्हाठ्यांसंबंधानें चार उद्गार या दोन्ही-वर मिळून कडाक्याचा वादविवाद झाला. तो थोडक्यांत असा—

( १ ) यादवाडकर व भागवत, हा सर्व पत्रव्यहार फार मनोरंजक आहे. त्यांत यादवाडकर पटवर्धन पेशव्यांचे अभिमानी असल्यामुळें त्यांच्या-वरचे आक्षेप पटवर्धनांना सहन झाले नाहींत. ( पुस्तक २१, पृ. ३११; पुस्तक २२; पृ ११३; २५४ )

( २ ) कालगांवकर व भागवत वाद; हा वाद कायस्थ प्रभूंच्या व्युत्पत्तिबद्दल असून चांगला आहे ( पुस्तक २१ पृ. २५९, २६३; पुस्तक २३, पृ. १३०; पुस्तक २४, पृ. ४२ )

( ३ ) तु अ. व भागवत ( पुस्तक २१ पृ. १६; पृ. १४३ )

( २५ ) कोंकणच्या संबंधानें चार शब्द ( पुस्तक २१. पृ १; २५; ९२ )

पत्रोत्तरें:- ( १ ) जुना ओळखीः— फिरून 'सरस्वती-मंडळाचा' प्रतिध्वनि. ( पुस्तक २१, पृ. १८६; ह्याला भागवतांनीं उत्तर दिलें नाहीं. त्यांचें एक पत्र पुढें पुस्तक २४, पृ. ४१ वर आलें आहे )

( २ ) पी. आणि भागवत ( पुस्तक २१, पृ. ६९, १४३)

( २६ ) १८९० १८९१; १८९३; १८९४; नादिरशहाची बखर ( अस्सल फारसी ग्रंथाच्या फ्रेंच भाषेंतील तर्जुम्याचा आमच्या देशी भाषेंत तर्जुमा; पुस्तक २२, पृ. १३२; १५२; २११, २८२; पुस्तक २३, पृ. ८५; २५०; २७२; पुस्तक २४, पृ. ९. १७६; २०६; २३५; पुस्तक २५, पृ. २८ अपूर्ण ).

( २७ ) १८९७; १८९८ फिरंग्यांची इकडील हकिगत ( डान्व-र्सच्या इंग्रजी ग्रंथाच्या आधारें; पुस्तक २९, पृ. २३; ७४; पुस्तक ३०, पृ. १५; ७३; १४५; ३०९ अपूर्ण ).

## ( ९ ) ज्योतिष

( २८ ) १८९४; १८९६ जुनाट ज्योतिष श्रुतींतलें ( पुस्तक २६; पृ. ४९; ९७; १४५; पुस्तक २८; पृ. १९३ अपूर्ण ).

( २९ ) १९०४; ब्राह्मणी व रोमी वर्ष ( हा लेख प्रथम बॉंबे गॅझेट मध्यें प्रसिद्ध झाला तो इंग्रजींतून. पुढें सयाजीराव गायकवाडांच्या आश्रयाखालीं स्वतंत्र पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाला. त्याचें मराठी भाषांतर कै. हरी वल्लाळ परचुरे यांनीं केलें. पुस्तक ३५; पृ. १७६ ).

## ( १० ) वैदिक व पौराणिक चर्चा

( ३० ) १८९४; १८९५; १८९६;

वेदार्थयत्नकारांचें स्मारक ( पुस्तक २६, पृ. १९३; २४१; पुस्तक २७, पृ. १; ४९; ९७; १४५; १९३; २४१; पुस्तक २८, पृ. ११; ६०; ९७; १४५ )

( ३१ ) १९०७; देव आणि असुर ( पुस्तक ३८, पृ. ३२५ )

## ( ११ ) धर्म व समाजशास्त्र

( ३२ ) १८९५; न मांसभक्षणे दोषः ( पुस्तक २७, पृ. २२८ )

( ३३ ) १८९७; स्त्रियांचा पुनरुद्वाह ( पुस्तक २९; पृ. ८४ )

( ३४ ) १८९७; चातुर्वर्ण्य ( पुस्तक २९, पृ. १५६; १६७; २०१ )

( ३५ ) १८९७; वपन व क्षत्रिय वैश्य ( पुस्तक २९;, पृ. ३१६; ३३५; ३६१ )

( ३६ ) १८९८; ब्राह्मणांचा स्वधर्म ( पुस्तक ३०, पृ. ६८; ११८ )

( ३७ ) १९०७ क्षत्रिय व ब्राह्मण ( पुस्तक ३८, पृ. १८५, २१३ )

## ( १२ ) पुस्तक परीक्षणें

( १ ) रत्नाकरपंत आपा, अहिल्याबाई होळकरीण, सिधोजी निपाणकर. पुस्तक चांगलें पण भाषा वाईट ( पुस्तक २२ पृ. ५८ )

( २ ) शिवछत्रपतीच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे ( स. देऊसकर ) शास्त्रीबोवांस पाठिंबा ( पुस्तक ६५ पृ. २५. )

( ३ ) भगवद्गीतेचें ग्रंथदृष्टया परीक्षण ( चिं. वि. वैद्य ) ही एक प्रखर पण मार्मिक टीका आहे. ' भगवतद्गीतेंतील बुड्यांवर ' हा साधार आक्षेप आहे. ( पुस्तक ३८ पृ. १५ )तरी पण ह्या टीकेंत वैद्य स्वतः परंपरेचे निःसीम भोक्ते असल्यामुळें पक्षपातीपणाचा भास वारंवार होतो.

## ( १६ ) ग्रंथमाला

ग्रंथमालेंत संस्कृतभाषेची विचिकित्सा व प्राकृत भाषेची विचिकित्सा ह्या दोन लेखमाला सन १९०० पूर्वी प्रसिद्ध झाल्या. पण मला जुन्या फायली मिळाल्या नाहींत; त्यामुळें जास्ती खल करतां येत नाहीं.

## (१७) धर्म

' धर्म ' हें साप्ताहिक कै. काशिनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले यांनीं संपादिलेलें एक साप्ताहिक वांईस निघत असे ( १९०३–१९१० ) शास्त्रीबोवा आणि भाऊशास्त्री यांची मतें किती परस्पर विरोधी होतीं याबद्दल थोडी माहिती मागें आलेलीच आहे. ' धर्मांत ' तीन उल्लेख शास्त्रीबोवांच्या बाबतींत मला आढळले ते असेः—

( १ ) ५–१०–१९०५ रोजीं ' ज्ञानोदय ' पत्रांत प्रार्थनासमाजांत सर्व जातींच्या ' स्पृश्यास्पृश्य मंडळींच्या प्रीतिभोजनाची हकिगत आलेली असून त्यांत भोजनांत भाग घेणारांची नांवें मुद्दाम जाहीर केली होतीं. राजारामशास्त्री भागवतांनीं ' प्रार्थनासमाज व महार ' मथळ्याखालीं ज्ञानोदयकर्त्यांचें अभिनंदन केलें. हा मजकूर धर्मामध्यें असा आहे कीं—रा. रा. भा. म्हणतात " आपला आजचा अंक पाहून फार फार आनंद झाला. धाकटे भांडारकर, चंदावरकर, धाकटे माडगांवकर, भाजेकर वकील, पंडित, गुप्ते...वगैरे प्रार्थनासामाजिकांनीं महारांच्या पंगतीस बसून त्यांस जाहीर पावन केल्याचें वाचतांच या सर्वांचीं तारिफ केल्याशिवाय राहवेना. मंडळी जी निरुपायानें नव्हती ती सगळी पुढच्या प्रीतिभोजनाचे प्रसंगीं जमेल व यंदाप्रमाणें महारांस जाहीर पावन करून घेण्यात पीछेहाट करणार नाहीं अशी आशा करितों. यंदाच्या प्रीतिभोजनांत मुस-

लमान गृहस्थ सय्यद अब्दुल होतेच. ... जातिभेदाची नांगी साफ मोडेल, तेव्हां ख्रिस्त्यांशीं व मुसलमानांशीं जाहीर दळणवळण शक्य होईल, राष्ट्रपणा येईल, ' राष्ट्रीय ' सभा नांव सार्थक होईल. " रा. रा. भा यांचे हे शब्द वाचून आम्हालाही त्यांचें अभिनंदन ' केल्याशिवाय राहवेना. '

यानंतर धर्मकार भविष्यपुराणांतील ' शूद्र ब्राह्मणाप्रमाणें आचरण करूं लागतील व ब्राह्मण शूद्रांप्रमाणें वागूं लागतील ' या वचनाचा अनुभव सांप्रत कसा येत आहे तें सांगून भाऊशास्त्री म्हणतात, ' सोडावाटर, ब्रँडी, इराण्याच्या दुकानांतील चहा, बिस्किटें, फ्रूटसाल्ट, कोको, चायना ग्रास ( रेनेट ), अंडीं इत्यादि पदार्थांना पोटांत घेणारे ब्रह्मकुलोत्पन्न सांप्रत जिकडे तिकडे पसरले आहेत. आणि श्रावण्या करणारे शूद्रकुलोत्पन्न ठिकठिकाणीं फडकण्याच्या बेतांत आहेत. " ( कलियुगविचार, १९–१०–१९०५ )

( २ ) कोल्हापूरच्या ' वेदोक्त ' प्रकरणांत मराठ्यांना क्षत्रिय लखून त्यांच्या मुंजी करण्यास शाहूमहाराजांच्या इच्छेप्रमाणें काशिनाथपंत ब्रह्मनाळकरांनीं आरंभ केला. त्यावेळीं करवीर व संकेश्वर या दोन्ही ठिकाणच्या जगद्गुरूंनीं ब्रह्मनाळकरांचा जाहीर निषेध केला. त्याला उद्देशून धर्मकार लिहितात— ' काशिनाथपंत ब्रह्मनाळकरांना जगद्गुरूंचें आज्ञापत्र प्रसिद्ध झाल्याप्रमाणें, जरी सांप्रत सर्वांनीं सोडलें आहे, तरी काशीकर कृष्णानंद त्यांचें पाठीराखे असून मुंबईतील राजारामपंत भागवतांचीही त्यांना कुमक होण्याचा संभव आहे. सांप्रत हे रा. रा. भा. मुंबईहून निघून बेळगांव मुक्कामीं मराठ्यांच्या मुंजी लावण्यांकरितां गेले असून द्विजेतर रा. आबाजी रामचंद्र सावंत ह्यांच्या घरीं उतरले आहेत व ह्यांचा भोजनादि व्यवहारही मराठ्यांच्या घरींच होत असतो असें कळतें. रा. रा. भा. सारख्यांची कुमक काशिनाथपंतांना झाल्यास फार उत्तम होईल, ह्यास्तव, जरी सर्वांनीं सोडिलें आहे, तरी रा. रा. भा. व कृष्णानंद या उभयतां पाठिराख्यांच्या मदतीनें ब्रह्मनाळकरांचे दिवस सुखानें निघण्यास आतां हरकत येणार नाहीं. ( पतित ब्रह्मनाळकर व कृष्णानंद, १७–५–१९०६)

( ३ ) ‘ नन्दान्तं क्षत्रियकुलं ’ इत्यादि वचनें ‘ कृपणांनीं ’ पुराणांत घुसडून दिली आहेत, असें राजारामशास्त्र्यांनीं ‘ मऱ्हाठ्यांसंबंधीं चार उद्गार ’ या पुस्तकांत म्हटलें आहे. मराठे क्षत्रिय आहेत यांत संशय नाहीं हें शास्त्रीबोवांचे म्हणणें ‘ वेडेपणाचें होय ’ असें धर्मकार म्हणतात. नंदांनंतर क्षत्रिय मुळीं उरलेच नाहींत, ते शूद्रांत मिळून गेले असें भाऊशास्त्र्यांचें म्हणणें आहे. गागाभट्टानें शिवाजीस गायत्री मंत्र दिला. शिवाजी जाधव म्हणजे यादव वंशांतला होता. या यादव वंशांतल्या रामचंद्र यादवाचा ‘ यदुवंशविलास ’ असा उल्लेख ज्ञानेश्वरांनीं केला आहे; त्यावरून राजारामशास्त्र्यांनीं जाधव वगैरे मराठ्यांस क्षत्रिय असें संबोधून त्यांना गायत्रीचा अधिकार आहे असें सांगितलें. ( ‘ क्षत्रियांची मूळची पायरी ’ या लेखांत ). त्यावर भाऊशास्त्र्यांनीं शिवाजी क्षत्रियेतर म्हणजे शूद्र होता असें प्रतिपादन करून मराठे हे त्यांच्या आडनांवाची जंत्री पाहिल्यास त्यांच्या देवकांवरून शूद्रच आहेत असें म्हटलें आहे.

( मराठे हे क्षत्रिय आहेत काय ? २८–६–१९०६. )

भाऊशास्त्र्यांच्या शास्त्रीबोवांबद्दलच्या आक्षेपांस ब्राह्मणेतरांनीं प्रत्यक्ष कृतीनें कसें उत्तर दिलें त्याचा वृत्तांत एके ठिकाणीं सांपडला, तो पुढें देत आहे.

कोल्हापुरांतल्या वेदोक्त प्रकरणांत शास्त्रीबोवांनीं जें कार्य केलें त्याचें वर्णन, श्री. बा. भु. पाटील बी. ए. एल् एल्. बी; वकील, सांगली, यांनीं “कै. राजारामशास्त्री भागवत व कोल्हापुरांतील एक प्रसंग” या आपल्या आठवणींत दिलें आहे ती अशी—

“१९०३।१९०४च्या सुमाराची गोष्ट. कदाचित् तें साल १९०४–१९०५ हि असावें. प्रस्तुत लेखक त्यावेळीं कोल्हापूर येथील राजाराम हायस्कुलांतील विद्यार्थी होता. कोल्हापुरांत ब्राह्मण ब्राह्मणेतरवाद थैमान घालीत होता. सामान्य मराठ्यांचेच काय पण छत्रपतींच्या राजवाड्यांतीलहि धार्मिक विधि वेदोक्त पद्धतीनें न करण्याच्या दुराग्रहाला कोल्हापूरचे

राजोपाध्ये पडले होते, व उलट वेदोक्त पद्धतीनेंच धार्मिक विधि करून घ्यावयाचा हा तर कै. शाहू छत्रपतींचा निश्चय होता.

कोल्हापुरास मराठा जातीच्या विद्यार्थ्यांकरितां एक विद्यार्थि—वसतिगृह आहे. तेथील विद्यार्थ्यांना गायत्री मंत्र शिकवावा असें त्या संस्थेच्या चालकांनीं ठरविलें. ठरलें. पण हा मंत्र शिकवणारा ब्राह्मण कसा मिळणार ? कै. राजारामशास्त्री भागवत यांचें या मंत्राबद्दलचें मत सर्वांनाच कळून चुकलें होतें. मराठा-विद्यार्थि-वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना हा मंत्र सांगण्यासाठीं शास्त्रीबुवांना कोल्हापुरास येण्याबद्दल निमंत्रण गेलें. कोल्हापूर येथील जुन्या राजवाड्यांतील श्रीभवानी देवीच्या मंडपांत सभा झाली. शास्त्रीबुवा व्याख्याते होते. विषयाचें नांव नक्की आठवत नाहीं. एवढा मोठा सभामंडप पण तो श्रोत्यांनीं चिकार भरून गेला होता. हिंदु पुराणांतील भाकडकथांवर अर्धा पाऊण तास शास्त्रीबोवांनीं झोड उठवली सभेस हजर असलेल्या सनातन्यांत — विशेषतः ब्राह्मणांत — चुळबुळ सुरूं झाली. पण सभेंत उघड विरोध करण्याची कोणाची छाती झाली नाहीं. द्वारका नगरीचें क्षेत्र, यादवांची संख्या, प्रत्येक यादवाच्या देहाची उंची व रूंदी यांबद्दल शास्त्रीबोवांनीं पुराणांतील उतारे देऊन असें दाखविलें, कीं इतक्या यादवांना द्वारकानगरीच्या क्षेत्रांत एकमेकांस चिलगुन उभे राहतां येणें अशक्य. मग राहण्या झोपण्याची गोष्ट दूरच. शास्त्रीबोवा श्रीभवानीसमोर उभे राहून व्याख्यान देत होते. सभामंडपाच्या उत्तरभागांत एक उतारवयाचे ब्राह्मण हे व्याख्यान ऐकत होतें. या पुराणांतरीं वर्णिलेल्या कथा भाकडकथा आहेत, त्या असत्य आहेत, विश्वासाला पात्र नाहींत. सबब त्यांवर विश्वास ठेवूं नका इत्यादि भाषण ऐकून या उतार वयाच्या ब्राह्मणाच्या पोटांत मळमळूं लागलें. तो देहभान विसरला. स्वारी आपलें उपरणें सावरीत सावरीत उठली. मी आपल्या इतर स्नेह्यांसमवेत या स्वारीच्या मागें उभा राहूनच भाषण ऐकत होतों. मला वाटलें स्वारी विरोध करणार ! सभेंत गलबला होऊन मोठी मौज येणार ! परंतु माझी इतरांबरोबर निराशा झाली. स्वारी उठली व "माझें नशीब ! नशीब ! नशीब ! ! ! म्हणून कपा-

ळावर त्रिवार हात मारून आपल्या जागीं बसली. सभागृहांत थोडा हंशा पिकला व शास्त्रीबोवांचें व्याख्यान पुरें झालें.

या प्रसंगीं मराठा विद्यार्थ्यांना गायत्रीमंत्र शिकविला, ब्राह्मण व हिंदुधर्मीय पुराणें यांच्यावर हल्ला चढवून अंधभक्तांच्या डोळयांत चरचरीत अंजन घातलें, ब्राह्मणेतरांत माणुसकीची जागृति केली. आपणांस जें जें ठावें होतें तें तें इतरांना सांगून कोल्हापुरास रामराम केला. त्या सभाप्रसंगीं पाहिलेली शास्त्रीबोवांची देहयष्टि व नशिबाला बोल लावून कपाळाला त्रिवार हात लावणारा ब्राह्मण यांचीं चित्रें अद्याप दृष्टीआड झालेलीं नाहींत. " ( महाराष्ट्र–साहित्यपत्रिका, एप्रिल, १९४० )

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
अनुक्रम 47996 वि. निबंध
क्रमांक 2605 नों. दि. 23/4/60

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## राजारामशास्त्री भागवतांवरील चरित्रात्मक वाङ्मय

( १ ) कै. राजारामशास्त्री भागवत :– कै. बाळकृष्ण नारायण देव; विविधज्ञानविस्तार, १९०९

( २ ) कै. राजारामशास्त्री भागवत, श्री. माधव हणमंत घोरपडे, ज्ञानप्रकाश १९०८

( ३ ) Prof. R. R. Bhagvat by V. V. Nowrange, ( Indian Social Reformer ) १९०९

( ४ ) राजारामशास्त्री भागवत ( व्यक्तिचित्र व वाङ्मयविवेचन ) दुर्गा भागवत, स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई ४; १९४८

( ५ ) धनुर्धारी साप्ताहिक, राजारामशास्त्री भागवत खास अंक, जानेवारी १९४९

( ६ ) साधना साप्ताहिक, धर्ममूर्ति राजारामशास्त्री भागवत, लेखक, साने गुरुजी; ३–१–१९४९.

## मृत्युलेखांची नोंद

टाइम्स ऑफ इंडिया; ६-१-१९०८

इंडियन सोशल रिफॉर्मर; जानेवारी १९०८

हिंदी पंच; ८-३-१९०८

सेंट झेविअर कॉलेज मॅगझिन्;

सुबोधपत्रिका; ५-१-१९०८

केसरी; ७-१-१९०८

इंदुप्रकाश; ४-१-१९०८

काव्यसंग्रह; फेब्रुवारी १९०७

मराठामित्रः फेब्रुवारी.

दीनबंधु, ११-१-१९०८

सुधारक; ६-१-१९०८

बाळबोध; फेब्रुवारी, १९०८

ज्ञानप्रकाश; ६-१-१९०८

विविधज्ञानविस्तार; जानेवारी, १९०८

---

शास्त्रीबोवांची जन्मतारीखः- ११ नोव्हेंबर १८५१.

---

## दुय्यम संदर्भ साहित्य

मागें दिलेल्या शास्त्रीबोवांच्या व इतर साहित्याखेरीज हा लेखसंग्रह तयार करण्यास पुढील साहित्य उपयोगीं पडलें.


( १ ) विष्णु कृष्ण चिपळुणकर यांचें चरित्र,
लेखक, लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर, ( पुणें १८९४ )

( २ ) निबंधमाला, २ री आवृत्ति ( चित्रशाळा, पुणें १९१९ )

( ३ ) गोपाळ गणेश आगरकर यांचें चरित्र,
लेखक, माधव दामोदर आळतेकर, ( मुंबई १९३० )

( ४ ) संपूर्ण आगरकर, भाग १, २;
संपादक, माधव दामोदर आळतेकर, ( पुणें, १९३७,१९३८ )

( ५ ) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचें चरित्र, भाग, १, २, ३;
लेखक, नरसिंह चिंतामण केळकर, ( पुणें १९२३, १९२८ )

( ६ ) लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १ व २, पुणें

( ७ ) शिवराम महादेव परांजपे यांचे काळांतील निवडक निबंध, भाग १–८ ( पुणें १९४६–४७ )

( ८ ) रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख, भाग १ ( मुंबई १९४२ )

( ९ ) न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र,
लेखक, नरहर रघुनाथ फाटक ( मुंबई, १९२४ )

(१०) इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे चरित्र,
लेखक, भास्कर वामन भट, ( धुळें १९४७ )

(११) इतिहासाचार्य राजवाडे, लेखक साने गुरुजी ( पुणें १९४७ )

(१२) वि. का. राजवाडे यांच्या ऐतिहासिक प्रस्तावना, भाग १, ( पुणें १९२८ )

(१३) महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी,
लेखक, गंगाधर बाळकृष्ण सरदार, ( पुणें १९४१ )

(१४) अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक, भाग १, २, ३;
लेखक, गंगाधर देवराव खानोलकर, ( मुंबई, १९३०, १९३८, १९४९ )

(१५) मराठी गद्याचा इंग्रजी अवतार,
लेखक, दत्तो वामन पोतदार, ( पुणें १९२२. )

(१६) आत्मवृत्त, घोंडो केशव कर्वे ( पुणें, १९२८ )

(१७) श्रीधर गणेश जिनसीवाले यांचें चरित्र,
लेखक, नारायण कृष्ण गद्रे ( मुंबई, शके १८२५ )

(१८) महाराष्ट्रीय ज्ञानकोश,
संपादक, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ( पुणें १९१६-१९२९ )

(१९) महाराष्ट्रीय शब्दकोश भाग १–७
संपादक, यशवंत रामचंद्र दाते व चिंतामण गणेश कर्वे ( पुणें १९२८–३७ )

(२०) निबंधसंग्रह, लेखक, लोकहितवादी ( इंदुप्रकाश, मुंबई, १८८४ )

# सूचि


अनंत भट्ट ७३
आंध्र ८०
आर्यसमाज १८२
आर्यावर्त ८२, ८३
इब्राहीम गारदी ७२
उडिसा ८३
करवीर ८९, ९०
कऱ्हाड ८९
कलचुरे ८७
कलियुग २१७
कलिंग ८०
कायस्थ ५०
कालिदास १५४
कुडाळ ८९
कुंतल ८८
केरल ८१
कोंकण ८५, ८६, ९८, ९९
कोंकणी बोली २०७
कोळवण ८५
कोळी ९३, ९४
खानदेश ८६, ८७
ख्रिस्ती १६३
ख्रिस्ती धर्म २०८
गणेशोत्सव १३१, १६८
गागाभट्ट ४९
गुजर प्रतापराव ६९
गुजराथी-मराठी २१४
गोंड ९२
गोंडवन ८५
गोंडी गीतें ३५
गोंडी रिवाज ३७
गोंडी भाषा २८, ३२, ३४
गोपिकाबाई १९९
गोमंतक ८९
घोरपडे संताजी ६७, ६९
चालुक्य ८१
चिमणाजी आप्पा ६९
चोखामेळा संत ७३
चोखामेळे (महार अथवा अस्पृश्य या अर्थी) २१२
चेंबर्स १२५

जातिभेद नको, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, १६७, १६९
जातिमत्सर २०३
जाधव धनाजी ६४, ६७, १०४
जिजाबाई १९९
जैन २०८
टिळक रेवरंड २०७
ठाकुर ९४
डफ ग्रँट ६७
ताराबाई १०५
तेलंगण ८०
यस्यू ८३
दीनबंधु ७३
दुधाचे पदार्थ ( यीस्ट = सुराबीज, केसीन = सांतानिक, फरमेंटेशन-संधान ) २५–२८
देशी भाषा १०१, ११६
देशबंधुत्व २११
धनगर ८८
धर्म २१३, २१४
धर्मभाषा ११२
धर्मशिक्षण १८८
नन्दान्तं क्षत्रियकुलं ४८, ४९
नॅशनल कॉंग्रेस ४३
नर्मदा ७९, ८५, ८७
नानासाहेब ( बंडवाले ) १११
निजाम ७०
पदमजी बाबा २०७
परशुराम त्रिंबक ६४
परांजपे रँग्लर १५८
पौराणिकांची लटपट १४३
प्रभु ५०
प्रल्हादपंत ७१, ७४
प्राचीन भरतखंडस्थिति १
फार्सी भाषा १००, १०१
फिरंगोजी नरसाळा ६८
बदामी ८१
बाजीराव ( पहिले, ) ६९, ७२
बाळाजी विश्वनाथ ( पेशवे ) ६४, ६५, ७९
बाप्तिस्मा १६३
बी. ए. ची परीक्षा १२४
ब्रह्मद्वेष ७३, ७४
ब्राह्मणब्राह्मणेतर वाद १९८
ब्राह्मणी धर्म ७७, ७८, १७६
ब्राह्मणशाही ६९
भागवत धर्म ११५, २०८
भाटवडेकर सर भालचंद्र १५९
भोंसले परसोजी १०३
भोंसले रघोजी ७७
भिल्ल ९२
मगध ८३
मलय ७९, ८०

मराठ्यांचा लुटारुपणा ६६
मऱ्हाठा शब्दाची व्युत्पति ६०
मराठीचा विद्यापीठांत प्रवेश १०२
महार ९०, १६१
मांग ९२
मांसभक्षण १३३
मुक्ताबाई ५७, ५९
मुकुंदराज ११३, ११४
मुंज बायकांची १४९
मुंज मराठ्यांची ५०
मुंज सुतारासोनारांची १५१
मुसलमान १६२, १६३
मुसलमानी धर्म १६७
मुरारबाजी ६८
मेहेंदळे बळवंतराव ७२
मोडक रावसाहेब १०२
मोहिते ६९
रमाबाई पंडिता १३०, ५८,१
१६७
राज्यक्रांति २१६
राजाराम छत्रपति ७४
रानडे न्यायमूर्ति १०२
रामचंद्रपंत ६४, ६८, ७०, १०५,
१०६
रामशास्त्री ( प्रभुणे ) १६५
रामदेवराव ७१, १२०
रावबाजी ६८
लग्न १९४, १९६
लक्ष्मीबाई झांशीकरीण १११
लाट ८८
वऱ्हाड ८८
वारळी ९३
विधवाविवाह १६५
विवाह १९४
विद्यारण्य १५४
विद्यासागर १६१
विठ्ठलपंत ५२, ५५
वैश्य ५०, ५१, ५२
शकुंतला २१६
शंकरजी १०४, १०५
शंकराचार्य ४२,११६,११७, ११८
शाहू ६४, ६५, ७२, १०३, १०४
शिवाजी ४२,४८,४९, ६६, १२७
शिंदे जनकोजी ७२
शिक्षण १२८
शिक्षण इंग्रजी १४६
श्रीनिवासराव ६५, ६६
सत्यशोधक समाज ७३
सुंग ८०
सुधारक १८३-८४
सुंता १६३
स्तेफेन्स फादर २०८

स्वधर्मानें चालणारा ब्राह्मण १५७
सोपार ८८
हिंदु १८२, २००, २०१
हिंदुधर्म ७७, ७८, १७६, २००, २०१
हिंदुमुसलमान १२८, १३१
हिंसायज्ञ २१२
हेमाडपंत ७१, ११५, १२०
होळकर मल्हारराव ७२
क्षत्रिय ५०
ज्ञानेश्वर ५४, ५९, ११५, ११७, ११८
ज्ञानेश्वरी ९६

REFBK-0007382

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्रत
अनुक्रम ७१११६ दि: १७.८.९१
क्रमांक १८०५ नोंद दि: २३।६।२००